परिवर्तन
Competitive Forum

भारतीय राज्यव्यवस्था

Class Notes

-अभिजीत राठोड



बॅचचे ठिकाण :
श्री चिंतामणी बिल्डींग (दुसरा मजला), न्यु इंग्लिश स्कूल समोर, ज्ञानप्रबोधिनीच्या पाठीमागे, टिळक रोड, सदाशिव पेठ, पुणे.

मुख्य कार्यालय :
उत्तम मोती बिल्डिंग (दुसरा मजला), नागनाथपार-शनिपार रोड, रमेश डाईंग जवळ, सदाशिव पेठ, पुणे 30.

9272100500

राज्यव्यवस्था अभ्यासक्रम

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

1. भारताची राज्यघटना

- घटना निर्मिती
- घटनेची ठळक वैशिष्ट्ये
- सरनाम्याचे तत्त्वज्ञान-(धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी आणि समाजवादी)
- मूलभूत हक्क आणि कर्तव्ये
- राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे. मोफ आणि अनिवार्य शिक्षण, एकसमान नागरी कायदा, आणि मूलभूत कर्तव्ये
- केंद्र, राज्य संबंधी आणि नवीन राज्यांची निर्मिती
- स्वतंत्र न्यायसंस्था
- घटनादुरुस्ती पद्धत आणि घटनेच्या महत्त्वाच्या दुरुस्त्या
- घटनेचा अन्वयार्थ लावण्यासाठी महत्त्वाच्या / ठळक खटल्यांचे निकाल
- महत्त्वाचे आयोग आणि मंडळांची रचना व कार्ये : निवडणूक आयोग, संघ आणि राज्य लोक सेवा आयोग, राष्ट्रीय महिला आयोग, मानवाधिकार आयोग, राष्ट्रीय अल्पसंख्यांक अनुसूचित जाती व जमाती आयोग-नदी जल विवाद निवारण मंडळ इत्यादी

परिवर्तन Competitive Forum

2. राजकीय व्यवस्था (सरकारांची रचना, अधिकार आणि कार्ये)

- भारतीय संघराज्याचे स्वरुप-संघ व राज्य कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायव्यवस्था
- केंद्र-राज्य संबंध: प्रशासकीय, कार्यकारी आणि वित्तिय संबंध. कायदेविषयक अधिकारांचे वितरण, विषय.

1) केंद्र सरकार

- केंद्रीय कार्यकारी मंडळ: राष्ट्रपती-उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि मंत्रीमंडळ- महान्यायवादी- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक

2) केंद्रीय कायदेमंडळ

- संसद अध्यक्ष आणि उपाध्यक्ष, संसदीय समित्या, संसदेचे कार्यकारी मंडळावर नियंत्रण

3) न्यायव्यवस्था

- न्यायव्यवस्थेचे संघटन-एकात्मिक न्यायव्यवस्था-कार्ये- सर्वोच्च न्यायालया आणि उच्च न्यायालय यांची भूमिका व कार्ये- कनिष्ठ न्यायालये
- लोकपाल, लोकायुक्त आणि लोक न्यायालय
- घटनात्मक व्यवस्थेचा संरक्षणकर्ता म्हणून न्यायव्यवस्थेची भूमिका- न्यायालयीन सक्रियता, जनहित याचिका

3. राज्य शासन आणि प्रशासन (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह)

- महाराष्ट्र राज्याची निर्मिती आणि पुनर्रचना
- राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्रीमंडळ
- मुख्य सचीव, राज्य सचिवालय, संचनालये
- विधानसभा, विधान परिषद-अधिकार, कार्ये आणि भूमिका-विधीमंडळ समित्या
- मुंबईचे शेरीफ

4. जिल्हा प्रशासन

- जिल्हा प्रशासनाची उत्क्रांती
- जिल्हाधिकाऱ्यांची बदलती भूमिका: कायदा व सुव्यवस्था, कार्यकारी विभागांशी संबंध
- जिल्हा प्रशासन आणि पंचायत राज संस्था
- उप-विभागीय अधिकाऱ्यांची भूमिका व कार्ये

5. ग्रामीण आणि शहरी स्थानिक शासन

- घटनेच्या 73 व 74 व्या घटनादुरुस्तीचे महत्त्व
- स्थानिक शासनाचे सबलीकरण आणि विकासात त्यांची भूमिका

1. ग्रामीण स्थानिक शासन

- जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्राम पंचायत यांची रचना, अधिकार आणि कार्ये
- महाराष्ट्रातील पंचायत राज संस्थांची वैशिष्ट्ये, पंचायत राज संस्था आणि त्यांच्या निष्पादन मूल्यांकनाबाबतचा सध्यस्थिती अहवाल
- 73 व्या घटनादुरुस्तीची प्रमुख वैशिष्ट्ये. अंमलबजावणीच्या समस्या
- प्रमुख ग्रामीण विकास कार्यक्रम आणि त्याचे व्यवस्थापन

2. शहरी स्थानिक शासन

- महानगर पालिका, नगर परिषदा आणि कटक मंडळे यांची रचना व कार्ये: रचना, अधिकार, संसाधने, अधिकार, कार्ये आणि नियंत्रणे
- 74 व्या घटनादुरुस्तीची प्रमुख वैशिष्ट्ये: अंमलबजावणीच्या समस्या
- प्रमुख शहर विकास कार्यक्रम आणि त्याचे व्यवस्थापन

6. शिक्षण व्यवस्था

- राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे आणि शिक्षण
- वंचित गटांच्या शैक्षणिक समस्या: अनुसूचित जाती, जनुसूचित जमाती, मुस्लिम आणि स्त्रिया
- शिक्षणाचे खाजगीकरण-शिक्षणास प्रवेश, मेरिट, गुणवत्ता, आणि सामाजिक न्याय यांच्याशी संबंधित मुद्दे
- सेवा व्यापारविषयक सामान्य करार (GATS) आणि नवीन मुद्दे
- उच्च शिक्षणातील सध्यकालीन आव्हाने
- सर्व शिक्षा अभियान, माध्यमिक शिक्षा अभियान

परिवर्तन Parivartan Competitive Forum

7. पक्ष पद्धती आणि दबाव गट

- पक्षपद्धतीचे स्वरुप- रा ्ीय भूमिका-विचारसरणी, संघटन आणि निवडणुकींमधील निष्पाद
- राजकीय पक्ष आणि त्य चे सामाजिक आधार
- प्रादेशिकवाद- प्रादेशि पक्षांचा उदय, विचारसरणी, संघटन आणि निवडणूकींमधील संघटन
- महाराष्ट्रातील प्रमुख दबाव गट आणि स्वारसय गट- धोरण निर्मितीतील त्यांची भूमिका व प्रभाव
- महाराष्ट्रातील सामाजिक कल्याणाचे कार्यक्रम : स्त्रिया व मुले, कामगार आणि तरूण
- गैर शासकीय संघटना आणि समाज कल्याणातील त्यांची भूमिका

8. प्रसार माध्यमे

- प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमे-त्यांचा धोरण निर्मिती, जनमत तयार करणे आणि लोक शिक्षण यांवरील प्रभाव
- भारतासारख्या धर्मनिरपेक्ष लोकशाहीमध्ये जनसंपर्क माध्यमांसाठी आचारसंहिता
- मुख्य प्रवाहातील जलसंपर्क माध्यमांमध्ये स्त्रियांचे प्रदर्शन : तथ्ये आणि मापदंड
- वाचा /भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य, आणि त्यांच्या मर्यादा

9. निवडणूक प्रक्रिया

- निवडणूक प्रक्रियेची महत्त्वाची वैशिष्ट्ये-एक सदस्यय प्रादेशिक मतदारसंघ. दुर्बल घटकांसाठी आरक्षित मतदारसंघ- प्रौढ मतदारसंघ
- निवडणूक आयोगाची भूमिका
- सार्वत्रिक निवडणूका-प्रमुख कल
- मतदान वर्तनाचे स्वरूप-आणि मतदान वर्तनास प्रभावित करणारे घटक-मुक्त व न्याय्य मतदान घडवून आणण्याच्या प्रक्रियेतील समस्या व आडचणी
- निवडणूक सुधारणा. इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन्स

10. प्रशासकीय कायदा

- कार्यघाचे राज्य. प्रशासकीय निर्णय आणि त्याचे नियंत्रण आणि न्यायिक पुनर्विलोकन
- प्रशासकीय न्यायाधिकरणे, त्यांची स्थापना आणि कार्यपद्धती, नैसर्गिक न्यायाची तत्त्वे

11. केंद्रीय आणि राज्य शासन अधिकार

- इंडियन एव्हिडन्स ॲक्टचे कलम 123.
- ऑफिशिअल सिक्रिट्स ॲक्ट, महितीचा अधिकार आणि त्याचा ऑफिशिअल सिक्रिट्स ॲक्टवरील प्रभाव

12. समाज कल्याण आणि सामाजिक विधीनियम

- सामाजिक विधीनियम: सामाजिक बदलाचे एक साधन, मानव अधिकार
- स्त्रियांचे संरक्षण, पुढील कायद्यांतर्गत: भारतीय घटना, फौजदारी कायदा (CrPc), कौटुंबिक हिंसाचार (थोपवणूक) कायदा, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार थोपवणूक) कायदा, 1989 आणि माहितीचा अधिकार कायदा, 2005

13. सार्वजनिक सेवा

- अखिल भारतीय सेवा, घटनात्मक स्थिती, भूमिका आणि कार्ये
- केंद्रीय सेवा: स्वरुप आणि कार्ये
- राज्य सेवा आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग
- प्रशासनाच्या बदलत्या संदर्भात प्रशिक्षण, यशदा, लाल बहादूर शास्त्री अकॅडेमी आफ ॲडमिनिस्ट्रेशन, सरदार वल्लभभाई पटेल नॅशनल पोलीस अकॅडेमी

14. सार्वजनिक खर्चावरील नियंत्रण

- संसदीय नियंत्रण, लोक अंदाज समिती, लोकलेखा समिती, सार्वजनिक निगम समिती
- भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांचे कार्यक्रम
- मौद्रिक आणि राजकोषिक धोरणामध्ये वित्त मंत्रालयाची भूमिका
- महाराष्ट्राचे महालेखापाल यांची रचना व कार्ये

15. कायदे

1. पर्यावरण संरक्षण अधिनियम, 1986 : उद्देश, यंत्रणा आणि त्यातील उपाय.
2. ग्राहक संरक्षण कायदा, 1986 : व्याख्या, ग्राहक तक्रार निवारण यंत्रणा.
3. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005: आवेदकाचे अधिकार, सरकार अधिकाऱ्याची कर्तव्ये, माहितीचे अपवाद.
4. माहिती तंत्रज्ञान अधिनियम -2000 (सायबर लॉ): व्याख्या-अधिकार-गुन्हे
5. भ्रष्टाचार थोपवणूक अधिनियम: उद्देश आणि यंत्रणा आणि त्यातील उपाययोजना
6. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार थोवणूक) अधिनियम, 1989 : उद्देश, यंत्रणा आणि त्यातील उपाययोजना.
7. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार थोपवणूक) नियम, 1995: उद्देश, यंत्रणा आणि त्यातील उपाययोजना.
8. नागरी अधिकार संरक्षण अधिनियम, 1955 : उद्देश, यंत्रणा आणि त्यातील उपाययोजना.

16. आंतरराष्ट्रीय संबंध व संघटना

परिवर्तन Competitive Forum

- अभिजीत राठोड

मानव संसाधन विकास व मानवी हक्क

अभ्यासक्रम (मानव संसाधन विकास)

1.1 भारतातील मानव संसाधन विकास

- भारतातील लोकसंख्येची सध्यस्थिती सद्यस्थिती-संख्यात्मक बाजू (आकार, वाए, लिंग, वय, शहरी आणि ग्रामीण) आणि गुणात्मक बाजू (शिक्षण व आरोग्य)
- लोकसंख्या धोरण आणि 2050 पर्यंतचा अंदाज
- आधुनिक समाजात मानव संसाधन नियोजनाचे महत्त्व आणि गरज
- मानव संसाधन नियोजनातील अंतर्भूत घटक
- भारतातील बेरोजगारीचे स्वरुप, प्रकार आणि समस्या
- भारतातील रोजगाराचे कल, विविध क्षेत्रे व प्रदेशांतील कुशल मनुष्यबळाच्या मागणीचा अंदाज
- मनुष्यबळाच्या विकासात गुंतलेल्या शासकीय आणि स्वयंसेवी संस्था. उदा. NCERT, NIEPA, UGC, NCERT, NIEPA, UGC, मुक्त विद्यापीठे, AICTE, NICTE, ITIs, NCVT, IMC.
- मनुष्यबळ विकासाशी संबंधित समस्या आणि मुद्दे
- शासकीय रोजगार धोरण, बेरोजगारी आणि कमी प्रतीची बेरोजगारी कमी करण्यासाठी विविध योजना.

1.2 शिक्षण

Art-21 (A), Art-45

- शिक्षण, मनुष्य बळ विकास आणि सामाजिक बदलाचे एक साधन
- भारतातील शिक्षण पद्धती (पूर्व-प्राथमिक ते उच्च शिक्षण)
- समस्या व मुद्दे (शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, शिक्षणाचे व्यावसायीकीकरण, गुणवत्ता सुधार, गळतीचा दर इत्यादी)
- मुली, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या वंचित गट, अपंग, अल्पसंख्यांक, प्रज्ञा शोध इत्यादींसाठी शिक्षण.
- शिक्षणासाठी सरकारी धोरणे, योजना व कार्यक्रम
- औपचारिक, अनौपचारिक आणि प्रौढ शिक्षणाचे प्रवर्तन, नियमन आणि पाहणी करण्यात गुंतलेल्या शासकीय व स्वयंसेवी संस्था
- ई-शिक्षण
- भारतीय शिक्षणावर जागतिकीकरण आणि खाजगीकरणाचा प्रभाव
- राष्ट्रीय ज्ञान आयोग, राष्ट्रीय उच्च शिक्षण आणि संशोधन आयोग, IITs, IIMs, आणि NITs

1.3 व्यावसायिक शिक्षण

Skill Development.

- मनुष्यबळ विकासाचे एक साधन
- व्यावसायिक/तांत्रिक शिक्षण- भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील सद्यस्थिती, व्यवस्था आणि प्रशिक्षण
- सरकारी धोरणे, योजना आणि कार्यक्रम-समस्या, मुद्दे आणि ते दूर करण्यासाठी प्रयत्न
- व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षणाचे प्रवर्तन, नियमन व मूल्यांकनात सहभागी संस्था.

1.4 आरोग्य

काही भाग मार्गदर्शक तत्वात, काही भाग नोट्समध्ये

- मनुष्यबळ विकासाचा एक महत्त्वाचा आणि प्रमुख घटक
- महत्त्वाची आकडेवारी
- जागतिक आरोग्य संघटना (WHO)-उद्दिष्ट्ये, संरचना, कार्ये आणि तिचे कार्यक्रम
- सरकारी आरोग्य धोरणे, योजना आणि कार्यक्रम
- भारतातील आरोग्य सेवा व्यवस्था
- आरोग्यसेवेशी संबंधित समस्या आणि मुद्दे आणि ते दूर करण्यासाठी प्रयत्न
- जननी बाल सुरक्षा योजना, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

1.5 ग्रामीण विकास

पंचायत राज

- पंचायत राज व्यवस्थेचे सबलीकरण
- ग्राम पंचायत आणि ग्रामीण विकासातील तिची भूमिका
- भूमी सुधारणा आणि विकास
- ग्रामीण विकासात सहकारी संस्थांची भूमिका
- ग्रामीण विकासात सहभागी वित्तीय संस्था
- ग्रामीण रोजगार योजना
- ग्रामीण पाणी पुरवठा आणि स्वच्छता कार्यक्रम
- ग्रामीण भागातील पायाभूत संरचना विकास उदा. ऊर्जा, वाहतूक, गृहनिर्माण आणि संपर्क व्यवस्था
- राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (NREGs)

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

अभ्यासक्रम (मानवी हक्क)

2.1 वैश्विक मानवाधिकार घोषणा (UDHR 1948)

मूलभूत हक्काची ऐतिहासिक पार्श्वभूमी

- आंतरराष्ट्रीय मानवाधिकार मापदंड/मानके, त्यांचे भारतीय राज्यघटनेतील प्रतिबिंब, भारतातील मानवाधिकार अंमलबजावणी व संरक्षण व्यवस्था
- भारतातील मानवाधिकार चळवळ
- मानवाधिकारांच्या वंचिततेशी संबंधित काही समस्या उदा.दारिद्रय, निरक्षरता, बेरोजगारी, सामाजिक-सांस्कृतिक-धार्मिक आचरण, हिंसाचार, भ्रष्टाचार, दहशतवाद, मजूरांचे शोषण कोठडीतील गुन्हे इत्यादी
- लोकशाही व्यवस्थेत मानवाधिकार आणि मानवी श्रमप्रतिष्ठेच्या प्रशिक्षण व आचरणाची गरज.
- जागतिकीकरण आणि त्याचा भारतीय समाजाच्या विविध घटकांवर त्याचा प्रभाव
- मानवी विकास निर्देशांक, अभ्रक मृत्यू प्रमाण, लिंग गुणोत्तर

2.2 बाल विकास

Art-14

- समस्या व मुद्दे (अभ्रक मर्त्यता, कुपोषण, बाल कामगार, बाल शिक्षण इत्यादी)
- सरकारी धोरणे, कल्याणकारी योजना आणि कार्यक्रम
- आंताराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना आणि समुदाय संसाधने यांची भूमिका. बालकल्याणातील लोकसहभाग

2.3 महिला विकास

Art-14

- समस्या व मुद्दे (स्त्री-पुरुष विषमता, महिलांवरील हिंसाचार, बालिकाहत्या/स्त्रीभ्रूणहत्या, महिलांचे सबलीकरण इत्यादी)
- विकास/कल्याण आणि सबलीकरणासाठी शासकीय धोरण, योजना आणि कार्यक्रम

2.4 तरुणवर्गाचा विकास

- समस्या व मुद्दे (बेरोजगारी, असंतोष, व्यसनाधिनता इत्यादी)
- शासकीय धोरण-विकास योजना आणि कार्यक्रम

2.5 आदिवासी विकास

Art-46

- समस्या व मुद्दे (कुपोषण, एकलेपणा, एकात्मीकरण आणि विकास इत्यादी)
- आदिवासी चळवळ, सरकारी धोरण, कल्याणकारी योजना आणि कार्यक्रम

2.6 सामाजिकदृष्ट्या वंचित वर्गाचा विकास (SC, ST, VJ/NT, OBC, etc)

Art-46

- समस्या व मुद्दे (संधीतील असमानता इत्यादी)
- सरकारी धोरण, कल्याणकारी योजना आणि विकासाचे कार्यक्रम

2.7 वृद्धांचे कल्याण

- समस्या व मुद्दे
- सरकारी धोरण-कल्याणकारी योजना आणि कार्यक्रम

2.8 कामगार कल्याण

Art-43

- समस्या व मुद्दे (कामाच्या ठिकाणची पारिस्थिती, मजूरी, आरोग्य आणि संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न)
- सरकारी धोरण, कल्याणकारी योजना आणि कार्यक्रम

2.9 अपंग कल्याण

Art-14

- समस्या व मुद्दे (शैक्षणिक व रोजगारांच्या संधीमधील विषमता इत्यादी)
- सरकारी धोरण, कल्याणकारी योजना आणि कार्यक्रम

2.10 लोकांचे पुनर्वसन

- विकास प्रकल्प तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे प्रभावित झालेल्या लोकांचे पुनर्वसन
- डावपेच आणि कार्यक्रम-कायदेशीर तरतुदी-विविध आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, मानसिक इत्यादी बाबींचा विचार

2.12 ग्राहक संरक्षण

Art-21

- सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्याची ठळक वैशिष्ट्ये- ग्राहकांचे हक्क, तक्रारी व निवारण यंत्रणा, विविध प्रकारचे फोरम्स-उद्देश, अधिकार, कार्ये, पद्धती, ग्राहक कल्याण निधी

2.13 आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संघटना


• अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

राज्यव्यवस्था

Polity.

Pre-book



→ पोलीस राज्य (Police state) – भूभागाचे संरक्षण & लोकांना शिस्त लावणे.

→ कल्याणकारी राज्य (Well fair state) – भूभागाचे संरक्षण, लोकांना शिस्त, जिवणमान उंचावणे, लोकांच्या गरजा पूर्ण करणे.

* पोलीस राज्य पेक्षा कल्याणकारी राज्य ही व्यापक संकल्पना आहे.
* पोलीस राज्य हे कल्याणकारी राज्य पेक्षा संकुचीत आहे.

संविधान

* पोलीस राज्याला निर्धारिकासाठी (promote) करण्यासाठी जे घटक लागतात. त्याची नोंदणी ज्या पुस्तकामध्ये असते. त्याला संविधान म्हणतात.

OR.


* कल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात उतरण्यासाठी लिखित नियमांचा समुच्चय म्हणजे. संविधान होय.

* मुलभुत हक्क (Fundamental Right)–
  सरकारने नागरिकांना दिलेले हक्क. होय

* मार्गदर्शक तत्वे (DPSP)–
  सरकारचे नागरिकांबद्दल कर्तव्य. होय.

* मुलभुत कर्तव्य (Fundamental Duty) –
  नागरिकांचे कर्तव्य होय.

* शासन पद्धती –! (शासन पद्धती)




— परिशिष्ट - १० नुसार पक्षांतर बंदी संबंधी नियम तयार करण्याचा अधीकार पिठासिन अधिकाऱ्याला आहे.

परंतु हे नियम ३० दिवसाआधी सभागृहपुढे ठेवणे आवश्यक.

— ५२ वी. घ.दु दोन्ही सभागृहाने एक मताने पारित केली. यास तात्कालिन परिस्थिती कारणीभुत होती.

भारत आणि भूप्रदेश
(India and It's Territory)



— एखादा भूप्रदेश ईश्वराच्या अधिपत्याखाली म्हणजे राजाच्या (Govt) अधिपत्याखाली असणे म्हणजे सार्वभौमत्व होय.

— जेव्हा Govt. चा उद्देश भूभागाचे संरक्षण आणि लोकांना शिस्त इथपर्यंत मर्यादित असेल तर त्याला. police state म्हणतात.

— जर Govt चा उद्देश भूभागाचे संरक्षण आणि लोकांना शिस्त यासोबत लोकांच्या गरजा पूर्ण करणे आणि जीवनमान उंचावणे यांच्याशी संबंधीत असेल तर त्याला Welfare State (कल्याणकारी राज्य) म्हणतात.

— आधुनिक काळात राज्याचे स्वरूप हे कल्याणकारी राज्याचे आहे.

— कल्याणकारी राज्यात police state चा सुद्धा समावेश होतो.

— Police state पेक्षा welfare state ही व्यापक संकल्पना आहे.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

- देशातील लोकसंख्या एक धर्म, एक भाषा, एक वंशाची असेल तर त्याला राष्ट्र असे म्हणतात.

- राष्ट्र निर्मितीचा केलेला प्रयत्न म्हणजे राष्ट्र उभारणी होय.

- परंतु ही व्याख्या युरोपियन व्याख्या समजण्यात येते.

- भारतात राष्ट्रवादाचा/राष्ट्राचा अर्थ अनेक भाषा, अनेक धर्म, अनेक परंपरा, परंतु एक जागी हा अर्थ होतो. व यासाठी प्रयत्न करणे म्हणजे राष्ट्रउभारणी.

- आधुनिक राज्य हे Nation state या तत्वाचा अवलंब करते.


- म्हणजे सर्व देशांना समान वागणूक व एकमेकांप्रतिचे संबंध हे राष्ट्रीयाच्या भावनेने.

- संयुक्त राष्ट्र सुद्धा याच तत्वाचा स्विकार करते.

- IMF व world bank मध्ये या तत्वाचा स्विकार होत नाही.

कारण, या संस्थेची पार्श्वभुमी आंतराष्ट्रीय भांडवल चळवळीची आहे.

* कलम – 1 –



– India अर्थात भारत हा राज्यांचा संघ असेल.

कलम – 1 (a) – यावरून पुढील बाबी स्पष्ट होतात,

① या भूभागाचे नाव India अर्थात भारत असे असेल.


② संविधान सभेत भारत या शब्दाविषयी एकवाक्यता दिसुन येते. (पोद्दरी व कामत वगळता)

③ नेहरूंनी आपल्या पारंपारिक नावासोबत आधुनिक नाव India चा समावेश करण्यासंबंधी प्रस्ताव मांडला. [Indus (सिंधु) चा अपभ्रंश].

④ व याला सर्वांनी सहमती दर्शविली.

⑤ भारताच्या भूभागामध्ये केंद्रासोबत राज्य असतील.

* भूभागाचा प्रकार (नियंत्रणावरून)




— भारतीय संविधानात संघराज्य हा शब्द न वापरता "राज्यांचा संघ" हा शब्द वापरण्याची कारणे :-

"राज्यांचा संघ"
↓ ↓
राज्य - केंद्र
संघराज्य

कारणे -

① संघराज्य निर्मितीच्या पद्धती.



केंद्राकर्षी

केंद्रोत्सारी
(भारत)

— वस्तुतः भारतीय संघराज्य हे केंद्रोत्सारी पद्धतीने निर्माण झाले आहे. म्हणजेच भारतामध्ये राज्यांची निर्मिती ही प्रशासकीय कारणासाठी झाली असून, अमेरिकेप्रमाणे करारने स्थापन झालेली नाही.

— राज्याचा संघ हा केंद्रोत्सारी पद्धतीला promote करतो व त्यामुळे राज्य फुटून बाहेर जाऊ शकत नाही.

भारतात संघराज्य स्वीकारण्याची कारणे —.

— ऐतिहासिक दृष्ट्या भारतामध्ये हि व्यवस्था दिसून येते.
[के. एम. मुन्शी]

— तात्कालिन परिस्थिती बघितली असता भारताला एकसंघ ठेवण्यासाठी संघराज्यीय व्यवस्था उपयुक्त
[ज. नेहरू]

— विविधतेत एकता - 1935 च्या कायद्यामध्ये सर्वप्रथम संघराज्यीय व्यवस्थेची तरतुद करण्यात आलेली होती. व संघराज्यीय व्यवस्थेसाठी ज्या मुलभुत गोष्टी / घटक आवश्यक असतात. त्यांची तरतुद सुद्धा या कायद्यामध्ये होती.

उदा. स्वतंत्र न्यायमंडळ.

संघराज्याची वैशिष्ट्ये —: [भारतीय]

— लिखित राज्यघटना.

— दूहेरि नियंत्रण / शासन व्यवस्था.

— संविधान सर्वोच्च असते.

— स्वतंत्र न्यायपालिका / न्यायमंडळ.

— द्विगृही कायदेमंडळ.

— केंद्र-राज्य यांच्या अधिकाराची विभागणी.

— प्रभागावर दूहेरी नियंत्रण.

भारतीय संघराज्य एकात्मक वाटण्याचा कारण.—:

- न्यायमंडळ (एकेरी)
- नागरिकत्व
- राज्यपाल
- नियोजन आयोग
- केंद्रीय लोकसेवा आयोग
- एकच राज्यघटना
- केंद्रशासित प्रदेश.
- वित्त आयोग.
- आणीबाणी.
- Diffence (संरक्षण) आणि परराष्ट्र.
- law commision
- CAG

भारतीय संघराज्याचे वर्णन--:

1] के. सी. विलर - भारतीय संघराज्य हे अर्ध संघराज्यीय

2] सॉरिश जॉन्स - भारतीय संघराज्य हे वाद्याघाटीचे.

3] गॉडविन ऑस्टीन - Co-oprative fedorizm.

— वरिल मतांना पूर्णविराम एस. आर बोम्बई किस ने दिले, सर्वोच्च न्यायालयाच्या मतानुसार, भारतामध्ये संघराज्यीय व्यवस्था असुन काही अटी आणि शर्ती सह राज्य हे सार्वभौम आहे.

भारतीय संघराज्याचे बदलते स्वरूप -

- कुठल्याही भूभागामध्ये संघराज्याची निर्मिती करण्याचे कारण हा त्या देशाचा विकास असतो.
  हे तत्व भारताला पूर्णपणे लागु पडते.
- त्यामुळे भारतीय संघराज्याच्या स्वरूपाविषयी काही तरतुदी स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत. व काही तरतुदी ह्या व्यवहारिक दृष्ट्या दिसुन येतात.
- त्यामुळे भारतीय संघराज्याचे स्वरूप हे वेळेनुरूप व कालानुरूप बदलत आहे.
- भारतीय संघराज्याचे स्वरूप हे पुढील टप्प्यांमध्ये बदलत गेल.

1. राजकोषीय संघवाद
2. सहयोगात्मक संघवाद
3. प्रतिस्पर्धी संघवाद
4. उपप्रतिस्पर्धी संघवाद.


1. राजकोषिय संघवाद -

- ज्या संघराज्यांमध्ये केंद्र आणि राज्य यांच्या आर्थिक अधिकारांसंबंधी स्पष्ट तरतुद आणि विभागणी केली. असेल तर त्याला राजकोषीय संघवाद म्हणतात.
- ही तरतुद भारताच्या मुळ संविधानामध्येच दिसुन येते.

उदा. कर रचना (भाग-12)

★ सहयोगात्मक संघवाद -

— ज्या संघराज्यामध्ये केंद्र सरकार राज्यांना अतिरिक्त अधिकार, वित्तीय मदत, धोरणात सहभागी करना घेत असेल व केंद्रासमोरील समस्या या संपूर्ण देशासमोरील असेल तर या प्रकारचा संघराज्याला सहयोगात्मक संघवाद म्हणतात.



— निती आयोगाची Governing council ही co-operative Fedrelism चे उदाहरण, GST-council, 14 finance commision.

★ प्रतिस्पर्धी संघवाद -

— राज्या-राज्यांनमध्ये राखादया जाणी विषयी स्पर्धा निर्माण करणे. व त्यातुन राज्याची गुणवत्ता व विकास साधणे. याला प्रतिस्पर्धी संघवाद. असे म्हणतात.

उदा ① राष्ट्रीय स्तरावर ease of doing bussiness Report प्रसिद्ध करणे. (DIPP कडून)

— ②

② National Higher education Frame Work च्या अंतर्गत विद्यापीठामध्ये स्पर्धा निर्माण करणे.

③ राष्ट्रीय स्तरावर मानव विकास अहवाल प्रसिद्ध करणे.

④ ACPCC.

* उपप्रतिस्पर्धी संघवाद –:

– आर्थिक पाहणी 2016-17 मध्ये या संकल्पनेचा वापर करण्यात आला.

– यानुसार ती राज्या-राज्यामधील स्पर्धा आणखी खाली नेऊन ती शहरा-शहरांमध्ये लावणे. याला. उपप्रतिस्पर्धी संघवाद म्हणतात.

– ही स्पर्धा,

① Property an Collection.

② Administration.

③ Joksuvedha (लोकसुविधा)

④ Ian Administration व etc.

यावर आधारित असेल.

* कलम -- 1 (b) –

– कलम 1 (b) मध्ये राज्याच्या नावाविषयी माहिती मिळते. यानुसार राज्यांची नावे ही पहिल्या अनुसूची-प्रमाणे असेल.


* कलम-1 (c) – यामध्ये भारतीय भूभागाच्या विस्ताराबद्दल म्हणजेच राज्यक्षेत्राबद्दल माहिती मिळते. भारतीय राज्यक्षेत्रामध्ये,

– केंद्र
– राज्य
– केंद्रशासित प्रदेश,
– भविष्यात जे अधिगृहीत केले जाणारे प्रदेश.

* नविन राज्य निर्मिती प्रक्रिया -

- भारतीय संविधानामध्ये नवीन राज्याच्या निर्मितीची प्रक्रिया स्पष्ट केलेली आहे. कारण, भारतीय संघराज्य हे प्रशासकीय कारणामुळे (केंद्रोत्सारी) निर्माण झालेले आहे.

- प्रशासन हे काळानुरूप आणि वेळेनुरूप बदलते असते. त्यामुळे राज्य पुनर्रचना करणे आवश्यक आहे. त्यासाठी भारतीय संविधानामुळे कलम - 2 व कलम - 3 मध्ये यासंबंधी तरतुद मिळते.



- वरिल दोन्ही कलमावरून एक बाब स्पष्ट होत नाही. ती म्हणजे, संसद आपला भुप्रदेश दूसऱ्याला देऊ शकते का?

केस - 1 — हा प्रश्न नेहरू - नून करारानुसार, पश्चिम बंगाल मधील बेरुबारी प्रदेश पाकीस्तानला हस्तांतरीत केला. जेव्हा राष्ट्रपतींनी यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाला सल्ला विचारला,

तेव्हा सर्वोच्च न्यायालयानुसार, भारतीय संसद आपला भुप्रदेश देऊ शकत नाही. परंतु, भुसीमा करार (Land - Boundary Agreement). करायचा असल्यास यासाठी भारतीय संसद आपला भुप्रदेश देऊ शकते.

म्हणून यासाठी, घटना दूरुस्ती करणे आवश्यक. व याच पार्श्वभुमीवर 9 वी घटना दूरुस्ती 1960 करून बेरुबारी हा प्रदेश पाकीस्तानला हस्तांतरित केला.

केस-2 इंदिरा- भंडारनाईके करारानुसार, कच्चातीवू बेट हा हस्तांतरीत केला. परंतु यासाठी घटना दुरुस्ती करण्यात आली नाही. त्यामुळे हा मुद्दा भारतीय राजकारणाचा एक वादग्रस्त मुद्दा राहिला.

2014 मध्ये जे. जयललिता यांनी सर्वोच्च न्यायालयात केरथाचीका दाखल केली व सर्वोच्च न्यायालयाने केंद्रसरकारला यासंबंधी मत विचारले.

तात्कालीन सहान्यायवादी मुकूल रोहतोगी यांनी बेट परत मिळवायचे असेल तर युद्ध हा एकमेव पर्याय असे प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर केले. व हा मुद्दा आजही वादग्रस्त मुद्दा आहे.

केस-3- भारत-बांग्लादेश भूसीमा करारानुसार, काही प्रदेश हा बांग्लादेशला हस्तांतरीत करणे आवश्यक होते. यासाठी 119 वी घटना दुरुस्ती विधेयक सादर करण्यात आले. व ही 100 वी घटना दुरुस्ती ठरली.

- 99 वी: घटना दुरुस्ती - राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती
- 101 वी घटना दुरुस्ती - GST.

★ नविन राज्य निर्मिती-

गृह मंत्रालय → केंद्रीय कॅबिनेट

↓

राष्ट्रपती (किती वेळ ते राष्ट्रपती ठरवितात)

↓

राज्यविधीमंडळ (विधेयक पारित केले/नाही केले.)

↓

संसद

↓

राष्ट्रपती सही.

भारतामध्ये राज्य निर्मिती

- देशांतर्गत राज्य निर्माण करण्याचा संसदेचा अधिकार - कलम - 2
- वाहेरून राज्य घेऊन त्याचे भारतात समाविष्ट ~~करणे~~ निर्माण करणे प्रक्रिया - कलम - 3

ब्रिटिशांनी पहिली वखार → (Presidency) → 1833 → प्रांत - शब्द आला → 1857 या उठाव → British प्रांत - जमिनदार - संस्थानिक - → स्वातंत्र्यानंतर →

Presidency चे रूपांतर Province मध्ये [प्रांत]

British भारत म्हणजे.. British प्रांत, जमिनदार संस्थानिक.

भारताला स्वातंत्र्य मिळणे म्हणजे, British प्रांतांना स्वातंत्र मिळणे.

- जमिनदार व संस्थानिकांना जबरदस्तीने, पोलीस कारवाईने भारतात समाविष्ट केले.

भारताची विभागणी → 4 भागात →

Zone
- A → British प्रांत — 9 प्रांत
- B → जमिनदार — 9 प्रांत
- C → संस्थानिक — 10 प्रांत
- D → अंदमान व निकोबार

ही विभागणी अतार्किक होती. [प्रशासकीय, भाषा. संस्कृतीक दृष्ट्या]

धर आयोग [एकमेव आयोग ज्याचा सदस्य संविधान सभेचा नाही.]

आंध्र राज्य - 1948 मध्ये
आंध्र प्रदेश - 1957 मध्ये

JVP - जवाहर नेहरू, वल्लभभाई पटेल, पट्टाभी सितारामय्या

यांची चर्चा संविधान सभेत व याला पूर्णसंरचीत करण्यासाठी संविधान सभेने उपसमिती स्थापन केली. ती म्हणजे

~~धर~~ S.K धर आयोग

* अट - राज्यांची निर्मिती भाषेच्या आधारावर नको. [कट्टर प्रशासकीय] →

पूर्ण भारताची प्रशासकीय आधारावर पुर्नरचना केली, पण आंध्र राज्याला भाषेच्या तत्वावर मान्यता दिली (चुक केली)

भारताला पूर्णसंरचीत करण्यासाठी, राज्य पुर्नरचना आयोग स्थापन

अध्यक्ष - फाजल अली

त्यामुळे, इतर भाषिक भडकुन त्यांनीही मागणी केली. (तेच प्रसंग झाला जो स्वातंत्र्या आधी होता)

- हा प्रसंग टाळण्यासाठी काँग्रेसने स्वतःची समिती बनवली. ती.

1948 चे जयपूर अधिवेशन मध्ये. [JVP समिती] [आंध्र राज्य cancel करणे]

↓

याविरोधात पोट्टाभी श्रीरामल्लु यांचे उपोषण → मृत्यु - आंध्रात हिंसा चालु.

↓

राज्य पुर्नरचना आयोग

- भारतामध्ये 1833 च्या चार्टर ॲक्ट नुसार पहिल्या प्रोव्हिन्स ची स्थापना करण्यात आली.

बॉम्बे प्रेसिडेन्सी - सिंध, गुजरात, पूर्ण महाराष्ट्र (विदर्भ, मराठवाडा सोडून).

- ब्रिटीश प्रशासनात सुरुवातीला 12 प्रोव्हिन्स होते. त्यापैकी 9 भारतात आणि 8 पाकीस्तान मध्ये गेले.

- 1858 च्या कायदयानुसार प्रोव्हिन्सचे रूपांतर ब्रिटीश प्रोव्हिन्स मध्ये झाले.

- स्वातंत्र्याच्या वेळी ब्रिटीश प्रांत, जमिनदार, आणि संस्थानिक या चारहीचे मिळुन 4 भागात विभागणी करण्यात आली. त्यापैकी बॉम्बे प्रोव्हिन्स हा A मध्ये आहे.

- 4 भागांमध्ये, A मध्ये 9 राज्य
  B मध्ये 9 राज्य.
  C मध्ये 10 राज्य
  D मध्ये, अंदमान, निकोबार.

— वरिल विभागणी अतार्किक (elogical) असल्यामुळे संविधान सभेने S.K. धर यांच्या अध्यक्षतेखाली आयोग स्थापन केला.

-- धर आयोगाने प्रशासन हा निकष ठेवला परंतु भाषेच्या आधारावर आंध्र राज्याची निर्मिती केली त्यामुळे इतर भाषीकांच्या मनात असंतोष.

- हा असंतोष दूर करण्यासाठी कांग्रेसच्या जयपूर अधिवेशनामध्ये JVP समितीची स्थापना

- या समितीचा कोणीही अध्यक्ष नव्हता.

- या समितीने आंध्र राज्याची मागणी नाकारली.

- याविरोधातच्चेल्ठ गांधीवादी कार्यकर्ते पोट्टाभी श्रीरामल्लु यांचा उपोषणा दरम्यान मृत्यु व यासोबत भाषिक राज्याच्या मागणीसाठी आंदोलन अधिक तीव्र झाले. व यामुळेच राज्य पुर्नरचना आयोग स्थापना.

राज्य पुनर्रचना आयोग -

- अध्यक्ष - फज्ल अली,
  सदस्य - के. एम. पण्णीकर, हृदयनाथ कुंझरू
  निकष - एक भाषा एक राज्य या तत्वाचा अस्वीकार

- भारतीय्या एकतेला व अखंडतेला महत्व.
- प्रशासकीय व वित्तीय सुदृढतेला महत्व.
- भाषिक व सांस्कृतिक एकसंधपणा.

शिफारशी -

- 4 गटातील विभागणी समाप्त करा.
- राज्या-राज्यांमध्ये समन्वयासाठी zonal council. (क्षेत्रीय परिषद) स्थापन करा.
- भाषावार प्रांत रचनेमुळे राष्ट्रीय एकात्मतेला बाधा निर्माण होऊ नये म्हणून अखिल भारतीय सेवेचे पुनर्घटन करावे.
- किमान 50% न्यायाधीश हे राज्याबाहेरील असावे अशी तरतुद करावी.
- शैक्षणिक क्षेत्रात प्रादेशिक भाषांचा वापर जरूर ठेवावा. परंतु विद्यापिठामध्ये काही कालानंतर शिक्षण इंग्रजीतुन
- उच्च न्यायालयाचे किमान 1/3 न्यायाधीश हे राज्या-बाहेरील असावे.
- 30 सप्टेंबर 1955 रोजी हा अहवाल भारत सरकारला सादर झाला. 267 पानाचा हा अहवाल.
- 16 ऑक्टोबर 1955 रोजी प्रकाशीत करण्यात आला व
- 7 वी घटना दुरुस्ती करून 1956, या आयोगाच्या शिफारशी ची कार्यवाही करण्यात आली.

— या संदर्भात राज्य पूर्नरचना कायदा 1956 करून हा कायदा 1 नोव्हें 1956 रोजी अंमलात आला.

— 7 वी. घटना दूरुस्ती नुसार 14 राज्य आणि 6 केंद्रशासित प्रदेश, राज्या-राज्यांमध्ये समन्वय प्रस्थापित करण्यासाठी झोनल कौन्सील ची स्थापना.

— राज्य पूर्नरचना आयोगानंतर भारतामध्ये 29 राज्याची निर्मिती झाली,

"आजही छोट्या राज्यांच्या निर्मितिचा प्रश्न चर्चेत असल्याचे दिसुन येते. व यातुन्च द्वितीय राज्य पूज्नरचना आयोग स्थापन करणे गरजेचे आहे."

- असे मत. "लालकृष्ण अडवाणी" यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या संसदीय समितीने आपला अहवाल दिला परंतु या आयोगाचा निकष भाषा नसुन विकास आहे.

* छोट्या राज्यांच्या निर्मितीचा प्रश्न -

— फायदे. — प्रशासकीय दृष्ट्या सोयीस्कर

— क्षेत्रीय economic balance हा मजबुत होतो. नेतृत्वाचा विकास व राजकीय चेतना जागृत.

— शोषण निर्मितीसाठी सोईस्कर

— संसाधनाचा योग्य वापर

— प्रादेशिक मुद्द्यांना स्थान मिळते.

— तोटे — फूटीरवादी प्रवृत्तीला चालना.

— राष्ट्रीय एकतेला तडा जातो.

— अखंड भारत या संकल्पनेवर प्रश्नचिन्ह

— जातीय वाद वाढतो.

— प्रशासकीय खर्च जास्त

— राजकीय अस्थिरता

— प्रादेशिक अस्मितेमध्ये वाढ

— पाणी विवाद.

कलम 371– विशेष राज्य दर्जा

- भारतातील सर्व राज्यांची प्रशासकीय रचना जवळपास सारखीच आहे. परंतु काही राज्यांना तेथील परिस्थितीनुसार घटनेने विशेष दर्जा बहाल केलेला आहे.
- जम्मू-काश्मीर या राज्याला कलम 370 नुसार विशेष दर्जा.
- इतर विशेष दर्जा असलेली राज्ये व संबंधीत कलम–

महाराष्ट्र आणि गुजरात – कलम 371

नागालॉंड – (कलम –371A)
आसाम– (कलम – 371 B)
मणिपूर– (कलम–371 C)
आंध्रप्रदेश – (कलम 371 D आणि 371 E)
सिक्कीम– (कलम– 371 F)
मिझोरम – (कलम–371 G)
अरुणाचल प्रदेश – (कलम 371 H)
गोवा– (कलम 371– I)
कर्नाटक – (कलम 371– J)

- **कलम व संबंधीत राज्य लक्षात ठेवण्याची ट्रीक्स–**

नामास माग की (NAM AS ABC(D,E)F MAG GHI की) J

राज्य–	नागालँड	आसाम	मणिपूर	आंध्रप्रदेश	सिक्कीम	मिझोरम	अ.प्रदेश	गोवा	कर्नाटक
रा.आद्यअक्षर	N	A	M	A	S	M	A	G	की
कलम 371–	A	B	C	D,E	F	G	H	I	J

कलम 371 – महाराष्ट्र–

- कलम 371 नुसार महाराष्ट्राच्या राज्यपालांवर पुढील विशेष जबाबदाऱ्या सोपविण्याचा राष्ट्रपतींना अधिकार :–

1. मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरीत महाराष्ट्र यांच्याकरीता प्रत्येकाला स्वतंत्र अशा विकासमंडळाची स्थापना करणे.
2. वरिल प्रदेशांत व्यावसायीक प्रशिक्षण, तांत्रीक शिक्षण तसेच रोजगाराच्या पुरेशा संधी पुरविण्याबाबत तरतुद करणे.
3. या तीन्ही विकास मंडळांच्या कामकाजाचे अहवाल राज्याच्या विधानसभेसमोर ठेवणे.
4. वरील प्रदेशांच्या विकासासाठी निधीचे समान व योग्य प्रमाणात वाटप करणे.

कलम 371– गुजरात–

- या कलमानुसार गुजरातच्या राज्यपालास कच्छ आणि सौराष्ट्र या गुजरातच्या प्रदेशांसाठी स्वतंत्र विकास मंडळाची स्थापना करता येते.

कलम 371 A– नागालँड–

- नागालँडमधील नागाटेकड्यांच्या परिसरात नागा लोकांच्या कारवायांमुळे निर्माण होणाऱ्या अस्थिरतेबाबत कायदा व सुव्यवस्थेची हमी देणे.

कलम 371 B– आसाम–

- आसामच्या राज्यपालास तेथील आदिवाशी प्रदेशांच्या प्रशासनाबाबत विशेष अधिकार.

कलम 371C– मणिपूर–

- मणिपूरच्या राज्यपालास, त्या राज्यातील विधानसभेची राज्यातील डोंगरी प्रदेशातील प्रतिनिधींची बनलेली समिती योग्यप्रकारे काम करते की नाही याची खातरजमा करण्याचे अधिकार.

कलम 371 D,E– आंध्रप्रदेश–

- आंधप्रदेश राज्याबाबत घटनेत विशेष तरतुद

कलम 371 F– सिक्कीम–

- सिक्कीममध्ये कायदा व सुव्यवस्था टिकून राहवी आणि तेथील जनतेस सामाजिक व आर्थिक विकासाची हमी मिळेल अशी न्यायव्यवस्था स्थापन व्हावी यासाठी तेथील राज्यपालस या कलमान्वये विशेष जबाबदारी.

कलम 371 G– मिझोरम–

Competitive Forum

- या कलमान्वये मिझोरम राज्यासाठी विशेष तरतुद

कलम 371 H– अरुणाचल प्रदेश–

- अरुणाचल प्रदेशमध्ये कायदा व सुव्यवस्था याची हमी देण्यासंबंधी या कलमात विशेष तरतुद.

कलम 371-I– गोवा–

- या कलमान्वये गोवा या राज्यासाठी घटनेत विशेष तरतुद

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

कलम 371 J– कर्नाटक–

- हे कलम कर्नाटक–हैद्राबाद प्रदेशांसाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याशी संबंधीत.
- **या व्यतिरिक्त घटनेत परिशिष्ट 5 आणि 6 मध्ये अनुसूचित क्षेत्रे आणि राज्यातील आदिवासी क्षेत्रे यांच्या प्रशासनाबाबतच्या स्वतंत्र तरतुदी आहेत.**

भारतीय राज्यांची निर्मिती आणि पूनर्रचना–

स्वातंत्र्यापूर्वी–

- स्वातंत्र्यापूर्वी–ब्रिटिशनियंत्रित ब्रिटीश प्रांत तर संस्थानिकांच्या ताब्यात संस्थाने (परंतु अधिपत्य ब्रिटीशांचेच)
- 18 जुलै 1947 च्या भारतीय स्वातंत्र्य कायद्याने भारत व पाकिस्तानची निर्मिती.
- 562 स्वतंत्र संस्थाने अस्तीत्वात–त्यांना निर्णयाचे स्वातंत्र्य–सार्वभौम.
- 27 जून 1947–'राज्य विभाग' स्थापन– अध्यक्ष– वल्लभभाई पटेल.
- 15 ऑगस्ट 1947 पर्यंत केवळ काश्मीर, हैद्राबाद आणि जुनागड स्वातंत्र्य–सार्वभौम
- भारतीय हद्दीतील 552 पैकी 549 संस्थाने भारतात विलीन.
- राहीलेली 3 संस्थाने पुढीलप्रमाणे विलीन–

1) काश्मीर राजा हरिसिंग 26 ऑक्टोबर 1947 भारतात विलीनीकरण निर्णय.
2) फेब्रुवारी 1948 सार्वमताद्वारे जुनागड भारतात विलीन.
3) 17 सप्टेंबर 1948 –'ऑपरेशन पोलो'द्वारे– हैद्राबाद संस्थान भारतात विलीन.

- **मुळ भारतीय राज्यघटनेत भारतातील राज्यांचे विभाजन 4 गटात.**

या 4 गटात एकूण 29 राज्ये.

1) गट 'अ' – 9 राज्ये – पुर्वीच्या ब्रिटीश प्रांताचा समावेश.
2) गट 'ब' – 9 राज्ये – पुर्वीच्या संस्थानांचा समावे.
3) गट 'क' – 10 राज्ये – केंद्रशासीत क्षेत्र – कमीशनर्सची राज्ये.
4) गड 'ड' – 1 राज्य – अंदमान व निकोबार बेटे

- काँग्रेसचे नागपूर अधिवेशन 1920– भाषागर राज्य पुनर्रचनेचे तत्व स्विकारले.
- 1928 नेहरू रिपोर्ट–भाषावार प्रांतरचनेचे तत्व स्विकारले.

स्वातंत्र्यानंतर

1) एस.के.धर आयोगर–1948

- एस.के.धर – अलाहबाद उच्च न्यायालयातील न्यायाधीश.
- राज्य पुनर्रचनेसाठी प्रशासकीय सोय प्रमुख निकष असावा, भाषा किंवा संस्कृती नाही–आयोगाची शिफारस.
- भाषिक आधारावर आंध्रप्रदेशची निर्मिती करण्यास अनुकुलता.

2) जे.व्ही.पी.समिती–1949

- काँग्रेस पक्षाने जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल व पट्टाभी सिताराम्या हे सदस्य (J.V.P) असलेली समिती स्थापन केली.
- भाषिक आधारावर राज्यनिर्मितीस अनुकुलता नाही.
- जयपूर अधिवेषण डिसेंबर 1948 मध्ये या समितीची स्थापना.
- अहवाल सादर– एप्रिल 1949
- 1953 मध्ये 52 दिवसांच्या उपोषणानंतर काँग्रेस कार्यकर्ता पोटी श्रीरामल्लु यांचा मृत्यू झाल्याने सर्वत्र असंतोष पसरला.
- 1953 मध्ये मद्रास राज्यातून तेलगू भाषिक क्षेत्र वेगळे करून आंध्रप्रदेशच्या निर्मितीची तात्काळ घोषणा.
- भाषिक आधारावर निर्माण झालेले आंध्रप्रदेश हे पहिले राज्य.

3) राज्य पुनर्रचना आयोग –1953 (पाक आयोग)

- डिसेंबर 1953–राज्यपुनर्रचना आयोग– अध्यक्ष फजल अली– सदस्य के.एम.पण्णीकर, हृदयनाथ कुंझरु (पण्णीकर–P, अली–A, कुंझरु–K = PAK)
- भाषिक तत्वावर राज्यपुनर्रचनेस आयोग अनुकुल पण 'एक भाषा एक राज्य' या तत्वाचा अस्विकार.
- मुळचे चार गटांतील राज्यांचे विभाजन रद्द करून त्याजागी 16 राज्ये व 3 केंद्रशासीत प्रदेश निर्माण करण्याची शिफारस.
- पाक आयोगाच्या शिफारशीनुसार ऑगस्ट 1956 मध्ये राज्य पुनर्रचना कायदा 1955 संमत – त्यानुसार
- गट–अ आणि गट–ब राज्यांतील फरक संपुष्टात– गट क राज्ये रद्दबातल
- अंतिमतः 14 राज्ये आणि 6 केंद्रशासीत प्रदेश निर्माण करण्यात आले होते.
- 7 व्या घटनादुरुस्तीने 1956 मध्ये 14 राज्य आणि 6 केंद्रशासीत प्रदेशांची यादी असलेली नविन यादी समाविष्ट.

1956 नंतर राज्यांची निर्मिती

- 1960- बॉम्बे प्रांताचे विभाजन होऊन महाराष्ट्र व गुजरात या राज्यांची निर्मिती.
- 1963- आसामपासून नागालँड.
- 1966- पंजाबचे विभाजन-हरियाना+चंदीगड केंद्रशासीत प्रदेश.
- 1970- पुर्वी केंद्रशासीत प्रदेश असलेल्या हिमाचलला घटक राज्याचा दर्जा.
- 1972- मणिपूर, मेघालय व त्रिपूरा या राज्यांची निर्मिती-ममेत्रि
- 1975- सिक्कीम -22 वे राज्य
- 1986- मिझोरम आणि अरुणाचलप्रदेश राज्यांची निर्मिती.
- 1987- गोवा-25 वे राज्य
- 2000- मध्यप्रदेशमधून छत्तीसगढ-26 वे
  उत्तरप्रदेशमधुन उत्तरांचल-27 वे
  बिहार मधून झारखंड -28 वे
- यातील उत्तरांचलचे नाव 2006 साली उत्तराखंड करण्यात आले.
- 2 जून 2014 -आंध्रप्रदेशचे विभाजन होऊन तेलंगणा -29 वे राज्य

काही राज्य तसेच केंद्रशासीत प्रदेशाच्या नावात झालेले बदल

- संयुक्त प्रांत = उत्तर प्रदेश- 1950
- मद्रास= तामिळनाडू- 1969
- म्हैसुर= कर्नाटक- 1973
- लॅकडिव्ह+ मिनिकॉय+अमिनदिवी बेट= लक्षद्विप-1973
- पाँडिचेरी = पुदुच्चेरी-2006
- ओरिसा = ओडिशा-2011

परिवर्तन
Competitive Forum

परिवर्तन
Competitive Forum

MPSC/UPSC

परिवर्तन

Competitive Forum

– अभिजीत राठोड

IAS / राज्यसेवा / PSI/ STI/ ASO

वीन बॅचसाठी

रजिस्ट्रेशन चालू

अर्थव्यवस्था

- आतापर्यंत MPSC च्या सर्व परीक्षामधील अर्थव्यवस्था या घटकातील 85%प्रश्न जशासतसे (जुन्या विद्यार्थ्यांकडून पडताळणी करून घेणे किंवा क्लास नोटस् व प्रिंटेड नोटस् पाहणे.)
- पहिल्या 15 तासिकामध्ये The Hindu News Paper मधील Business Page वरील News समजण्याची हमी.
- D.M. Sundaram, Uma Kapila, Shriram IAS नोटस् व इतर राष्ट्रीय पुस्तके मराठीमध्ये करून शिकवण्यात येईल.
- [illegible] आधारीत निबंध घेण्यात येईल. (राज्यसेवा मुख्य व UPSC मुख्य परीक्षेमधील)
- Banking S.S.C. ची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी याठिकाणी येऊ नये. फक्त क्लास MPSC/UPSC ची तयारी करणाऱ्यासाठी.

राज्यव्यवस्था

- राज्यसेवा मुख्यपरीक्षा व साहाय्यक मुख्य परीक्षा संपूर्ण पेपर–2 घेण्यात येईल.
- मुलभूत संकल्पनेवर भर
  - धर्मनिरपेक्षता – समाजवाद
  - अल्पसंख्यांक – एकात्मता
  - प्रजासत्ताक – अस्पृश्यता
- न्यायालयीन निर्णयाची विषयासोबत सांगड.
- राज्यव्यवस्थेविषयी चालू घडामोडी स्वतंत्रपणे घेण्यात येईल व नोटस देण्यात येतील.
- सर्व राष्ट्रीय पुस्तकांचा संदर्भ घेऊन शिकवण्यात येईल.
- निबंधासाठी उपयुक्त (राजकीय व्यवस्थेवर आधारित निबंध)
- कायद्यावर भर (नोट्स व विश्लेषण)
- 3 ते 3.5 महिन्याची बॅच असेल (तीन महिने सलग वेळ असेल तरच येणे.)

अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel-
@abhijitrathod join करा.

– अभिजीत राठोड

ी चिंतामणी बिल्डींग (दुसरा मजला), न्यु इंग्लिश स्कूल समोर,
ानप्रबोधिनीच्या पाठीमागे, टिळक रोड, सदाशिव पेठ, पुणे. 9272100 50

क्षेत्रीय परिषद

[Zonal Council]

- हि एक वैधानिक संस्था आहे.
- राज्य पुनर्रचना कायदा 1956 नुसार स्थापना.
  - या अंतर्गत 5 क्षेत्रीय परिषदा.
- 1971 मध्ये North-east साठी वेगळी क्षेत्रीय परिषद स्थापन करण्यात आली.

रचना (Structure)-

अध्यक्ष - गृहमंत्री

सदस्य - zonal मधील राज्यांचे मुख्यमंत्री तसेच केंद्राचे गव्हर्नर / Administrator.

- क्षेत्रीय परिषदेचा उपाध्यक्ष हा संबंधित राज्यांचे मुख्यमंत्री. (Alfabeats प्रमाणे आळीपाळीने असतात.)
- महाराष्ट्राचा समावेश हा पश्चिम क्षेत्रीय परिषद मध्ये होत असून याचे उपाध्यक्ष पद - पृथ्वीराज चौहान यांनी भुषविले.

कार्य -

- विकास प्रकल्प पूर्ण करण्यासाठी साहाय्य करणे.
- आर्थिक व सामाजिक मुद्द्यांवर सहकार्य.
- प्रादेशिक व भाषावाद इ. मध्ये वाढ न होऊ देणे
- क्षेत्रीय परिषदेचे निर्णय हे सल्लागारी स्वरूपाचे असून वर्तमान परिस्थितीमध्ये यांची प्रासंगीकता (*Important) कमी झाली. आहे.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

नागरिकत्व
[citizenship]

नागरिकत्वाचे महत्व -

* - राज्य म्हणून मान्यता मिळवण्यासाठी जे 4 घटक लागतात. त्यापैकी 1 म्हणजे नागरिकत्व.

* - अंतर्गत सुरक्षतेच्या कारणावरून लोकसंख्येला देशपत्वे व्याख्यायीत करणे गरजेचे त्यामुळे लोकसंख्या हा विषय गृहमंत्रालयाचा येतो.

* - कल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी पहिल्यांदा जनता म्हणजे कोण हे व्याख्यायीत करणे गरजेचे.

— वरिल मुद्दयांना नागरिकत्वाची पारंपारिक व्याख्या असे म्हणतात.

Indian Diaspora -
ज्यांचे वंशज हे कधीतरी भारतात स्थलांतर होते. परंतु त्यांचे इतर नातेवाईक विदेशात राहतात. त्यांचे नागरिकत्व हे विदेशाचे असते.

* नागरिकत्वाची आधुनिक व्याख्या -

- नागरिकत्वाची आधुनिक व्याख्येमध्ये नागरिकत्व हे भूभागानुसार निर्धारित करण्यात येत नाही तर यामध्ये Diaspora चा समावेश होतो.

- नवीन व्याख्येनुसार, भारतीय वंशाच्या लोकांना आर्थिक कारणासाठी भारतासोबत जोडण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचाच भाग म्हणजे NRI, PIO, OCI, SSR

— सरकार या संबंधी दुहेरी नागरिकत्वाचे तत्व सुद्धा स्वीकारते.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

संविधानिक तरतुदी

[कलम - 5 ते 11]

सद्या कलम - 5, 6, 7, 8 Invalid. आहे.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

नागरिकत्व

15 ऑगस्ट 1947 च्या आधी व 26 जानेवारी 1950 च्या आधी [म्हणजे स्वातंत्र्या आधी]

↓

भारताचा नागरिक कोण याची तरतुदी

↓

कलम - 5, 6, 7, 8 मध्ये मिळतात.

कलम - 11 [स्वातंत्र्यानंतर नागरीक कोण असेल याची तरतुद संविधानात नाही.] म्हणून स्वातंत्र्यानंतर नागरिक कोण हे ठरवण्याचा अधिकार

×

संसद

↓

संसदेने यासाठी नागरिकत्व कायदा, 1955 पारित केला.

- भारतीय संविधानामध्ये संविधान लागु होण्याच्या वेळी कोण भारतीय नागरिक असेल व मुळ भारतीय कोण असेल यासंबंधी तरतुद आढळते

- परंतु संविधान लागु झाल्यानंतर नागरिकत्व कसे प्राप्त करायचे ते नागरिकत्व कसे संपुष्टात आणायचे यासंबंधी तरतुद आढळत नाही.

- कलम - 11 नुसार, नागरिकत्वाची कालानुरुप व्याख्या करण्याचा अधिकार हा संसदेला आहे.

व संसदेने या कायदयानुसार 1955 मध्ये नागरीकत्व कायदा 1955 पारित केला.

- यामध्ये आतापर्यंत 8 वेळा दुरुस्त्या झाल्या.

कलम - 5 -

- संविधानाच्या प्रारंभी भारतीचे नागरिक

- संविधान लागु होण्याच्या आधी भारतात राहणारे सर्व लोक हे भारताचे नागरिक असेल.

अट - त्यांचा जन्म हा भारतीय राज्य क्षेत्रात झालेला असावा.

- त्यांच्या मात्यापित्यापैकी कोणीतरी एक भारतीय राज्य क्षेत्रात जन्मलेली असावे.

- घटना किंवा संविधान लागु होण्यापूर्वी किमान ५ वर्षे इतका काळ राज्यक्षेत्रात सामान्य निवासी असावा.

कलम - 6 -

- पाकीस्तानामधुन भारतामध्ये स्थलांतरित झालेल्या व्यक्तीचे नागरिकत्व.

अट - त्याच्या माता - पित्यापैकी किंवा आजी - आजोबा पैकी, कोणतिरी एकाचा जन्म. हा अतिभाजीत भारतात झाला असावा.

कलम - 7 -

- भारतातुन पाकीस्तानात व पुन्हा भारतात स्थलांतरीत झालेल्या व्यक्तीचे नागरिकत्व.

अट - कलम - 6 च्या अटिनुसार.

कलम - 8 -

- मुळ भारतीय असल्यास परंतु बाहेरिल देशाचे नागरिकत्व आहे. व त्याला पुन्हा भारतात यायचे असल्यास.

PRIVILEGE INDIAN COMPETITIVE FORUM
By-Appliit Rajput
CLASS NOTES

कलम - 9 -

- एखाद्या व्यक्तीने परकीय देशचि नागरिकत्व स्वइच्छेने स्वीकारले असेल तर भारतचि नागरिकत्व आपोआप संपूष्ठात येते.

कलम - 10 -

- संसदेने वेळोवेळी जे नियम व कायदे तयार केले असेल त्याच्या आधीन राहुन काम करणे बंधनकारक.

नागरिकत्व कायदा, 1955

- भारतीय संविधानाच्या कलम-11 नुसार नागरिकत्वासंबंधी कायदा करण्याचा अधिकार हा संसदेला आहे.

- संसदेने 1955 मध्ये हा वरिल कायदा केला.

- वरिल कायदयात नागरिकत्व प्राप्तीचे 5 मार्ग.

① जन्म
② वंश
③ नोंदणी
④ स्वीकृती
⑤ सामीलीकरण.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

* जन्म - 26 जानेवारी 1950 नंतर आणि 1 जुलै 1987 च्या आधी व नंतर जन्म झाला असेल तर त्याला भारतीय नागरिकत्व मिळेल.

- परंतु त्यावेळी माता-पित्यापैकी भारताचा नागरिक असणे आवश्यक.

*वंश – 26 जानेवारी 1950 या दिवशी ते 10 डिसेंबर 1992 या दरम्यान भारताबाहेर जन्मलेल्या व्यक्तीला भारताचे नागरिकत्व मिळेल परंतु, त्याचे पिता भारताचे नागरिकत्व असणे आवश्यक

*– 10 डिसेंबर 1992 ते 3 डिसेंबर 2004 या दरम्यान जन्म झाला असेल. तर त्याला भारताचे नागरिकत्व प्राप्त होते.

*– परंतु त्यावेळी माता किंवा पित्याचे भारतीय नागरिकत्व असणे आवश्यक

*– 3 डिसेंबर 2004 नंतर भारताबाहेर जन्मलेली व्यक्ती भारताचा नागरिक होऊ शकतो.

– परंतु, संबंधीत व्यक्तीच्या पालकांने संबंधीत देशाच्या दूतावासाकडे नोंदणी करणे आवश्यक. (1 वर्षाच्या आत)

*नोंदणी –

– पूढील व्यक्ती नोंदणी पद्धतीने भारताचे नागरिकत्व प्राप्त करू शकते.

① भारतीय वंशाची व्यक्ती नोंदणी अर्ज करण्यापूर्वी किमान 5 वर्षे भारतात वास्तव्य.
[हे 1 वर्षे केले, 1955 चा कायदा]

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

② भारतीय नागरिकाशी विवाह केलेले व्यक्ती अर्ज करण्यापूर्वी 5 वर्षे वास्तव्य [ही अट फक्त महिलेला आहे.]

③ राष्ट्रकुल देशाचे नागरिक यांना मिळू शकते.

— वरिल सर्वांना अट –

– वरिल सर्व व्यक्तींनी नागरिकत्व प्राप्त होण्याआधी. राष्ट्रनिष्ठा व संविधानाप्रती शपथ घेणे आवश्यक.

* X-वाकृतीकरण -

- कायदेशिररित्या स्थलांतरण केलेल्या व्यक्तीला भर्ज केल्यानंतर योग्य प्रक्रियेद्वारे नागरिकत्व प्राप्त होऊ शकते.

अट -

— ① ती व्यक्ती शत्रुराष्ट्र / प्रतिबंधीत केलेल्या देशाची नागरिक नसावी.

— ② संबंधीत व्यक्तीने पूर्वीच्या देशाच्या नागरिकत्वाचा त्याग केलेले असावा. व तशी सुचना ही केंद्र सरकारकडे दयावी.

— ③ त्या व्यक्तीचे चरित्र उत्तम असावे.

— ④ भारतचे नागरिकत्व प्राप्त करण्याचा हेतु, ~~निवास~~ निवास कायमचे वास्तव्य किंवा भारताच्या एखादया संस्थेत दाखल होणे. हा असावा.

-- संबंधीत व्यक्तीने 12 महिन्यापूर्वी तसा भर्ज केलेला असावा.

— जर एखादी व्यक्ती, sci, tech., कला, साहित्य जागतिक शांतता इ. क्षेत्रात मौल्यवान कामगिरी केली असेल. तर त्याला नागरिकत्वाच्या अटी शिथिल असेल. [लागणार नाही]

* स्वाभाविकरण - एखादा भुप्रदेश भारतात समाविष्ट केल्यास तेथील नागरिकांना या पद्धतीने भारताचे नागरिकत्व मिळेल.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

1955 च्या कायदयानुसार पुढील 3 पद्धतीने नागरिकत्व लोप पावु शकते.

① त्याग करणे - एखादया नागरिकाने स्वत:हुन सक्षम अधिकाऱ्याकडे भारतीय नागरिकत्व सोडायची इच्छा व्यक्त केली असेल.

- परंतु 1 वर्षाच्या आत पून्हा नागरिकत्वाची इच्छा प्रकट केल्यास नागरिकत्व मिळु शकते.

- संबंधीत व्यक्तीच्या नागरिकत्वासोबत त्याच्या आपत्याचे नागरिकत्व सुध्दा संपूष्टात येते.

② नागरिकत्व संपूष्टात येणे -: एखादया व्यक्तीने दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्वईच्छेने स्वीकारल्यास भारताचे नागरिकत्व आपोआप संपूष्टात येते.

③ नागरिकत्व काढून घेणे -: एखादया व्यक्तीने कसेवणूक, गैरप्रकार, दुसऱ्या मार्गाने नागरिकत्व प्राप्त करण्याचा प्रयत्न केला. किंवा स्वीकृती तत्वाद्वारे नागरिकत्व मिळाल्यानंतर 5 वर्षाच्या आत कोणत्याही देशाने त्याला 2 वर्षे अटकेची शिक्षा सुनावली किंवा एखादी व्यक्ती सतत 7 वर्षे भारताबाहेर वास्तव्य करत असेल.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

नागरिकत्वाचा आधुनिक संकल्पना

- आर्थिक कारणामुळे भारतीय वंशांच्या लोकांना भारताशीजोड हा या संकल्पनेचा उद्देश आहे.
- यासाठी सरकारने वेगवेगळ्या योजना निर्माण केलेल्या आहे.

① NRI (Non-Resident Indian) -:

- 182 दिवसांपेक्षा जास्त जर विदेशात राहत असेल तर त्याला NRI असे म्हणतात.
  - या व्यक्तीकडे भारताचे नागरिकत्व असते.
- त्यामुळे याला भारतातल्या सर्व सुविधा व हक्क मिळतात.

② PIO (Person of Indian origin) -:

- या योजनेची सुरूवात 19 ऑगस्ट 2002.
- PIO साठी पुढील व्यक्ती पात्र असेल -

① पूर्वी भारतीय नागरिकत्व प्राप्त केलेली व्यक्ती परंतु सध्या दुसऱ्या देशाचे नागरिकत्व प्राप्त आहे.

② संबंधीत व्यक्तीचा कुठलाही पूर्वज (आई, वडील, आजी-आजोबा) भारतामध्ये कायमस्वरूपी वास्तव करत असेल.

③ एखादया व्यक्तीचा विवाह PIO card धारक व्यक्तीशी किंवा भारतीय नागरिकाशी झालेला असेल.

- उल्लेखनीय बाब म्हणजे अफगाणिस्तान, बांग्लादेश भुतान, नेपाळ, पाकीस्तान, श्रीलंका या देशातील व्यक्ती पात्र असणार नाही.

③ PIO card धारक व्यक्तीला पुढील लाभ मिळतात:-

① अनिवासी (NRI) भारतीयांना ज्या वित्तीय व शैक्षणिक सुविधा मिळतात (कृषी वगळता) त्या यांना मिळतील.

② मशनरी कालिय संशोधन कार्य, गिर्यारोहण संरक्षीत क्षेत्रे. यांना शेत वगळता इतर सर्व कामे करता येतील.

③ यांना अनिवासी भारतीयांप्रमाणे राजकीय हक्क प्राप्त होत नाही.

④ यांना भारत भेटीवर येण्यासाठी Visa ची गरज नाही.

⑤ भारतभेट 180 दिवसापेक्षा कमी असेल. तर नोंदणी करण्याची सुद्धा गरज नाही.

⑥ यांनी 7 वर्षे भारतात वास्तव्य केल्यास यांना भारतीय नागरिकत्व मिळु शकते.

④ OCI Card (Overseas Citizen of India)-

- या योजनेची सुरुवात 2 डिसेंबर 2005

- खालील व्यक्तींना OCI card. मिळु शकते.

① 26 जानेवारी 1950 नंतर भारतात जन्मलेली व्यक्ती.

② संबंधीत व्यक्तीचे वंशज हे कधीतरी भारतीय स्थायी नागरिक होते.

③ OCI card धारक व्यक्तींना पुढील अधिकार प्राप्त होतात.

① संबंधीत व्यक्ती कितीही काळ भारतात राहु शकतो.

② संबंधीत व्यक्तीला आजिवन Visa प्रदान केलेला असतो.

③ अनिवासी भारतीयांप्रमाणे यांना राजकीय हक्क प्राप्त होत नाही.

- संबंधीत व्यक्तीला भारतीय नागरिकत्व पाहिजे असल्यास 5 वर्षे भारतात राहणे आवश्यक.
व मर्ज करण्यापूर्वी 1 वर्षे भारतात वास्तव्य आवश्यक.

— वरिल दोन्ही योजनेची तुलना केली असता PIO पेक्षा OCI ला अतिरिक्त अधिकार असल्याचे दिसुन येते. त्यामुळे 9 जानेवारी 2015 पासुन दोन्ही योजना एकत्रित करुन OCI या योजनेत समाविष्ट करण्यात आले.

— व ही 1955 च्या कायदयामध्ये 2015 ची 8 वी दुरुस्ती होती.

— या योजनेअंतर्गत (ठरावीक देशाचे नागरिक) व्यक्तींना त्या देशाचे नागरिकत्व ठेवुन भारताचे नागरिकत्व दिल्या जाऊ शकते.

याचा अर्थ हे दुहेरी नागरिकत्व नसुन आर्थिक कारणासाठी त्यांना दिलेली सवलत आहे.

— भारतात एकेरी नागरिकत्व तत्वाचा अवलंब करण्यात येतो.

* नागरिकत्वासंबंधी इतर मुद्दे :-

① विनोद झुल्सी समिती —

— NRI लोकांना मतदानाची प्रक्रिया ही कशी सुलभ करता येईल यासंबंधी ही समिती.

② गोवा citizenship issue :-

— पोर्तुगालची गोव्यात वसाहत असल्यामुळे, पोर्तुगाल blog Identity 1961 नुसार, वसाहत जरी संपुष्टात आली. तरी नागरिकत्व संपुष्टात येत नाही.

त्यामुळे गोव्यात दुहेरी नागरिकत्वाची स्थिती निर्माण झाली. व हा मुद्दा हाताळण्यासाठी केंद्र सरकारने प्रसाद समिती ची स्थापना केली. व या समितीने । वर्षाच्या आत. आपले नागरिकत्व सिद्ध करण्यासंबंधी शिकारस केली.

व समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

★ H1B Visa -

— अमेरिकेमध्ये व्यावसाय निमित्त व इतर कारणामुळे ।। वर्षाच्या वर वास्तव्यासाठी जो परवाना लागतो त्याला H1B Visa म्हणतात.

— H1B Visa वरून संबंधित व्यक्तीला अमेरिकन नागरिकत्वाची पात्रता म्हणजे Green card.

— अमेरिकेमध्ये निवडणूकीसाठी मूळ निवासी ही अट (अमेरिकेत जन्मलेला.)

— एल. एम. सिंघवी समिती (2001) -- by - अटलबिहारी वाजपेयी

— अनिवासी भारतीयांना भारतासोबत जोडण्यासाठी ही समिती.

— या समितीच्या शिफारशीच्या आधारावर Overseas ministry ची स्थापना.

— पुढे जाऊन या मंत्रालयाचे नाव. प्रवासी भारतीय मंत्रालय. असे करण्यात आले.

— 2015-16 मध्ये Minimum Government, Maximum Governess या तत्वानुसार याला परराष्ट्र मंत्रालयात विलिन केले.


MAHAVARTAN COMPETITIVE FORUM
By- Abhijit Kamble
CLASS NOTES

सुधारित H 1 B Visa

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

- अभ्यासक्रम-राज्यव्यवस्था
- अभिजीत राठोड

- अलिकडेच एच 1 बी व्हीसा धारकांसंबंधी ट्रम्प सरकारने एक सुधारणा जारी केली असून यापुढे एच 1 बी व्हीसा धारक व्यक्तीच्या जोडीदाराला अमेरिकेत नोकरी करण्यास नाकारली आहे.
- ओबामा सरकारच्या काळात दोघांनाही म्हणजेच एच 1 बी व्हीसा धारक व्यक्तीस व त्याच्या जोडीदारास अमेरिकेत नोकरीची परवानगी दिली जात होती. एच 1 बी व्हीसा धारकांना ग्रीन कार्ड मिळत होते. तर जोडीदाराला एच 4 व्हीसा अंतर्गत अमेरिकेत नोकरीची संधी मिळत होती. हा नियम ट्रम्प सरकारने बदलला आहे.



काय आहे एच 1 बी व्हिसा ? -

- अमेरिकेत काम करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक व्हिसांपैकी एक.
- हा व्हिसा परदेशी लोकांनी अमेरिकेत ठराविक मुदतीसाठी व पगारी काम करण्यासाठी देण्यात येतो.
- अमेरिकी कंपन्यांना तंत्रकुशल कामगार मिळावेत यासाठी एच 1 बी व्हिसा पद्धत 1989 मध्ये अध्यक्ष जॉर्ज बुश यांच्या काळात सुरु झाली.
- अमेरिकी अस्थापनांना कुशल कामगारांची उणीव जाणवत होती. सॉफ्टवेअर प्रोग्रामिंग क्षेत्रात अभियांत्रिकी व संशोधन तज्ञांची गरज होती.
- जी कंपनी या व्हिसा योजनेत कर्मचाऱ्यांना घेईल त्यांचा खर्च भागविण्याची जबाबदारी कंपनीवर असते.
- एच 1 बी व्हिसा असलेल्या व्यक्ती तीन ते सहा वर्ष राहू शकतात व स्थायी वास्तव्याची मागणी करू शकतात. तसेच अमेरिकेत मालमत्ता खरेदी करू शकतात.

व्हीसासंबंधी कोटा -

- एच 1 बी व्हिसांची संख्या 65 हजार असून अमेरिकी विद्यापिठांतून मास्टर्स पदवी घेतलेल्यांसाठी 20 हजार व्हिसा दिले जातात.
- व्हिसासाठी जास्त अर्ज आल्यास सोडत काढून निर्णय घेतले जातात.
- दरवर्षी 6800 व्हिसा चिली व सिंगापूरसाठी मुक्त व्यापार करारामुळे (FTA) राखीव असतात.
- गेल्यावर्षी अमेरिकेकडे एच 1 बी व्हिसासाठी 2 लाख अर्ज दाखल त्यापैकी दोन तृतीयांश अर्ज भारतीय नागरिकांचे होते.
- एच 1 बी व्हिसा इमिग्रेशन ॲंड नॅशनालिटी ॲक्टच्या कलम 101 (A) (15)-(4) नुसार दिला जातो.

भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या व्यक्तींचा दरवर्षीचा कोटा-

- अमेरिकेत नोकरीसाठी - 45000 व्यक्ती/वर्ष
- अमेरिकेत शिक्षणासाठी-20000 व्यक्ती/वर्ष
- भारत+चीन मिळू शिक्षणासाठी- 35000 व्यक्ती/वर्ष

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

अलिकडेच काही कालावधीपूर्वीच एच 1 बी व्हीसा संबंधी ट्रम्प सरकारने एक विधेयक तयार केले असून ते पुढील प्रमाणे-

- अमेरिकेतील रोजगार परकिय लोकांना मिळू नये यासाठी नवीन विधेयक मांडण्यात आले आहेत.
- तसेच एच 1 बी व्हिसाधारक व्यक्तीचे वेतन दुप्पट करून म्हणजेच साठहजार डॉलरवरून ते 1 लाख 30 हजार डॉलर्स करण्यात आले आहेत. त्यामुळे अमेरिकी कर्मचाऱ्यांच्या जागी स्वस्तातील परदेशी कर्मचारी ठेवणे अमेरिकेतील कर्मचाऱ्यांना शक्य होणार नाही.

- हाय स्किल्ड इंडिग्रिटी अँड फेअरनेस ॲक्ट-2017 हे विधेयक मांडले असून यानुसार आधीची निम्न वेतन श्रेणी वगळण्यात आली आहे.

शिफारशी –

- किमान वेतनाची मर्यादा 1 लाख 30 हजार डॉलर्स (पुर्वी 60 हजार डॉलर).
- बाजाराच्या मागणीनुसार कंपन्यांना व्हिसा.
- रिक्त जागांवर अमेरिकी नागरिकांना प्रथम संधी.
- प्रत्येक देशाला असलेला व्हिसा कोटा काढून टाकणार.
- लघुउद्योगांना एच 1 बी व्हिसाच्या नवीन नियमांतून वगळले.
- विद्यार्थ्यांच्या व्हिसासाठीचे अडथळे दूर करणार.
- एच 1 बी व्हिसासाठीच्या कागदपत्रांची संख्या कमी करणार.
- कर्मचारीवर्गाला अधिक संरक्षण
- या विधेयकाबरोबरच ओबामा सरकारने एच 1 बी व एल 1 व्हीसा संबंधी शुल्क वाढीचा निर्णय घेतला असून यामुळे भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगास एक मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

एच 1 बी व एल 1 व्हीसा शुल्कवाढीविषयी-

- अमेरिकन नागरिकत्व आणि स्थलांतर सेवा भागाने 2016 मध्ये या व्हीसा संबंधी शुल्कामध्ये वाढ केल्याची अधिसुचना जारी केली असून या संबंधी अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष ओबामा यांनी Consolidated Appropriation Act 2016 संमत केला.
- या नवीन शुल्कवाढीच्या सुधारणेमुळे एच 1 बी व्हीसा संबंधी अर्जदारांना 4000 डॉलर तर एल 1 ए आणि एल 1 बी व्हीसा संबंधी अर्जदारांना 4500 हजार डॉलर अतिरिक्त शुल्क द्यावे लागणार आहे.
- कारण संचित विनियोजन अधिनियम 2016 चा संदर्भ देवून अमेरिकेच्या नागरिकत्व आणि स्थलांतर सेवा विभागाने असे नमुद केले की, अमेरिकेत रोजगार पुरविण्यात येणाऱ्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी 50 टक्केपेक्षा अधिक कर्मचारी वरील दोन्ही व्हिसाच्या आधारावर रोजगार मिळविलात.
- वरील शुल्कवाढ ही 1) आधारभूत प्रक्रिया शुल्क, 2) फसवणुक प्रतिबंध आणि स्वतंत्र ओळख, 3)-अमेरिकन कॉम्पीटीटीवनेस ॲन्ड इन्प्रुव्हमेंट ॲक्ट 1998 तसेच विमा प्रक्रिया शुल्क यांमध्ये करण्यात आलेली आहे.
- ही वाढ पुढील 10 वर्षांसाठी करण्यात आलेली असून हिची मुदत 30 सप्टेंबर 2025 पर्यंत असेल.

शुल्कवाढीचा भारतावर परिणाम-

- भारतातील माहिती तंत्रज्ञान कंपन्यांना आपले कर्मचारी अमेरिकेत पाठवण्यासाठी एच 1 बी व एल या प्रकारच्या व्हीसावर अवलंबून राहावे लागते. यामध्ये झालेल्या शुल्कवाढीमुळे आपल्या माहिती तंत्रज्ञान कंपन्यांना एक प्रकारे अडथळा निर्माण झाला आहे.
- अलिकडेच नॅस्कॉमने केलेल्या निरिक्षणाच्या आधारे असे दिसून आले की, भारताचे माहिती तंत्रज्ञान उद्योग, व्यापार मंडळ, भारतीय माहिती तंत्रज्ञान कंपन्या या वेगवेगळ्या व्हीसाच्या माध्यमातून अमेरिकन अर्थव्यवस्थेमध्ये वार्षिक 70 ते 80 दशलक्ष डॉलर एवढ्या प्रमाणात भर टाकत आहेत.
- शुल्क वाढीची मुदत लक्षात घेता या कंपन्या अमेरिकन अर्थव्यवस्थेमध्ये सन 2025 पर्यंत 1.5 ते 1.7 अब्ज अमेरिकन डॉलरची भर घालतील.


मोफत सराव चाचणी
परिवर्तन Competitive Forum - अभिजीत राठोड
संपूर्ण मराठी
व्याकरण व शब्दसंग्रह
विशेष लक्ष्य 7 जानेवारी STI मुख्य परीक्षा
शनिवार दि.23 डिसेंबर दुपारी 3:00 वा
- निलेश राठोड
उत्तम मोती बिल्डींग, नागनाथपार–शनिपार रोड, रमेश डाईंगजवळ, सदाशिव पेठ, पुणे –30
9272100500

मुलभुत हक्क

[Fundamental Rights]


* मार्गदर्शक तत्वाविषयी संविधान सभेमध्ये त्याच समितीने काम केले जी मुलभुत हक्कांसाठी होती. म्हणजेच मुलभुत हक्क व अल्पसंख्यांक समिती (अध्यक्ष - सरदार पटेल)

* मार्गदर्शकाचे महत्व -:

* राजकीय स्थिरता निर्माण होते. वेगवेगळ्या राजकिय पक्षाची कल्याणकारी राज्याविषयी वेगवेगळी भुमिका असते. या भुमिकेमध्ये एकवाक्यता आणण्याचे काम ही मार्गदर्शक तत्वे करतात.



* भारतीय संविधानामध्ये DPSP चा समावेश करण्यासंदर्भात संविधान सभेने मुलभुत हक्क समितीकडे काम सोपविले होते.

* मुलभुत हक्क व अल्पसंख्यांक समितीने - हक्काची विभागणी 2 भागांमध्ये केली.

① नागरी व राजकीय हक्क ② आर्थिक व सामाजिक हक्क

* नागरी व राजकीय हक्कांचा समावेश हा F.R मध्ये करण्यात आला व हे हक्क न्यायप्रविष्ट आहेत.

* आर्थिक व सामाजिक हक्कांचा समावेश मार्गदर्शक तत्वांमध्ये करण्यात आला व हे हक्क न्यायप्रविष्ट नाही.

* संविधान सभेचे सदस्य - काझी नझुरुद्दीन यांनी हे न्यायप्रविष्ट असावे असा ठराव मांडला. याच प्रकारचा ठराव के.टी. शहा यांनी सुद्धा मांडला होता. परंतु ठराव हा नाकारण्यात आला. याचे कारण आर्थिक व सामाजिक हक्क पूर्णत्वास नेण्यासाठी संसाधनाची गरज होती. व तत्कालीन परिस्थितीचा विचार करता हे सर्व न्यायप्रविष्ट केल्यावर सरकार अपयशी ठरेल व सरकारचा विरोधात क्रांतीची शक्यता निर्माण होईल.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By- Abhijit Rathod

* न्यायप्रविष्ट

Legal Process → (न्यायप्रविष्ट)

Political Process

* डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खालील उत्तर दिले,
– मार्गदर्शक तत्वे जरी न्यायप्रविष्ट नसले तरी Political Process (राजकीय पद्धती) द्वारे न्यायप्रविष्ट आहे.

* S.C ने मिनर्व्हा मिल खटल्यात F.R & DPSP यांना - 'भारतीय लोकशाही रूपी रथाची दोन चाके' ही उपमा दिली.

* केशवानंद भारती खटल्यात DPSP भारतामध्ये कल्याणकारी राज्याची निर्मिती करते असा निवाडा दिला.

*

समता

(F.R) → नागरी, व राजकिय हक्क

(D.P.S.P) → आर्थिक व सामाजिक हक्क

* सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी जर मुलभूत हक्कांचे उल्लंघन होत असेल तर, म्हणजे DPSP च्या अंमलबजावणी साठी FR चे उल्लंघन होत असेल आणि उद्देश समानता प्रस्थापित करणे असेल तर DPSP (मार्गदर्शक तत्वे) वरचढ ठरतात.

* मार्गदर्शक तत्वे जरी न्यायप्रविष्ट नसली परंतु त्यांच्या उद्दीष्टांच्या पुर्ततेसाठी (सामाजिक व आर्थिक न्याय) सरकारने एखादा ठराव/निर्णय घेतला व त्यामुळे मुहक्कांचे उल्लंघन होत असेल अशा वेळी DPSP वरचढ ठरतात, ना की F.R (मु.ह)

* सरकारला मार्गदर्शक तत्वानुसार काम करणे आवश्यक आहे. परंतु मार्गदर्शक तत्वाविरोधी एखादा ठराव घेतल्यास तो रद्द होतो.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

* 'सत्ताविभाजन' सिद्धांत मॉन्टेस्क्यु यांनी मांडला.

* कार्यक्रमांनी हा कार्यकारी मंडळाचा भाग असतो.

* मार्गदर्शक तत्वे ही 'शोष' असतात - डी. डी. बसु (शोष हक्क)

* मार्गदर्शक तत्वाच्या कलम-50 मध्ये 'न्यायपालिका ही (न्यायमंडळ) कार्यपालिकेपासुन वेगळी (कार्यकारी मंडळ) विभक्त असावी' असे सांगितले आहे.

— यालाच 'सत्ताविभाजन सिद्धांत' म्हणतात.

* सरकारने 99 वी घटनादुरूस्ती करून न्यायधिशांच्या नियुक्ती-साठी NJAC-(National Judicial Apointement commi ision) बनले. यामध्ये कायदा मंत्रींचा समावेश.

* या घटना दुरूस्तीमध्ये जे हे मंडळ स्थापन झाले. त्यामध्ये न्यायमंडळामध्ये कार्यकारी मंडळाचा समावेश होता. याच कारणावरून सर्वोच्च न्यायलयाने ही घटनादुरूस्ती रद्द केली होती.


* थोडक्यात सरकारने मार्गदर्शक तत्वाच्या सपोर्टने कायदा केला नाही. तरी चालते परंतु तो मार्गदर्शक तत्वाच्या विरोधी नसावा. सर्वोच्च न्यायालय एखाद्या कायदयाची घटनात्मक वैधता तपासताना मार्गदर्शक तत्वाचा आधार घेऊ शकते.

* मार्गदर्शक तत्वे

* भारतीय संविधानात असलेली मार्गदर्शक तत्वे ही भारताच्या स्वातंत्र्य लढयाची उद्दीष्टांचे प्रतिनिधित्व करतात. जसा स्वातंत्र्य - लढा एकल नव्हता. तसा मार्गदर्शक तत्वाची उद्दीष्टे ही अनेक आहे. व या सगळ्यांना मा.त मध्ये स्थान देण्यात आले आहे.

— 1935 चा कायदयामध्ये 'Instrumental of Instruction' होते. त्याचा विस्तारित भाग म्हणजे संविधानातील मार्गदर्शक तत्वे

— भारतीय संविधानात असलेली मार्गदर्शक तत्वे ही सामुहिक आहे. तर मुलभूत हक्क वैयक्तिक आहे.



★ आत्तापर्यंत DPSP मध्ये 5 वेळा दुरुस्ती करण्यात आल्या.

→ 7 वी घटनादुरुस्ती, 1956.

42 वी घटनादुरुस्ती, 1976.

44 वी घटनादुरुस्ती, 1978, अशोक मेहता समिती आहाराखर.

86 वी घटनादुरुस्ती, 2002,

91 वी घटनादुरुस्ती, 2012.

★ संविधानीक तरतुदी


F.R. DPSP.

कलम - 12 ←→ 36

13 ←→ 37

14 ←→ 38

35 ←→ 51



न्यायप्रविष्ट ← कलम - 12 → F.R } Govt- व्याख्या.

न्यायप्रविष्ट नाही ← कलम - 36 → DPSP }

★ या कलमामध्ये मार्गदर्शक तत्वे कोणासाठी व त्याची अंमलबजावणी कोण करेल या संबंधी उल्लेख म्हणजे राज्य संज्ञेबद्दल उल्लेख मिळतो. या कलमानुसार राज्यसंस्था म्हणजे काय याचा उल्लेख हा कलम - 12 प्रमाणे असेल.

— कलम-12 व कलम-36 हे दोन्ही सारखे आहे. परंतु कलम - 12 पेक्षा कलम-36 हे संकुचित आहे.

— कलम - 37 →


— मार्गदर्शक तत्वे ही न्यायप्रविष्ट नाही परंतु सरकारने कायदा निर्माण करताना या तत्वांना डोळ्यासमोर ठेवणे आवश्यक आहे. या तत्वाच्या विरोधी कायदा निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास न्यायमंडळ ती रद्द करू शकते.


—कलम - 38 →

★या कलमात सामाजिक, आर्थिक व न्याय प्रस्थापित करणे हे सरकारचे कर्तव्य आहे/असेल.

—कलम 38(A) — नुसार, राज्याने, सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात न्यायप्रस्थापित करण्याचा तसेच लोककल्याण सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करावा.

—कलम - 38(B) — राज्याने वैयक्तीक, क्षेत्रिय, भौगोलिक, व व्यावसायिक पातळीवरिल उत्पन्न विषयक विषमता घटवावी. तसेच दर्जा, संधी व सुविधा विषयक विषमता घटवावी. तसेच दर्जा संधी, व सुविधा बिषयक विषमता नाहिशी करावी. हे कलम मुळ संविधानात नव्हते तर अशोक मेहता समितीच्या शिफारशिच्या आधारावर 44 वी. घटना दुरुस्तीने टाकण्यात आले.*





★या तत्वामध्ये समानतेचे कलम -14 प्रमाणे व्यापक तत्व स्पष्ट करण्यात आले आहे व सोबत सरकार या संबंधी वेगवेगळ्या योजना जाहिर करतो.

उदा: PURA, श्यामाप्रसाद मुखर्जी रुरबन (रूरल) मिशन
भारत नेट (National optical fibre mission).

★कलम - 39 —

★ या कलमानुसार राज्याला काही ठोस बाबी सुनिश्चित करायच्या आहे.

① स्त्री व पुरुषांना समान उपजिविका उपलब्ध करुन देणे.

—या कलमाचा संबंध सर्वोच्च न्यायालयाने विशाखा केस मध्ये जोडला (कलम-14 व कलम-21)

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

② भौतीक संसाधनाचे समतामुलक वितरण करताना (जमिनदारी निर्मुलन) राखादया व्यक्तीला त्याच्या संपत्ती पासुन विलग करता येते/ सरकार विलग करू शकते.

— अशा वेळी त्याच्या मुलभुत हक्काचे उल्लंघन होणार नाही परंतु, ती संपत्ती हिरावताना त्याच्या योग्य मोबदला देणे आवश्यक व हा मोबदला म्हणजे बक्षीस नव्हे.

③ सामुहिक हिताला मारक ठरेल असे संपत्ती व उत्पादन साधनाचे केंद्रीकरण होणार नाही.

यासाठी सरकारने वेगवेगळे कायदे केले.

उदा. MRTP Act, CCI (compitition commision of India)

④ स्त्री- पूरूषांना समान कामासाठी समान वेतन.

⑤ बालकांचा व युवकांचा शोषणापासुन बचाव.

— सरकारने या संदर्भात बालकामगार प्रतिबंध - अधिनियम पारित केला.

★ कलम- 39- (A)-

— सर्व व्यक्तींना समान न्यायाची हमी द्यावी. आणि गरिबांना मोफत व न्यायविषयक सल्ला.

— हे तत्व 42 वी घ. दुरूस्ती, 1976 मध्ये जोडण्यात आले. परंतु या कलमाच्या अधिपासुन्च भारतामध्ये हे तत्व दिसुन येते. स्वातंत्र्यपुर्व काळात पहिले संस्थान-त्रावणकोर आणि पहिला प्रांत-मुंबई प्रांताने 1949 मध्ये मोफत आणि कायदे विषयक सल्ला देण्यासाठी पी. एन. भगवती समितीची स्थापना केली.

व या समितीच्या शिफारशिच्या आधारावर राज्य विधी-सहाय्यता मंडळ स्थापन केले. व या योजनेने प्रभावित होऊन केंद्र सरकारने न्यायमुर्ती-कृष्ण अय्यर यांच्या अध्यक्षतेखाली "The comitee on free legal aid" स्थापन केली.

— या समितीचा परिणाम म्हणजे 42 व्या. घटना. दूरूस्ती ने मोफत न्यायविषयक सल्ला हे कलम टाकले.

— सर्वोच्च न्यायालयाने आपल्या वेगवेगळ्या निकालामध्ये कलम- 21 सोबत त्याचा संबंध जोडला.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

- 1987 मध्ये सरकारने कलम 39-A या संदर्भात एक कायदा केला व ज्या अंतर्गत National Legal service ~~Act~~ Aforty Act, 1987 पारित केला.

—व या कायद्यानुसार व्यक्तींना मोफत व कार्यक्षम सल्ला देण्यासाठी पुढील संस्था निर्माण करण्यात आल्या.

① राष्ट्रीय विधी सहाय्यता प्राधिकरण
② राज्य विधी सहाय्यता प्राधिकरण
③ जिल्हा विधी सहाय्यता प्राधिकरण
④ तालुका विधी सहाय्यता प्राधिकरण.

—सदर उल्लेखनीय बाब म्हणजे विधी विषयक सहाय्यक प्राधिकरणाची तरतुद CRPC च्या कलम-304 मध्ये आहे.

— NALSA Act, 1986 अंतर्गत लोक अदालतची स्थापना करण्यात आली आहे.

★ कलम-40- ग्रामपंचायतीचे संघटन.

—मसुदा समितीने संविधान सभेला जो अहवाल दिला होता. यात या कलमाचा समावेश नव्हता तर संविधान सभेत चर्चे दरम्यान समाविष्ट करण्यात आले.

—सदर उल्लेखनीय बाब म्हणजे हे कलम फक्त ग्रामपंचायतीचा उल्लेख करते. इतर स्थानिक स्वराज्य संस्थेचा नाही.

परंतु स्थानिक स्वराज्य संस्थेचा पाया हे ग्रामपंचायत समजण्यात येते. व 73 व्या व 74 व्या घटना दुरुस्ती ने या कलमाला अधिक पाठबळ मिळाले.

★ कलम-41 — सामाजिक सुरक्षा.

—राज्याने आपल्या आर्थिक क्षमतेच्या व विकासाच्या मर्यादीत कामाच्या, शिक्षणाच्या, आणि बेरोजगारी, वृद्धत्व, अपंगत्व तसेच इतर दुर्दैवी स्थितीमध्ये (मदतीच्या हक्काच्या उपलब्धतेसाठी प्रभावी पाऊले उचलावी.

— कलम 41 मध्ये एक प्रकारे सामाजिक सुरक्षा स्पष्ट केलेली आहे. सामाजिक सुरक्षा म्हणजे व्यक्ती विशिष्ट वेळी जीवन जगण्यासाठी ज्या गरजा लागतील त्या गरजा पूर्ण करण्यास सक्षम नसणे. विशिष्ट वेळ म्हणजे (जेष्ठत्व, अपंगत्व, नैसर्गिक आपत्ती, विधवा, रोगाने ग्रस्त, दुष्काळग्रस्त, बलात्कारित आणि पिडित महिला इ. अशा व्यक्तींना जीवन जगण्यासाठी एक पोषक वातावरण निर्माण करून देणे.

—सामाजिक सुरक्षा ही संकल्पना जर्मनीमध्ये बिस्मार्क हा जर्मनीचा चान्सलर असताना ही संकल्पना त्याने मांडली. परंतु त्याचा विकास अमेरिकेत जास्त झाला.

★→ भारतात सामाजिक सुरक्षा ही संकल्पना 1923 मध्ये कामगार कायद्याने झाली.

— भारताच्या संविधानामध्ये सामाजिक सुरक्षतेची व्याख्या जरी स्पष्ट नसली तरी संविधानाच्या वेगवेगळ्या कलमानुसार व सर्वोच्च न्यायालयाच्या वेगवेगळ्या निर्णयानुसार याची प्राप्ती येते.

— भारतात सामाजिक सुरक्षतेसाठी वेगवेगळे कायदे करण्यात आलेले आहे.

① कामगार नुकसान भरपाई देण्याबाबत कायदा, 1923
या कायद्यानुसार कामगाराचा मृत्यु झाल्यास 50,000 ते 2,28,000 व अपंगत्व आल्यास 60,000 ते 2,74,000
— या दरम्यान नुकसान भरपाई दिली जाते.

② भविष्य निर्वाह निधी कायदा, 1952
(Provident act)

③ मातृत्व काळातील लाभ कायदा, 1961

— सामाजिक सुरक्षेविषयी संयुक्त राष्ट्राच्या, आम-सभेत ठराव क्र 21(A) नुसार 1948 च्या Universal Declaration Human Right च्या सेक्शन 22 नुसार प्रत्येक व्यक्तीला सामाजिक सुरक्षतेचा अधिकार आहे. व कलम 23 नुसार हे पाहवळ देणे राज्यसंस्थेचे कर्तव्य आहे.

— विकसनशील देशात सामाजिक सुरक्षा ही कमजोर अस्त्याचे दिसुन येते.

— तर तुलनेने विकसीत देशात ही ज्यास्तीत ज्यास्त लोकां-पर्यंत गेल्याचे दिसुन येते. याचे मुख्य कारण म्हणजे संसाधनाची कमतरता ना की राज्यसंस्थेचा उद्देश.

— 2011 च्या जनगणनेनुसार ज्येष्ठ नागरिकांची संख्या 10.4 कोटी आहे. 2026 पर्यंत ही संख्या 17.3 कोटी होण्याची शक्यता म्हणजेच 2000 ते 2050 या दरम्यान भारतातील ज्येष्ठ नागरिक संख्येत 36% वाढ होईल. तर कार्यक्षम लोकसंख्येचे प्रमाण 2001 मध्ये 8.4% होते. ते कमी होऊन 2026 मध्ये 5.2% होईल.

— विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे 2050 पर्यंत 60 वर्षे आणि त्यापुढील तयोगटातील महिलांचे प्रमाण वाढणार आहे.

आजची DPSP त्याचे F.R होतात.

ज्या DPSP चा संबंध हा सामाजिक आणि आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासंबंधी आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्याची F.R सोबत जोडणी करून ते न्यायप्रविष्ठ बनविले आहे.

*एकुण ज्येष्ठ नागरिकांपैकी 45% ज्येष्ठ नागरिक आर्थिक दृष्ट्या दुर्बल आहे. म्हणजेच 45% ज्येष्ठ नागरिक हे BPL गटातील आहे.

सामाजिक सुरक्षा हा F.R च्या कलम 21 चा भाग आहे.

*कलम - 42 -

①राज्याने न्याय व मानवी कार्य वातावरण (कामगार) तसेच मातृत्व विषयक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावे.

—कलम 42 हे मुळात कक्त कामगाशी संबंधी परंतु यामध्ये कामगारांना ज्या वातावरणात काम करावे लागते व ज्या अडचिंया आधिन राहुन काम मिळते. त्या अटी न्याय व मानवी सन्मानाला पूरक असतील हे राज्यांनी तपासुन पहावे. व यामुळेच स्त्रीयांना मातृत्व विषयक सुविधा मिळते. व सरकारने या संबंधी अनेक उपाययोजना केलेला आहे. याचाच भाग म्हणजे प्रसुती रजा संशोधन कायदा 2017, ज्या अंतर्गत प्रसुती रजा ही. 12 आठवड्यावरुन, 26 आठवडे करण्यात आली. (2 जिवंत आपत्यापर्यंत व तिसऱ्या आपत्याच्या वेळी 12 आठवडे.

—अपेक्षीत प्रसुतीच्या दिवसाच्या 8 आठवड्या आधी रजा मिळेल.

—सवलत उल्लेखनीय बाब म्हणजे खाजगी व संघटीत या दोन्ही संघटीत क्षेत्राचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

— 50 च्या वर अस्थापना असल्यास (काम करणारे लोक) work from home ची तरतुद

—कामाच्या ठिकाणी पाळणा घराची सुविधा याच धर्तीवर महाराष्ट्र राज्याने महिला कर्मचाऱ्यांसाठी विशेष रजा नियमावली तयार केली. ज्या अंतर्गत या कायदयापेक्षा अतिरिक्त सवलती राज्यातील महिला कर्मचाऱ्यांना मिळु शकिल यासाही महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981 मध्ये बदल करणे अपेक्षीत.

—कलम 42 मध्ये मातृत्व विषयक सुविधा म्हणजे त्या सुविधा ज्या स्त्रीला तिची माता म्हणून जबाबदारी चार पाडण्यासाठी मिळालेल्या असतात.

उदा. प्रसोभत्ता, हक्काचे वेतन, कामाच्या ठिकाणी पाळणागृहे व इतर सुविधा.

*कलम - 43 - कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग -

—राज्याने प्रचलित कायदयाद्वारे व आर्थिक संघटनेद्वारे व इतर कुठल्याही मार्गाने उद्योग चालु असेल तेव्हा तेथील कामगारांना त्यामध्ये सहभागी व समाधानी जीवनदर्जा मिळवण्यासाठी प्रयत्न करावे.

कलम - 43

कामगारांचे हित — कुटीर उद्योग विकास

— या कलमामध्ये पूढील दोन मार्गदर्शक तत्वाचा समावेश होतो.

① कामगारांच्या हीत संरक्षणासाठी राज्याने कायदे करावे.

② कुटीर उद्योगाचा विकास करावा.

* 97 वी घटना दूरूस्ती याच कलमासंदर्भात आहे.

*कलम - 44 - समान नागरी कायदा.

— व्यक्तीचे वर्तन तसेच तिचे इतर व्यक्ती अथवा राज्य सोबतचे संबंध यांचे निर्धारण करणाऱ्या नियमांचा संच म्हणजे कायदा होय.

कायदा

— देशातील जे कायदे प्रथा व परंपरेनुसार चालतात त्यांचा समावेश law of the land. मध्ये होतो. ज्या देशाची राज्यघटना अलिखित असते. त्या देशामध्ये या प्रकारचा कायदा चालतो. (ब्रिटन)

— देशाच्या एखादया संस्थेने निर्माण केलेला कायदा म्हणजेच Municiple law होय.

— याची दोन भागात विभागणी.

① constitutional law.

② ordinary law

- संविधान सभेने निर्माण केलेले कायदे म्हणजे constitutional law व इतर अस्तित्वात असलेले कायदे म्हणजे ordinary law.

— ordinary law चे दोन भागात विभागणी होते.

① common law

② Administrative law.

— सामान्य वर्तणूकीला नियंत्रीत करणारा कायदा म्हणजे. common law. व विशिष्ट वर्तनाला निर्धारित करणारा कायदा म्हणजे. Administrative law.


— common law चे दोन विभागणी होते.

① civil law (देशाची आर्थिक देवाणी. व्यवहार)

② criminal law (मांडणी.)

~~कर~~

कायदा



PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

★ वारसा हक्क, दत्तक विवाह, घटस्फोट इ.

★ समान नागरी कायद्याचा संबंध फक्त याच कायद्याशी येतो.

★ शहाबानो खटला या कायद्या संदर्भात होता.

★ ऐतिहासिक पार्श्वभूमी वैयक्तीक कायद्याची –
(Histrorical Baground of Personal Law)

– भारतामध्ये वैयक्तीक कायदयाच्या पार्श्वभुमीचा विचार केला असता भारतामध्ये समान वैयक्तीक कायदे निर्माण करण्याचे अनेक प्रयत्न झाल्याचे दिसुन येते. सर्वसाठी एकसमान कायदा करण्याची सुरुवात ही ब्रिटीश फौजदारी कायदयापासुन झाली. व त्यासाठी 1833 मध्ये पहिला विधी आयोग स्थापन करण्यात आला. अध्यक्ष - मेकॉले होते. या आयोगाने संपूर्ण भारतामध्ये एक समान कायदा संहिता असावी. यासाठी प्रयत्न सुरु केले. व. याचाच भाग म्हणजे. 1857 चा उठाव.


– कारण, एकसमान कायदा निर्मितीला सुरुवातीचा संबंध हा धार्मिक बाबींशी जोडला गेला.

– परिणामी ब्रिटीशांनी नाणिवपूर्वक वेगवेगळे कायदे निर्माण करण्याचा प्रयत्न केला व व्यक्तीच्या खाजगी बाबींना हस्तक्षेप न करण्याचे धोरण अवलंबिले. व याचाच भाग म्हणजे

हिंदू विवाह कायदा, 1864
ख्रिश्चन विवाह कायदा, 1872
भारतीय घटस्फोट कायदा, 1869
द मुस्लीम डिझॉल्युशन ऑफ मॅरेज अॅक्ट, 1939
हिंदू वारसा हक्क कायदा, 1925


– 1935 नंतर काही प्रमाणात याचे संहिताकरण (एकीकरणाला) सुरुवात त्याचाच भाग म्हणजे. जी. व्ही. देशमुख यांनी मांडलेला हिंदू महिला संपत्ती हक्क कायदा ज्याला 'देशमुख बिल' असेसुद्धा म्हणतात. हाच कायदा भारतात समान नागरी कायदा-ची पार्श्वभुमी ठरला.

– त्यानंतर या कायदयाचा केर आढावा घेण्यासाठी संविधान सभेने B.N. Rao यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. व या समितीची शिफारस म्हणजे. भारतीय संविधानचे कलम - 44.



उदा. द्यामनुसार वेगळा

विवाह नोंदणी सक्ती करणारे पहिले राज्य "उत्तर प्रदेश."



— भारतामध्ये मुस्लीमांच्या जातीत वैयक्तिक कायदे हे. वरिल प्रमाणे वेगळे आहे.

— उल्लेखनीय बाब म्हणजे मुस्लीमांमध्ये सुद्धा आणखी वेगलेवेगळे वैयक्तिक कायदे असल्याचे दिसुन येते.

★ समान नागरी कायदयाची घटनात्मक स्थिती :-

① भारतामध्ये असमान वैयक्तीक कायदे निर्माण होण्यासाठी संविधानातील महत्वाचे कलम म्हणजे. कलम - 372 ज्यामध्ये स्वातंत्र्या-पुर्वीचे सगळे कायदे हे तसेच चालु राहिले. जोपर्यंत नवीन कायदेमंडळ यात हस्तक्षेप करणार नाही.

— स्वातंत्र्यानंतर वैयक्तीक कायदयासंदर्भात सरकारने ही तटस्थ भुमिका ठेवली (Neutral) त्यामुळे हे सर्व कायदे तसेच चालु राहिले. त्यातला एक कायदा म्हणजे मुस्लीम शरियत कायदा, 1937

② समान नागरी कायदा हा समवर्ती सुचीचा विषय आहे. परंतु समवर्ती सुचीमध्ये याची मांडणी ही समान नागरी कायदा म्हणून नाही तर समान नागरी कायदयामध्ये जे वैयक्तिक कायदे येतात त्यांचा संबंध हा घटस्फोट, पोटगी, वारसा हक्क विवाह या संबंधित येतो.

व हे सर्व समवर्ती सुचीचा भाग आहे.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

या प्रकारचा कायदा करणारे पश्चिम बंगाल पहिले राज्य आहे.

– त्यामुळे म्हणून समान नागरी कायदा हा समवर्ती सूची चा भाग आहे. असे संबोधण्यात येते. सद्यस्थितीत, पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड, आसाम, मेघालय, उडिसा या राज्यात त्या या राज्याचे मुस्लीम विवाह व घटस्फोट कायदे आहे.

– यामुळेच समान नागरी कायदा संदर्भात क्षेत्रानुसार भिन्नता आढळते.

③ समान नागरी कायदा हा मार्गदर्शक तत्वाचा भाग असल्यामुळे सर्वोच्च न्यायालय हा कार्यपालिकेच्या (executive) कार्यक्षेत्रात येणारा घटक आहे. अशी भुमिका घेते. कारण मार्गदर्शक तत्वे न्यायप्रविष्ठ नाही.

④ परंतु एखादया वैयक्तीक कायद्यामुळे जर मुलभुत हक्काचे उल्लंघन होत असेल तर सर्वोच्च न्यायालय या संदर्भी आपली भुमिका स्पष्ट करू शकते.

उदा. शहाबानो खटला.

***– वैयक्तीक कायद्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाची भुमिका म्हणजे समान नागरी कायदयाविषयी भुमिका नव्हे.

***– समान नागरी कायदया संबंधीत लाढी ही धार्मिक लाढीशी निगडीत नसुन वैयक्तीक लाढीशी निगडीत आहे.

– हा विषय समवर्ती सुचीतील असल्यामुळे जर राज्यांना या संदर्भात कायदा करण्याचा अधिकार दिल्यास आणखी असमान वैयक्तीक कायदे निर्माण होऊ शकतात. त्यामुळे केंद्राकडून अपेक्षा केली जाते. कि त्यांनी समान नागरी कायदा प्रस्थापित करावा.

– संविधान सभेत बेगम एजाज रसुल यांनी हिंदू आणि मुस्लीम स्त्रीयांना एकसमान अधिकार असावे. असा प्रस्ताव मांडला.

– राजकुमारी. अमृता कोर व हंसा मेहता यांनी मिळुन हिंदू आणि मुस्लीम स्त्रियांचे हक्क हे मुलभुत हक्कात समाविष्ट करावे. असा आग्रह धरला. व B.N. Rao समितीच्या शिफारशीच्या आधारावर कलम- ४४ मध्ये राज्याकडून ही अपेक्षा केल्या गेली.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

*कलम-45- बाल शिक्षण-

— मुळात हे कलम बालविकास व शिक्षण यांच्याशी संबंधीत कलम आहे.

— मुळ घटनेत हे कलम ज्या स्वरूपात होते. साडेचार्‍या हे. त्या स्वरूपात नाही कारण 86 व्या घटना दुरूस्तीने यात बदल केला.

— कलम 45 हे भारतीय संविधानातील एकमेव असे कलम आहे. कि त्याच्या अंमलबजावणीसाठी 10 वर्षाची मुभा दिली होती. व ही मुदत 86 व्या घटना दुरूस्तीने वाढवण्यात आली.

— व ही मुदत आता मुलभुत हक्क मध्ये समाविष्ट करण्यात आली असुन कलम-21(A) मध्ये याचा समावेश होतो.

— मार्गदर्शक तत्वांमध्ये आतापर्यंत एकही कलम वगळण्यात आले नाही परंतु यामध्ये भरच टाकण्यात आली. त्याचाच हा एक भाग.

— कलम-45 हे कलम-21 सोबत सरळ संबंधीत आहे. त्यामुळे या कलमाला "कल्याणकारी राज्याचे कलम" असे म्हणतात.

* कलम-46— SC व ST व इतर दुर्बल घटक यांचे शैक्षणिक व सामाजिक हित संबंध जोपासणे हे राज्याचे कर्तव्य असेल.

— स्वतंत्र्य भारताच्या इतिहासात हे एकमेव असे कलम आहे. याचा वापर सरकारने "न्यायालयात आरक्षणाविषयी बाजु मांडताना आधार घेतला होता.

*****-> सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे अॅट्रॉसीटी कायदयाची वैधता ही याच कलमाच्या आधारे आहे. ना की कलम-17.

*-> तर civil. Right Act ची वैधता ही कलम-17 या आधारावर आहे.

*कलम-47—

— राज्याने लोकांच्या पोषणाच्या व जिवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी तसेच सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न करावे.

— आणि विशेषत: आरोग्याला हानिकारक ठरणाऱ्या मादक द्रव्य सेवणास प्रतिबंध करण्यासाठी प्रयत्न करावे. परंतु मादक द्रव्याचा वापर हा औषधी म्हणून होत असेल तर या कलमाला अपवाद आहे.

— वेगवेगळ्या संस्थांकडून याचा आधार घेऊन दारू बंदीचे समर्थन केल्या जाते.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
CLASS NOTES

★ कलम-48-
— राज्याने कृषी व पशुसंवर्धन उद्योगाची आधुनिक व शास्त्रीय आधारावर संरचना करण्याचा प्रयत्न करावा.
— आणि विशेषत: पशुंच्या जातीचे संरक्षण आणि सुधारणेसाठी प्रयत्न करावे. सोबतच गायी, वासरे व इतर दुधाळ जनावरांच्या कत्तलीस प्रतिबंध करावा.
— N.C. सक्सेना यांनी गोवंश हत्या बंदीचे समर्थन करताना त्याचे आर्थिक महत्व स्पष्ट करून दिले. त्यामुळे भारतीय संविधानात कलम-48 मध्ये गोवंश हत्तेविषयी जी बाब आहे. ती बाब धार्मिक नसुन आर्थिक आहे.

गोवंश हत्या बंदी- N.C सक्सेना.

— 48(A)-
— राज्याने पर्यावरणाच्या संरक्षण व सुधारणेसाठी तसेच वने व वन्यजीव संरक्षणासाठी प्रयत्न करावे.
— 42 वी घटनादुरूस्ती ने हे कलम जोडण्यात आले.

★ कलम-49-
— राज्याने अशी सर्व स्मारके, ठिकाणे, अथवा कलात्मक व ऐतिहासिक ठिकाणे ज्यांना संसदेने अथवा संसदीय कायदा अंतर्गत राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषीत केले आहे. त्यांना विद्रुपीकरण, परिवर्तन, नष्ट करणे, स्थलांतर, नियति यापासुन राज्याने संरक्षण करावे.

★ कलम-50- सत्ता विभाजन सिद्धांत
— ~~राज्याने अशी सर्व स्मारके~~

(कार्यकारी + कायदेमंडळ × न्यायमंडळ)

'मॉन्टेस्क्यु' (जनक)

फ्रान्स ← जॉन केल्विन (अंमलबजावणी) (या तत्वाला organised केले.) (कार्यकारी + कायदेमंडळ एक असावे)

ऑरिस्टॉटल (तत्व) → पॉलिटिक्स ग्रंथ

Mixe Government (Hybrid Govt.)

कायदेमंडळ | कार्यकारी मंडळ | न्यायमंडळ

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

सत्ता विभाजनाचा सिद्धांत
(कलम-५०)

— ॲरिस्टॉटल ने सर्वप्रथम Hybrid Govt. (मीक्स गर्व्हमेंट) चे तत्व मांडले. त्याने आपल्या Polityics या ग्रंथामध्ये कायदा निर्माण करणारी, कायद्याची अंमलबजावणी करणारी व न्यायदान करणारी अशा 3 संस्था असाव्या असे तत्व मांडले. परंतु या तत्वामध्ये हे तिन्हिही एकमेकाला जबाबदार नव्हते किंवा यांच्या एकमेकांच्या जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या नव्हत्या. त्यामुळे एखाद्या कायद्यासंबंधी या तिघांमध्ये वारंवार संघर्ष निर्माण होत. त्यामुळे या तत्वाला आणखी पुढे नेण्याचे काम जॉन कोल्विन यांने केले.

यांने कायदा आणि कार्यकारी मंडळ हे एक असावे, असे तत्व मांडले. परंतु या तत्वाला संघटीत स्वरूप देण्याचे कार्य फ्रान्स पुर्नजागरणाचा अग्रदूत "मॉन्टेस्कु" यांने केले. त्याने 'The spirit of laws" या ग्रंथामध्ये सत्ता विभाजनाचा सिद्धांत मांडला. हा त्याचा सिद्धांत फ्रान्सच्या पार्श्वभूमीवर आधारित होता.

मॉन्टेस्कुच्या सत्ता विभाजनाच्या सिद्धांतानुसार कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ हे एक असावे; परंतु न्यायमंडळ /न्यायव्यवस्था या पासुन भिन्न असावी.

म्हणजेच कार्यकारी मंडळाने /कायदेमंडळाने एखादा कायदा केला. आणि हा कायदा संविधानाच्या विरोधी असेल तर तो रद्द करण्याचा अधिकार ज्युडिशी (न्यायमंडळाला) ला असेल.

मॉन्टेस्कुचा सत्ता विभाजनाचा सिद्धांत हा क्रांतीशी संबंधीत होता. परंतु भारताच्या संविधानामध्ये जे हे तत्व दिसते. त्याचे कारण क्रांती नसुन न्यायालयीन स्वातंत्र्य आहे.

* — भारतामध्ये कलम-५० मध्ये हे तत्व आढळते. परंतु या तत्वाचा मुख्य उद्देश -

1. न्यायालयीन स्वातंत्र्य
2. दृश्यम न्यायालय

— हे कार्यकारी मंडळ यापासुन विभक्त.

– म्हणूनच भारतामध्ये कार्यकारी दंडाधिकारी व न्यायिक दंडाधिकारी हे वेगळे / विभक्त आहे.

– भारतीय संविधानात ज्या कलम-50 चा समावेश करण्यात आला आहे. त्याचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे "check & balance" म्हणजेच
- कार्यकारमंडळ कितीही वेळा कायदा करू शकते. आणि न्यायिक / न्यायमंडळ ते कितीही वेळा रद्द करू शकते.

★ कलम-51 -

– या कलमामध्ये भारताच्या आंतराष्ट्रीय भूमिकेची ओळख होते व जी आपल्या परराष्ट्र धोरणाचा आधार आहे.

– भारत हा त्या देशांपैकी एक आहे कि ज्याचा संविधानत: परराष्ट्र धोरणचे तत्व स्पष्ट केले आहे. इतर देशामध्ये परराष्ट्र धोरणासंबंधी कायदे आहे: जे कालानुरूप बदलू शकतात.

यामध्ये,

① भारताने आंतराष्ट्रीय शांतता व सुरक्षीतता यांचे संवर्धन करावे.

② राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये न्याय आणि समन्वय टिकुण ठेवणे.

③ आंतराष्ट्रीय कायदे व करार यासंबंधी आदरभाव ठेवणे.

④ आंतरराष्ट्रीय विवादाची लवादाच्या माध्यमातुन सोडवण्याचा प्रयत्न करणे.

भारतीय राज्यघटनेची मूलभूत संरचना

घटनेची मूलभूत संरचना या संकल्पनेच्या उदय आणि विकासाचे टप्पे-

- घटनेची 'मूलभूत संरचना' या संकल्पनेचा घटनेत कोठेही उल्लेख नाही.
- ही संकल्पना सर्वोच्च न्यायालयाने मांडली.
- मूलभूत संरचना संकल्पना सर्वोच्च न्यायालयाच्या वेगवेगळ्या खटल्यांच्या निकालावरून विकसीत होत गेली.
- संसद मूलभूत हक्कांमध्ये दुरुस्ती/बदल करू शकते का? हा प्रश्न घटना लागू झाल्यानंतर पहिल्याच वर्षी पडला.

शंकरीप्रसाद विरुद्ध भारत सरकार खटला (1951)-

- संसदेने पहिल्या घटनादुरुस्तीने मालमत्तेचा हक्क कमी केला होता, त्याला या खटल्याने आव्हान देण्यात आले.
- या खटल्याच्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने असा निकाल दिला की,
  - अ) कलम 368 अंतर्गत संसदेच्या घटनादुरुस्तीच्या अधिकारात मूलभूत हक्कांच्या दुरुस्तीचाही समावेश होतो.
  - ब) कलम 13 (मूलभूत हक्कांशी विसंगत असलेले अथवा त्यांचे न्यूनीकरण करणारे कायदे अवैध ठरतील) मधील 'कायदा' या शब्दात केवळ साधारण कायद्यांचा समावेश होतो, घटनादुरुस्ती कायद्यांचा समावेश होत नाही.
  - क) त्यामुळे संसद घटनादुरुस्ती कायद्याद्वारे कोणत्याही मूलभूत अधिकारात घट करू शकते किंवा तो काढून घेऊ शकते, आणि असा कायदा कलम 13 अंतर्गत अवैध ठरणार नाही.

गोलकनाथ विरुद्ध पंजाब सरकार खटला (1967)-

- या खटल्यात 17 व्य घटनादुरुस्तीच्या कायद्यास (1964) आव्हान देण्यात आले.
- या घटनादुरुस्तीने नवव्या अनुसूचीमध्ये काही राज्य कायदे समाविष्ट करण्यात आले होते.
- या घटनादुरुस्तीविरुद्धच्या गोलकनाथ खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की,
  - अ) मूलभूत हक्क 'अलौकिक आणि अपरिवर्तनीय (Transcendental and Immutable)' आहेत. त्यामुळे संसद मूलभूत हक्कांत घट करू शकत नाही किंवा काढून घेऊ शकत नाही.
  - ब) मूलभूत हक्कांवर गदा आणणारा घटनादुरुस्ती कायदा कलम 13 नुसार अवैध असेल.
- **थोडक्यात-** न्यायालयाने मूलभूत हक्कांत संसदेद्वारे घटनादुरुस्तीने बदल करण्याबाबत शंकरीप्रसाद खटल्यातील आपला निकाल गोलकनाथ खटल्यात बदलवीला. तसेच मूलभूत हक्क हे अलौकीक व अपरिवर्तनीय आहेत असे सांगून संसदेच्या कलम 368 अन्वये घटनादुरुसतीच्या अधिकारास मर्यादा घातली.
- गोलकनाथ खटल्यात सर्वोच्च न्यायालय घटनेच्या 'मूलभूत संरचने'च्या संकल्पनेकडे पाऊल टाकत असल्याचे दिसते.'

गोलकनाथ खटल्याच्या निर्णयाला संसदेचा 24 वी घटनादुरुस्ती (1971)ने प्रतिसाद-

- 24 व्या घटनादुरुस्तीने कलम 13 आणि कलम 368 मध्ये दुरुस्ती करण्यात आली.
- या दुरुस्तीद्वारे घटनेत अशी तरतुद करण्यात आली की,
  - अ) संसदेला कलम 368 अंतर्गत कोणत्याही मूलभूत हक्कात घट करण्याचा किंवा तो काढून घेण्याचा अधिकार आहे.
  - ब) कलम 13 अंतर्गत हा घटनादुरुस्ती कायदा अवैध नसेल.

केशवानंद भारती विरुद्ध केरळ सरकार (1973)–

- या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने गोलकनाथ खटल्यातील आपला निर्णय बदलला.
- सर्वोच्च न्यायालयाने या खटल्यात 24 व्या घटनादुरुस्तीची वैधता मान्य करून संसदेस कोणत्याही मूलभूत हक्कात घट करण्याचा किंवा तो काढून टाकण्याचा अधिकार असल्याचे मान्य केले. मात्र त्याचबरोबर घटनेची **'मूलभूत संरचना'** ही नवीन संकल्पना या खटल्याच्या निकालावेळी मांडली.
- त्याद्वारे सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की, कलम 368 अंतर्गत घटनेच्या मूलभूत संरचनेत बदल करण्याचा अधिकार संसदेला प्राप्त नाही.
- म्हणजेच संसदेला मूलभूत हक्कात घट करणारा किंवा काढून टाकणारा घटनादुरुस्ती कायदा करण्याचा अधिकार नाही. कारण मूलभूत हक्क हे घटनेच्या मूलभूत संरचनेचाच भाग आहे.
- अशा प्रकारे केशवानंद भारती खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने घटनेची 'मूलभूत संरचना' ही संकल्पना मांडली.
- सर्वोच्च न्यायालयाने इंदिरा गांधी विरुद्ध राज नारायण (1975) या खटल्यात घटनेची मूलभूत संरचना ही संकल्पना पुन्हा एकदा पक्की करून लागू केली.

'मूलभूत संरचना' या तत्वाला 42 व्या घटनादुरुस्तीने (1976) संसदेचा प्रतिसाद–

- सर्वोच्च न्यायालयाच्या 'मूलभूत संरचना' या तत्वाला संसदेचा प्रतिसाद 42 व्या घटनादुरुस्तीच्या (1976) स्वरुपात करण्यात आला.
- या घटनादुरुस्तीने कलम 368 मध्येच दुरुस्ती करण्यात आली त्यानुसार कलम 368 (4) हे कलम समाविष्ट करून असे घोषित केले की,–
- अ) संसदेच्या संविधिय अधिकारावर कोणतीही मर्यादा नाही.
- ब) कोणतीही घटनादुरुस्ती (भाग 3 च्या तरतुदीसह) कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कारणास्तव प्रश्नास्पद करता येणार नाही.

मिनर्व्हा मिल्स विरुद्ध भारतीय संघराज्य (1980)–

- या खटल्याच्या निकालाद्वारे सर्वोच्च न्यायालयाने कलम 368 (4) मधील तरतुद अवैध ठरवली कारण त्यामुळे न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार नष्ट होतो. जो घटनेच्या मूलभूत संरचनेचाच भाग आहे.
- कलम 368 अंतर्गत संसद आपल्या घटनादुरुस्ती करण्याच्या अधिकाराची व्याप्ती वाढवून राज्यघटना रद्द करण्यावा किंवा राज्यघटनेची मूलभूत संरचना नष्ट करण्याचा अधिकार स्वत:कडे घेऊ शकत नाही असे सर्वोच्च न्यायालयाने मिनर्व्हा मिल्स या खटल्यात स्पष्ट केले.
- या खटल्याच्या निकालातून न्यायालयाने स्पष्ट केले की, कलम 368 अंतर्गत संसदेला असलेला घटनादुरुस्ती अधिकार हा अमर्याद नसून मर्यादीत स्वरुपाचा आहे– घटनेच्या मूलभूत संरचनेत संसद बदल करू शकत नाही.

वामनराव विरुद्ध भारतीय संघराज्य (1981)–

- या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने 'मूलभूत संरचनेचे' तत्व पुन्हा उचलून धरले आणि स्पष्ट केले की, 24 एप्रिल 1973 नंतर (केशवानंद भारतीय खटल्याच्या निकालाची तारीख) केलेल्या सर्व घटनादुरुस्त्यांना ते लागू होईल.

सद्यस्थिती–

- संसद कलम 368 नुसार राज्यघटनेच्या कोणत्याही भागात (मूलभूत अधिकारांसहित) दुरुस्ती करू शकते, परंतु राज्यघटनेच्या 'मूलभूत सरचनेत' बदल करू शकत नाही.
- सर्वोच्च न्यायालयाने अजूनही घटनेच्या 'मूलभूत संरचनेत' कोणत्या घटकांचा समावेश होतो हे स्पष्ट केलेले नाही.
- अद्यापपर्यंत न्यायालयाने मूलभूत संरचना किंवा 'मूलभूत चौकट' म्हणजे काय? याबाबत कोणतीही व्याख्या केलेली नाही.
- सर्वोच्च न्यायालयाच्या विविध खटल्यांच्या निकालावरून घटनेच्या 'मूलभूत संरचनेत' पुढील गोष्टींचा समावेश होतो असे समजते.

1) घटनेची सर्वोच्चता	2) घटनेच्या प्रास्ताविकेत दिलेली उद्दिष्टे	3) संसदिय शासनव्यवस्था
4) सार्वभौम, लोकशाही व गणराज्य संरचना	5) धर्मनिरपेक्षता	6) कायद्याचे राज्य
7) व्यक्तिचे स्वातंत्र्य व आत्मसन्मान	8) राष्ट्राची एकता व एकात्मता	9) अधिकारांच्या विभागणीचे तत्व

उत्सव मोती बिल्डींग (दुसरा मजला), नागनाथपार-शनिपार रोड, रमेश डाईंग जवळ, सदाशिव पेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.
9272100500

10) न्यायकि पुनर्विलोकन (कलम 32, 226, 227) 11) संघराज्य 12) समानतेचे तत्व

13) भाग 3 मधील इतर मूलभूत हक्कांचा 'सार'

14) सामाजिक व आर्थिक न्याय, कल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी संपूर्ण भाग चार

15) मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वे यांमधील संतुलन

16) मुक्त व न्याय निवडणूकांचे तत्व

17) न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य (घटनेच्या चौकटीतच राहून)

18) कलम 32, 136, 141, 142 या अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार

19) कलम 226 आणि 227 अंतर्गत उच्च न्यायालयाचे अधिकार

20) कलम 368 ने प्रदान केलेल्या घटनादुरुस्तीवरील अधिकारावरच्या मर्यादा

राज्यघटना पुनर्विलोकन आणि मूलभूत संरचनेचे तत्व –

- 22 फेब्रुवारी 2000 रोजी भाजपप्रणीत रालोआ सरकारने एम.एन.वेंकटचलैय्या यांच्या अध्यक्षतेखाली 'राज्यघटना पूनर्विलोकन आयोग' स्थापन केला. या आयोगाने 31 मार्च 2002 रोजी आपला अहवाल सादर केला.
- या आयोगात पुढील 10 सदस्य होते– बी.पी.जीवनरेड्डी, आर.एस.सरकारिया, के.पुन्नय्या, सोली सोराबजी, के.परसरण, सुभाष कश्यप, सी.आर.इराणी, अबिद हुसैन, सुमित्रा कुलकर्णी, पी.ए.संगमा.
- घटनेच्या मौलीक संरचनेला धक्का न लावता संसदीय लोकशाहीच्या चौकटीतच राहून आयोगाला शिफारसी करण्याचे निर्देश दिले होते.
- आयोगाने मूलभूत संरचनेला कोणतीही बाधा येणार नाही याची पुर्नतः काळजी घेवून एकूण 249 शिफारसी केल्या होत्या, त्यांपैकी 58-शिफारसी राज्यघटनेत दुरुस्ती करून अंमलात आणता येतील अशा होत्या तर उर्वरित शिफारशी कार्यकारी मंडळाच्या कार्यवाहीने अंमलात आणता येतील अशा होत्या.

काही महत्वाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे–

- संसदीय लोकशाहीच्या संस्थाना बळकटी देणे, निवडणूक सुधारणा, सामाजिक, आर्थिक बदलाचे सुरक्षितता, केंद्र-राज्य संबंध, विकेंद्रीकरण आणि पंचायत राज व्यवस्था बळकट करणे, मूलभूत हक्कांचा विस्तार, मूलभूत कर्तव्यांना परिणामकारकता देणे, मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करणे, वित्तीय व चलनविषयक धोरणावर विधीवत नियंत्रण ठेवणे.
- यावरून असे स्पष्ट होते की, संसद (कार्यकारी मंडळ) कार्यकारी मंडळ आणि न्यायमडळ या सर्वांना आपापली कार्ये घटनेच्या मूलभूत चौकटीत राहूनच पार पाडावी लागतात.
- थोडक्यात कोणतीही अधिसत्ता घटनेच्या मूलभूत संरचनेला बाधा पोहचवू शकत नाही.

परिवर्तन Competitive Forum

राज्यसेवा २०१८ (पूर्व-मुख्य-मुलाखत)

परिवर्तन
Competitive Forum

Foundation Batch

लवकरच...

General Studies : अभिजीत राठोड सर घेतील.
CSAT : सचिन ढवळे सर घेतील.

Integrated Batch
एकत्रित बॅच

राज्यसेवा पूर्व परीक्षेचा
अभ्यासक्रम प्रथम घेण्यात येईल.

- The Hindu वर्तमानपत्र दररोज मराठीमध्ये करून शिकवण्यात येईल.
- अभ्यासक्रमातील जे घटक संदर्भग्रंथात उपलब्ध नाही त्यावर स्वतंत्र नोट्स देण्यात येतील.
- बेसीक गोष्टीवर भर देण्यात येईल. (NCERT, Maharashtra State Board)
- दर आठवड्याला टेस्ट, त्यावर सविस्तर चर्चा स्वत: राठोड सर.
- दर रविवार : वैयक्तिक मार्गदर्शन.

दररोज चालु घडामोडीवर
नोट्स व बेसिक विषयावर टेस्ट.

- मर्यादित जागेमुळे नाव नोंदणी आवश्यक.
- संयुक्त परीक्षा (PSI/STI/ASO) चा अभ्यासक्रम यामध्येच पूर्ण करण्यात येईल.

- अभिजीत राठोड

उत्तम-मोती बिल्डिंग, नागनाथपार-शनिपार रोड,
रमेश डाईंगजवळ, जनसेवा बँकेच्या वर,
सदाशिवपेठ, पुणे- 411 030

9272100500

Polity Part-2

(Polity + HR + History).

शिक्षण (education)

— व्याख्या —

→ प्लेटो (Plato) -

① प्लेटो ने 'रिपब्लीक' नावाच्या ग्रंथामध्ये, ज्याचे वर्णन 'रूसो' ने शिक्षण शास्त्राबरिल सर्वोकृष्ट ग्रंथ असे केले आहे.

② प्लेटो ने त्याचे विचार आदर्श समाज व्यवस्थेसंबंधी विशेषत: न्यायसंबंधी मांडले.

③ समाजाची न्याय तत्वावर उभारणी करण्याचा प्रयत्न / उपाय म्हणजेच 'शिक्षण'

— प्लेटोच्या व्याख्येवरून समाजाची न्याय तत्वावर उभारणी म्हणजे,

① शिक्षणाची कर्तव्याची भावना निर्माण होणे.

② समाज हिताची भावना निर्माण होते

③ बौद्धीक विकास घडून येतो.

— वरिल लक्षणे व उद्दीष्टे ही शिक्षणाची असल्याचे प्लेटोने स्पष्ट केले आहे.

— "शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या शारिरिक, मानसिक आणि आध्यात्मिक शक्तीचा सर्वांगिण विकास घडवुन आणणे होय." — महात्मा गांधी.

— विशेष लाव म्हणजे भारतामध्ये शिक्षणाचा संबंध हा मुल्यांसोबत जोडण्यात येतो.

— " मुल्य म्हणजे देशप्रेम, भावना, एकात्मता इ.

भारतीय शिक्षण व्यवस्था
(Indian education)

शिक्षण व्यवस्था

* प्राचीन
* मध्ययुगीन
* आधुनिक

* प्राथमिक
* माध्यमिक
* उच्च
* संशोधन (IIT, IR इ.)

नॉलंदाचा शोध बुद्ध धर्माच्या काळात लागला.

आर्य राज्य - घोडा
मुघल राज्य - हत्ती.

हडप्पा मध्ये - घोडा होता.

वैदीक काळ म्हणजे "आर्य लोकांचा काळ" वैदीक व्यवस्था ही "कर्मावर" आधारित उत्तर वैदीक व्यवस्था ही "जन्मावर" आधारित

* भारतातील शिक्षण पद्धती -

* प्राचीन काळातील -

① भारतातील शिक्षण पद्धतीची सुरुवात ही वैदीक काळापासून मान्यात येते. या कालामध्ये शिक्षणाचा उद्देश मानवाचा विकास करणे हा होता. शिक्षण हे गुरूच्या दारी जाऊन घेतल्या जात असे. त्याला 'गुरूकुल' असे म्हणत.

— हे गुरूकुल मुख्य वस्ती पासून थोडे दूर असे याचे मुख्य कारण म्हणजे शिक्षणामध्ये कोणत्याही प्रकारचा व्यत्यय नको.

— ब्रम्हचर्याचे पालन करणे अत्यावश्यक.

— सामाजिक जीवन जगण्यासाठी जी भुमीका पार पाडण्याची आवश्यकता आहे. त्याचे शिक्षण हे दिल्या जात.

व यालाच धर्माचे पालन करणे असे संबोधण्यात येईल. शिक्षण हे संस्कृत मधुन दिल्या जात असे.

— शिक्षण सर्वनिसाठी होते.

② उत्तर वैदीक काळात वर्ण व्यवस्था ही कठोर झाली. कारण आर्यानी वैदीक कालामध्ये जी समाजाची विभागणी 4 भागात केली होती ती विभागणी उत्तर वैदीक काळात ही "जन्मावर" झाली.

— शिक्षण फक्त मार्गदर्शक गटातील वर्गनिच होते.

— शिक्षण हे कर्मकांडावर आधारित.

— यामुळे सामान्य लोकांचा शिक्षणाचा अधिकार हा नाकारल्या गेला.

— 6th century B.C मध्ये "बुद्ध" आणि "जैन" धर्माचा उगम झाला. व सोबतच शिक्षणव्यवस्था सगळ्यांना उपलब्ध झाली.

— जैन धर्मापेक्षा बौद्ध धर्माने शिक्षणाचा प्रसार केला.

— या काळात शिक्षणाची भाषा ही सर्वसामान्यांना कळेल अशी होती.

① बुद्ध – पाली भाषा,
② जैन – अर्धमागधी भाषा.

"विहार" – डोंगर कोरून तयार केलेले ठिकाण

— शिक्षण हे मोफत होते.

— विहार आणि स्तुप ही शिक्षणाची केंद्रे होती.

"स्तुप" – सपाट प्रदेशावर उभारलेले ठिकाण.

— जैन धर्मापेक्षा, बुद्ध धर्माने शिक्षणाचा प्रसार जास्त केला याच काळात शिक्षणासाठी मोठी आंतराष्ट्रीय विद्यापीठ निर्माण झाली.

— यात सर्वात प्रमुख,

① नालंदा विद्यापीठ (बिहार)
② तक्षशिला विद्यापीठ (पाकीस्तान)

★ प्राचीन काळातील विद्यापीठे –

① तक्षशिला – इ.स.पूर्व ४०० ते इ.स.पू ४०० या काळात निर्माण करण्यात आले. कौटिल्य आणि चाणक्य या विद्यापीठात प्राध्यापक होते.

— यामध्ये १४ विषयांचा अभ्यास केला जात
— सध्या हे पाकिस्तान मधील 'रावलपिंडी' येथे आहे.

② नालंदा – "अलेक्झांडर कनिंघम" यांनी या विद्यापीठाचा शोध लावला. हे बौद्ध विहार होते.

— 6th century B.C मध्ये जे १६ महाजन पदे निर्माण झाले त्यापैकी हे एक (मगध)
— समुद्रगुप्त व कुमारगुप्त यांच्या काळात हे विद्यपीठ भरभराटीस आले.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
Rv. Abhijit Rathod

- सम्राट हर्षवर्धनाच्या काळात त्यांनी या विद्यापिठास 100 खेडी दान दिली होती.

- सर्वत उल्लेखनीय महत्वाचे वैशिष्ट म्हणजे. नालंदा विद्यापीठ "शिक्षण व कला/सांस्कृतिक" याचे केंद्र होते.

- या विद्यापीठामध्ये बौद्ध धर्मसोबत इतर धर्माचिपण शिक्षण दिल्या जात.

2006 मध्ये. नालंदा विद्यापीठ पुनर्जीवित करा असे डा. ए.पी. जे. अब्दुल कलाम म्हणले.

- आधुनिक काळात सरकारने या नालंदा विद्यापीठाचे पुनर्जिवन करायला सुरुवात केली.

*

आवडी अधिवेशन

1950 (1955) → 1991

1950
① close economy
② social economy
③ Govt ↑ (हस्तक्षेप जास्त)
④ Resource (कमी)

1991
भारताचे परकीय चलन कमी झाले (चलन संकट)

उपाय म्हणून सरकारने राक योजना आणली.
"look east policy"
→ (म्यानमार, थायलँड, मलेशिया व्हियतनाम, मंगोलिया इ. सोबत व्यापारी संबंध वाढवले या देशांची राक संघटना आहे. ति म्हणजे. ASEAN.

* हित पुर्ण करण्यासाठी (मार्ग)
* Track (Deplomacy)
  - (I) Govt. to Govt. चर्चा
  - (II) Non Govt. (NGO, पत्रकार, वकील यांचे संमेलन घडवणे)
  - (III) सांस्कृतीक

- नालंदा विद्यापीठाला पुनर्जिवीत करण्याचे कारण म्हणजे 1991 मध्ये USR चे विघटन झाल्यानंतर भारताच्या राकुण व्यापारापैकी 33% व्यापार हा या गटांसोबत होत होता. व विघटनामुळे हा व्यापार संपूष्टात (Distroy) आला.

—परकीय चलन वाढवण्यासाठी नवीन बाजाराची गरज होती. व त्यासाठी look east. धोरणाचा अवलंब केला. त्या अंतर्गत ASEAN देशासोबत व्यापारी संबंध प्रस्थापित करणे. Track-3 Deplomacy नुसार भारत आशियन देशासोबत व्यापारी संबंध प्रस्थापित करण्याचे काम करत आहे.

—याच्या कुलगुरू पदी डॉ. विजय भाटकर यांची नियुक्ती.

— ~~भाल~~ काही काळ उपकुलगुरू पदी सिंगापूर चे विदेश मंत्री होते. परंतु सद्या प्राध्यापक. सुनैना सिंग या कार्यरत आहे.

*— मध्ययुगीन कालात मुघलांच्या आक्रमणानंतर बुद्ध आणि जैन धर्माचा प्रभाव कमी झाला व मुघलांनी आपल्या सोईस्कर शिक्षणपद्धती आणली. जी मुख्यत्वे लष्करी स्वरूपाची होती. व भारतामध्ये सर्वाति जास्त युद्धे ही याच काळात.

— मध्ययुगीन काळात शिक्षणाची 2 केंद्रे होते

① मक्तबा – प्राथमिक शाळा
② मदरसा – माध्यमिक व उच्च.

—सुरुवातीला शिक्षण हे फक्त मुस्लीमांपूरतेच मर्यादित होते. परंतु नंतर सगळ्यांना शिक्षण देण्यात आले.


— प्राचीन आणि मध्ययुगीन शिक्षणाचे सर्वाति महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे शिक्षण देणे हे राजसंस्थेची जबाबदारी नव्हती.

★ महाराष्ट्रातील शिक्षण–

① महाराष्ट्रात मुक्त शिक्षण पद्धती.
② एक शिक्षकी शाळा त्याला "पंतोजी" असे म्हणत. ही शाळा पारावर, मंदीरात, वाड्यात या ठिकाणी चालत असे.
③ प्रौढ शिक्षणावर भर कीर्तनाच्या माध्यमातुन शिक्षण दिले जात असे.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES


★ आधुनिक काळातील शिक्षण पद्धती.—



★ ब्रिटीशांनी भारतीय शिक्षणात लोकदान देण्याची कारणे.

① प्रशासनाचा खर्च कमी करण्यासाठी
② शिक्षित भारतीय इंग्लंड मध्ये बनलेल्या वस्तुंचा स्वीकार करून भारतात प्रसार व प्रचार करेल.
③ पाश्चात्य शिक्षणामुळे भारतीय जनता ही ब्रिटीशांना स्वीकारेल.
④ धर्माचा प्रसार.

★



— ब्रिटिशांच्या वरिल उद्दीष्टांची पूर्तता करण्यासाठी 1813 च्या चार्टर ॲक्ट, 1813 मध्ये । लाखाची शिक्षण विषयक तरतुद. करण्यात आली.

— परंतु शिक्षण कोणत्या भाषेत दयायचे यावरून मतभेद निर्माण झाले. एका गटाच्या म्हणण्यानुसार शिक्षण हे इंग्रजी भाषेमध्ये दयावे याला आंग्लवादी म्हणतात.

— व दुसरा गट ज्याच्यानुसार शिक्षण हे मातृभाषेत दयावे. तो म्हणजे प्राच्यवादी म्हणतात.

—परंतु यात आंग्लवादी विजयी झाले. म्हणजे शिक्षण हे इंग्रजी माध्यमात.

—पुढील प्रश्न म्हणजे हे शिक्षण कोणाला दयावे ? यासाठी Down filtration theory (पाझरता सिद्धांत) आणण्यात आली.

—ज्यानुसार समाजातिल वरच्या गटाला शिक्षण दिले असता ते झिरपत / पाझरत सामान्य लोकांपर्यंत पोहचेल.

—परंतु ही theory. पूर्णपणे अपयशी ठरली. व यामुळे ब्रिटीशांच्या वसाहतवादी मार्गामध्ये अडथळा निर्माण झाला. व काही करून शिक्षणाचा प्रसार करणे हे गरजेचे होते. व यासाठी. 1854 मध्ये चार्ल्स वुडसचा अहवाल प्रसिद्ध झाला.

* वुडसचा खलिता 1854 -

या अहवालानुसार,

① शिक्षणाची जबाबदारी पूर्णपणे सरकारने स्वीकारली.
② शिक्षणाचे माध्यम हे इंग्रजीसोबत देशी भाषा असावे.
* ③ शिक्षण क्षेत्रात अनुदान पद्धती वापरण्यात यावी.
***** ④ कलकत्ता, मद्रास, मुंबई येथे विदयापिठे स्थापन करण्यात यावे.
⑤ अध्यापक, प्रशिक्षक संस्था स्थापन करण्यात यावी.
⑥ व्यावसायिक शिक्षण देण्यात यावे.
⑧ Department of Pubic education ची स्थापना करण्यात यावी.

* हंटर आयोग, 1882 -

① याचा मुख्य उद्देश शिक्षण विषयक दिर्घकालीन उपायोजना करणे.
② वुडसच्या अहवालात मुख्य करून उच्च शिक्षणावर भर होता. त्यामुळे एक समग्र सुधारणेसाठी 1882 मध्ये "हंटर आयोग" स्थापना व आयोग ब्रिटनमधून स्थापन करण्यात आला.

— 1857 च्या उठावानंतर 1858 मध्ये राणीचा जाहीरनामा "प्रसीद्ध व यानुसार ब्रिटीश कंपनीची सत्ता जाऊन त्याजागी ब्रिटीश गव्हर्मेंटची सत्ता स्थापन झाली. ब्रिटनमध्ये शिक्षणासाठी एक संस्था काम करत होती.

— त्या संस्थेने भारतीय शिक्षण पद्धतीवर ताशेरे ओढले.

— "General Council for Indian education" ही ब्रिटनमधील संस्था भारतासाठी Policy बनवण्याचे काम करते. असे (द्वीरण बनवण्याचे).

— यांनी भारतातील शिक्षण सर्वसमावेशक नाही असे मत नोंदविले. व 'रिपन' ने या कौन्सिल ने केलेल्या टिकेमुळे भारतामध्ये "भारतीय शिक्षण आयोगाची" स्थापना केली. ज्याचे अध्यक्ष - हंटर

— या आयोगाचे मुख्य कार्य - प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व सोबत मुलींच्या मह्वाचे परिक्षण करणे.

*शिकारशी -

① प्राथमिक शिक्षणावर विशेष भर देणे शिक्षण स्थानिक भाषेमध्ये देणे.

② प्राथमिक शिक्षणात खाजगी क्षेत्राचा समावेश करा

③ विद्यार्थिंना नैतीक शिक्षण द्या.

राष्ट्रवाद दाबण्यासाठी "रॅले आयोग 1902"

— 1885 मध्ये कांग्रेसची स्थापना झाल्यानंतर भारतीय राष्ट्रवाद हा सर्वोच्च विंदूवर होता. व हा ब्रिटिश सत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा होता. त्यामुळे या राष्ट्रवादाच्या उदयास शिक्षण हे कारणीभुत असल्याचे दिसुन आले. व त्यामुळे याचा अभ्यास करण्यासाठी "रॅले आयोग" स्थापना करण्यात आली. हा आयोग "उच्च शिक्षणाशी संबंधीत" होता.

"राखीव विभाग" म्हणजे. कायदा व सुव्यवस्था, यांसारखे विभाग. इ.

"सोपीव विभाग" म्हणजे. शिक्षण, आरोग्य, महिला विकास बालविकास, आरोग्य इ.

— व या आयोगाच्या शिकारशीच्या आधारावर 1904 मध्ये भारतीय विद्यापीठ कायदा" पारित करण्यात आला.

— या कायदयाचा मुख्य उद्देश ब्रिटिश सत्तेकडुन भारतीय विद्यापीठावर नियंत्रण प्रस्थापित करणे हा होता.

— या कायदयाला भारतीयांनी विरोध केला. त्यामुळे 1913 मध्ये शिक्षण विषयक घोषणापत्र प्रसिद्ध करण्यात आले.

- सॅडलर आयोग शिक्षण संबंधी नव्हता.
- आशुतोष मुखर्जी :- Indian science congress (ISC) मध्ये महत्वाचा सहभाग
- Isc ची स्थापना "1913" हे त्याचे पहिले अध्यक्ष.
- 2013 मध्ये Isc ला 100 वर्षे पूर्ण व त्यानिमित्त भारत सरकारने Indian Science Technology & Enovation policy प्रसिद्ध केली.
- कालावधी - 2020 पर्यंत
- उद्देश - ToP 5 Scintific super power मध्ये भारताचा समावेश.
- या पॉलिसीनुसार, 2010 ते 2020 हा "National Enovation Decate" घोषित केला.
- 2020 पर्यंत Total GDP चा 2% sci. Tech. वर खर्च.
- Globaly research paper प्रसिद्ध करण्यामध्ये 9 वा Rank व petant मध्ये 12 वा Rank.
- 2020 पर्यंत यात सुधारणा करण पहिल्या 6 मध्ये येणे.
- भारतामध्ये enovation मध्ये खाजगी क्षेत्राला सहभागी करून घेणे.

- या घोषणा पत्रामध्ये प्रत्येक प्रांतात एक विद्यापीठ असावे. अशी शिकारस केली.
- निरक्षरता घालवणे हा सरकारचा उद्देश आहे.
- * - वंचित गटाला निशुल्क शिक्षण

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

* - सॅडलर आयोग, (1917) -
  - हा आयोग विशेष करून कलकत्ता विद्यापीठाशी संबंधीत होता. यामध्ये 2 भारतीय होते.
    1. आशुतोष मुखर्जी
    2. जिया उद्दीन अहमद.

* सॅडलर आयोगाच्या शिकारशी :-
  - 1. ढाका (बांग्लादेश) विद्यापीठ स्थापन करण्यात यावे.
  2. मुस्लीमांच्या सामाजिकेपणामुळे मुस्लीमांना शिक्षण दयावे.
  3. हे पहिला, पहिला असा आयोग होता, कि ज्यानी धर्म आधारित सामाजिकेपणावर शिक्षण दयावे. अशी शिकारस केली.
  4. विद्यापीठ स्तरावरिल अदर्जा सुधारण्यासाठी माध्यमिक स्तरावर सुधारणा करणे आवश्यक आहे.
  5. शालेय शिक्षण हे 12 वर्षाचे असावे.

- 1919 या कायदयाने राखीव आणि सोपीव अशी अधिकाराची विभागणी करण्यात आली. ज्यानुसार education हे भारतीयांकडे आले.
- भारतीयांनी शिक्षण संस्था स्थापन कराचला सुरवात केली व परिणामी शिक्षणाचा दर्जा खालावला.

  व त्यामुळे 1928 मध्ये "हार्टोग कमिशन" ची स्थापना. या कमिशन ने प्राथमिक शिक्षणावर भर दिला.

** - ग्रामीण भागातील लोकांना महाविद्यालयीन शिक्षण देऊ नये. त्यांना व्यावसायिक शिक्षण दया.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

1919 चा कायदा → 10 वर्षे
(constitutn कायदे विभागून देण्याची तरतूद)

↓

1927 – सायमन कमिशन
(1919 च्या कायद्याचा अभ्यास करण्यासाठी)
(भारतीयांनी विरोध केला काळा यात. सुद्धा भारतीय नव्हता)

↓

1930 / 3rd R.C.C. (गोलमेज परिषद)
(1930, 1931, 1934) R.C.C झाल्या.
(सायमन कमिशनला अपयश) ✗

1935 ← 1930 / 3rd R.C.C. (गोलमेज परिषद)

1935 चा कायदा
(11 राज्यांची स्थापना)
(थेट निवडणूका होऊन काँग्रेसची सत्ता आली.)
(काँग्रेस विनयी स्थळे 8 राज्यात शिक्षण काँग्रेसकडे)
स्थळे भारतीयांकडे)

+

↓

1937
(1919 च्या कायद्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून दोन आयोग)

→ Gandhi education plan (G.E.P), 1937
(हा काँग्रेसचा आयोग)

→ वुड ॲबॉट आयोग, 1937
(हा ब्रिटिशांचा आयोग)

– Gandhi Education plan - 1937 –;
– ① 7 ते 14 वर्षातील बालकांना निशुल्क व अनिवार्य शिक्षण
② शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी
③ विद्यार्थी स्वावलंबनावर भर
④ शिक्षणाचा मुख्य उद्देश
– बौद्धीक विकास
– भावनात्मक विकास } म्हणजेच 3 Hand policy
– कार्यात्मक विकास

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

★ Wood Abo आयोग – (1937) –

– बालकांच्या शिक्षणाची जबाबदारी ही प्रशिक्षित महिलेवर सोपवावी.

– प्राथमिक शाळेतील मुलांचे शिक्षण पूरक्की शिक्षणापेक्षा नैसर्गिक असावे.

– उच्च माध्यमिक शाळेत इंग्रजी हा विषय सक्तीचा असावा.

– कलेच्या शिक्षणावर भर दया.

– नोकरीपूर्व व नोकरिनंतर प्रशिक्षणावर भर.

– व्यावसायिक शिक्षणावर भर.

★ सार्जेंट आयोग (1944) –

– महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर हा आयोग स्थापन करण्यात आला होता. या आयोगाचे कार्यक्षेत्र प्राथमिक, माध्यमिक, व उच्च हे तिन्हीही होते.

– या आयोगाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट म्हणजे - हा आयोग दिर्घकालीन उपाय म्हणजे पुढील 40 वर्ष शिक्षणाचा काय अजेंडा असावा. यांच्याशी संबंधीत होता.

– एकल भारत (plan India) एकल शिक्षण पद्धती असावी या संबंधीत सुद्धा हा आयोग होता.

– या आयोगाच्या बरचशा शिफारशी स्वातंत्र्यानंतर सुद्धा लागु केल्या गेल्या.

★ शिफारशी –

① सर्व मुलांना 8 वर्षाचे सक्तीचे व मोफत शिक्षण दयावे.

② मुलांच्या वयाचा 11 ते 17 हा कालावधी उच्च माध्यमिक (High school) चा असावा.

★ ③ माध्यमिक शिक्षणासाठी स्पर्धा परिक्षा.

★ ④ माध्यमिक शाळेमधुन 15 विदयार्थ्यांपैकी 1 विदयार्थ्यांची उच्च शिक्षणासाठी निवड.

⑤ प्रौढ शिक्षण योजना राबवण्यात येईल.

⑥ शारिरिक शिक्षणाकडे लक्ष

⑦ रोजगार केंद्र स्थापन करण्यात यावे.

1951 ज्या जनगणनिनुसार भारतामध्ये 18.33 % लोकसंख्या ही साक्षर होती.
म्हणजेच 82 % लोकसंख्या निरक्षर होती.

⑥ शिक्षण प्रशिक्षणावर भर

⑦ या आयोगाचा परिणाम म्हणजे स्वातंत्र्य शिक्षण खात्याची निर्मिती करण्यात आली. विद्यापीठ अनुदान समितीची स्थापना.

⑧ उच्च तांत्रिक समितीची स्थापना.

★ ब्रिटीश शिक्षण पद्धतीचे कायदे -

① ब्रिटीशांनी शिक्षणाचा प्रसार केल्यामुळेच भारतीयांना आधुनिक शिक्षणाची ओळख झाली.

② हर्बट स्पेंसर, स्मिथ, डार्विन, लॉक यांना वाचण्याची भारतीयांना संधी मिळाली त्यामुळे भारतामध्ये शिक्षणाचा प्रसार झाला. व संचित लोकशाहीची ओळख झाली.

③ एका शिक्षीत मध्यमवर्गाचा उगम.

④ भारतीयांमध्ये काही प्रमाणात वैज्ञानिक प्रवृत्तीस चालना मिळाली.

★ नकारात्मक -

① भारतामध्ये 2 वर्ग निर्माण -
① शिक्षित , ② अशिक्षित

② आधुनिक शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे भारतीयांचे जुने सांपदंड होते (रूढी, परंपरा) हे विसरले.

③ हिंदू - मुस्लीम हा वाद निर्माण केला.

④ शिक्षणाचा उद्देश हा सामाजिक बदल न घडुन बसाहतवादी बदल होता.

⑤ देशी अर्थव्यवस्थेचा ऱ्हास.

— एकंदरीत ब्रिटीश शिक्षण पद्धतीचे काही कायदे तर काही तोटे होते.

— एक विशेष बाब म्हणजे 18.33 % ही जनता साक्षर होती.

— नवीन देशाची उभारणी करताना इतकी प्रचंड निरक्षरता ही प्रश्नचिन्ह निर्माण करते.

—त्यामुळे निवडणूकीला सामोरे जाण्याच्या आधी शिक्षणात बदल करणे. आवश्यक होते. व यासाठीच स्वतंत्र भारताचा पहिला आयोग स्थापन करण्यात आला

* राधाकृष्णन आयोग—

—याला university education commision. (विद्यापीठ आयोग) असे सुद्धा म्हणतात.

* शिफारशी — या पूर्ण उच्च शिक्षणाशी संबंधीत.

① विद्यापीठात प्रवेश घ्यायचा अगोदर 12 वर्षाचा एक अभ्यासक्रम असावा.

② विद्यापीठात कमीत कमी 180 दिवस शिकवण्याचे काम चालावे.

③ शिक्षणाला समवर्ती सुचीत स्थान द्या.

④ शिक्षकांचे वेतन वाढवा. व त्यांना या क्षेत्रात येण्यास प्रोत्साहन द्या.

⑤ संशोधनाची उपलब्धता करून देण्यात यावी.

⑥ शिक्षणात नैतिक व आध्यात्मिक मुल्यांना स्थान देण्यात यावे.

*⑦ प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी पदवी ही अट शिथिल (समाप्त) करा.

⑧ विद्यापीठ हे निसर्गाच्या सानिध्यात असावे.

⑨ शिक्षणाचे उद्देश—

① सर्व सामान्य शिक्षण
② संस्कार शिक्षण
③ व्यावसायिक शिक्षण.

⑩ विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना करा.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

* मुदलियार आयोग—

—या आयोगाने भारतीय शिक्षण व्यवस्थेमधील दोष स्पष्ट केले. व हे दोष समग्र शिक्षण व्यवस्थेवरदेखील होते.

— या आयोगाने पुढील दोष सांगीतले आहे.

① शालेमधुन दिले जाणारे शिक्षण हे व्यवहारिक नाही

② शिक्षण हे संकुचीत आहे. व ते व्यक्तीमत्वाचा विकास करण्यास पूर्णपणे अपयशी.

③ इंग्रजीच्या सक्तीमुळे बाकी विषयांकडे दुर्लक्ष.

★ शिफारशी –

① माध्यमिक शिक्षण हे 7 वर्षाचे.

② माध्यमिक स्तराची विभागणी 2 भागात करण्यात यावी.

① कनिष्ठ माध्यमीक – कालावधी – 4 वर्ष

② वरिष्ठ माध्यमीक – कालावधी – 3 वर्ष.

③ सार्वजनिक शाळा स्थापन करण्यात याव्या.

④ माध्यमिक स्तरावर किमान 2 भाषामध्ये शिक्षण.

⑤ पाठ्यपुस्तके ही वारंवार बदलू नये.

मानव संसाधनाच्या विकास 1961 नंतर झाला.

D.S. कोठारी आयोगाला यावर्षी (2017) मध्ये 50 वर्षे पूर्ण.

★ D.S. कोठारी आयोग पार्श्वभूमी –

– 1961 मध्ये लोकसंख्या ही प्रचंड वाढली. त्या आधीचे कुठलेच नियोजनाचे सर्व उपाय हे अपयशी त्यामुळे सरकारने ** लोकसंख्येला संख्यात्मक स्रोताऐवजी गुणात्मक मानायला सुरुवात केली.

– लोकसंख्येला गुणात्मक माणणे म्हणजे त्यांना शिक्षण देऊन त्याचा वापर भांडवल म्हणुन करणे

– मानवाचा वापर भांडवल म्हणून करणे म्हणजे मानव – संसाधन विकास होय.

– म्हणजेच भारतामध्ये मानव संसाधनाची सुरुवात किंवा मानवाचा संसाधन म्हणुन वापर हा 1960 नंतर सुरुवात झाली.

परंतु याची गरज 1991 नंतर तिव्रतेने जानवु लागली. तर 2011 नंतर म्हणजेच मंदीच्या पार्श्वभुमीवर सरकारने – कौशल्य विकास (गुणात्मक) हे तिव्र गतीने अवलंबवायला सुरुवात केली.

* D.S. कोठारी आयोग -

— याला भारतीय शिक्षण आयोग असेही म्हणतात.

— या आयोगाचे कार्यक्षेत्र हे प्राथमिक, माध्यमिक, व उच्च असे होते.

— या आयोगाने शिक्षणाचे पुढील उद्दीष्टे स्पष्ट केली.

① प्रत्येक नागरिकात देश भावना वाढीस लावणे.

② देशाच्या सामाजिक व सांस्कृतिक यशाचे मूल्यमापन करणे

③ देशातील उणिवांचा निसंकोचपणे स्वीकार करणे

④ आपल्या योग्यतेनुसार देशाची सेवा करण्याचे शिक्षण देणे.

— D.S. कोठारी यांनी तीन्ही गटांसाठी आपल्या शिफारशी दिल्या.

त्यापैकी,

① समाजसेवा कार्यानुभव व उत्पादन अनुभव हे शिक्षणाचे अविभाज्य भाग म्हणून सुरू करण्यात यावे.

② नैतिक शिक्षण व सामाजिक जबाबदारी निर्माण करणारे शिक्षण द्यावे.

③ शिक्षकांच्या गुणवत्ता व सोयीसाठी विशेष प्रयत्न राष्ट्र विकासासाठी प्रज्ञाशोध परिक्षेची स्थापना

*** ④ राष्ट्रीय शिक्षण कायद्याची निर्मिती.

⑤ शाळा व महाविद्यालयाच्या व्यवस्थापनात शिक्षकांना प्रतिनिधित्व द्यावे.

⑥ महाविद्यालयांना स्वायत्तता प्रदान करण्यात यावे.

⑦ पाठ्यपुस्तक संकल्पना निर्मिती (बालभारती)

⑧ कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यात यावे.

⑨ शालेय स्तरावर त्री-भाषा सुत्राचा अवलंब करण्यात यावा.

**** ⑩ सर्व घटकांना समान संधी.

स्वतंत्र भारतचे पहिले राष्ट्रीय शिक्षण धोरण 1968.

* राष्ट्रीय शिक्षण धोरण (1968) -

① 10 + 2 + 3 असा आकृतीबंध तयार करावा.

② शिक्षणाची समान संधी

③ सामाजिक व नैतीक मुल्यांचा प्रसार

④ साक्षरता वाढवण्याचे प्रयत्न

* ⑤ प्रौढ शिक्षण (निरंतर शिक्षण)

⑥ शिक्षणाचे विकेंद्रीकरण.

* शिक्षण धोरण (1986) -

— या धोरणाची पार्श्वभूमी म्हणजे.

① भारतामध्ये माहिती व तंत्रज्ञान (I.T) क्षेत्राचा विकास.
② Political change.
③ विचार धारात्मक बदल.

* शिफारस -

① 10+2+3 असा आकृतीबंध तयार ~~करणे~~ करा.
② पहिल्या 10 वर्षामध्ये 1 ते 5 वी - प्राथमिक
5 ते 7 वी - उच्च प्राथमिक
8 ते 10 वी - माध्यमिक

, या धोरणानुसार शिक्षणाची पुढील उद्दीष्टे -

① स्वातंत्र्य लढ्याचा बदल जाणिव निर्माण करणे.
② घटनात्मक जबाबदाऱ्यांची जाणिव निर्माण करणे.
③ राष्ट्रीयत्वाची भावना जोपासणे.
* ④ छोटे कुटुंब, सुखी कुटुंब.
⑤ समानतेसाठी शिक्षण
⑥ स्त्री शिक्षण व प्रौढ शिक्षण
⑦ विद्यार्थ्यांना स्वयंरोजगाराची प्रवृत्त करणे.
⑧ बाल संगोपन व पूर्व प्राथमिक शिक्षण.
⑨ नवोदय विद्यालयाची स्थापना
* ⑩ ग्रामीण विद्यापीठाची स्थापना
⑪ या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारने 'ऑपरेशन ब्लॅक बोर्ड' ही मोहिम सुरू केली. याचा मुख्य उद्देश - ग्रामीण भागात शिक्षण विषयक यापासून सुविधा निर्माण करणे.

— वरील धोरणाचे दर 5 वर्षांनी पुनरावलोकन करण्यात येईल.

— त्यासाठी 1991 मध्ये 'आचार्य. राममूर्ती समिती ची स्थापना

— या समितीचा अभ्यास करण्यासाठी जनार्दन रेड्डी समिती ची स्थापना व या समितीच्या शिफारशीच्या आधारावर 1992 मध्ये सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रसिद्ध करण्यात आले.

★ सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (1992) –

— 1992 चे सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे खुल्या आर्थिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर आले होते.

– समाजातील गरजा पूर्ण करण्यासाठी जे शिक्षण लागते. त्यावर भर दया. म्हणजेच कौशल्य विकासाला प्राधान्य.

– संस्कृत व अन्य भाषा अभ्यासण्यासाठी स्वतंत्र आयोग स्थापन करावा.

– जुन्नो च्या धर्तीवर प्रत्येक राज्यात खुले विदयापीठ स्थापन करणे.

– 86 च्या धोरणानुसार दर 5 वर्षानि पूनरावलोकन करणे गरजेचे ~~आहे~~ होते, म्हणनि 1997 मध्ये धोरणाचे पूनरावलोकन करणे अपेक्षीत होते.

– यासाठी 1991 मध्ये अर्जुन देव समितीची स्थापना

– याच 1991 मध्ये अभ्यासक्रमात बदल करण्यासाठी जे. पी. राजपुत समितीची स्थापना.

– परंतु काही कारणास्तव दोन्ही समितीचे अहवाल आले नाही.

★ शिक्षण धोरण (2001) –

– या धोरणाची पार्श्वभुमी ही. Millennium Development Goals (MDGs) सहस्त्राब्दी विकास लक्ष या मध्ये 8 लक्ष असुन त्यामध्ये 1 शिक्षणाशी संबंधीत आहे.

– याचे मुख्य लक्ष होते ते म्हणजे शिक्षणाचे सार्वत्रिकरण आनि हेच 2001 च्या धोरणाचे मुख्य उद्दीष्ट.

– या व्यतीरिक्त अन्य शिफारशी –

– सहामाही अभ्यासक्रम व सहामाही परिक्षा
– विदयार्थ्यांना उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण करू नये.
– 10 वी बोर्ड परिक्षा रद्द करावी.
– तासिकांचा कालावधी निश्चित करावा.
– शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी मुक्त शाळा व मुक्त अभ्यास पद्धती या संकल्पनेचा स्वीकार करण्यात यावा.

— सरकारने हो गुणवत्ता वाढवण्यासाठी अभ्यासक्रमाला दोषी धरले. व यासाठी प्राध्यापक. यशपाल यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली.
— या समितीच्या शिफारशीच्या आधारावर राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा 2005 प्रसिद्ध करण्यात आला.

★ राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा 2005 –
— लोकशाहीला अनुसरून अभ्यासक्रमाची मांडणी.
— उपयोजीत दृष्टीकोन विद्यार्थ्यांमध्ये विकसीत करा.
— शाळाबाह्य जिवनाशी ज्ञानाचा संबंध जोडणे.
— अभ्यासक्रम समृद्ध व विकसीत करणे.
— प्रश्नपत्रिकेचा संबंध सामान्य ज्ञान ज्ञानाशी असावा.

★ महाराष्ट्राचे शैक्षणिक धोरण –
— 1996 मध्ये महाराष्ट्राचे पहिले शैक्षणिक धोरण.
— जीवनावश्यक शिक्षण
— सामान्यज्ञान हा विषय सक्तीचा
— मुल्य शिक्षण ही दिवसाची पाहिली आरिका.
— NCC च्या धर्तीवर MCC.
— शिक्षकांकडून अशैक्षणिक कामे काढून घेणे (उदा. जनगणना इ.)
— 3 वर्षपर्यंत शिक्षकांच्या बदल्या करु नये.
★ ग्राम शिक्षण समितीची स्थापना ज्याचा मुख्य उद्देश ग्राम शिक्षणात लोक सहभाग वाढवुन घेणे.

★ शिक्षणाचे सार्वत्रिकरण –:
— शिक्षणाचे सार्वत्रिकरण हे पुढील 4 स्तंभावर आधारित संकल्पना आहे.
(1) शाळेची उपलब्धता
(2) पट नोंदणी
(3) उपस्थीती
(4) गुणवत्ता.

★ शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी सरकारचे उपाय –

– महात्मा फुले यांनी हंटर कमिशन समोर साक्ष देताना ब्रिटीश सरकार शेतकऱ्यांकडून जेवढा शेतसारा वसूल करते. त्याची 50% रक्कम ही शिक्षणावर खर्च करावी विशेष करून शाळेच्या उपलब्धतेवर.

– गोपाळकृष्ण गोखले यांनी Legestrative Assembly. मध्ये एक खाजगी बील मांडले होते. ज्यामध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले होते.

– 1906 मध्ये सयाजीराव गायकवाड व शाहु महाराज यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले.

– 1947 मध्ये बी. जी. खेर समिती –
  – पुढील 10 वर्षामध्ये शिक्षणाच्या सार्वत्रिकरणावर भर दिला.

– भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वे कलम – 45 नुसार प्राथमिक शिक्षण देणे हे राज्य संस्थेचे कर्तव्य मानले (वय 0-6)

★ शैक्षणिक धोरणे –
  – Opration Black Board.
  – Mid Day Meal. (मध्यान्य भोजन योजना)

– स्वातंत्र्याआधी त्रावणकोर संस्थानामध्ये MDM ही योजना सुरू करण्यात आली.

– स्वातंत्र्यानंतर ICDC योजने अंतर्गत याची अंगणवाडी केंद्रात अंमलबजावणी.

– 15 ऑगस्ट 1995 रोजी ही योजना प्राथमिक व माध्यमिक स्तरावर सुरू.
  – याचा मुख्य उद्देश.
    – विद्यार्थ्यामध्ये प्रोटीन चे प्रमाण वाढवणे
    – शाळेमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती टिकवणे.
    – 5 व्या वर्गापर्यंत 450 kal. energy व 12 gm protin / Day
    – 6 वी ते 8 वी पर्यंत 700 kal. energy व 20 gm protin / Day.

मंत्र्यांव्यतिरिक्त इतर सदस्यांनी मांडलेले विधेयक म्हणजे खाजगी विधेयक होय.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

* सर्व शिक्षा अभियान -
(Right to education) -

- पार्श्वभूमी →

* तरतुदी -

- शैक्षणिक वर्षात कुठल्याही दिवशी शाळेत प्रवेश.
- प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कुठल्याही विद्यार्थ्याला कुठल्याही कारणास्तव शाळेतुन काढता येणार नाही.
- कोणतीही बोर्ड ची परिक्षा नाही.
- सर्व शाळांमध्ये economically & socially Backward यासाठी 25 % आरक्षण.

उदा. Right to education Vs Art-19
(Right to Business)


- घरापासून 1 km च्या आत प्राथमिक व 3 km च्या आत उच्च प्राथमिक शाळा अनिवार्य.
- 3 वर्षाच्या आत सर्व शाळांमध्ये पायाभुत सुविधा निर्माण करणे.
- शाळामध्ये प्रवेश देण्यासंदर्भात पारदर्शकता असावी.
- कुठल्याही कारणास्तव विद्यार्थ्यांना मानसिक व शारिरिक त्रास होऊ नये.
- शालेय व्यवस्थापन समिती स्थापना करण्यात यावी.
  अध्यक्ष - सरपंच, सचिव - मुख्याध्यापक.
- शिक्षकांकडून अशैक्षणिक कामे काढून घेण्यात यावे.
- Right to education ची नोडल योजना ही सर्व शिक्षा अभियान.

* - सर्व शिक्षण अभियान अंतर्गत 1 km च्या आत विद्यार्थी असेल परंतु शाळा नसेल तर पर्यायी शाळा बांधणे व 2 वर्षाच्या आत तीथे पक्की शाळा बांधणे यालाच शिक्षण हमी योजना असे म्हणतात.

MUKUL EDUCATIONAL FORUM
Bottom of Middle-Ka-Pipplia
CLASS NOTES

परिवर्तन
Competitive Forum
- अभिजीत राठोड

सर्व शिक्षा अभियान



सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

- प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट निश्चित कालावधीमध्ये पूर्णतः साध्य करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने संयुक्तपणे 'सर्व शिक्षा अभियान' हा महत्वकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. सर्व शिक्षा अभियान 18 जानेवारी 2002 च्या शासन आदेशानुसार प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करून या अभियानांतर्गत केंद्र शासनाने विहित केलेली उद्दिष्टये राज्यांच्या संदर्भात पूर्ण करण्याच्या दृष्टिने राज्यामध्ये हे अभियान अंमलात आणण्यासाठी मान्यता दिली आहे.

पार्श्वभूमी–

1. संविधानिक अध्यादेश 1950- राज्यघटनेच्या अंमलबजावणीपासून पहिल्या 10 वर्षांच्या आत राज्य बालकांचे वयाचे 14 वर्ष पूर्ण होईपर्यंत सर्व बालकांना मोफत आणि अनिवार्य शिक्षण देईल.

2. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986- 21 व्या शतकात प्रवेश करण्या आधी 14 वर्षापर्यंतच्या सर्व बालकांना मोफत समाधानकारक गुणवत्ता आणि सक्तीचे शिक्षण देण्यात यावे.

3. 86 वी घटनादुरुस्ती 2002- कलम 21 अ नुसार 6 ते 14 वर्षे वयोगटातील बालकांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा मुलभूत अधिकार देण्यात आला.

- अशाप्रकारे प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचे ध्येय गाठण्यासाठी केंद्र सरकार सर्व शिक्षा अधियान हा पथदर्शी कार्यक्रम राबवत आहे. शाळा नसलेल्या भागांमध्ये नव्या शाळा सुरू करणे आणि शाळा असतील त्या ठिकाणी अतिरिक्त वर्गखोल्या, प्रसाधनगृहे, पेयजल, देखभाल अनुदान आणि शाळेत सुधारणा घडवून आणण्यासाठी अनुदान प्राप्त करून देणे असे उपक्रम या कार्यक्रमांतर्गत राबवले जातात.

आव्हान–

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये प्राथमिक शिक्षणासमोर असलेल्या प्रमुख तीन आव्हानांचा उल्लेख आहे तो पुढीलप्रमाणे–

1. 6 ते 14 वयोगटातील मुला–मुलींना शाळेमध्ये आणणे.

2. शाळेमध्ये आलेल्याा मुलांना किमान 14 वर्षे वयापर्यंत तरी शिक्षण प्रवाहामध्ये टिकवून धरणे.

3. शिक्षणाची जी उद्दिष्टये आणि ज्या आपेक्षा आहेत त्यांच्या संपादणुकीची किमान अध्ययन पातळी या सर्व मुलांनी गाठणे.

उद्देश–

1. या अभियानांद्वारे 2010 पर्यंत 6 ते 14 वयोगटातील सर्व मुलांना उपयुक्त आणि दर्जेदार प्राथमिक शिक्षणाची सुविधा पुरविणे.

2. समाजाच्या, वस्तीच्या किंवा स्थानिक लोकांच्या शालेय वातावरणातील सक्रिय सहभागाद्वारे सामाजिक, प्रादेशिक आणि लिंगविषयक भेदभाव कमी करणे.

शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ,
हॅपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे-३०
for more updates join our telegram channel - @abhijitrathod
9272100500

उद्दिष्ट्ये–

- 2003 पूर्वी सर्व मुले शाळेत, शिक्षण हमी केंद्रात, शाळेत परत आणणाऱ्या व्यवस्थेत दाखल करणे.
- 2007 पूर्वी सर्व मुलांना 5 वी पर्यंतचे प्राथमिक शालेय शिक्षण देणे.
- 2010 पूर्वी सर्व मुलांना 8 वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण देणे.
- दर्जेदार प्राथमिक शिक्षणावर, जीवनासाठीच्या शिक्षणावर भर देणे.
- लिंगभेद व समाजाच्या विविध घटकांतील दरी 2007 पर्यंत भरून काढणे.
- 2010 पर्यंत प्राथमिक शिक्षणाची सर्वांची समान पातळी निर्माण करणे.
- 2010 पर्यंत सर्व मुला–मुलींना शाळेत टिकवून ठेवणे.

स्वरुप–

- प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी एका निश्चित मुदतीची चौकट.
- देशभरात दर्जेदार शिक्षणाच्या गरजेला प्रतिसाद.
- मूलभूत शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक न्यायाला प्रोत्साहन देण्याची संधी.
- शालेय शिक्षण व्यवस्थापलनात पंचायत राज संस्था, शालेय व्यवस्थापन समिती, ग्रामशिक्षण समिती, पालक–शिक्षण संघटना, माता–शिक्षक संघटना, जमातींच्या स्वायत्त परिषदा यांना प्रभावीरित्या सहभागी करून घेण्याचा एक प्रयत्न
- उच्चस्तरावर प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठीचे सक्रिय राजकीय पाऊल.
- केंद्र, राज्य आणि स्थानिक प्रशासनामध्ये चांगली भागीदारी.
- राज्यांना प्राथमिक शिक्षणासंदर्भात स्वतंत्र दृष्टी विकसीत करण्याची संधी.

व्याप्ती–

- हे अभियान सुरवातीस शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या 3073 तालुक्यांमध्ये राबविण्यात आले होते. सध्या हे अभियान देशभरात सर्वत्र राबविण्यात येत आहे. 2004 मध्ये सुरु करण्यात आलेली कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना सर्व शिक्षा अभियानांतर्गत शैक्षणिकदृष्ट्या मागास तालुक्यांमध्ये राबविण्यता येत आहे.

यंत्रणा–

1. संपूर्ण देशभरात राज्य सरकारच्या मदतीने हे अभियान राबविण्यात येते.

2. सर्व शिक्षा अभियान राबविण्याची जबादारी जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर योग्य प्रकारे वाटप करण्यात आली.

- महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद हा महाराष्ट्र शासनाचा एका उपक्रम असून राज्यात सर्व शिक्षा अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हा उपक्रम प्रयत्नशील आहे.

आर्थिक तरतुद–

पंचवार्षिक योजना	केंद्र : राज्य हिस्सा(टक्के)
10 वी	75 : 25
11 वी	50 : 50
12 वी	85 : 15

- 2004 पासून केंद्रीय करामध्ये 3 टक्केशिक्षण उपकर आकारला जातो यापैकी 2 टक्के उपकर हा प्राथमिक शिक्षणावर म्हणजेच सर्व शिक्षा अभियानावरही खर्च होतो.

सर्व शिक्षा अभियानाचा परिणाम:–


S.no	Details	Estimated Child population (6-13 years)			Estimated Number of Out of School Children			Percentage of Out of School Children		
		Rural	Urban	Total	Rural	Urban	Total	Rural	Urban	Total
1	All children (6-13 years)	15,01,10,915	5,20,76,326	20,40,87,274	46,85,538	13,58,711	60,64,225	3.13	2.54	2.97
2	Male Children	8,32,65,078	3,11,50,340	11,44,16,418	24,50,953	7,15,456	31,66,409	2.94	2.30	2.77
3	Female Children	6,68,44,870	2,28,25,986	8,96,70,856	22,44,564	6,53,256	28,97,820	3.36	2.86	3.23
4	Age 6-10 years	9,01,23,249	3,26,47,814	12,27,71,166	26,23,399	7,74,939	33,98,338	2.91	2.37	2.77
5	Age 11-13 years	5,99,87,699	2,13,28,410	8,13,16,108	20,72,119	5,83,772	26,55,891	3.45	2.78	3.26
6	SC Children	4,63,96,983	1,43,75,716	6,07,72,699	15,91,869	3,74,158	19,66,027	3.43	2.60	3.24
7	ST Children	1,92,30,908	47,00,374	2,39,91,282	9,25,193	82,369	10,07,562	4.80	1.75	4.20
8	OBC Children	5,11,38,467	2,07,60,803	7,18,99,270	15,50,918	6,55,084	22,06,001	3.03	3.16	3.07
9	Other Children (Social Group)	3,32,84,589	1,41,39,433	4,74,24,023	6,27,538	2,57,101	8,84,639	1.89	1.82	1.87
10	Hindu Children	12,25,75,932	3,88,80,483	16,14,56,415	36,42,763	7,59,650	44,02,413	2.97	1.95	2.73
11	Muslim Children	2,24,00,636	1,27,67,893	3,51,68,529	9,72,727	5,84,373	15,57,100	4.34	4.58	4.43
12	Christian Children	26,84,836	14,37,172	41,22,030	47,444	15,255	62,699	1.77	1.06	1.52
13	Other Children (Religion)	24,49,522	8,90,778	33,40,300	32,583	9,434	42,017	1.33	1.06	1.26
14	All Disabled			21,39,943*			6,00,627*			28.07
15	Mental Disability			3,11,837			1,12,175			35.97
16	Visual Disability			4,19,250			73,969			17.64
17	Hearing Disability			2,20,425			42,556			19.31
18	Speech Disability			3,62,766			1,26,319			34.82
19	Orthopaedic / Loco-motor Disability			5,37,493			1,27,489			23.72
20	Multiple Disability			2,52,789			1,11,564			44.13
21	Slum			1,96,80,602			4,73,130			2.38

शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ,
हॅपी हाऊस फर्निचर समोर, नवीपेठ, पुणे–३०
for more updates join our telegram channel - @abhijitrathod
9272100500

- महाराष्ट्र सरकारने या योजनेचे नाव 'महात्मा फुले शिक्षण हमी योजना' असे केले आहे.

- ऊसतोड कामगार
- स्थलांतरीत झालेले यांच्यासाठी पर्यायी व नाविन्यपूर्ण योजना यालाच सेतुशाळा म्हणतात.
  - यामध्ये 45 दिवस शिक्षण चालते.

★ गुणवत्तावाढ - गुणवत्ता वाढीचा संबंध हा मार्काशी नसून मुल्याशी आहे.



कलम-6-11.

- गुणवत्ता वाढीमध्ये विद्यार्थ्यांमध्ये अंतर्गत गुणांचा किती विकास झाला याला विशेष स्थान दिले जाते.
- गुणवत्ता वाढीचा विकास करताना त्यात: अभ्यासक्रम, अभ्यासक्रमाचा परिणाम व त्यातुन होणारी जडण-घडण (संस्कार) याचा समावेश होतो.

★ गुणवत्ता वाढीसाठी सरकारचे प्रयत्न -
- शैक्षणिक पायाभुत सुविधा
- शाळेचा कालावधी जरी 6 तास असला तरी कमीत-कमी विद्यार्थी 4-5 तास मानसिकदृष्ट्या वर्गात असावा.
- सेवा पूर्व प्रशिक्षण
- अभ्यास साहित्य
- दप्तराचे ओझे कमी करणे.
- No Detension policy.
- शैक्षणिक सहल.
- खेळ आणि योग शिक्षण
- पर्यावरण प्रबोधन

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

- यासाठी सरकारने स्कुल नर्सरी योजना सुरु केलेली आहे.
- विज्ञान क्षेत्रात सुधारना.
- वार्षिक संम्मेलन आयोजित करणे.
- मुल्य शिक्षण
- शालेय व्यवस्थापनामध्ये पालकांचा सहभाग.
- भारतामध्ये गुणवत्ता वाढी संबंधात नोडल एजन्सी म्हणून NCRT काम करते.

शिक्षण पद्धती

राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्त्वे आणि शिक्षण

भारतीय राज्यघटनेच्या 4थ्या भागात कलम 36 ते 51 यामध्ये धोरणासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहेत.

राज्याचे ध्येयधोरण, योजना यांना मार्गदर्शन करण्यासाठी तसेच राज्यकारभारासाठी अधिक चांगल्या प्रकारे मार्ग दाखविण्याच्य दृष्टिने मार्गदर्शक तत्त्वे उपयुक्त असून त्यांना नीतिदर्शक तत्त्वे असेही संबोधले जाते. पुढील विचार व घोषणा यांचा प्रभाव मार्गदर्शक तत्त्वांवर पडलेला दिसून येतो.

1. जेरेमी बेंथम, जे.एस.मिल– उपयुक्तवादी विचारांचा प्रभाव
2. रॉबर्ट ओवेन, सिडनेवेष, जी.डी.एच.कोल, हेरॉल्ड लास्की, विलियन क्लार्क, ॲनी बेझंट– समाजवादी विचारांचा प्रभाव
3. 1935 चा कायदा– मार्गदर्शक तत्वांचे स्वरुप 1935 च्या कायद्याबरोबर ज्या आदेशवजा सूचना देण्यात आलेल्या होत्या. गव्हर्नर जनरलने राज्यकारभार कसा चालवावा याबाबतचे आदेशवजा सूचनापत्राप्रमाणे आहे.
4. युनोची मानवी हक्क सनद व युनोचे घोषणापत्र– भारतीय घटनाकारांवर युनोच्या मानवी हक्काच्या सनदेचा व घोषणापत्राचा प्रभाव पडलेला दिसून येतो.
5. म.गांधी यांचे विचार, राष्ट्रीय काँग्रेसच्या ध्येयधोरणांचा प्रभाव– भारतीय घटनाकारांवर म.गांधी यांच्या विचारांचा तसेच राष्ट्रीय काँग्रेसच्या ध्येयधोरणाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. उदा. विकेंद्रीकरणा, ग्रामराज्य, दारूबंदी, गोहत्याबंदी, कुटीरोद्योग इ. सारखे म.गांधी यांचे विचार, राष्ट्रीय काँग्रेसची सामाजिक, आर्थिक स्वातंत्र्याविषयीची ध्येयधोरणे–उद्दिष्टे

भारतीय राज्यघटनेच्या 4थ्या विभागात कलम 36 ते 51 याअंतर्गत जी मार्गदर्शक तत्त्वे आहेत त्यांना कायदेशीर मान्यता नाही, अथवा न्यायालयीन संरक्षण नव्हते. परंतू 1976 मध्ये 42 व्या राज्यघटनादुरुस्तीनुसार मार्गदर्शक तत्त्वांना न्यायालयीन संरक्षण देण्यात आले. तसेच घटनेत कलम 39(क), 39(च), 43(क), 48(क) या चार कलमांचा समावेश केला. मार्गदर्शक तत्वामधील कलम 38, 45, 46 यामध्ये शिक्षणाविषयक तरतूदी आहेत. याशिवाय मूलभूत हक्कांमधील कलम 21 (क), 28, 29, 30 (क), 30(2) इ. मध्ये शिक्षणविषयक तरतूदी आहेत. राज्यघटनेच्या भाग 4 (अ), मूलभूत कर्तव्यांमधील कलम 51 (ज), कलम 51(अ–के) भाग 16 मधील कलम 337, 350 (क) तसेच केंद्रसूची, समवर्ती सुचीमधील कलमांमध्ये तरतूदी केलेल्या आहेत.

कलम 21 (क)– शिक्षणविषयक अधिकार हा मुलभूत अधिकार झाल्याने शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणास चालना.

कलम 28 – विवक्षित शैक्षणिक संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण/धार्मिक उपासना यांना उपस्थित राहण्याबाबत स्वातंत्र्य

कलम 29– अल्पसंख्यांक समाजाच्या हितसंबंधाचे संरक्षण या कलमांतर्गत राज्याच्या खर्चाने/पैशातून साहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा यापैकी कोणत्याही कारणासतव प्रवेश नाकारला जात नाही.

कलम 30– अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार राहील.

कलम 30 (1–क)– यानुसार एखाद्या अल्पसंख्यांक समाजाने स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्थांच्या कोणत्याही संपत्तीचे सक्तीने संपादन करण्याचा उपबंध करणारा कोणताही कायदा करतांना राज्य अशा संपत्तीच्या संपादनाबद्दल या कायद्याने निश्चित केलेल्या रकमेमुळे त्या खंडाखाली हमी दिलेला अधिकार निर्बंधित/निराकृत करणार नाही अशा प्रकारची रक्कम असेल खात्रीलाय तजवीज करे.

कलम 30(2)– शैक्षणिक संस्थाना सहाय्य देतांना राज्य एखादी शैक्षणिक संस्था ही धर्म अथवा भाषा या नियमानुसार अल्पसंख्यांक असलेल्या एखाद्या समाजाच्या व्यवस्थापनाखाली आहे या कारणावरून तिला प्रतिकुल होईल अशाप्रकारे भेदभाव केला जाणार नाही.

कलम 51 (अ–के)– पाल्यांना प्राथमिक शिक्षण देणे हे पालकांचे कर्तव्य

कलम 337- अँग्लो-इंडियन समाजासाठी शैक्षणिक अनुदानाबाबत विशेष सवलती राज्यघटनेच्या प्रारंभानंतर 10 वर्षात देण्यात आल्या असे अनुदान प्राप्त होण्यासाठी अशा संस्थांनी इतर समाजासाठी किमान 40% जागा राखून ठेवणे आवश्यक आहे.

कलम 350(क)- प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षणाच्या सोयी प्रत्येक राज्य व राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकरण भाषिक अल्पसंख्यांक समाजातील मुलांना शिक्षणाच्या प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षण देण्याच्या पर्याप्त योगी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहील. अशा सोयी पुरविणे शक्य होण्यासाठी राष्ट्रपती स्वतःला आवश्यक अथवा योग्य वाटतील असे निर्देश कोणत्याही राज्याला देऊ शकतील.

केंद्रसूची 7 वी अनुसूची अंतर्गत कलमे व तरतूदी

कलम 64- राष्ट्रीय महत्त्वाच्या वैज्ञानिक/तांत्रिक शिक्षणाच्या संस्थांचा समावेश

कलम 65 (क)- पैशाविषयी, व्यावसायिक, तांत्रिक प्रशिक्षण यासंबंधी माहिती.

कलम 66- उच्च शिक्षणाच्या/संशोधनाच्या संस्था, वैधानिक व तांत्रिक संस्था यातील दर्जाचे समन्वयन व निर्धारण याबाबत माहिती

कलम 67 (ख)- विशेष अभ्यास/संशोधन यांचे प्रवर्तन याविषयी माहिती.

राज्यसूची 7 वी अनुसूची अंतर्गत कलमे व तरतुदी

कलम 14- कृषीविषयक शिक्षण व संशोधन

कलम 15- पशुवैद्यकीय प्रशिक्षण व व्यवसाय

कलम 45- राज्यघटना अस्तित्वात आल्यापासून 10 वर्षाच्या आत राज्य 14 वर्षापर्यंतच्या बालकांसाठी मुक्त व सक्तीचे शिक्षण पुरविण्याचे प्रयत्न करील ही जबाबदारी राज्यसरकार व केंद्रसरकारकडे राहील.

अनुसूचित जाती-जमाती, मुस्लिम आणि महिला या वंचित वर्गातील लोकांच्या शिक्षणविषयक समस्या

अनुसूचित जातीतील लोकांच्या शिक्षणविषयक समस्या

प्राचीन काळापासून अनुसूचित जातीतील लोकांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असे. उदा. स्मृतिकाळामध्ये त्यांना शिक्षण नाकारले होते. ब्रिटिश काळात शासकांद्वारे शासकीय शाळा सुरु करण्यात आल्या तसेच ज्या शाळांना अनुदान दिले जाते अशा शाळांमध्ये कोणासही शिक्षणनाकारता येणार नाही असे निर्देश देण्यात आले.

महाराष्ट्रात म. फुले व सावित्रीबाई फुले यांचे शिक्षणक्षेत्रातील योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे तसेच डॉ.आंबेडकर यांनी समाजाला शिक्षण घेण्याचा आधुनिक मंत्र दिला.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये शैक्षणिक पातळीमध्ये वाढ होत असली तरी पुढील समस्या आढळल्या-

1. साक्षरता प्रमाण कमी
2. शिक्षणाची पातळी निम्न स्तरावर
3. अनुसूचित जमातींचे प्रमाण ग्रामीण अधिक असल्याने त्यांना शिक्षणक्षेत्रातील संधीची उणीव तसेच उच्च शिक्षण घेण्यासाठी आर्थिक दृष्ट्या क्षमता नाही.
4. शिक्षणाच्या खाजगीकरणातून महागड्या शिक्षणाची निर्मिती झाल्याने अनुसूचित जातीतील घटकांना आर्थिक क्षमता नसल्याने त्यांना उच्च शिक्षण घेता येत नाही.
5. मुलींसाठी स्वतंत्र शाळा अनेक ठिकाणी उपलब्ध नसल्याने मुलींना शिक्षणापासून वंचित राहावे लागते.
6. अनुसूचित जातीतील घटकांना शिक्षणाचे महत्त्व नसल्याने ते पारंपारिक जीवन जगणे पसंत करतात.
7. अनुसूचित जातीत शैक्षणिक दृष्ट्या योग्य मार्गदर्शनाचा अभाव आढळतो.

अनुसूचित जमातीतील लोकांच्या शिक्षणविषयक समस्या

आदिवासी क्षेत्रात शासनाद्वारे शैक्षणिक संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत. याशिवाय अशासकीय संस्थाद्वारेही शैक्षणिक संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत उदा. रामकृष्ण मिशन, वनवासी आश्रम, ख्रिश्चन, मिशनरी, हरिजन सेवक, संघ यासारख्या संस्था असल्या तरी अनुसूचित जमातीमधील शैक्षणिक समस्या पुढीलप्रमाणे सांगता येतील-

1. आदिवासी क्षेत्रात पुरुष व स्त्रियांचा साक्षरता दर अल्प स्वरुपाचा आहे.
2. मर्यादित स्वरुपाचा शिक्षणप्रसार

- अभिजीत राठोड
Complete Study
उत्तम-मोती बिल्डींग (दुसरा मजला), नागनाथपार-सनिपार रोड, रमेश डाईंग जवळ, सदाशिव पेठ, पुणे-३०
अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.
9272100500

3. शिक्षणाबद्दल अनास्था
4. शिक्षणाच्या दृष्टीने व्यावसायिक शिक्षण सुविधांचा अभवा, आदिवासींच्या बोलीभाषा अथवा संबंधित भाषेचा विकास न झाल्याने लोकसाहित्य दुर्लखित
5. आत्यंतिक दारिद्र्य, मुलांना उदर निर्वाहार्थ कामे करावी लागत असल्याने ते शिक्षणापासून वंचित
6. आदिवासी जमातींमध्ये काळी जादू, भानामती, जादूटोणा यासारख्या अंधविश्वासांचा प्रभाव असल्याने त्यात लहान मुले, नातेवाईक, यांचा बळी दिला जातो तसेच चाली रिती, धार्मिक विचारांचा पगडा असल्याने शिक्षण आव्हानात्मक ठरते.
7. आदिवासी क्षेत्रात पाणीटंचाई, अन्नटंचाई यातून त्यांना कुपोषणाला, रोगराईला तोंड द्यावे लागते व त्याचा परिणाम शिक्षणावर होतो.

मुस्लिम/इस्लाम धर्मीय अल्पसंख्यांकांच्या शिक्षणविषयक समस्या

1. मुस्लीम धर्मामध्ये असलेल्या विविध स्तरांमधील मुस्लीम अल्पसंख्यांकांचा निम्न स्तर हा दारिद्र्य रेषेखाली जवीन व्यतीत करीत असल्याने त्या प्रवर्गामध्ये शैक्षणिक स्तर निम्न आहे.
2. या प्रवर्गामध्ये साक्षरतेचा दर कमी, परंपरा-रुढींवर आधारित समाजामुळे स्त्रियांमध्ये पडदा पद्धती यामुळे शिक्षणाचे प्रमाण कमी असते.
3. ग्रामीण स्तरावर अगदी लहान शहरात या समाजाच्या शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही.
4. या समाजातील पालकांच्या आर्थिक असमर्थनेतून मुलांना उपजिविकेसाठी शिक्षणाऐवजी काम करण्याकडे कल असतो.
5. उर्दू भाषा व साहित्याचा अभ्यास करण्यासाठी सुविधांचा अभावा

महिलांच्या शैक्षणिक समस्या-

महिला प्रवर्गात पुढील प्रकारे शैक्षणिक समस्या असतात.

1. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रिला दुय्यम स्थान
2. कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे शिक्षणाकडे दुर्लक्ष
3. पालकांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यास शिक्षणापासून वंचित
4. घरापासून शाळेचे अंतर अधिक असल्यास अथवा शाळेच्या वेळा सोयीच्या नसतील तर शिक्षणापासून वंचित
5. मुलींना शिक्षण देणे- विकास करणे-मार्गदर्शन करणे इ. बाबींचा अभाव असल्यास मुलींना शिक्षणापासून वंचित
6. ग्रामीण भागात मुलींना लहान वयातच विवाह करून दिले जात असल्याने त्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागते.
7. विवाहामुळे मुलीचा भविष्यकालीन फायदा नसल्याने पालकांची मुलींच्या शिक्षणप्रती अनास्था-

परीक्षा Competitive Forum

शिक्षणाचे खाजगीकरण

- अभिजीत राठोड

शिक्षणाचे खाजगीकरण हे पुढील प्रकारे होते.

1. हस्तांतरण
2. अनुदान
3. गुंतवणूक
4. परवाना

शिक्षणाचे खाजगीकरण म्हणजे शिक्षण क्षेत्रामध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढविणे, तसेच खाजगी क्षेत्रांच्या हातात तत्संबंधी नियंत्रण व व्यवस्थापन जाणे होय. शिक्षणाच्या खाजगीकरणातून-

1. शिक्षण आणि गुणवत्ता पूर्ण होण्यास मदत.
2. देशातील- परदेशातील संस्था शैक्षणिक क्षेत्रात गुंतवणुक करू शकतात.
3. शिक्षण जागतिक दर्जाचे होण्यासाठी उपयुक्त
4. शिक्षणसंस्थांच्या व्यवस्थापनातील दप्तर दिरंगाई दूर झाल्यास या व्यवस्थापनात कार्यक्षमता वाएवण्यास मदत होते.
5. शिक्षणाच्या उपलब्धतेत वाढ.
6. भारतात जवळ जवळ 40% विद्यार्थी खाजगी शिक्षणसंस्थेतून शिक्षण घेत असून व्यावसायिक दृष्ट्या खाजगी शिक्षण संस्थांच्या व्यावसायिक दृष्टीमुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर विपरित परिणाम होतो. त्यामुळे प्रा.यशपाल समितीने याशिक्षणसंस्थांचा उल्लेख Business Center असा करून विद्यापीठे बंद करण्याबाबत या संस्था राजकीय नेत्यांसाठी एक साधन बनल्याने मत प्रतिपादन केले जाते.

शिक्षणाच्या संधी, गुणवत्ता, दर्जा आणि सामाजिक न्याय

उच्च शिक्षणामुळे देशाच्या आर्थिक स्थितीमध्ये प्रगती घडून येण्यास मदत होते तसेच त्यातून तंत्रज्ञ, कुशल मनुष्यबळ निर्माण होते. यात कृषी, फार्मास्युटिकल, तंत्रशिक्षण, व्यवसायाभिमुख प्रशिक्षण इंजिनिअरिंग सारख्या विषयांचा अंतर्भाव होतो. तसेच उच्च

शिक्षण प्राप्त करण्याचा उद्देशान, गुणात्मक विकास साधता येण्यासाठी विविध भागातून विद्यार्थी येतात. साधारणतः-

1. साधारण व उच्च शिक्षण 2. कृषी शिक्षण
3. पशुशास्त्र शिक्षण 4. वैद्यकीय शिक्षण इ.चा समावेश होतो.

भारतात विद्यापीठांचे 5 प्रकार आहेत.

1. संलग्न स्वरुपाची विद्यापीठे
2. अध्यापन करणारी व संलग्न विद्यापीठे
   उदा.पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, नागपूर विद्यापीठ, एस.एन.डी.टी.विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठ, नांदेड विद्यापीठ
3. एककेंद्रीय विद्यापीठे-शांतीनिकेतन विद्यापीठ, जामिया मिलिया विद्यापीठ
4. केंद्रशासित विद्यापीठे-अलिगढ विद्यापीठ, विश्वभारती विद्यापीठ, दिल्ली विद्यापीठ, बनारस विद्यापीठ
5. अभिमत दर्जा प्राप्त विद्यापीठे- दिल्ली, पुणे, मुंबई, बंगलोर, धनबाद, वाराणसी, अहमदाबाद, अहमदनगर या ठिकाणी या शिवाय महाराष्ट्रामध्ये 17 अभिमत विद्यापीठे व 4 कृषी विद्यापीठे आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोग (1956)-

स्थापना -1956

कार्ये- 1. उच्च शिक्षणास उत्तेजन देणे.
2. गुणवत्ता व मापदंड प्रस्थापित करणे.
3. अनुसूचित जाती-जमातींसाठी आरक्षणाचे धोरण निश्चित करणे.
4. प्रौढ शिक्षण, महिला शिक्षण, दूरस्थ शिक्षण, शिक्षणाचे व्यावसायिकरण, शिक्षण- प्रशिक्षण, शिक्षण पात्रता, परीक्षा, पर्यावरण, मानव संसाधन विकास, मागास वर्गीयांचे शिक्षण इ. बाबत विशेष प्रयत्न

तसेच

1. मानव संसाधन विकासामध्ये-

1. गुणवत्तापूर्ण शिक्षकांना संशोधनास साहाय्य करणे.
2. राष्ट्रीय पात्रता परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्यांना देणे.
3. शिक्षक आणि संशोधकांना वेगवेगळ्या क्षेत्रातील ज्ञान संपादन करण्यासाठी विविध योजना कार्यान्वित करणे.

2. आंतरराष्ट्रीय संशोधन या अंतर्गत-

1. वैश्विक पर्यावरण, वातावरण शास्त्र, सुपर कंडक्टर्स यांचा समावेश.
2. नवीन क्षेत्रामध्ये संशोधन करण्याच्या दृष्टीने नवीन अभ्यासक्रमाची आखणी करणे.
3. वेगवेगळ्या विद्याशाखांमधून घेतल्या जाणाऱ्या संशोधनास इतर विद्याशाखेस जोडणे.

परिवर्तन Competitive Forum -अभिजीत राठोड

3. व्यावसायिक शिक्षण यामध्ये-

1. 1994-95 पासून पदवीच्या प्रथम वर्षापासून विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण घेता येण्याच्या दृष्टीने खास आयोजन करण्यात आले. यासाठी प्रादेशिक स्तरावर मुंबई, कोलकत्ता, बंगलोर, दिल्ली येथे प्रादेशिक नियंत्रण केंद्रे असून येथे अभ्यासक्रम शिकवण्यासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण घेतले जावे.

4. शैक्षणिक माध्यम तंत्र-

1. दूरदर्शनच्या माध्यमातून माहिती तंत्रज्ञानाचा वापर, कंट्रीवाईड प्रोग्रेसिंगद्वारे माहिती प्रसारण करणे.
2. संपूर्ण देशात 7 विभाग असून त्यात दूरस्थ शिक्षणासाठी व्हिडिओ टेप तयार करणे, पर्यावरण जागृती एड्स, पिण्याचे पाणी इ. महत्त्वाच्या विषयांचा समावेश.

5. प्रौढ शिक्षण व लोकसंख्या विभाग-

1. लोकसंख्या शिक्षण
2. निरक्षरता निर्मूलन
3. विकासात्मक कार्यक्रमांचे आयोजन
4. विद्यापीठीय स्तरावर प्रौए शिक्षण कार्यक्रांतर्गत प्रौढ व निरंतर शिक्षण विभागाची स्थापना.
5. आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन (8 सप्टेंबर) साजरा करणे.
6. केंद्रीय प्रौढ शिक्षण बोर्ड, राष्ट्रीय साक्षरता मिशनमध्ये शैक्षणिक व तांत्रिक संसाधनास सहयोग.

उत्तम-मंती बिल्डींग (दुसरा मजला), नागनाथपार-शनिपार रोड, समेश डाईंग जवळ, सदाशिव पेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.
9272100500

7. साक्षरतेच्या दृष्टीने बालविज्ञान समितीची स्थापना.

6. दूरस्थ शिक्षण/ पत्राद्वारे शिक्षण–

1. विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे दूरस्थ शिक्षणासाठी 35 ते 50 लाख इ. ची मदत 5 वर्षांसाठी केली जाते.
2. विविध भाषेमध्ये दृकश्राव्य माध्यमाच्या सहाय्याने अभ्यास तयार केला जातो.

7. विशेष घटकांसाठी शिष्यवृत्ती–

1. या संदर्भात दुर्बल, अपंग घटक, मागासवर्गीय, जाती–जमाती या घटकांना शिष्यवृत्ती देणे.
2. Jounior Research Fellowship आरक्षण उपलब्ध करून देणे.
3. मागासवर्गीयांना अध्ययनास पूरक शिक्षण देण्यासाठी सुरु करण्यात आलेले असून त्यासाठी दीड लाख रु. प्रतिवर्षी महाविद्यालयास दिले जातात.
4. स्पर्धात्मक परीक्षांसाठी मार्गदर्शन करण्यासाठी मदत पुरविणे.

8.स्त्री शिक्षण–

1. महिलांच्या समस्यांवर संशोधनात्मक अध्ययन करण्यासाठी स्त्री अभ्यास केंद्राची स्थापना करणे.
2. यात स्त्रीचे आर्थिक स्वावलंबन, स्त्री समानतेसारख्या प्रश्नांवर अध्ययन.
3. स्त्री अभ्यास केंद्र हे विभागीय स्तरावर कार्यरत असून याची जवळजवळ 33 केंद्रे आहेत.
4. याद्वारे संशोधन व प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात.

9. इनफ्लिबनेट–

1. शैक्षणिक क्षेत्रातील मानवी भांडवल एकत्रित करणारी ज्ञानबँक मानली जाते.
2. यात शैक्षणिक संस्थांमधील प्राध्यापकांची शैक्षणिक पात्रता, कार्य संपर्काचे पत्ते, इंटरनेटद्वारे जोडलेले असतात.
3. त्याचा वापर शैक्षणिक क्षेत्राची गुणवत्ता वाढविण्यासाठी केला जातो.
4. ग्रंथालयाचे संगणकीकरणे करण्यासाठी 114 विद्यापीठांना मदत पुरविण्यात आली.

10. बनावट विद्यापीठे–

आयोगाची संमती नसतानांही तसेच संसदेच्या/ राज्य सरकारची मान्यता नसतानाही सुरु केलेल्या बनावट विद्यापीठांची यादी संकेतस्थळावर प्रसारित करून शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने नियंत्रण ठेवले जाते.

राष्ट्रीय मूल्याकन व अधिमान्यता समिती (नॅक)–

स्थापना – 16 सप्टेंबर 1994 (विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे)

नॅक ही स्वायत्ता संस्था आहे.

उद्दिष्टे– विविध शैक्षणिक संस्थांमधील महाविद्यालये, विद्यापीठे यांच्या गुणवत्तेची सत्य पडताळणी करणे. संबंधित संस्थेला योग्य तो दर्जा प्रदान करणे.

कार्ये– नॅकद्वारे शैक्षणिक संस्थांचे मूल्यमापन करतांना पुढील बाबींवर लक्ष दिले जाते.

1. अभ्यासविषयक बाबी–

1. महाविद्यालयात चालविले जाणारे अभ्यासक्रम
2. संस्थेची ध्येयधोरणे
3. काळानुरूप बदल
4. अभ्यासक्रमाची व्याप्ती– सखोलता
5. विद्यार्थ्यांना उपलब्ध असणारे पर्याय

2. अध्यापन–

1. अध्यापन, मुल्यमापन या संदर्भातील बाबी
2. विद्यार्थ्यांची बौद्धिक कुवत
3. शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पूरक सुविधा
4. अध्यापन पद्धती
5. शैक्षणिक साधनांचा वापर
6. शिक्षकांच्या निवडपद्धती
7. अध्यापनाचे नियोजन, त्याची अंमलबजावणी
8. महाविद्यालयीने विद्यार्थ्यांची प्रवेशपद्धती
9. प्रत्यक्ष अध्यापन दिवस
10. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्याच्या पद्धती

3. संशोधन सल्लामसलत व विस्तार–

1. संशोधन समिती
2. संशोधनासाठी अभ्यास रजा दिल्या जातात का?

Competitive Forum
– अभिजीत राठोड

3. संशोधनासाठी निधींची उपलब्धता
4. संशोधन पत्रिकांमध्ये लेखन
5. संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन
6. विविध सामाजिक प्रकल्प
7. संशोधनासाठी महाविद्यालयात कशाप्रकारे प्रोत्साहन दिले जाते.

4. पायाभूत सुविधा व अध्ययन संसाधने–

1. विविध स्पर्धांचे आयोजन करणे.
2. महाविद्यालयाचा परिसर, आजूबाजूचे वातावरण, हवामान, प्रदूषणमुक्त व सुंदर परिसर विकासासाठी केले जाणारे प्रयत्न
3. इतर पायाभूत सुविधांची उपलब्धता

5. विद्यार्थी मदत व त्यांची प्रगती–

1. विद्यार्थ्यांना दिली आर्थिक मदत
2. विविध स्पर्धांचे आयोजन
3. माहिती पुस्तिका
4. माजी विद्यार्थी संघटना, त्यांचा प्रतिसाद
5. खेळाच्या सुविधा
6. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नोकरी/व्यवसाय करणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती
7. महाविद्यालयीन वार्षिकांक
8. शिक्षण मध्येच सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण

6. संघटन व व्यवस्थापन–

1. संस्थेचे व्यवस्थापन
2. आर्थिक स्थिती
3. विविध समित्या
4. इतर संस्थांशी असणारा संपर्क
5. शैक्षणिक दिनदर्शिका

7. पोषक प्रगती–

1. अंतर्गत गुणवत्ता तपासणी
2. आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण अभ्यासक्रम
3. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबरचे करार
4. आधुनिक व्यवस्थापन संकल्पना
5. व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने केले जाणारे प्रयत्न, इतर बाबी

- नॅकचे तारांकित दर्जा पद्धती रद्द करून त्याऐवजी नवीन शैक्षणिक वर्षापासून त्रिस्तरीय श्रेणी दर्जा देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार संस्थांना व श्रेणींमधील गुणवत्तेनुसार एक श्रेणी दिली जाते, ती पुढीलप्रमाणे–

अ.क्र.	मुल्यमापनात मिळालेले गुण	श्रेणी	अ.क्र.	मुल्यमापनात मिळालेले गुण	श्रेणी
1.	95-100	अ++	2.	90-95	अ+
3.	85-90	अ	4.	80-85	ब
5.	75-80	ब+	6.	70-75	इ
7.	65-70	उ++	8.	60-65	उ+
9.	55-60	उ			

परिवर्तन Competitive Forum अभिजीत राठोड

थोडक्यात नॅकची स्थापना वाढती बेकारी, जागतिकीकरणामुळे वाढती स्पर्धा यामुळे शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता, विश्वसार्हता, सामाजिक उपयुक्तता वाढवण्याच्या दृष्टीने करण्यात आलेली आहे.

सेवा-विनिमय विषयक सामानय करार आणि उभरत्या समस्या

गॅटसने (जागतिक व्यापार संघटना) शिक्षणासंबंधीत क्षेत्राशी जगभरातील देशांमध्ये वस्तू व सेवा यांच्या चालणाऱ्या व्यापाराचे नियमन करणाऱ्या वेगवेगळ्या अटी व तरतुदी लागू केल्या आहेत.

तरतुदी–

1. सीमेदरम्यानचा व्यवहार–

इंटरनेद्वारे शिक्षण सुविधा पुरविणे–यात दूरशिक्षण, टेलिकम्युनिकेशन, एज्युकेशन टेस्टिंगचा समावेश

2. परदेशी शिक्षण–

- एका देशातून दुसऱ्या देशात शिक्षणासाठी जाणारे विद्यार्थी
- अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, ऑस्टलिया येथे शिक्षणासाठी भारतातून जाणारे विद्यार्थी
- दुसऱ्या देशातून भारतात शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी

संबंधित सेवा या परकीय विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांशी संबंधित असणे आवश्यक.

3. दुसऱ्या देशामध्ये विद्यापीठीय शाखा, अभ्यासक्रमास प्रारंभ करणे–

गॅट्समध्ये प्रामुख्याने प्राथमिक, माध्यमिक, उच्च, पदव्युत्तर, व्यावसायिक, प्रौढ, पदवीस्तरीय संलग्न शिक्षण इ.चा समावेश होतो.

आयात–

कॅम्पस अॅब्रॉड– अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, रशिया इ. देशांमध्ये भारतातील 1 लाखापेक्षा जास्त विद्यार्थी प्रशिक्षण घेत असून दरवर्षी 75000/– पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची भर पडते.

कमर्शिअल प्रेझेन्स– अनेक परदेशी विद्यापीठांनी देशातील खाजगी विद्यापीठांशी सहकार्य करून त्यांचे कॅम्पस सुरु केले आहेत. या विद्यापीठांमार्फत सुरु केले आहेत. या विद्यापीठांमार्फत व्यावसायिक कोर्स, परदेशी पदवी दिली जाते.

भारतात–

- वेस्टर्न इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी–अॅरिकोना
- हार्ट फोर्ड शायन युनिव्हर्सिटी–लंडन
- आयटीटी एज्युकेशन सर्व्हिसेस– अमेरिका, केलॉन, वॉटर या संस्था कार्यरत आहेत.

क्रॉस बॉर्डर डिलिव्हरी– भारताद्वारे 1. टेलि एज्युकेशन, 2. व्यवस्थापन, 3. एक्झिक्युटिव्ह ट्रेनिंग या क्षेत्रात इतर देशात उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न केले जातात. उदा. प्रॅक्टिस टेस्ट, ट्युशन यासाठी आऊटसोर्सिंग संधी उपलब्ध करून देणे.

कॅम्पस अॅब्रॉड– अभियांत्रिकी, वैद्यकीय शिक्षणासाठी परदेशातून/विकसनशील देशातून विद्यार्थी येतात. भारतात एक्सचेंज

निर्यात–

प्रोग्रॉम व ट्रेनिंग अरेंजमेंट सारखे उपक्रम शैक्षणिक संस्थांद्वारे राबविले जातात.

कमर्शिअल प्रेझेन्स– भारतातील सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ इंग्लीश व फॉरेन लँग्वेज, बिट्स, सीबीएसई या शैक्षणिक संस्थानी इतर देशांमध्ये शाळा व महाविद्यालय सुरु केली आहेत. मूळ भारतीय वंशाच्या भारतीय अधिकाऱ्यांच्या मुलांना भारतीय शिक्षण देणे.

मुव्हमेंट ऑफ नॅचरल पर्सन्स– युरोप, आफ्रिका, मध्यपूर्व आशिया इ देशांमध्ये भारतातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षणतज्ज्ञांद्वारे मार्गदर्शन सुविधा पुरविल्या जातात.

भारत हा युनुस्कोच्या अहवालामध्ये केलेल्या 129 देशांच्या यादीत 105 क्रमांकावर आहे.

उच्च शिक्षणातील [illegible]–

विद्यापीठीय/उच्च शिक्षणाच्या समस्या पुढीलप्रमाणे सांगता येतील–

1. उच्च शिक्षणामध्ये गुणवत्तामापन ही अडचणीची बाब
2. उच्च शिक्षणात [illegible] संधी असल्या तरी त्याचे प्रमाण अत्यल्प
3. उच्च शिक्षण घेऊ इच्छिणारे/पात्रता असतानाही सामाजिक, आर्थिक, इतर कारणांमुळे एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षण घेता येत नसेल अथवा शिक्षणाची संधी मिळत नसल्यास विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी उदेद् संबंधित विद्यार्थी कोणत्या प्रदेशातून आलेला आहे यासारख्या निकषांवर अवलंबून राहावे लागते.
4. उच्च शिक्षणक्षेत्रात सर्वसाधारण अतांत्रिक शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण तुलनेने तांत्रिक–व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांपेक्षा जास्त आढळते.
5. उच्च शिक्षणात संधीचे प्रमाण अधिक असले तरी स्थूल पटनोंदणी दर मात्र जागतिक सरासरीपेक्षा कमी होतो.
6. उच्च शिक्षणामध्ये समावेशक विकासाबरोबर समन्वय विकासही तितकाच महत्त्वाचा असल्याने मागास राज्यांना ग्रामीण भाग, अल्पसंख्यांक, मागासवर्गीय महिला वर्ग इ. ना समाज प्रवाहात सहभागी करून घेताना अडचणी येतात.
7. महाविद्यालयांप्रमाणे विद्यापीठीय गुणवत्तावाढ होण्यात अडचणी निर्माण होत असताता.
8. दर्जेदार, पुस्तके, कायमस्वरुपी शिक्षण, संगणक, क्रीडांगण, वसतिगृह इ. बाबत

सर्व शिक्षा अभियान

केंद्र सरकारद्वारे इ.सन 2001 मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी 'सर्व शिक्षण अभियान' ही योजना घोषित केली.

उद्दिष्टे– सर्वशिक्षा अभियानाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे–

1. 2005 पर्यंत 6 ते 14 वयोगटातील सर्व मुलांना शिक्षण हमी योजना व पर्यायी शिक्षण योजनांतर्गत शिक्षण देणे.
2. 2007 पर्यंत सर्व मुलांना 5 वर्षापर्यंतचे प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देणे.
3. 2010 पर्यंत सर्व मुलां 8 वर्षापर्यंतचे प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देणे.
4. 2007 पर्यंत प्राथमिक स्तरावरील, सामाजिक वर्गामधील व स्त्री–पुरुष लिंगभाव दूर करणे.

Competitive Forum
उत्तम–मोती बिल्डींग (दुसरा मजला), नागनाथपार–शनिपार रोड, रमेश डाईंग जवळ, सदाशिव पेठ, पुणे–30
• अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.
9272100500

5. गुणवत्ताधिष्ठित प्राथमिक शिक्षणावर भर देणे व जीवनोपयोगी शिक्षणाचा अंगिकार करणे.

6. 2010 पर्यंत विद्यार्थ्यांच्या गळतीला पूर्णतः आळा घालणे.

7. अनुसूचित जाती/जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी तसेच प्रतिकूल परिस्थितीमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक आवश्यकतेनुसार विशेष लक्ष देणे.

8. ज्या भागात शाळा नाहीत तेथे शाळा सुरु करणे, वर्गांसाठी नव्या खोल्या, शौलालय, पिण्याचे पाणी, इरत बाबी शालेय सुधारणा अनुदानाच्या माध्यमातून करणे.

9. या योजनेअंतर्गत मुलींसाठी, समाजातील दुर्बल घटकांतील मुलांवर विशेष लक्ष पुरवण्यात येईल.

10. अशा मुलांना निःशुल्क पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देणे.

11. ग्रामीण क्षेत्रापर्यंत कॉम्प्युटरचे शिक्षण देणे.

विशेष योजना– सर्व शिक्षा अभियानातील विशेष योजना खालीलप्रमाणे–

१. मुलींच्या शिक्षणाच्या योजना–

- लिंगभाव मिटविण्याच्या दृष्टीने शिक्षणाला प्रोत्साहन देणे उदा. शैक्षणिक साधने व मोफत गणवेश, मोफत पाठ्यपुस्तके, मध्यान्ह भोजन, शिक्षक भरती करून त्याद्वारे ग्रामीण भागात झोपडपट्ट्या, कामगार वस्त्यांमध्ये जनजागृती करणे.
- मुलींच्या प्राथमिक शिक्षणाबरोबर व्यावसायिक शिक्षण देणे, त्यादृष्टीने मुलींच्या प्राथमिक शिक्षणाचा राष्ट्रीय कार्यक्रम व कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय या योजना महत्त्वपूर्ण आहेत.

२. अनुसूचित जाती–जमातींचया मुलांचे शिक्षण–

- अनुसूचित जाती–जमातींतील जास्तीत जास्त बालकांनी शाळेत प्रवेश घेण्यासाठी त्यांना मोफत पाठ्यपुस्तके पुरवणे.
- शाळेत प्रवेश घेण्याच्या दृष्टीने विविध योजना अंमलात आणणे.
- वसतीगृहांची सुविधा, पर्यायी शिक्षण योजना अनुसूचित जाती–जमातींच्या समुदायांच्या शाळा समितीची स्थापना करणे.

विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी शिक्षण योजना–

शारिरीकदृष्ट्या अपंगत्व असलेल्या बालकांना शाळेत प्रवेश मिळण्याच्या दृष्टीने सर्व समावेशी योजना तयार करण्यात आलेली आहे. यात–

1. शिक्षकांना एखाद्या बालकात कोणते अपंगत्व आहे विशिष्ट लक्षणांवरून ओळखण्याचे प्रशिक्षण देणे.
2. जिल्हा नागरी इस्पितळात निदान करून बालकांच्या अपंगत्वावर उपचार केले जातात.
3. आवश्यकतेनुसार विविध वैद्यकीय साधने बालकांना पुरविली जातात.

उदा. 1. दृष्टीदोष असणाऱ्या बालकांना चष्मे

2. अस्थिदोष असणाऱ्या बालकांना तीन चाकी सायकल अथवा इतर वैद्यकीय साधने

3. श्रवणदोष असणाऱ्या बालकांना श्रवणयंत्रे पुरवली जातात.

परिवर्तन Competitive Forum – अभिजीत राठोड

यामागे हेतू बालकाचे अपगत्त्व दूर करणे तसेच त्याना मुख्य शैक्षणिक प्रवाहात आणणे हा होय.

सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांद्वारे अधिकाधिक विद्यार्थ्यांना शाळेत सामावून घेण्याच्या दृष्टीने शाळांमधील भौतिक सुविधांमध्ये सुधारणा करणे, अधिक वर्गांची सोय करणे, स्वच्छतागृह व पिण्याच्या पाण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे, अशा बाबी हातात घेण्यात आल्या आहेत. तसेच ग्रामीण भागात संगणक प्रशिक्षणावर भर दिला जात आहे.

शिक्षण हमी योजना आणि पर्यायी शिक्षण योजना–

1. ज्या दुर्गम वस्त्यांमध्ये 6 ते 14 वयोगटातील मुलांना त्यांच्या 1 कि.मी. परिसरात औपचारिक शिक्षण उपलब्ध नाही अशा ठिकाणी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे.
2. एखाद्या वस्तीत एक जरी मूल असेल तर त्याला पर्यायी शिक्षण देण्यासाठी 'राजीव गांधी संधी शाळा' उपलब्ध असते.
3. पर्यायी शिक्षणाच्या दृष्टीने बालकामगार, बेवारस मुले, पालकांबरोबर उदर निर्वाहासाठी स्थलांतर केलेली मुले यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी सेतू शाळा, महात्मा फुले हंगामी शिक्षण योजना राबविण्यात येतात. यामध्ये वसतिगृहे सुविधांचीही तरतूद करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासनद्वारे मुलांना जीवनोपयोगी दर्जेदार प्राथमिक शिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून या मोहिमेअंतर्गत

1. प्रथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी आर्थिक तरतूद
2. बॅक टू स्कूल कॅम्प
3. पर्यायी नाविन्यपूर्ण योजना
4. शिक्षण हमी योजना इ.चा समावेश

या मोहिमेअंतर्गत पुढील बाबतीत तरतूद करण्यात आलेली आहे. वर्गखोल्या, शिक्षक (40 विद्यार्थ्यांसाठी 1 शिक्षक) पर्यायी शाळा (वस्तीपासून 1 किमी अंतरावर), शिक्षक अनुदान, शाळा अनुदान, मोफत पाठ्यपुस्तके, शाळा बांधकाम, अपंग विद्यार्थी इ.

माध्यमिक शिक्षा अभियान

केंद्र शासनाद्वारे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाला प्रारंभ झाला.

उद्दिष्टे-

1.2017 पर्यंत माध्यमिक शाळेत जाणाऱ्या सर्व मुलामुलींना जीवनावश्यक व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे.

2. केंद्र शासनाचा 75%, राज्य सरकारचे 25% असे निधी उपलब्ध करण्याचे मान्य. सन 2011-12 या कार्यक्रमांतर्गत केंद्राचा हिस्सा 2000 कोटी व राज्याचा हिस्सा 500 कोटी रु. आहे.

या अभियानांतर्गत केंद्र सरकारद्वारे पुढील प्रयत्न करण्यात आले आहेत-

1. केंद्रीय विद्यालय संघटन-

स्थापना-1962

उद्देश- शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या होतांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर परिणाम होतो व ही समस्या दूर करणे.

वैशिष्ट्ये-

1. विद्यालये-858
2. पाचवी ते आठवी पर्यंत संस्कृत विषय सक्तीचा
3. नवीन विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये 15% अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी 7.5% अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी राखीव जागा असतात.
4. या वर्गातील मुलांना 12वी पर्यंत मोफत शिक्षण असते.
5. भारतात 931 वैद्यकीय विद्यालये असून 3 केंद्रीय विद्यालये ही तेहरान, मास्को, काठमांडू येथे आहेत.
6. सर्व केंद्रीय विद्यालयात समान अभ्यासक्रम असतो.

2. नवोदय विद्यालय समिती-

1. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे
2. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची स्थापना केली जाते.
3. नवोदय विद्यालय प्रत्येक जिल्ह्यासाठी असते.
4. या विद्यालयात राखीव जागा संदर्भात त्यांच्या लोकसंख्येच्या 22.5% म्हणजेच 15% अनुसूचित जाती, 7.5% अनुसूचित जमाती यांच्यासाठी राखीव असतात.
5. देशात 31 राज्य/केंद्रशासित प्रदेशात 31 मार्च 2006 पर्यंत 540 नवोदय विद्यालये असून जवळजवळ 1 लाख 76000 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

3. राष्ट्रीय मुक्त विद्यालय संस्था -

1. 1989 पासून मुक्त/खुल्या शिक्षणाचा प्रारंभ
2. औपचारिक व अनौपचारिक पध्दी उपलब्ध
3. अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना 200 रु. माध्यमिक वर्गासाठी 250 रु., उच्च माध्यमिक वर्गासाठी 300 रु. पर्यंत शिक्षण शुल्कात सवलत दिली जाते.
4. वसतीगृहांची स्थापना व त्यातील सुविधांसाठी आर्थिक मदत पुरवणे.
5. शैक्षणिक दृष्ट्या मागास जिल्ह्यांना प्राधान्य
6. ज्या जिल्ह्यामध्ये अनुसूचित जाती/जमातींचे लोक शैक्षणिकदृष्ट्या मागास अल्पसंख्यांक आहेत.
7. ग्रामीण स्तरावर विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्त्या दिल्या जातात.

4. वसतिगृह योजना-

1. 1992 मध्ये मुलींच्या वसतिगृहाची योजना अमलात आणली.
2. मुलींच्या शिक्षणाचा पारंपारिक दृष्टिकोन इ.
3. स्वयंसेवी संघटनांना मदत
4. प्रतिवर्षी प्रति विद्यार्थी 1500रु. फर्निचर घेण्यासठी दिले जातात व 5000 रु. प्रति विद्यार्थी राहण्याचा खर्च दिला जातो.


5. अपंगांसाठी समन्वत शिक्षण-

1. 1992 केंद्रसरकारद्वारे अपंग मुलांसाठी समन्वत शिक्षण योजना राबविण्यात आली.
2. 2005 च्या अखेरीस ही योजना सरकारला लाभली.

6. शिक्षणपुरस्कार-

1. गुणवंत शिक्षकांना 1998 पासून देण्यास प्रारंभ
2. शिक्षकांना सामाजिक सन्मान
3. शासकीय स्तरावर गुणवत्तेला प्राधान्य
4. प्रतिवर्षी हा सन्मान प्रदान
5. पारितोषिक स्वरुप-10,000 रु. रोख व चांदीचे मानचिन्ह

Competitive Forum



संसद द्विगृही आहे.
कारण भारतात
संघराज्य व्यवस्था आहे.

राज्यस्तरावर सुद्धा
Head of the state
~~आणि~~ आणि Head of the
Govt. आहे.

- भारतामध्ये संसदीय शासन व्यवस्था आहे.
म्हणजेच,
① Head of the state असेल – राष्ट्रपती (नामधारी)
② Head of the Govt. असेल – पंतप्रधान (वास्तव / कार्यकारी)

★ संसदीय शासन व्यवस्था –
– व्याख्या – ज्या शासन पद्धतीमध्ये Head of the state आणि Head of the Govt. हा वेगळा असेल त्या शासन पद्धतीला संसदीय शासन पद्धती म्हणतात.

— भारतीय संविधानाच्या कलम 74 व 75 नुसार केंद्रामध्ये संसदीय शासन पद्धती आहे.

– तर कलम 163 व 164 नुसार राज्य स्तरावर सुद्धा संसदीय शासन पद्धती आहे.

★ संसदीय शासन पद्धतीचे वैशिष्ट्ये –
– संसदीय शासन पद्धतीत कनिष्ठ सभागृह (लोकसभा) चे सदस्य जनतेकडून प्रत्यक्षपणे निवडले जातात. व त्या सभागृहामध्ये ज्या पक्षाला बहुमत असेल. त्या पक्षाचे सरकार अस्तित्वात येते.

– संसदीय शासन पद्धतीत एक वास्तविक प्रमुख व एक नामधारी प्रमुख असतो.

– सामुहिक जबाबदारी (Coilective Responsibility) –
– ① सामुहिक जबाबदारी म्हणजे कार्यकारी मंडळ / मंत्रीमंडळ हे लोकसभेला जबाबदार आहे. (कलम - 75)

– ② सामुहिक जबाबदारीचे तत्व म्हणजे जोपर्यंत लोकसभा बहुमत आहे. तोपर्यंत कार्यकारीमंडळ / मंत्रीमंडळ सत्तेत आहे.

– सामुहिक जबाबदारीचे तत्व म्हणजे कार्यकारी मंडळातील सदस्यांना गोपनीयतेची शपथ दिली जाते.

संसद

* Head of the Govt. आणि Head of the State यांचे प्रमुख वेगळे असतील त्याला संसदीय शासन व्यवस्था म्हणतात.


* जेव्हा Head of the State आणि Head of the Govt. एकच असेल त्याला अध्यक्षीय शासन व्यवस्था म्हणतात


* Head of the State हा जनतेद्वारे निवडला जात असेल तर या प्रकारच्या संसदीय शासन व्यवस्थेला प्रजासत्ताक म्हणतात.

* आणि जर Head of the State वंशपरंपरेने निवडला जात असेल तर या व्यवस्थेला राजेशाही म्हणतात.

* खासदार - जनतेतुन संसदेत (राज्यसभा - लोकसभा) जे सदस्य निवडून जातात. त्यांना खासदार म्हणतात. (संसद सदस्य म्हणजे खासदार)

* आमदार - जनतेतुन राज्यविधीमंडळात / राज्यकायदे मंडळात जे सदस्य निवडून दिले जातात त्यांना आमदार म्हणतात (राज्यविधीमंडळाचे सदस्य म्हणजे आमदार)





④ सामुहिक जबाबदारीचे तत्व म्हणजे गुप्त बैठका मध्ये झालेल्या चर्चेची बाहेर चर्चा व वाच्छता करता येत नाही. व या संबंधी बाहेर चर्चा घडवुन आणल्यास व विरोधी मत प्रकट केल्यास तोच मंत्र्याचा राजीनामा असतो.

— डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सी. डी. देशमुख यांनी याच तत्वाबद्दल राजीनामा दिला होता.

⑤ सामुहिक जबाबदारी म्हणजे, मंत्री व्यक्तीगतरित्या राष्ट्रपतीला जबाबदार असतो. (राष्ट्रपती/राज्यपाल)

— संसदीय शासन पद्धतीत कार्यकारी मंडळाचे सदस्य हे कायदेमंडळाचे सदस्य असतात. म्हणजेच संसदीय शासन पद्धतीमध्ये कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यात एकेरी सदस्यत्व असते.

— परंतु अपवादात्मकरित्या कायदेमंडळाचा सदस्य नसतानाही 6 महिन्यापर्यंत कार्यकारी मंडळाचा सदस्य असु शकतो. परंतु ही अट लोकसभेच्या अध्यक्षाला लागु पडत नाही. म्हणजेच तो कायदेमंडळाचा सदस्य असणे अनिवार्य.

— संसदीय शासन पद्धतीमध्ये पंतप्रधानाच्या सल्ल्यावरुन राष्ट्रपती लोकसभा विसर्जित करु शकतो.

— म्हणजेच संसदीय शासन पद्धतीमध्ये कनिष्ठ (लोकसभा) सभागृह हे कधिही विसर्जित होऊ शकते. (कारण ते जनतेकडून निवडून येते.)

★ संसदीय शासन पद्धतीचे फायदे -

— संसदीय शासन पद्धतीमध्ये जनतेला एक उत्तरदायी सरकार मिळते. (Accountable).

— संसदीय शासन पद्धतीमध्ये अधिकार एका व्यक्तीकडे नसुन व्यक्तीसमुहाकडे असते

— कार्यकारी मंडळ व कायदेमंडळ यामध्ये विवाद (Disputes) कमी होतो.

— संसदीय शासन पद्धतीमुळे जनतेच्या इच्छा आणि आकांशा या प्रशासनामध्ये प्रतिबिंबीत (Reflect) होतात.

* संसदीय शासन पद्धतीचे तोटे :-

— संसदीय शासन पद्धतीमध्ये सरकार अस्थिर असते. म्हणजे लोकसभेच्या बहुमतावर सरकारचे अस्तित्व असल्यामुळे. परंतु हे बहुमत केव्हाही बदलू शकते. व याचा परिणाम हा आर्थिक व्यवस्थेवर

— धोरणात्मक दूरदृष्टीचा अभाव

— संसदीय शासन पद्धतीत बहुमत मिळवण्यासाही पक्षाचा विचार धारेसोबत तडजोड करावी लागते.

उदा. जम्मु कश्मीर मध्ये BJP आणि PDP या दोघांचीही विचारधारा वेगळी असुन हे सत्तेमध्ये सोबत आहे.

* भारतामध्ये संसदीय शासन पद्धती स्वीकारण्याची कारणे —:

① संविधान सभेमध्ये या मुद्द्याविषयी चर्चा झाल्याचे दिसुन येते. की भारतामध्ये संसदीय शासन पद्धती असावी की अध्यक्षीय.

② संविधान सभेचे सर्वात सक्रीय सदस्य. के.टी.शाह. यांनी भारतामध्ये अध्यक्षीय शासनपद्धती असावी असा प्रस्ताव मांडला होता. व याला उत्तर के.एम. मुन्शी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिले.

— के.एम. मुन्शी यांनी भारताला संसदीय शासन पद्धती ही प्राचीन काळापासुन परिचयाची असल्याचे नमुद केले. — व ब्रिटिशांच्या आगमनानंतर याचा अनाकर्षी विकास झाल्याचे दिसुन येते व संसदीय शासन पद्धतीमुळे उत्तरदायित्वाची (Accountability ~~Accountability~~ Responsibility) ची भावना निर्माण झाल्याचे दिसुन येते. असे मत के.एम. मुन्शी यांनी मांडले.

— डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संसदीय शासन पद्धतीचे समर्थन करताना लोकशाहीमध्ये कार्यकारी विभागामध्ये स्थैर्य व उत्तरदायित्व ही दोन्ही तत्वे सोबत पूर्ण होईल. अशी कुठलीही व्यवस्था निर्माण झालेली नाही.

- परंतु स्थिरत्व (stability) व उत्तरदायित्व (Responsibility) या दोघांपैकी लोकशाही ही उत्तरदायित्व ला महत्व देते. ना की स्थिरत्व ला.

- व हे तत्व संसदीय शासन पद्धतीत दिसुन येते.

- संसदीय शासन पद्धती मध्ये एकोपा वाढीस लागतो

- 1975 मध्ये कांग्रेसने संविधान पूर्नरविलोकन समिती स्थापन, अध्यक्ष - स्वर्ण सिंग.

- यांनी सुद्धा देशाच्या विकासाठी संसदीय शासन पद्धती उपयुक्त असल्याचे मत नोंदविले

* अध्यक्षीय शासन व्यवस्था -:

सरकार एका पक्षाचे नसुन संपूर्ण देशाचे असेल त्याला नॅशनल गव्हर्नमेंट म्हणतात.

व्याख्या - Head of the state आणि Head of the Govt. जर एक असतील तर त्याला अध्यक्षीय शासन व्यवस्था म्हणतात.

पहिले नॅशनल गव्हर्नमेंट चर्चिल ने आणले.

* वैशिष्ट्ये -:

- कार्यकारीमंडळ व कार्यकारीमंडळ हे एकमेकांपासुन विभक्त असतात, म्हणजेच कार्यकारीमंडळाचे सदस्य हे कार्यकारी मंडळाचे सदस्य असतीलच असे नाही., तर त्यांची निवड ही मंत्री म्हणून होऊ शकते.

भारतामध्ये स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रीमंडळात हे तत्व दिसुन येते.

- अध्यक्षीय शासन पद्धतीमध्ये सामुहिक जबाबदारीचे तत्व लागु पडत नाही, म्हणजेच बहुमतावर सरकार अवलंबुन नाही.

- यामध्ये शासन व्यवस्थेचा कार्यकाळ हा संविधानिक व व्यावहारिक दृष्ट्या निश्चित असतो. (4/5 वर्षे)

- शासनप्रमुखाचा मृत्यु जरी झाला असेल, तरीपण सरकार स्थिर राहते.

* ~~तत्वे~~ फायदे -

1. स्थिरत्व
2. द्रोणात्मक दृष्ट्या योग्य (policy)
3. दिर्घकालीन विकासास चालना मिळतो.
4. निवडणूक खर्च कमी.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

* तोटे -

① हुकुमशाही प्रवृत्ती निर्माण होण्याची शक्यता
② उत्तरदायित्वाला महत्व नाही.
③ जनभावनेला कोठेही स्थान नाही.

* राष्ट्रपती :-

प्रजासत्ताक
↓
Head of the state
जनतेतुन निवडणे
↙ ↘
प्रत्यक्ष अप्रत्यक्ष

प्रस्तावना -

— भारताने संसदीय शासन पद्धतीचा स्विकार केल्यामुळे भारतामध्ये Head of the state आणि Head of the Government हे वेगळे असतात.

— भारतामध्ये Head of the state ला राष्ट्रपती म्हणतात.

— भारतामध्ये कार्यकारी राज्य असल्यामुळे राष्ट्रपती हा निवडणूक पद्धतीने निवडून येत असतो.

— भारतामध्ये राष्ट्रपतीच्या निवडणूक संबंधी राष्ट्रपती व उपराष्ट्रपती कायदा 1952 चालतो.

— या कायदयानुसार ~~1953~~ 1974 मध्ये अतिरिक्त नियमावली तयार करण्यात आली.

— संविधानाच्या कलम - 54 नुसार राष्ट्रपतीची निवड ही एका निवडणूक मंडळामार्फत होते. त्यामध्ये,

— संसदेच्या दोन्ही सभागृहाचे (लोकसभा - राज्यसभा) निर्वाचित सदस्य

— राज्याच्या विधान सभांचे निर्वाचित सदस्य. (संबंधीत)

राष्ट्रपतीच्या निवडणूकीत कलम - 74 नुसार निवडणूक उमेदवार हा लोकसभेचा सदस्यच असतो.
व
उपराष्ट्रपतीच्या निवडणूकीत निवडणूक उमेदवार हा राज्यसभेचा सदस्य असतो.

— 70 वी घटनादुरुस्ती, 1992 नुसार याची अंमलबजावणी 1 जानेवारी 1995 पासून झाली. त्यानुसार दिल्ली व पॉंडिचेरी च्या विधानसभेचे निवडित सदस्य राष्ट्रपती निवडणूकीमध्ये भाग घेतात.

— संविधानाच्या कलम-55 मध्ये राष्ट्रपतीची निवडणूक पद्धत दिली आहे.

— 1952 च्या कायदयानुसार लोकसभेचा महासचिव हा निवडणूक अधिकारी म्हणून काम बघतो.

— राष्ट्रपतीच्या निवडणूक वेळी एखादया राज्याची विधानसभा भंग पावली असेल. व नविन विधानसभेची निवडणूक बाकी असेल. किंवा एखादी जागा रिक्त असेल तर राष्ट्रपतीच्या निवडणूकीवर कोणताही परिणाम होत नाही.

— व या आधारावर सर्वोच्च न्यायालयात दाद-फिर्याद मागता येत नाही.

रचनकार हे पर्यायी रोजगार नसून ही एक सेवा आहे.

याची जाणीव करून देण्यासाही ब्रिटनमा धर्तीवर लाभाचे पद विधेयक 2006 पारित करण्यात आले.

- भारतीय संविधानात कुठेही लाभाचे पद म्हणजे काय याचा उल्लेख नाही.
- 2006 च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सरकारी पगार घेणारा / मोबदला घेणारे पद म्हणजे लाभाचे पद (Government post)

*पात्रता -

— भारताचा नागरिक असावा, येथे नागरिकत्व म्हणजे कोणत्याही पद्धतीने प्राप्त झाल्यास राष्ट्रपती पदाची निवडणूक लढवता येते.

— वय वर्षे 35 असावे.

— तो लोकसभेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असावा.

— त्याने लाभाचे पद (Office of Profit) धारण केलेले नसावे.

*कार्यकाल -

— राष्ट्रपतीचा कार्यकाल हा पदग्रहण केल्यापासून 5 वर्षे असतो.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

~~2006 या सर्वोच्च~~ तर कलम - 102, 171, 64, 65. या कलमांमध्ये या तत्वाचा समावेश करण्यात आला आहे. या विधेयकामध्ये राकुण 55 लाभाचे पद घोषित करण्यात आले.

— राष्ट्रपती आपला पदाचा राजीनामा उपराष्ट्रपतीकडे देतो. व
— उपराष्ट्रपती तो राजीनामा लोकसभा अध्यक्षाकडे देतो. व
— लोकसभा अध्यक्ष तो राजीनामा निवडणूक आयोगाकडे ~~देतो व~~ पाठवुन नवीन राष्ट्रपतीची निवड प्रक्रिया सुरू करण्याविषयी सुचीत करतो.
— तोपर्यंत उपराष्ट्रपती हा राष्ट्रपती पदाची धुरा सांभाळतो
— परंतु जुलै 1969 च्या निवडणूकीमध्ये राक घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाला.
— डॉ. झाकीर हुसेन. यांचा मृत्यु झाल्यानंतर डॉ. व्ही. व्ही. गिरी (उपराष्ट्रपती) यांना निवडणूक लढायची होती.

म्हणजेच एकाचवेळी राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती हे दोन्ही पद रिक्त झाले.

तेव्हा महान्यायवादीच्या सल्यानुसार राक नवीन कायदा करण्याचा सल्ला देण्यात आला. व यासाठी 'राष्ट्रपती कार्यपालन कायदा' 1969 पारित करून सर्वोच्च न्यायालयाने तात्कालीन सरन्यायाधीश एम. हिदायतुल्ला यांनी कालजीवाहु राष्ट्रपतीचा पदभार सांभाळला.

- **कलम-60 नुसार राष्ट्रपतीला शपथ घ्यावी लागते- सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशाच्या समक्ष किंवा त्यांच्या अनुपस्थीतीत सर्वोच्च न्यायालयाच्या जेष्ठतम न्यायाधीशांच्या सक्षम**

महाभियोग-

- कलम-61 नुसार घटनाभंग- या केवळ एकाच कारणासाठी राष्ट्रपतींवर महाभियोग
- प्रस्ताव संसदेच्या कोणत्याही सभागृहात.
- आरोपांची छाननी दुसरे सभागृह करते.
- प्रस्ताव मंजूर झाल्यास राष्ट्रपती पदमुक्त.
- असा प्रस्ताव मांडण्यापूर्वी 14 दिवसांची पूर्व नोटीस-त्यावर 1/4 सदस्यांच्या स्वाक्षऱ्या.
- प्रस्ताव 2/3 बहुमताने पारीत होणे आवश्यक. (दोन्ही सभागृहे)
- संसदेच्या दोन्ही सभागृहातील निर्वाचीत तसेच नामनिर्देशित सदस्य महाभियोगात भाग घेतात.
- **आतापर्यंत कोणत्याही राष्ट्रपतीवर महाभियोग नाही.**
- कलम 61 (1)-पदावधी संपला तरी नवीन राष्ट्रपती येईपर्यंत जुनेच राष्ट्रपती पदावर-उपराष्ट्रपती नाही.
- राजीनामा, मृत्यू, पदच्युती किंवा इतर बाबींमुळे राष्ट्रपती पद रिक्त झाल्यास-नवीन राष्ट्रपती पदग्रहण करेपर्यंत उपराष्ट्रपती राष्ट्रपती म्हणून कार्य करतात. नवीन राष्ट्रपतीचे पद 6 महन्यात भरावे लागते.
- राष्ट्रपती, उपराष्ट्रपती दोघांची पदे रिक्त असल्यास सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश-त्यांचेही पद रिक्त असल्यास सर्वोच्च न्यायालयाचा ज्येष्ठतम न्यायाधीश राष्ट्रपती म्हणून कामकाज करतील-राष्ट्रपतींचे सर्व अधिकार भत्ते प्राप्त.

राष्ट्रपतींचे अधिकार आणि कार्ये-

कार्यकारी अधिकार-

- भारत सरकारचा सर्व कारभार राष्ट्रपतींच्या नावाने.
- अध्यादेशांचे नियमन
- कामकाजांची विभागणी
- पंतप्रधानांची नेमणुक-त्यांच्या सल्ल्याने इतर मंत्र्यांची नेमणुक.
- महान्यायवादी, महालेखापाल, मुख्य व इतर निवडणुक आयुक्त, संघ लोकसेवा, आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य राज्यांचे राज्यपाल, वित्त आयोगाचे अध्यक्ष यांच्या नेमणुका.
- अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती आयोग
- आंतरराज्य परिषदची स्थापना.
- एखादा भूप्रदेश अनुसूचीत क्षेत्र म्हणून घोषीत करणे.

कायदेविषयक अधिकार-

- संसदेचा अविभाज्य घटक.
- संसद अधिवेशन बोलावणे, सत्रसमाप्ती, पंतप्रधानांच्या सल्ल्याने लोकसभा विसर्जित करणे.
- संयुक्त बैठक - कलम 108
- सार्वत्रिक निवडणुकीनंतर पहिल्या अधिवेशनाच्या सुरुवातीला दरवर्षी पहिल्या अधिवेशनाची सुरुवात राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने.
- लोकसभेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष दोन्ही पदे रिक्त असल्यास-लोकसभेतील एका सदस्यांची अध्यक्षपदी तात्पुरती नियुक्ती.
- राज्यसभेचे सभापती आणि उपसभापती दोन्ही पदे रिक्त असल्यास-एका सदस्याची सभापती म्हणून तात्पुरती नियुक्ती.
- राज्यसभेवर कलम 80 नुसार कला, विज्ञान, साहित्य, सामाजिक सेवा या क्षेत्रांतील 12 सदस्य नियुक्ती.
- लोकसभेत-अँग्लो इंडियन समाजाचे 2 सदस्य नियुक्त.
- निवडणुक आयोगाच्या सल्ल्याने संसद सदस्य अपात्रतेबाबत निर्णय.
- राज्यनिर्मिती, सीमाबदल, नावबदल करण्यासंबंधी विधेयकांना पुर्वसंमती आवश्यक.
- संचीत निधीतून खर्च करण्याशी संबंधीत विधेयके, धन विधेयके यांना राष्ट्रपतींची पूर्व संमती आवश्यक.

MUKHERJEE CLASSES NOTES
PRIVATE LIMITED COMPETITIVE FORUM

- राष्ट्रपतींकडे आलेल्या राज्यविधीमंडळाच्या विधेयकाबाबत निर्णय घेण्या अधिकार.
- अध्यादेश काढण्याचा अधिकार/मागे घेण्याचा अधिकार.

वित्तीय अधिकार-

- अर्थविधेयक पुर्वसंमती
- केंद्र शासनाच्या अर्थसंकल्प संसदेत मांडण्याचे घडवून आणणे.
- आकस्मिक निधीतून खर्च
- वित्त आयोग नेमणूक
- अनुदानाची मागणी राष्ट्रपतीच्या संमतीने

न्यायविषयक अधिकार-

- सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील न्यायाधिशांच्या नेमणुका.
- एखाद्या बाबीवर सर्वोच्च न्यायालयाचे मत मागवणे-मत बंधनकारक नाही.
- शिक्षेत क्षमादान, वटहुकुम, कमी करणे, निलंबीत करणे

परराष्ट्रविषयक अधिकार-

- आंतरराष्ट्रीय तह/करार-राष्ट्रपतींच्या नावे.
- राजदूत व राजनैतीक अधिकाऱ्यांच्या नेमणुका
- अन्य देशांच्या भारतातील राजदुत/राजनैतीक अधिकाऱ्यांना राष्ट्रपतींची मान्यता आवश्यक.
- आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर भारताचे प्रतिनिधी.

लष्करी अधिकार-

- तिन्ही संरक्षक दलाचे सरसेनापती
- तिन्ही दलांच्या प्रमुखांच्या नेमणुका.
- युद्ध/शांतता विषयक सर्व निर्णय.

आणीबाणीविषयक अधिकार-

- राष्ट्रपती तीन प्रकारची आणीबाणी घोषीत करू शकतात.
  1. राष्ट्रीय आणीबाणी-कलम 352
  2. राष्ट्रपती राजवट-कलम 356 आणि 365
  3. आर्थिक आणीबाणी-कलम 360

राष्ट्रपतींचे नकाराधिकार-

- घटनेच्या कलम 111 नुसार राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी आलेल्या विधेयकाबाबत तीन पर्याय
  1. संमती देणे.
  2. रोखून ठेवणे.
  3. पुनर्विचारार्थ पाठवणे (धनविधेयक वगळून)

नकाराधिकारांचे 4 प्रकार-

1. पुर्ण/शुद्ध
2. गुणात्मक
3. निलंबनात्मक
4. पॉकेट

यापैकी गुणात्मक नकाराधीकार भारताच्या राष्ट्रपतींना नाही-अमेरिकेच्या अध्यक्षांना आहे.

भारताच्या राष्ट्रपतींना प्राप्त नकाराधिकार-

1.पुर्ण /शुध्द -संसदेने संमत केलेल्या विधेयकाला संमती रोखुन ठेवणे - विधेयक संपुष्टात येते-कायद्यात रुपातंर नाही.

2.निलंबनात्मक-विधेयक संसदेकडे पुनर्विचारार्थ पाठवल्यानंतर संसदेणे पुन्हा साध्या बहुमताने पारित करून पाठवणे - अशावेळी संमती देणे बधनकारक.

3.पॉकेट नकाराधीकार - संसदेने पारित केलेल्या विधेयकावर कोणताच निर्णय न घेता तसेच राहु देणे

राष्ट्रपतींना घटनादुरूस्ती विधेयकाबाबत नकाराधीकार नाही

24 व्या घटनादुरुस्ती विधेयकाला मान्यता देणे राष्ट्रपतींना बंधनकारक.

राज्यविधेयकाबाबत राष्ट्रपतींचा नकाराधिकार -

- कलम-200 अनुसार राज्यविधीमंडळाचे एखादे विधेयक राज्यपाल राष्ट्रपतीच्या संमर्तीसाठी राखुन ठेवतात. त्यावर राष्ट्रपतींना पढील निर्णयाचे पर्याय असतात.
  1. संमती देणे.
  2. रोखून ठेवणे
  3. (धनविधेयक नसल्यास) पुनर्विचारार्थ पाठवण्याचे राज्यपालांना निर्देश देऊ शकतात.
- पुनर्विचारानंतरही संमती देण्याचे राष्ट्रपतींवर बंधन नाही.

वटहुकूम काढण्याचा अधिकार-

- कलम 123 नुसार-संसदेचे अधिवेशन सुरु नसतांना वटहुकूम काढण्याचा अधिकार.
- दोन पैकी एक जरी सभागृहाचे अधिवेशन चालू नसेल तर राष्ट्रपती वटहुकूम काढू शकतात.
- संसदेच्या कायदेविषयक अधिकाराच्या समांतर नाही- म्हणजेच एकाचवेळी राष्ट्रपतींचा अध्यादेश आणि संसदेचे अधिवेशन सुरु असणे होऊ शकत नाही.
- संसद कायदा करू शकते अशाच विषयांवर अध्यादेश.
- अध्यादेशाने मूलभूत हक्कांवर गदा नाही.
- संसदेचे अधिवशेन सुरु झाल्यापासून 6 आठवड्याच्या आत अध्यादेशाला मान्यता नाही दिल्यास तो संपुष्टात.
- अध्यादेख/ वटहुकुम केवळ मंत्री मंडळाच्या सल्ल्यानेच काढणे/मागे घेणे.

- अध्यादेश पुर्वलक्षी असू शकतो.
- कर कायद्यात अध्यादेशाद्वारे दुरुस्ती शक्य.
- अध्यादेशाद्वारे घटनादुरुस्ती नाही.

अधिक माहिती-

- राजेंद्र प्रसाद- पहिले राष्ट्रपती-सलग दोन वेळा राष्ट्रपती (एकमेव)
- राष्ट्रपती पदाच्या पहिल्या निवडणुका -मे 1952
- 1950-52 राजेंद्र प्रसादच राष्ट्रपती
- दुसऱ्या फेरीची मतमोजणी आतापर्यंत एकदाच 1969- व्ही.व्ही. गिरी -विजयी (पहिल्या फेरीत एन.एस.रेड्डी पुढे- दुसऱ्या फेरीत व्ही.व्ही. गिरी पुढे-विजयी)
- आधी उपराष्ट्रपती नंतर राष्ट्रपती (6) एस.राधाकृष्णन, झाकीर हुसेन, व्ही.व्ही.गिरी, आर.वेंकटरमन, एस.शर्मा, के.आर.नारायणन.
- प्रभारी राष्ट्रपती- व्ही.व्ही.गिरी- झाकीर हुसेन यांच्या मृत्युनंतर - न्या.मोहमद हिदायतुल्ला- राष्ट्रपती व उपराष्ट्रपती दोन्ही पदे रिक्त असल्याने जुलै ते ऑगस्ट 1969.

भारताचे आत्तापर्यंतचे राष्ट्रपती-

अ.क्र.	वर्ष	नियुक्त राष्ट्रपतीचे नाव	विरोधी व्यक्ती
1.	1952	डॉ.राजेंद्र प्रसाद	के.टी.शहा
2.	1957	डॉ.राजेंद्र प्रसाद	एन.एन.दास
3.	1962	डॉ.सर्वोपल्ली राधाकृष्णन	चौधरी हरी राम
4.	1967	डॉ.झाकीर हुसेन	के.सुब्बाराव
5.	1969	व्ही.व्ही.गिरी	निलम संजीव रेड्डी
6.	1974	फक्रुद्दिन अली अहमद	त्रिदेव चौधरी
7.	1977	निलम संजीव रेड्डी	बिनविरोध
8.	1982	ग्यानी झैलसिंग	एच.आर.खन्ना
9.	1987	आर.वेंकटरमण	व्ही.कृष्ण अय्यर
10.	1992	डॉ.शंकर दयाल शर्मा	जॉर्ज स्वेल
11.	1997	के.आर.नारायणन	टी.एन.सेशन
12.	2002	डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम	लक्ष्मी सेहगल
13.	2007	श्रीमती प्रतिभा पाटील	भैरवसिंह शेखावत
14.	2012	प्रणव मुखर्जी	पी.ए.संगमा
15.	2017	रामनाथ कोविंद	मीरा कुमार

परिवर्तन
Competitive Forum

परिवर्तन
Competitive Forum
- अभिजीत राठोड

अर्थव्यवस्था
Policy & Performance

तीन दिवसीय
मोफत कार्यशाळा

शनिवार दि.16 सप्टें.
स.10 वा.

- अभिजीत राठोड

उत्तम-मोती बिल्डींग (दुसरा मजला), नागनाथपार-शनिपार रोड, 9272100500
रमेश डाईंग जवळ, सदाशिव पेठ, पुणे-३०

महाभियोग

(कलम - 61)

- घटनाभंग या एकाच कारणावरून राष्ट्रपतीच्या विरोधात महाभियोग चालवला जातो.
- या प्रक्रियेचे 2 टप्पे आहेत.
- ① हा प्रस्ताव संसदेच्या कुठल्याही सभागृहात सादर केला जातो, परंतु 1/4 सदस्यांनी, 14 दिवसाच्या आधी तशी सूचना पिठासिन अधिकाऱ्याला देणे गरजेचे. व हा प्रस्ताव 2/3 बहुमताने पारित झाल्यानंतर हा प्रस्ताव दुसऱ्या सभागृहात जातो. दुसरे सभागृह हे चौकशी सभागृह म्हणून काम करते.
- राष्ट्रपती दुसऱ्या सभागृहात वाजु मांडू शकतो.
- या सभागृहाने 2/3 बहुमताने ठराव पारित केल्यास तेच राष्ट्रपतीचा महाभियोग संमत झाला असे समजतात.

उपराष्ट्रपती

(कलम - 63)

- कलम - 63 नुसार, भारतचे उपराष्ट्रपती हे पद हे अमेरिकन उपराष्ट्रपती पदाच्या धर्तीवर निर्माण करण्यात आले आहे.
- उपराष्ट्रपतीची निवडणूक ही 1952 च्या कायदयानुसार होते.
- उपराष्ट्रपतीची निवडणूकीत संसदेच्या दोन्ही सभागृहाचे निर्वाचित व नामनिर्देशित सदस्या भाग घेतात.
- उपराष्ट्रपती ~~निवडणूकीत~~ पदासाठी 35 वर्षे वयासह तो राज्यसभेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असावा.
- उपराष्ट्रपती पदासाठी 20 मतदारांनी पाठींबा व 20 मतदारांनी अनुमोदन देणे गरजेचे आहे.

परिवर्तन
Competitive Forum

परिवर्तन
Competitive Forum
- अभिजीत राठोड

मानव संसाधन विकास व मानवी हक्क
Human Resource Development
मोफत कार्यशाळा

- संकल्पनेवर भर.
- संपूर्ण पेपर 3 घेण्यात येईल.
- सर्व मुद्द्यांवरील योजनांचा समावेश.
- प्रिंटेड नोट्स देण्यात येतील.
- कायद्यावर नोट्स देण्यात येईल.

नाव नोंदणी सुरु

मानव संसाधन विकास व मानवी हक्क हा योजनांचा अभ्यास नसून संकल्पनांचा अभ्यास आहे. (मागील प्रश्न पत्रिकेचे स्वरुप तपासून पाहणे.)

अभिजीत राठोड

कार्यशाळेचे ठिकाण-

श्री चिंतामणी बिल्डिंग, दुसरा मजला, न्यु इंग्लिश स्कुल समोर
ज्ञान प्रबोधिनीच्या पाठीमागे, टिळक रोड, सदाशिव पेठ,
पुणे -30 **9272100500**

प्रमुख पदस्थांच्या बडतर्फीच्या पद्धती

१. राष्ट्रपती–

- **पुढील कारणाने राष्ट्रपतींचे पद रिक्त होते–**
  1. राष्ट्रपती पद धारण करण्यास अपात्र असल्यास
  2. त्यांची निवडणुक सर्वोच्च न्यायालयाने अवैध ठरल्यास
  3. राजीनामा दिल्यास
  4. पदावदीधी दरम्यान मृत्यू झाल्यास
  5. त्यांचा पाच वर्षाचा पदावधी संपल्यास
  6. संसदेने महाभियोग प्रक्रियेद्वारे राष्ट्रपतींना पदावरून दूर केल्यास

राष्ट्रपतीवरील महाभियोगाची प्रक्रिया–

- 'राष्ट्रपतींकडून घटनाभंग' या एकाच कारणास्तव घटनेच्या कलम 61 नुसार राष्ट्रपतींवर महाभियोग लावल्या जातो.
- परंतु घटनाभंग म्हणजे काय हे घटनेत स्पष्ट केलेले नाही.

महाभियोगाची पद्धत–

- महाभियोगाची सुरुवात संसदेच्या दोन्हीपैकी कोणत्याही एका सभागृहात सर्वप्रथम करता येते.
- परंतु सभागृहात राष्ट्रपतींवरील दोषारोपाचा ठराव मांडण्यापूर्वी संबंधीत सभागृहाच्या किमान 25% सदस्यांनी स्वक्षरीसह लेखी नोटीस किमान 14 दिवस आगोदर सभागृहासमोर मांडावी लागते.
- राष्ट्रपतींवरील दोषारोपाचा ठराव त्या सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येच्या 2/3 बहुमताने मंजुर होणे आवश्यक असते.
- दुसरे सभागृह राष्ट्रपतींवरील दोषारोपाचे अन्वेषण करते. यावेळी राष्ट्रपतीस स्वतः किंवा आपल्या प्रतिनिधीद्वारे आपले मत मांडण्याचा अधिकार आहे.
- अन्वेशन करणाऱ्या सभागृहाने राष्ट्रपतींवर दोषारोप सिद्ध झाले आहेत या आशयाचा ठराव त्या सभागृहाच्या 2/3 बहुमताने मंजुर केल्यास त्याच क्षणापासून व त्याच दिनांकापासून राष्ट्रपतींना पदावरून दूर केल्या जाते.
- राष्ट्रपतीपदाच्या महाभियोग प्रक्रियेत संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सर्व (निर्वाचित+नामनिर्देशित) सदस्य भाग घेतात.

२. उपराष्ट्रपती–

- पुढील कारणाने उपराष्ट्रपतींचे पद रिक्त होते. (राष्ट्रपतींचे मुद्दे क्र.1 ते 5 जशास तसे)
- (6) उपराष्ट्रपतींना पदच्युत करण्यात आल्यास

उपराष्ट्रपतींना पदावरून दूर करण्याची पद्धत–

- उपराष्ट्रपतींना पदावरून दूर करण्याची कारणे घटनेत नमुद नाहीत.
- उपराष्ट्रपतींना पदावरून दूर करण्याचा ठराव सभागृहात मांडण्यापूर्वी किमान 14 दिवसांची पुर्व नोटीस सभागृहात देणे गरजेचे असते.
- उपराष्ट्रपतींना पदावरून दूर करण्याचा ठराव प्रथम राज्यसभेतच मांडावा लागतो.
- राज्यसभेच्या सदस्यांनी प्रभावी बहुमताने तो ठराव पारीत केल्यानंतर लोकसभेने साध्या बहुमताने तो ठराव मंजुर केल्यानंतर उपराष्ट्रपतींना पदावरून दूर केल्या जाते.

३. पंतप्रधान–

- पुढील कारणाने पंतप्रधानांचे पद रिक्त होते–
- राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत पंतप्रधान आपले पद धारण करतात अर्थात राष्ट्रपती पंतप्रधानांना त्यांच्या पदावरून केंव्हाही दूर करू शकत नाहीत. जोपर्यंत पंतप्रधानांना लोकसभेतांचे समर्थन आहे तोपर्यंत राष्ट्रपती त्यांना पदावरून दूर करू शकत नाहीत.

- पंतप्रधानांनी लोकसभेत समर्थन गमावल्यानंतर ते स्वतः राजीनामा देतात किंवा राष्ट्रपती त्यांना पदावरून दूर करू शकतात.
- पंतप्रधानाने लोकसभेत समर्थन गमावल्यानंतर ते स्वतः राजीनामा देतात किंवा राष्ट्रपती त्यांना पदावरून दूर करू शकतात.
- पंतप्रधानाने लोकसभेचे बहुमत असतांनासुद्धा राजीनामा दिल्यास ते पदमुक्त होता. (पंतप्रधानांचा राजीनामा हा संपुर्ण मंत्रीमंडळाचा राजीनामा असतो.)
- संसदेच्या कोणत्याही सभागृहाचे सदस्य नसलेली व्यक्ती 6 महिन्यांपर्यंत पदावर राहू शकते. तोपर्यंत कोणत्याही सभागृहाचे सदस्यत्व प्राप्त नाही केल्यास त्यांचे पद संपुष्टात येते.
- पंतप्रधानपदाचा निश्चित कालावधी घटनेत नमुद नाही.

४. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश व इतर न्यायाधीश-

- सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे पद पुढील कारणाने रिक्त होते.
  1. वयाची 65 वर्षे पुर्ण झाल्यास
  2. राष्ट्रपतींना संबोधुन आपल्या सहीनिशी लेखी राजीनामा दिल्यास
  3. संसदेच्या शिफारशिने राष्ट्रपती न्यायाधीशांना पदावरून दूर करू शकतात.

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांना पदावरून दूर करण्याची पद्धत-

- सर्वोच्च न्यायालयांच्या न्यायाधीशांना पदावरून दूर करण्यापद्धत घटनेच्या कलम 124(4) मध्ये नमुद करण्यात आली आहे.
- गैरवर्तणुक किंवा अकार्यक्षमता या कारणांने सर्वोच्च न्यायालयांच्या न्यायाधिशांना पदावरून दुर करता येते.
- 'न्यायाधीश चौकशी कायदा, 1968' द्वारे सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांच्या न्यायाधीशांस पदावरून दुर करण्याच्या पद्धतीचे नियमन करण्यात आले आहे.
- लोकसभेच्या किमान 100 सदस्यांनी किंवा राज्यसभेच्या किमान 50 सदस्यांनी न्यायाधिशाला पदावरून दुर करण्याचा प्रस्ताव सह्यानिशी अध्यक्ष/सभापतींना सादर करणे आवश्यक.
- असा प्रस्ताव स्विकारण्याचा वा नाकारण्याचा अध्यक्ष/सभापती यांना अधिकार.
- जर प्रस्ताव स्विकारला तर अध्यक्ष/सभापती न्यायाधिशांवरील आरोपाची चौकशी करण्यासाठी एका त्रिसदस्यीय समितीची स्थापना करतात.
- या त्रिसदस्यीय समितीत- 1. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश किंवा (जर सरन्यायाधीशावरच आरोप असेल तर) सर्वोच्च न्यायालयाचा दुसरा एखादा न्यायाधीश, 2. देशातील कोणत्याही एका उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश; 3. एक निष्णात कायदेपंडीत यांचा समावेश असेल.
- चौकशीत न्यायाधीश दोषी आढलल्यास सभागृह त्यांना पदावरून दूर करण्याचा प्रस्ताव विचारात घेते.
- दोन्ही सभागृहात विशेष बहुमताने ठराव संमत झाल्यास राष्ट्रपतींना संबंधीत न्यायाधीशाला पदावरून बडतर्फ करण्याबाबतचे समावेदन सादर केल्या जाते.
- त्यानंतर राष्ट्रपती आपल्या आदेशाद्वारे संबंधीत न्यायाधीशाला पदावरून दूर करतात.

५. उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीश-

- उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदावरून दूर करण्याचो पद्धत (कलम 217) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाप्रमाणेच (कलम 124, (4))आहे.

६. राज्यपाल-

पुढील कारणांने राज्यपाल पदावरून दुर होऊ शकतात-

- घटनेच्या कलम 156 नुसार राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंतच राज्यपाल आपले पद धारण करू शकतात. राष्ट्रपती त्यांना केंव्हाही पदावरुन दुर करू शकतात.
- राष्ट्रपतींची राज्यपालांना पदावरून दुर करण्याबाबतची मर्जी न्यायप्रविष्ट नाही.
- राज्यपाल आपल्या पदाचा सहीनिधी लेखी राजीनामा राष्ट्रपतींना देऊन पदमुक्त होऊ शकतात.
- राज्यपालांना पदावरून दूर करण्याबाबतचे कोणतेच आधार घटनेत नमुद नाहीत.
- साधारणतः राज्यपालांना त्यांचे पद ग्रहण केल्यापासून पुढील पाच वर्षापर्यंत पदावर राहता येते. (राष्ट्रपतींच्या मर्जीने)

७. मुख्यमंत्री-

पुढील कारणाने मुख्यमंत्र्यांचे पद रिक्त होते.

- त्यांनी आपल्या सहीनिशी लेखी राजीनामा राज्यपालांना संबोधुन दिल्यास

- मुख्यमंत्र्यांनी विधानसेत बहुमताचे समर्थन गमावल्यास ते स्वतः राजीनामा देतात किंवा अशावेळी राज्यपाल त्यांना पदावरून दुर करू शकतो.
- जर एखादा व्यक्ती राज्यविधीमंडळाच्या कोणत्याच सभागृहाचा सदस्य नसेल तरीही त्याची नियुक्ती मुख्यमंत्री म्हणुन करता येते. परंतु पढील 6 महिन्यांच्याआत त्या मुख्यमंत्र्याने राज्यविधीमंडळाच्या कोणत्याही एका सभागृहाचे सदस्यत्व मिळवणे आवश्यक असते या 6 महिन्यांच्या कालावधीत जर त्याने राज्यविधीमंडळाच्या कोणत्याही सभागृहाचे सदस्यत्व प्राप्त केले नाही तर त्याचे पद संपुष्टात येते.

८. भारताचा महान्यायवादी-

- घटनेच्या कलम 76 मध्ये भारताच्या महान्यायवादी पदाची तरतुद
- महान्यायवाद्याना पदावरून दूर करण्याची कोणतीही तरतुद वा पद्धत भारताच्या राज्यघटनेत नमुद नाही.
- राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंतच ते पद धारण करू शकतात.
- ते राष्ट्रपतींना स्वतःच्या सहीनिशी लेखी राजीनामा देऊन पदमुक्त होऊ शकतात.
- राष्ट्रपती केंव्हाही त्यांना पदावरून दुर करू शकतात.
- महान्यायवाद्याची नेमणुक केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानेच झालेली असते त्यामुळे मंत्रीमंडळाने राजीनामा दिल्यास वा मंत्रीमंडळ बदलल्यास महान्यायवाद्यानी राजीनामा देण्याचा संकेत आहे.

९. राज्याचा महाधिवक्ता-

- घटनेच्या कलम 165 मध्ये राज्याच्या महाधिवक्ता पदाची तरतुद
- राज्याच्या महाधिवक्त्यांना पदावरून दुर करण्याची कोणतीही पद्धत घटनेत नमुद नाही.
- राज्याच्या राज्यपालाची मर्जी असेपर्यंत ते आपले पद धारण करतात.
- ते राज्यपालांना स्वतःच्या सहीनिधी लेखी राजीनामा देऊन पदमुक्त होऊ शकतात.
- राज्यपाल केंव्हाही त्यांना पदावरून दूर करू शकतात.
- राज्याच्या महाधिवक्त्याची नेमणुक संबंधीत राज्याच्या मंत्रिमडळाच्या सल्ल्यानेच झालेली असते. त्यामुळे मंत्रीमंडळाने राजीनामा दिल्यास वा मंत्रिमंडळ बदलल्यास महान्यायवाद्यानी राजीनामा देण्याचा संकेत आहे.

१०. भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक (CAG)-

- कलम 148 नुसार राष्ट्रपतींद्वारे CAG ची नियुक्ती होते.
- घटनेत त्यांचा कार्यकाळ किती असावा हे निश्चित नाही परंतु संसदीय कायद्याने तो नियुक्तीपासून 6 वर्षे किंवा वयाची 65 वर्षे यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत CAG पदावर राहतील.
- आपला पदावधी पूर्ण होण्याआधीसुद्धा ते राष्ट्रपतींना संबोधून राजीनामा देऊन पदमुक्त होऊ शकतात.
- सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना ज्या कारणास्तव व ज्या पद्धतीने पदावरून दूर करता येते त्याच कारणास्तव व त्याच पद्धतीने CAG ला पदावरून दुर करता येते. (महाभियोगाद्वारे)
- (सर्वोच्च न्यायालयांच्या न्यायाधीशांना पदावरून दूर करण्याची कारणे व पद्धत याआधीच नमुद केलेली आहे.)

परिवर्तन
Competitive Forum

PSI/STI/ASO/राज्यसेवा पूर्व व मुख्य

(भारतीय संविधान-राजकारण-कायदे)

राज्यव्यवस्था

मोफत कार्यशाळा

राज्यसेवा मुख्य -EXICE PSI-PSI/STI/ASSO (Combine) पूर्व

यासंबंधी अभ्यासाची रणनिती काय असावी यावर विशेष भर देण्यात येईल.

- धर्मनिरपेक्षता
- अल्पसंख्यांक
- अस्पृश्यता

प्रत्येक टॉपिकवर स्वतंत्र नोट्स व टेस्ट.

-अभिजीत राठोड

श्री चिंतामणी बिल्डींग (दुसरा मजला), न्यु इंग्लिश स्कूल समोर,
ज्ञानप्रबोधिनीच्या पाठीमागे, टिळक रोड, सदाशिव पेठ, पुणे. 9272100500

संसद / कायदेमंडळाची

ऐतिहासिक पार्श्वभूमी

— "संसदीय लोकशाही पद्धती आम्ही स्वीकारत आहोत, या अगोदर आम्ही नेहमी संसदीय पद्धतीने विचार करत आलो आहोत.

एवढ्या एकाच कारणासाठी आम्ही ही पद्धत स्वीकारत आहोत. असे नाही तर आमच्या प्राचीन परंपरेमध्ये या पद्धतीशी मिळते जुळते. बरेच काही आहे.

अर्थात, या परंपरा तेव्हा ज्या स्वरूपात होत्या तशा आता नाही. परिस्थितीशी आणि वातावरणाशी त्यांनी बरेचसे जुळुन घेतले आहे. परंतु त्याहीपेक्षा हे स्विकारण्यामागे एक वेगळे कारण आहे. ते म्हणजे इतर देशात विशेष करून ब्रिटनमध्ये आज संसदीय लोकशाही पद्धती सक्रीय आहे. व याचे श्रेय त्यांना दयायेच लागेल."

——पंडित जवाहरलाल नेहरू

— भारताचे आजचे कायदेमंडळ हे जरी ब्रिटनच्या धर्तीवर अधिष्ठित असलं. तरी याची पार्श्वभूमी ही भारतातील प्राचीन ग्रंथ ऋग्वेदात मिळते. याबद्दल विशेष संशोधन हे दुसऱ्या पिढीचे राजकिय विचारवंत डॉ. सुभाष कश्यप यांनी केले.

— यांनी, 26 जानेवारी 1950 रोजी भारतीय संविधान अंमलात आले. त्या दिवशी आपल्या प्रदिर्घ ऐतिहासिक कालखंडात पहिल्यांदा भारताने आधुनिक संस्थात्मक चौकट असलेल्या लोकशाही संसदेचा विकास केला.

— भारतात प्राचीन काळामध्ये लोकप्रतिनिधिच्या दोन सभा होत्या त्यामध्ये,

① सभा
② समिती

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

आजची जी संसद दिसते त्याचे मुळ सुद्धा याच दोन संस्थेत असल्याचे दिसुन येते.

- वरिल समित्यांच्या दर्जा व कार्यविस्तार याची विभागणी करण्यात आली होती. समिती ही सर्वसाधारण लोक प्रतिनिधीची सभा असायची म्हणजेच आजच्या लोकसभे - सारखी.

तर, सभा ही बिवडक अशा ज्येष्ठ व्यक्तींची असायची म्हणजेच आजच्या राज्यसभेसारखी.

- वैदीक संहितेवरुन या समितीबद्दल काही निष्कर्ष निघतात. राज्याच्या राज्यकारभाशासध्ये याची महत्वाची भुमिका होती. व सामान्य लोकांवर या दोन्ही सभेचा खुप मोठा प्रभाव होता.

~~मुख्य~~ मुक्त चर्चा आणि बहुमताच्या आधारावर निर्णय ही याची खास वैशिष्ट्ये.

'शलाखा' म्हणजे वेगवेगळ्या रंगाची कीते (चिठ्ठी) दाखवणे

--मतदान हे "शलाखा" पद्धतीने होत.

- या सभेचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट म्हणजे यांचा निर्णय न्यायव्यवस्थासुद्धा पलटू शकत नसे परंतु वर्तमान कायदेमंडळाचा निर्णय न्यायपालिका बदलु शकते.

- राज्यकारभार हा एका व्यक्तीचा नसुन तो संस्थेचा असावा. हे प्राचिन राजकारणाचे मुख्य तत्व होते. म्हणजेच संसदीय शासन व्यवस्था आणी कायद्याचे राज्य हे. प्राचिन काळापासुन अस्तीत्वात असल्याचे दिसुन येते.

- या दोन्ही समित्यांचा कारभार हा एका व्यक्तीचा नसुन तो संस्थेचा असावा हे प्राचिन राजकारणाचे मुख्य तत्व होते. म्हणजेच संसदीय शासन व्यवस्था आणि कायद्याचे राज्य हे प्राचीन काळापासुन अस्तीत्वात असल्याचे दिसुन येते.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

- या दोन्ही समित्यांचा कारभार हा धर्मावर आधारित असे परंतु हा म्हणजे आजच्या काळातील धर्म नसुन कायदयाचे राज्य होते.

- मध्ययुगीन काळात सुध्दा या सभा आणि समिती चालु राहिल्या परंतु ब्रिटिशांच्या आगमनानंतर या समितींनी पाश्चात्य रूप स्विकारले.

- म्हणजेच आजचे कार्यदेमंडळ हे जरी ब्रिटीश धर्तीवर आधारित असले तरी त्याची तत्व ही प्राचीन काळात दिसुन येतात.

आधुनिक काळातील कार्यदेमंडळ -

- ब्रिटीशांनी भारतामध्ये साम्राज्यवादी धोरणाचा अवलंब केला. त्यासाठी प्रशासनाची घडी निट बसवणे आवश्यक होते. व यासाठी जे वेगवेगळे कायदे निर्माण करण्यात आले. त्याचा परिणाम म्हणजे भारतातील आधुनिक कायदे मंडळे.

- 1773 च्या रेग्युलेटिंग ॲक्ट नुसार एका कौन्सिलची स्थापना करण्यात आली. (सदस्य - 4) हीच कौन्सिल भारतामध्ये कायदे निर्माण करण्याचे, अंमलबजावणी करणे हे दोन्ही काम याच कौन्सिल कडे होते.

1909, मोर्ले मिंटो सुधारणा कायदा -

- 1909 चा कायदयाने पहिल्यांदा भारताचा समावेश हा कौन्सिलमध्ये करण्यात आला. परंतु भारतीयांना प्रतिनिधित्व वर्ग आणि समाजाच्या आधारावर दिले.

- या कायदयानुसार कार्यकारी मंडळाची सदस्य संख्या 16 वरुन 60 करण्यात आली.

- या कायदयानुसार भारतीयांना बजेटवर चर्चा करण्याचा अधिकार मिळाला परंतु मतदानाचा नाही.

★ 1919 चा कायदा -

— या कायदयानुसार केंद्र स्तरावर केंद्रीय राज्य परिषद व केंद्रीय विधानसभा असे द्विगृही कायदेमंडळ निर्माण करण्यात आले.

★ — केंद्रिय राज्यपरिषदेत एकुण - 60 सदस्य असुन त्यापैकी 26 सदस्य नामनिर्देशित व 34 सदस्य हे निर्वाचित

— वरिल निर्वाचितांमध्ये आरक्षणाची तरतुद -

— शीख - 1 , सर्वसाधारण - 20 , मुस्लीम - 10, युरोपीयन-3

— ज्यांचे उत्पन्न 10,000 पेक्षा जास्त असेल त्यांना दरवर्षी 3000 कर भरावा लागत असे.

— त्यांच्याकडे specific tittle असावे.

— Local bodys मध्ये specific स्थान.

— 1920 मध्ये भारताची लोकसंख्या ही 24 कोटी त्यामध्ये 17,000 मतदार त्यामधुन 60 ची निवड.

★ — केंद्रीय विधानसभेत एकुण - 145 सदस्य असुन त्यात 41 संस्थानिकांचे व 104 हे निर्वाचित.


— 41 संस्थानिकांमध्ये,

26 हे कार्यालयिन (युरोपियन)

15 हे गैरकार्यालयिन (भारतीय)

-- यामध्येसुद्धा स्त्रीयांना मतदानाचा हक्क नव्हता.

— जो वार्षिक भाडे 180 रू देईल त्यास मतदानाचा अधिकार व या निकषानुसार असे 9 लाख मतदार.



— याच कायदयामध्ये दर 10 वर्षानंतर प्रशासकीय व कार्यविषयक सुधारणा दिल्या असे नमुद केले याचाच परिणाम म्हणजे या कायदयाचे पूनरावलोकन (review) करण्यासाठी व भारतीयांना सुधारणा देण्यासाठी सायमन कमिशन, 1927 ची स्थापना ~~क~~ करण्यात आली.

— परंतु, सायमन कमिशन मध्ये एकही भारतीय सदस्य नसल्यामुळे विरोध केला. व याचा परिणाम म्हणजे गोलमेज परिषद.

— या गोलमेज परिषदेमधुन जी श्वेतपत्रिका प्रसिद्ध झाली. तीच म्हणजे 1935 चा कायदा.

★ 1935 चा कायदा —

★ संसद —;

भारतीय संविधानाच्या भाग-5, प्रकरण-2 व कलम-79 ते 122 या दरम्यान संसदेची तरतुद करण्यात आली आहे.

— कलम-79 मध्ये भारतीय संघराज्यासाठी 1 संसद असेल. या संसदेत,

① राष्ट्रपती
② राज्यसभा
③ लोकसभा, यांचा समावेश असेल.

— कलम-81 मध्ये, लोकसभा रचनेसंबंधी तरतुद असुन. या सभागृहाचे सदस्य जनतेकडून थेट निवडले जातात.

— या सभागृहाची महत्तम सदस्य संख्या 552 असुन 530 सदस्य हे राज्याचे व 20 सदस्य केंद्राचे व 2 ॲग्लो.

— परंतु, सदयस्थितीमध्ये 545 सदस्य संख्या असुन 530 राज्याचे 13 केंद्राचे व 2 ॲग्लो इंडियन.

By-Abhijit Rathod
CLASS NOTES

★ लोकसभा मतदार –

– 18 वर्षे पूर्ण करणाऱ्या व अंतिम मतदान सूचित नाव असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मतदानाचा हक्क आहे.

– लोक प्रतिनिधी कायदा, 1950 नुसार तो अपात्र घोषीत झालेला नसावा.

– भारतीय दंड संहितेच्या कलम 171 (E) व 171 (F) किंवा लोकप्रतिनिधी कायदा 1950 च्या सेक्शन 125, 135 व 136 यामध्ये दोषी आढळल्यास 6 वर्षपर्यंत मतदानास बंदी.

– लोकप्रतिनिधी कायदा 1950 नुसार (सेक्शन - 16) नुसार संसदेने अपात्रतेविषयी एखादा कायदा केल्यास त्या अटिवरून अपात्र झाल्यास मतदानास बंदी.

– लोकसभा उमेदवार हा मतदार असणे आवश्यक

– भारतातील प्रत्येक मतदार भारताच्या कोणत्याही मतदार संघातुन निवडणूक लढवू शकतो.

अपवाद - जम्मु काश्मीर, आसाम, लक्षदिप, सिक्किम, नागालँड

– आसाम मध्ये ज्या स्वायत्त जिल्हाची निर्मिती केली आहे. त्या मतदार संघात निवडणूक लढायची असल्यास तो. त्याच स्वायत्त जिल्हाचा मतदार असणे आवश्यक.

– लक्षदिप बाबत हि अट असुन येथे फक्त स्वायत्त जिल्हे एवजी संपूर्ण मतदार संघ असा उल्लेख मिळतो.

– आसाम व सिक्किम विधान सभेत काही जागा या अशा राखीव आहे की त्यात फक्त त्याच जमातीचा व त्याच प्रदेशाचा शहीवाशी व मतदान असणे आवश्यक.

उदा. सिक्किमामध्ये संघा व भुतिया यासाही काही जागा राखीव आहे. व तो उमेदवार याच जमातीचा असणे आवश्यक.


PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

★ लोकसभा उमेदवार -

- 61 व्या घटना दुरुस्तीने, 1988, मतदाराचे किमान वय 21 वरून 18 वर्षे करण्यात आले. व उमेदवारासाही ही लोकसभा-25 वर्षे व राज्यसभा- 30 वर्षे करण्यात आली. आहे.

- लोकसभेचा उमेदवारी अर्ज दाखल करताना,

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES



- लोकसभा उमेदवारी अर्ज दाखल करत असताना जर राष्ट्रीय पक्ष, राज्य पक्ष, नोंदणीपक्षाचा उमेदवार असेल तर 1 अनुमोदक व या व्यतिरिक्त उमेदवार असल्यास 10 अनुमोदक.

- लोकसभा उमेदवाराला निवडणूकीच्या आधी 25000 रुपये अनामत रक्कम भरणे आवश्यक परंतु हा उमेदवार SC, ST प्रवर्गातील असेल तर 50% सूट म्हणजे 12500 रुपये.


- विधानसभा उमेदवारी अर्ज भरताना 10000 रुपये अनामत रक्कम व SC, ST प्रवर्गातील असल्यास 5000 रुपये अनामत रक्कम.

निवडणूक घोषणा झाल्यापासुन आचार-संहिता चालु होते.

मतदान वेळ -
संध्याकाळी - 5.00 पर्यंत
* आदिवासी भाग असेल तर दुपारी 3.30 पर्यंत

* निवडणूक प्रक्रिया -

समजा,



- ज्या दिवशी निवडणूक आयोग निवडणूकीची घोषणा करतो त्या दिवसापासुन आचारसंहिता सुरुवात होते.
- निवडणूक आयोग सभागृहाची मुदत संपण्याच्या 6 महिने आधी केव्हाही आचारसंहिता घोषीत करु शकते.

ही आचारसंहिता घोषित करताना निवडणूक आयोग सरकारचा सल्ला घेतो. हा सल्ला निवडणूक आयोगावर बंधनकारक नाही परंतु या संदर्भात एक संकेत पाळला जातो. की. सभागृहाची मुदत आणि नवीन सभागृह सदस्य यात जास्त अंतर असता कामा नये.

- निवडणूक आयोग उमेदवारी अर्ज भरताना 7 दिवसांचा (fix) कालावधी देतो. परंतु या दरम्यान एखादा Public Holiday (सार्वजनिक सुट्टी) आल्यास ही मुदत एका दिवसाने वाढवली जाते.
- त्यानंतर एक दिवस अर्जाची छाणणी होते.
- त्यानंतर 2 दिवस उमेदवारी अर्ज परत घेण्यासाठी मुदत दिली जाते. व तेथुन 13 दिवस म्हणजे 14 व्या दिवसापासुन निवडणूक घेण्यात येते.

–ज्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा पहिला दिवस असतो त्या दिवसानंतर ते निवडणूकीचा शेवटचा टप्पा संपेपर्यंत exit poll (बाहेर पडणारे मतदान) व opinion poll (जनमत) देता येत नाही.

–शेवटच्या टप्यानंतर 12 तासांनंतर निकाल घोषीत केले जातात. व जिल्हा निवडणूक अधिकारी विजयी उमेदवाराला प्रमाणपत्र देतो.

★ E.V.M (Electronic Voting Machine)–

– 1989 मध्ये जेकब मायर्स यांनी सर्वप्रथम हे यंत्र तयार केले. व याचा सर्वप्रथम वापर हा अमेरिकेत करण्यात आला.

– भारतामध्ये सर्वप्रथम 70 च्या दशकामध्ये IIT मद्रास ने प्रथम EVM चा प्रस्ताव मांडला परंतु सर्वप्रथम EVM बनवण्याचे श्रेय M. S. Manik यांना जाते.

यांनी एक शोध निबंध प्रसिद्ध करुन हा प्रस्ताव सादर केला होता विशेष उल्लेखनिय बाब म्हणजे भारताच्या राजपत्रामध्ये प्रसिद्ध होणारा हा पहिला आणि शेवटचा शोधनिबंध.

–पहिल्यांदा EVM चा वापर 1982 मध्ये केरळ मध्ये करण्यात आला परंतु याला कोणताही वैधानिक व संवीधानिक आधार नसल्याने ही निवडणूक रद्द करण्यात आली.

–मध्य प्रदेश, राजस्थान व दिल्ली, या तीन राज्याच्या विधान-सभेच्या निवडणूकीत 1989-90 मध्ये वापरण्यात आले.

– 2004 पासुन सर्व निवडणूकीत याचा वापर करण्यात येतो.

- एका EVM मध्ये 3840 मतांचा समावेश होऊ शकतो. परंतु एका Booth ची मतदारांची संख्यासुद्धा ही 1500 ~~च्या~~ च्या वर नसते.

- नोटा पर्यायानंतर एका E.V.M वर 15 उमेदवार +1 नोटा पर्याय असे निळ्या कलर चे बटन असतात व त्या बटन समोर उमेदवारचे संपूर्ण नाव व चिन्ह दिल्या जाते. व निवडणूक आयोग कोटो ची व्यवस्था विचाराधिन आहे.

- एक मतदान केंद्रावर एकूण 4 EVM चा वापर करण्यात येतो.

- भारतामध्ये Electronic Corporation of India limited मार्फत ही EVM बनवल्या जाते.

- ही EVM कोणत्याही प्रकारच्या संगणकीय व इंटरनेट या माध्यमातुन जोडण्याची व्यवस्था नाही.

- EVM मध्ये दोन यंत्राचा समावेश होतो.
  ① बॅलेट युनिट - ज्यावर मतदान केले जाते.
  ② कंट्रोल युनिट - ज्याद्वारे बॅलेट युनिट बंद चालु केल्या जाते.

- EVM मशीन कुठल्याही विजेशिवाय चालु शकते.

- यातील डाटा 10 वर्षापर्यंत साठवून ठेवला जाऊ शकतो.

- EVM ची बॅटरी 6 V ची असते.

* VVPAT - Voter Verified. Paper. Audit Trail.

★ निवडणूक चिन्ह -:

— भारतामध्ये निवडणूक चिन्हाची संकल्पना ही स्वातंत्र्य तिळी मोठ्या प्रमाणात भारतात असलेली निरक्षरता व पहिल्यादा एक निवडणूकीला सामोरे गेले या पार्श्वभूमिवर ही संकल्पना आली.

— प्रादेशिक पक्षाच्या उदयानंतर निवडणूक चिन्ह हे संघटीत करणे हे गरजेचे झाले व या मधुनच निवडणूक चिन्ह वाटप कायदा 1968 तयार करण्यात आला.

— वरिल कायदयानुसार चिन्हचे वर्गीकरण 2 भागात करण्यात येते.

① आरक्षित (Reserve)
② अनारक्षित (unreserve)

— राष्ट्रीय पक्ष व राज्य पक्ष यांना आरक्षीत चिन्ह दिल्या जाते.

— व इतर पक्षांना / अपक्षांना अनारक्षित चिन्ह दिल्या जाते.

— अनारक्षित चिन्ह कोठ्यातुन देताना उमेदवाराला 3 चिन्ह दिल्या जाते. व त्यातुन राकाची निवड ही निवडणूक आयोग करून होते. यासाठी ईश्वर चिन्ह (चिठ्ठ्या टाकुन) पद्धतीचा अवलंब केल्या जातो.

— महाराष्ट्रात राकुण 45 चिन्हाचा समावेश होतो. त्यापैकी 9 चिन्ह इतर राज्यांमध्ये राज्य पक्ष म्हणून मान्यता असणाऱ्या पक्षासाठी 2 चिन्हे महाराष्ट्रामध्ये राज्यपक्ष असणाऱ्या शिवसेना आणी मनसे साठी, 7 चिन्ह ही राष्ट्रीय पक्षासाठी.

— अनारक्षित यादीमध्ये कोणते चिन्ह असेल या संबंधी 2001 मध्ये नवीन नियमावली तयार करण्यात आली. याच नियमावलीनुसार 2001 नंतर कुठल्याही पक्षाला प्राणी व धार्मिक टेढ निर्माण करणारे चिन्ह दिल्या जात नाही.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

— परंतु हा नियम फक्त 2001 नंतरच्या पक्षाला लागु पडतो, 2001-च्या अधिच्या पक्षाला नाही.


— अनारक्षित चिन्हामध्ये पहिले प्राधान्य हे नोंदणीकृत उमेदवाराला व नंतर प्राधान्य हे अपक्ष उमेदवाराला

— आरक्षित चिन्हाचे आणखी दोन गट पडतात.

① राष्ट्रीय पक्षासाठी आरक्षित
② राज्य पक्षासाठी आरक्षित.

राजकीय पक्षावर बंदी घातली जाऊ शकते (कलम-19)

— निवडणूक चिन्हाविषयी एखादा विवाद निर्माण झाल्यास या संबंधी अंतिम निर्णय निवडणूक आयोगाचा असेल.



– उत्तरप्रदेशमध्ये 2017 ज्या विधानसभा निवडणूकीच्या आधी समाजवादी पक्षात 2 गट पडले. (1924)

① मुलायमसिंग यांचा गट
② अखिलेश यादव यांचा गट.

लोकप्रतिनिधी म्हणजे,
– ~~जि~~ जिल्हाध्यक्ष
– तालुकाध्यक्ष
– लोकप्रतिनिधी (खासदार, आमदार)

– अशावेळी कार्यकारिणी व लोकप्रतिनिधी हे ज्या बाजुने जास्त असेल. त्या बाजुने निवडणूक आयोग आपला निर्णय देते.

परंतु या निर्णयाविरोधात कोठेही अपील करता येत नाही म्हणजेच हा निर्णय अंतिम असतो.

– राखाडया पक्षाचा दर्जा गेला असता चिन्हपण जाते.


– राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणूक मध्ये निवडणूक चिन्हाचा वापर होत नाही.

★ मतदार संघ :-

– भारतामध्ये लोकसभेचे सदस्य जनतेकडून प्रत्यक्षपणे निवडून जात असल्यामुळे भारतच्या लोकसंख्येनुसार सारासरी १ १० लाखामागे 1 असा मतदार संघ निर्माण करण्यात येतो. व जेवढे मतदार संघ निर्माण झाले त्यांची राज्यांच्या लोकसंख्येनुसार विभागणी करण्यात येते. याचाही आधार लोकसंख्या आहे.

भारतात लोकसंख्येनुसार संयुक्त प्रादेशिक मतदार संघ आहेत.

स्वातंत्र्याआधी दोन्ही प्रकारचे मतदार संघ होते



PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

- वरिल निकषानुसार मतदार संघ निर्माण करण्याचे काम हे पुनर्रचना आयोगामार्फत करण्यात येते. (परिसिमन / Delimitation / पुनर्रचना आयोग).

- आतापर्यंत 4 परिसिमन आयोग स्थापन करण्यात आले आहे.

- स्वातंत्र्यानंतर पहिल्या जनगणनेनंतर 1952, 1962, 1972, 2002.

- मतदार संघाची निर्मिती व केरस्चना ही जनगणनेनंतर केल्या जाते.

- स्वातंत्र्याआधीसुद्धा याप्रकारचे आयोग स्थापन करण्यात आले आहे.

- 84 व्या घटना दुरूस्तीनुसार (2001) लोकसभेच्या जागा 2026 पर्यंत तशाच राहील. परंतु मतदारसंघाच्या लोकसंख्येमध्ये बदल झाल्यास मतदार संघाची संरचना / आकार / विस्तार बदलविण्यात येईल.

- 2002 च्या परिसिमन आयोगाचे अध्यक्ष - कुलदीपसिंग

- या आयोगाने 2008 पर्यंत आपल्या शिकारशी दिल्या. व 2009 पासुन याची अंमलबजावणी.

- 60 लाखाच्यावर लोकसंख्या असलेल्या राज्यांसाठीच हा आयोग आपली शिकारस देतो.

- भारतामध्ये आरक्षण सुद्धा लोकसंख्येच्या प्रमाणातच दिले जाते. (आरक्षित मतदार संघ).

- परिसिमन आयोग सर्व लोकसभा व विधानसभा मतदार संघाचे पुनर्रचना करतो.

अपवाद - जम्मु-कश्मीर विधानसभा व सिक्किम मधील मतदार संघ.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

★★★★★ — 4th. परिसिमन आयोग अरुणाचल प्रदेश, मणिपूर, जम्मू व आसाम याला लागु पडत नाही.

परंतु या राज्यांसाठी व सोबत झारखंड साठी राष्ट्रपती केव्हाही परिसिमन आयोगाची स्थापना करू शकतो.

★★★★★ — 1960 मध्ये महाराष्ट्राची निर्मिती झाली. तेव्हा महाराष्ट्र विधानसभेचे निर्वाचित सदस्य संख्या 259 होती. व ही संख्या मुंबई राज्य फेर रचना कायदा 1960 द्वारे ठरविण्यात आली होती.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे याच कायदयाने महाराष्ट्र आणि गुजरात अशी २ राज्य निर्माण झाली.

— 1962 च्या दुसऱ्या परिसिमन आयोगानुसार सदस्य संख्येत बदल होऊन ती 270 झाली.

सध्या सदस्य संख्या 288 आहे.

— 1972 च्या ह्या परिसिमन आयोगानुसार ती 288

— 4 थ्या परिसिमन आयोगाने प्रतिनिधी व आरक्षण ह्या मध्ये कुठलाही बदल केला नसुन कक्त भुभागाची फेर रचना केली. त्यानुसार,

सर्वात मोठा मतदार संघ — लडाख.

सर्वात लहान लोकसभा मतदार संघ — चांदणी चौक (दिल्ली)

— महाराष्ट्रात सर्वात मोठा विधानसभा मतदार संघ — गडचिरोली मधील अहेरी हा आहे.

— तेलंगणा राज्यातील मलकानगरी लोकसभा मतदार संघ हा लोकसंख्येच्या आधारावर सर्वात मोठा तर,

— लक्षद्वीप हा लोकसंख्येच्या दृष्टीने सर्वात लहान मतदार संघ आहे.

— राज्याच्या मतदार संघापैकी सर्वात कमी लोकसंख्या असणारा मतदार संघ — उत्तर कोलकता तर,

— लोकसंख्येच्या व क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात लहान मतदार संघ — दक्षिण मुंबई.

– महाराष्ट्रामध्ये लोकसभा मतदार संघाची लोकसंख्येची सरासरी ही 10 लाख आहे.

तर सरासरी यामध्ये 6 विधानसभा मतदार संघ समाविष्ट होऊ शकतात. कक्त याला 2 लोकसभा मतदार संघ अपवाद आहित (पूणे, औरंगाबाद)
तर दूसऱ्या बाजुने 5 विधानसभा मतदार संघ असलेला लदाख हा लोकसभा मतदार संघ.

– 33 विधानसभा सरासरी असणारा लोकसभा मतदार संघ म्हणजे-अरूणाचल प्रदेश

– परिसिमन आयोगाच्या शिकारशीला न्यायालयात याचिका दाखल करता येत नाही.

कारण, निवडणूक प्रक्रिया न्यायप्रविष्ठ नाही.

– स्थानिक स्वराज्य संस्थे विषयी पूनर्रचना करण्याचा अधिकार राज्यसरकारला आहे.

त्यात महानगरपालिका व जिल्हापरिषद यांची पूर्नस्चना राज्यसरकार करते.
तर पंचायत समितीची विभागीय आयुक्त
तर ग्रामपंचायतीची जिल्हाधीकारी करतो.

– परिसिमन आयोगाच्या अध्यक्ष व सदस्याची नियुक्ती ही राष्ट्रपती मार्फत होते.

(1962) – पहिल्या परिसिमन आयोगाचे अध्यक्ष – चंद्रशेखर अय्यर
(1962) – दूसऱ्या परिसिमन आयोगाचे अध्यक्ष – जे. एल. कपूर
(1972) – तिसऱ्या परिसिमन आयोगाचे अध्यक्ष – व्ही. एस. भार्गव
(2002) – चौथ्या परिसिमन आयोगाचे अध्यक्ष – कुलदिपसिंग

– परिसिमन आयोगाच्या शिकारशीत संसद बदल करू शकत नाही.

लोकप्रतिनिधींची निवडणूक खर्च मर्यादा

अभ्यासक्रम- राज्यव्यवस्था

लोकसभा सदस्य (खासदार)-

- मोठ्या राज्यांमध्ये निवडणुक खर्च मर्यादा पुर्वीच्या 40 लाखांवरून वाढवून 70 लाख ₹ प्रति उमेदवार करण्यात आली आहे.
- मोठ्या राज्यांमध्ये महाराष्ट्र, दिल्ली (राष्ट्रीय राजधानी प्रदेश), मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश,पश्चिम बंगाल, कर्नाटक यांसारख्या राज्यांचा समावेश होतो.
- छोट्या राज्यांमध्ये निवडणूक खर्च मर्यादा पुर्वीच्या 22 लाखांवरून वाढवून 54 लाख ₹ प्रति उमेदवार करण्यात आली आहे.
- छोट्या राज्यांमध्ये अरुणाचल प्रदेश, गोवा, सिक्कीम, अंदाम-निकोबर बेटे, चंदीगढ, दादरा आणि नगरहवेली, दमण व दिव, लक्ष्यद्विप, पुदुचेरी इत्यादींचा समावेश होतो.

विधानसभा सदस्य (आमदार)-

- मोठ्या राज्यांमध्ये निवडणूक खर्च मर्यादा पुर्वीच्या 16 लाखांवरून वाढवून 28 लाख ₹ प्रति उमेदवार करण्यात आली आहे. तर छोट्या राज्यांसाठी ही खर्च मर्यादा 20 लाख रुपये प्रति उमेदवार करण्यात आली आहे.
- विधानसभेच्या छोट्या राज्यांमध्ये अरुणाचल प्रदेश, गोवा, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, सिक्कीम, त्रिपुरा, पुदुचेरी इ. समावेश होतो.

महानगरपालिका सदस्य-

- महानगरपालिकांच्या वर्गवारीनुसार उमेदवाराचो निवडणूक खर्च मर्यादा वेगवेगळी आहे.

वर्ग	सदस्य संख्या	पुर्वीची खर्च मर्यादा	सुधारीत खर्च मर्यादा
अ	151-175	5	10
ब	116-150	4	8
क	85-115	4	7
ड	65-85	3	5

जिल्हा परिषद सदस्य-

- जिल्हा परिषदेच्या सदस्य पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराची खर्च मर्यादा पूर्वीच्या 4 लाखावरून वाढवून आता 6 लाख रुपये करण्यात आली आहे.
- जिल्हा परिषदेच्या एकूण सदस्य संख्येनुसार खर्च मर्यादा पुढीलप्रमाणे बदलते-

सदस्य संख्या	खर्च मर्यादा
71-75	6 लाख ₹
61-70	5 लाख ₹
50-60	4 लाख ₹

पंचायत समिती-

- पंचायत समितीच्या सदस्य पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराची खर्च मर्यादा पूर्वीच्या 3 लाखावरून वाढवून आता 4 लाख रुपये करण्यात आली आहे.

ग्रामपंचायत -

- ग्रामपंचायत सदस्य व सरपंच या पदासाठीची निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराची सुधारित खर्च मर्यादा पुढीलप्रमाणे-

लोकसंख्येनुसार ग्रा.पं.ची सभासद संख्या

600 ते 1500-7 सभासद
1501 ते 3000- 9 सभासद
3001 ते 4500- 11 सभासद 11-13
4501 ते 6000-13 सभासद
6001 ते 7500- 15 सभासद
7501 व त्यापेक्षा जास्त-17 सभासद

सुधारित खर्च मर्यादा		
सदस्य संख्या	सदस्यांसाठी	सरपंच पदासाठी
7-9	25 हजार	50 हजार
35 हजार	1 लाख	
15-17	50 हजार	1.75 लाख

मिशन इंद्रधनुष्यच्या अंतिम टप्प्याला सुरुवात

अभ्यासक्रम- मानव संसाधन विकास

- **मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या गुजरात दौऱ्यादरम्यान 8 ऑक्टोबर रोजी इंद्रधनुष्य अभियानाच्या शेवटच्या टप्प्याला सुरुवात केली असून या दरम्यान त्यांनी युनोव्हेटीव मोबाईल फोन टेक्नॉलॉजी फॉर कम्युनिटी हेल्थ ऑपरेशन या टेक्नॉलॉजीचाही शुभारंभ केला आहे.**
- **या टेक्नॉलॉजी अंतर्गत आरोग्य विभागाला माता व नवजात बालकांचा मृत्यू दर कमी करण्यास मदत मिळणार असून आपल्या देशातील आरोग्य सेवांना अधिकाधिक सक्षम होण्यास या यंत्रणेचा लाभ होणार आहे.**

इंद्रधनुष्य अभियानाविषयी-

- भारत सरकारने डिसेंबर 2014 मध्ये या कार्यक्रमास सुरुवात केली असून सन 2020 पर्यत या कार्यक्रमांतर्गत बालकांना लसीकरण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.
- या कार्यक्रमांतर्गत बालकांना पुढील 7 प्रकारच्या रोगांचा सामना करण्यासाठी लसीकरणाद्वारे सक्षम केले जाते.

1. घटसर्प	2. डांग्या खोकला	3. धनुर्वात
4. कावीळ	5. क्षयरोग	6. पोलिओ

7. देवी/गोवर - तसेच काही निवडक राज्यांमध्ये हिमोफेलिया व इंफ्लुएन्झा याही लसी पुरविल्या जातात.

- यासाठी प्राथमिक स्तरावर देशातील 7 राज्यांमधून 201 जिल्ह्यांची निवड करण्यात आली होती. यासाठी अपूर्ण लसीकरण तसेच लसीकरणापासून वंचीत बालके व गरोदर माता यांचे प्रमाण ज्या ठिकाणी 50 टक्क्यांपर्यंत आहे अशा जिल्ह्यांच्या निवडीस प्राथमिकता देण्यात आली आहे.
- या सर्व जिल्ह्यातील माता व बालकांना पल्स पोलिओ मोहिमेच्या धर्तीवर लसीकरण करण्यात आले.
- हा कार्यक्रम राबविण्यासाठी भारत सरकारला डब्ल्यूएचओ, युनिसेफ व रोटरी इंटरनॅशनल या संस्थांनी विशेष मदत पुरविली आहे.

मिशनच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी-

- प्रत्येक जिल्ह्याने यासंबंधीची जिल्हा टास्क फोर्स समितीची सभा आयोजित करावी. यामध्ये शिक्षण विभाग, महिला व बालकल्याण विभाग अशा विभागांचा समावेश असेल.
- ज्या गावांमध्ये वारंवार साथीच्या रोगांचा उद्रेक होतो अशा गावांसाठी एक विशेष कृती आराखडा तयार करणे.
- वरील कृती आराखड्यात ज्या उपकेंद्रांमध्ये आरोग्य सेविकांचे पद दीर्घ काळासाठी रिक्त आहे किंवा त्या दीर्घकाळ रजेवर आहेत अशा गावांचाही समावेश असावा.
- प्रत्येक गावात आरोग्य सेविका, आशा सेविका यांकडे शुन्य ते 2 वर्षे बालकांची तसेच गरोदर मातांची अद्यावत माहिती असणे आवश्यक आहे.

लसीकरण कार्यक्रमाविषयी-

- प्रत्येक मुलाला राज्य घटनेच्या कलम 21 अंतर्गत टाळता येण्याजोग्या आजारांविरुद्ध पूर्ण व मोफत लसीकरण मिळण्याचा हक्क आहे. यानुसार भारत सरकारने सन 1985 मध्ये युनिव्हर्सल इमिशिनेझेशन प्रोग्राम (युआयपी) सुरु केला आहे.
- हा प्रोग्राम 30 वर्षापेक्षा अधिक काळ कार्यरत असूनही या अंतर्गत आतापर्यंत 65 टक्के मुलांना पुर्णतः व मोफत लसीकरण करण्यास यश मिळाले आहे.
- या लसीकरण कार्यक्रमातंर्गतच पोलिओ लसीकरण मोहिम राबविली गेली होती. या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे जागतिक आरोग्य संघटनेने भारतास पोलिओ रोगातून मुक्त असल्याचा दर्जा दिला.
- या लसीकरण कार्यक्रमांतर्गत 0-2 वयोगटाच्या बालकांना मोफत लसीकरण पुरविले जाते व या अंतर्गत राबविणाऱ्या मोहिमांचे लक्ष्य भारत सरकाने सन 2020 असे निर्धारित केले आहे.

या विषयाशी निगडीत इतर बाबी-

1. डब्ल्यूएचओ विषयी तसेच याअंतर्गत घोषीत करण्यात येणारी आरोग्य आणीबाणी
2. पोलिओमुक्त भारत

राज्यसभा

— राज्यसभा हे संसदेचे वरिष्ठ सभागृह असून कलम-80 नुसार राज्यसभेमध्ये,

1] राज्याचे प्रतिनिधी
2] केंद्रशासित प्रदेशाचे प्रतिनिधी
3] राष्ट्रपती नियुक्त यांचा समावेश.

— कलम 80 नुसार महत्तम सदस्य संख्या 250 इतकी निधारित करण्यात आली असुन त्यापैकी 238 सदस्य राज्य व केंद्रशासित प्रदेशाचे तर 12 सदस्य राष्ट्रपती नियुक्त.

— वर्तमान काळात सध्या राज्यसभेची सदस्य संख्या 245 इतकी असुन त्यापैकी राज्याचे 229, केंद्रशासित प्रदेशाचे 4 तर राष्ट्रपती नियुक्त-12.

— राज्यसभेतील जागांचे विवरण व विभागणी ही घटनेच्या 4 थ्या अनुसुची मध्ये आहे.

— राज्यसभेत दिल्ली व पॉंडेचेरी यांना प्रतिनिधित्व देण्यात आले आहे.

पिठासीन अधिकारी =
लोकसभा अध्यक्ष -
राज्यसभा सभापती.

लोकसभा

— कलम - 94 नुसार नवीन लोकसभेच्या पहिल्या बैठकीमध्ये राष्ट्रपती जुन्या लोकसभेतील जे सदस्य पुन्हा निवडून येतात त्यातील जेष्ठ सदस्यांची प्रोटेम स्पीकर / हंगामी स्पीकर म्हणून निवड होते.

प्रोटेम स्पीकर हे सॅंविधानिक पद आहे.

— याला शपथ राष्ट्रपतीमार्फत देण्यात येते.
— व हा प्रोटेम स्पीकर इतर सदस्यांना शपथ देतो.
— जो पर्यंत लोकप्रतिनिधी शपथ घेत नाही तो पर्यंत त्याला सदस्यत्व प्राप्त होत नाही.
— 16 व्या लोकसभेचे प्रोटेम स्पीकर म्हणून कमलनाथ यांनी भुमिका पार पाडली.

– नव निर्वाचित सदस्यांमधुन एकाची निवड अध्यक्ष म्हणून केली जाते. व ही निवड प्रक्रिया सुद्धा प्रक्रिया प्रोटेम स्पीकरच्या नियंत्रणात चालत असते. व ही निवड झाल्यानंतर हे पद आपोआप रद्द होते.

– लोकसभेचा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष हे दोन्ही पद रिक्त झाल्यास राष्ट्रपती 10 सदस्यची एक तालिका निर्माण करतो. आणी हे ही रिक्त झाल्यास एका ~~त्रे~~ सदस्याची अध्यक्ष म्हणून निवड केली जाते. परंतु याला शपथ द्यावी आवश्यक


×राज्यसभा

–कलम ७९ नुसार भारताचे उपराष्ट्रपती हे राज्य सभेचे पदसिद्ध सभापती असतात.

'विरोधी पक्ष' ही संकल्पना विस्टन चर्चिल ने मांडली.

सर्वात जास्त जागा मिळालेला पक्ष हा विरोधी पक्ष असतो.

–



कायदेमंडळातील पक्ष आणि बहुमतातील पक्ष हे वेगळे आहे.

राष्ट्रपती हा कायदेमंडळातील पक्षातलाच असतो.

जर दोन्ही पक्षांना सारख्या जागा मिळतील तर राज्यसभेमधील बहुमत बघतात.

P.M ला शपथ राष्ट्रपती देतात Certificate देतात.

राज्यसभेत नेहमी विरोधी पक्षच असतो लोकसभेत कायदेमंडळातील पक्ष असतो.

— दोन्ही सभागृहामध्ये स्वतंत्र असा विरोधी पक्ष नेता असतात.

— सभागृहाच्या सदस्य संख्येच्या 1/10 पेक्षा सदस्य असणाऱ्या पक्षाला कायदे मंडळातील पक्ष असे संबोधतात.

व या पैकी 2nd largest party ही विरोधी पक्ष म्हणून काम करते. परंतु, हया वर्षीपासुन. ही अट रद्द करण्यात येवून लोकसभेमधील 2nd largest party ही विरोधी पक्ष म्हणून काम करू शकते. कारण 16 व्या लोकसभेमध्ये 1/10 ची अट पूर्ण करणारा 2nd पक्ष हा अस्तित्वात्च नव्हता.

— 1969 मध्ये सर्वप्रथम विरोधी पक्ष नेत्यास मान्यता देण्यात आली. ते 1977 मध्ये विरोधी पक्ष नेत्यास कॅबिनेट चा दर्जा देण्यात आला. व या तत्वाइवरे पहिले विरोधी पक्षनेते म्हणजे यशवंतराव चव्हाण.

— भारतातील बऱ्याच राज्यामध्ये याच धर्तीवर तरतुद करण्यात आली.

— महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र विधिमंडळ विरोधीपक्ष नेता. वेतन व भत्ते कायदा 1995 नुसार हा दर्जा देण्यात आला आहे.

— सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे हा दर्जा वेतन, भत्ते व सुख सुविधा या संदर्भात आहे. ~~याची~~ ना की कॅबिनेट बैठकी संदर्भात

— कलम 87 नुसार., नवीन लोकसभेच अधिवेशन हे निवडणूक आयोगामार्फत बोलविण्यात येते.

— पहिला दिवस हा हंगामी अध्यक्षाची निवड. (प्रोटेम स्पिकर)

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

- दुसऱ्या दिवशी सदस्यांना शपथ दिला जातं व
- तिसरा दिवस हा लोकसभा अध्यक्षांची निवड व
- चौथा दिवस राष्ट्रपतींचे अभिभाषण.

- सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी एका विशिष्ट संख्येची गरज असते. त्याला कोरम म्हणजे गणपूर्ती असे म्हणतात.

- ही गणपूर्ती पिठासिन अधिकाऱ्यांच्या धरून 1/10 असणे आवश्यक.

- गणपूर्तीसाठी सदस्यांच्या बाकावर पांढऱ्या कलरचे एक बटन असते. ते दाबुन तो हजेरी लावु शकतो. तीच म्हणजे त्याची हजेरी.

* विधेयक व्यापगत होणे -
- जुन्या लोकसभेमध्ये जे कामकाज झाले असेल व ते अविवट असेल तर त्या परिस्थितीत कामकाजामध्ये पुढील करक पडतो.

1st रद्द
लोकसभेत - ✓ × होते
राज्यसभेत - ✓ ✓ होत नाही.
राष्ट्रपतीकडे - ✓ ✓ होत नाही

* (1) लोकसभेत प्रलंबित विधेयक (लोकसभेत प्रथम मांडलेले) व्यापगत (रद्द) होतात.
- लोकसभेत पारित केलेले मात्र राज्यसभेत प्रलंबित असलेले विधेयक व्यापगत होतात.

* (2) जर दोन्ही सभागृहाच्या मतभेदामुळे Bill पारित झाले नसेल आणि लोकसभेच्या विसर्जनापूर्वी राष्ट्रपतींनी संयुक्त बैठकीची घोषणा केली असेल तर व्यापगत होत नाही.

* (3) राज्यसभेत प्रलंबित असलेले मात्र लोकसभेने पारित न केलेले व्यापगत होत नाही.

* (4) दोन्ही सभागृहाने पारित केलेले मात्र राष्ट्रपतींच्या संमतीसाठी प्रलंबित राहिलेले व्यापगत होत नाही.

* (5) दोन्ही सभागृहाने पारित केलेले मात्र राष्ट्रपतीने पुनर्विचारार्थ पाठविलेले व्यापगत होत नाही.

—संसदेचे कार्यकारी मंडळावर नियंत्रण—

— भारतामध्ये संसदिय शासन पद्धतीचा स्विकार केल्यामुळे कार्यकारी मंडळ हा कायदेमंडळाचा भाग असेल.

— कायदेमंडळाचे काम हे कायदयाची अंमलबजावणी करणे व कार्यकारी मंडळाच काम धोरण निर्मिती करणे. व अंमलबजावणी हे असते.

— कार्यकारी मंडळावर संसदेचे नियंत्रण नसल्यास कार्यकारी मंडळाचे वर्चस्व निर्माण होऊ शकते. हे यामुळे कार्यकारी मंडळाच्या प्रवृत्तीवर नियंत्रण प्रस्थापित करणे. आवश्यक यासाठी भारताच्या संविधानामध्ये व लोकसभेच्या नियमावली मध्ये काही तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

① बजेट ② प्रश्नोत्तर

③ संसदिय समित्या ④ प्रस्ताव

⑤ अहवाल.

② प्रश्नोत्तर

— दोन्ही सभागृहाचा पहिला तास हा प्रश्नोत्तराचा असतो.


— प्रश्नोत्तरासंदर्भात वेगवेगळ्या मंत्रालयाचे गट निर्माण करण्यात येतात.

— व प्रत्येक गटाला अधिवेशन कालावधीनुसार वेळ दिला जातो.

— मंत्र्यांचे गट पाडण्याचे कारण म्हणजे दोन्ही सभागृहात एकाच वेळी मंत्र्याला उत्तर देता येऊ नये.

— प्रश्नोत्तराची यादी पिठासिन अधिकारी सभागृहाच्या सचिवाच्या मदतीने तयार करतो. व कमीत कमी 5 दिवसाआधी संबंधीत मंत्रालयाला दिली जाते.

★ प्रश्न → गैर सरकारी प्रश्न.



तारांकित प्रश्न अतारांकीत प्रश्न अल्पसुचना प्रश्न.

★ तारांकीत प्रश्न -

— या प्रश्नांची उत्तरे तोंडी दिली जातात.

— या प्रश्नांना पूरवणी प्रश्न विचारता येतात

— एका दिवसात 20 पेक्षा अधिक प्रश्न जसतात.

। सदस्य एका दिवशी । तारांकीत प्रश्न विचारू शकतो.

— पिठासिन अधिकारी तारांकीत प्रश्नांचे अतारांकीत प्रश्नात रूपांतर करू शकतो.

— तारांकित प्रश्नांची सुची हिरव्या कागदावर छापली जाते.

— सहसा तारांकीत प्रश्न हे धोरणात्मक बाबींशी संबंधीत असतात.

★ अतारांकीत प्रश्न -

— या प्रश्नांची उत्तरे लिखित स्वरूपात दिली जाते.

— या प्रश्नांना पूरक प्रश्न विचारता येत नाही.

— अतारांकीत प्रश्नांची उत्तरे 3 महिन्याच्या आत देणे. बंधनकारक

— एका दिवशी जास्तीत जास्त 230 अतारांकीत प्रश्न विचारल्या जाऊ शकतात.

अपवाद - एका किंवा एकापेक्षा जास्त राज्यात आणीबाणी असल्यास त्या दिवशी त्या राज्यासंबंधी अतिरिक्त 25 प्रश्न विचारले जाऊ शकतात.

— सहसा अतारांकीत प्रश्न तथ्यात्मक बाबींशी संबंधीत असतात.

* अल्पसूचना प्रश्न -

— तातडीच्या सार्वजनिक मुद्द्याविषयी १० दिवसापेक्षा कमी दिवसाची नोटीस देऊन विचारलेला हा प्रश्न असतो.

- संबंधीत सदस्याने कमी दिवसाची सूचना का दिली याचे स्पष्टीकरण देणे आवश्यक.

—या प्रश्नांची उत्तरे तोंडी दिली जातात.

— सर्वप्रथम तारांकीत प्रश्न चर्चेसाठी आणल्या जातात. त्यानंतर अतारांकीत प्रश्न व शेवटी अल्पसूचना प्रश्न.

—एका दिवशी एकच अल्पसूचना प्रश्न विचारल्या जाऊ शकतो.

* गैर सरकारी प्रश्न -

—प्रश्नोत्तराचा हा एक प्रकार पडतो.

- या संबंधी प्रश्न हा सदस्यांना विचारण्यात येतो.

- अजूनपर्यंत भारताच्या संसदेच्या इतिहासामध्ये हा प्रश्न विचारण्याची वेळ आलेली नाही.

- खासदार. भगवंत मान (आप) संसद सुरक्षा मुद्द्यावरून हा प्रश्न विचारण्यात आलेला होता. परंतु निलंबणाच्या कारवाईमुळे हा प्रश्न वाद झाला.

*③ संसदीय समित्या -

— ज्या समिती सभागृहाच्या पिठासिन अधिकाऱ्याने स्थापन केली असते / त्या समितीचे कार्य पिठासिन अधिकाऱ्याच्या नियंत्रणात चालते.

— जी समिती सभागृहाला अहवाल सादर करते


— ज्या समितीला लोकसभा व राज्यसभा सचिवालयामार्फत प्रशासकीय सेवा पुरविली जाते.

त्यालाच संसदीय समिती असे म्हणतात."

—संसदीय समित्यांचा भारतीय संविधानामध्ये स्पष्ट उल्लेख नाही. परंतु काही कलमांमध्ये उदा. कलम - ८८, कलम - १०५ यामध्ये संदर्भ मिळतो.

* संसदीय समित्यांची आवश्यकता -

—संसदेचा वेळ खर्च वाचतो.
— विषयांवर सविस्तर चर्चा होऊन येते.
— विषयांशी तडजोड करणे शक्य होते.
— विरोधी पक्षाचा यामध्ये समावेश असल्यामुळे खरी लोकशाही निर्माण होते.
— संसदिय समित्या या जनतेकडून सुचना मागु शकतात. त्यामुळे यांना संसद आणि जनता यामधील दुवा असेही म्हणतात.
— संसदीय समित्या या ~~जनतेकडून~~ संसदेवर देखरेखीचे काम करतात.
— या समित्यांमध्ये सर्व सदस्यांचा सहभाग असतो. त्यामुळे यांना मंत्री निर्माण करणाऱ्या संस्था असेही म्हणतात.
— संसदिय समित्या या संसदेचे श्रमविभागणीच्या तत्वावर काम करतात.



★ वित्तिय समिती --

① लोकलेखा समिती -

-या समितीचे मुख्य कार्य म्हणजे, ज्या कामासाठी पैसा खर्च केला गेला किंवा दिला गेला, त्याच कामासाठी खर्च झाला की नाही. ते पाहणे / तपासणे.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

★ मुख्य उद्दीष्ट –

– ज्या कामासाठी पैसे दिले ते त्या साठीच खर्च झाले की नाही पाहणे.

– या समितीमध्ये सुरुवातीला 15 सदस्य होते. परंतु 1953 मध्ये ~~स~~ राज्यसभेला प्रतिनिधित्व देऊन यांची संख्या 22 झाली

– या समितीत लोकसभेचे सदस्य एकल संक्रमणीय मतदान पद्धतीने निवडले जातात तर राज्यसभेचे सदस्य निवडणूकीच्या माध्यमातुन.

– या समितीचा कार्यकाळ 1 वर्षे.

– ५ व्या लोकसभेपासुन यचि अध्यक्ष पद हे विरोधी पक्षाकडे.

★ या समितीच्या मर्यादा –

– या समितीचा संबंध धोरणात्मक बाबींशी नसतो. व तथ्यात्मक असते.

– समितीचे सर्व निष्कर्ष हे खर्चनिंतर काढले जातात.

– व खर्चामध्ये अनियमितता आल्यास त्यावर काय कार्यवाही करायची हा अधिकार समितीला नाही.

– ही समिती संस्थांना चौकशीसाठी बोलावु शकत नाही. परंतु सदस्यांना बोलायचे असल्यास मतदान प्राक्रियेचा अवलंब केल्या जातो.

– आतपर्यंत 2 वेळा असे प्रसंग निर्माण झाले.

(1) कोळसा घोटाळा मध्ये. मनमोहन सिंग यांना मुरली मनोहर जोशी हे अध्यक्ष असताना बोलविण्यात आले.

(2) नोटा बंदीच्या निर्णयावर पी. सी. चाको हे अध्यक्ष असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बोलविण्यात आले परंतु दोन्ही दोन्ही पक्ष निर्णयाच्या वेळी सत्तारूढ पक्षाचा निर्णय झाला.

PARIVARTAN COMPETITIVE CORNER
CLASS NOTES

– या समितीचे कार्य हे गोपनीय पद्धतीने चालते. व चर्चेची बाहेर वाच्छाता करता येत नाही.

– या समितीला CAG अहवाल देते.

② लोक अंदाज समिती –

– स्थापना – 1950

– सदस्य – 30

– सर्व सदस्य लोकसभेचे.

– यामध्ये सर्व राजकिय पक्षांना त्यांच्या सदस्यत्वाच्या प्रमाणानुसार प्रातीनिधित्व दिले जाते.

– या समितीचे मुख्य कार्य म्हणजे ज्या कामासाठी पैसा खर्च केला जात आहे त्यामध्ये काटकसर करता येते का? या विषयी अहवाल सादर करणे.

* – अंदाज पत्रकामधील धोरणे लक्षात घेऊन कुठल्या प्रशासकिय व संघटनात्मक सुधारणा करता येते का? या विषयी अहवाल देणे

– बजेट मधील खर्चाची विभागणी ही अर्थसंकल्पानुसार झालीय का? हे पाहणे.

** – लोकसभेच्या नियमावलीनुसार अर्थसंकल्प कोणत्या स्वरूपात मांडावा ही समिती सुचवत असते.

③ सार्वजनिक उपक्रम समिती –

– स्थापना – 1964

– सदस्य – 15 (10-लोकसभा, 5-राज्यसभा)

– कार्यकाळ – 5 वर्षे.

– दरवर्षी 1/5th सदस्य निवृत्त होतात व तेवढेच सदस्य नव्याने निवडून येतात.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

- या समितीचे मुख्य कार्य म्हणजे सार्वजनिक उपक्रमाविषयी वार्षिक अहवाल तपासणे.
- सार्वजनिक उद्योगामध्ये व्यवसायिकता निर्माण करणे.

★ विभागीय समित्या -

- लोकसभेच्या नियम समितीच्या शिफारशीनुसार सर्वप्रथम 1989 मध्ये कृषी विज्ञान व तंत्रज्ञान आणि पर्यावरण या संबंधी 3 समित्यांची स्थापना करण्यात आली होती.
- 1993 मध्ये अशा 17 विभागीय समित्या स्थापन करण्यात आल्या.
- 2004 मध्ये आणखी अतिरिक्त 4 समित्या स्थापन करण्यात आल्या. परंतु 2014 मध्ये वरिल सर्व समित्यांची नरचनास्ती करून पूर्णरचना करण्यात आली.

★ सरकारी आश्वासन समिती -

- ही दोन्ही सभागृहाची वेगवेगळी समिती असते.
- लोकसभेत 15 तर राज्यसभेत 10 सदस्य.

★ अनुसुचित जाती व जमाती यांच्या कल्याणासाठी समिती -

-- 30 सदस्य (लोकसभा - 20, राज्यसभा - 10)

★★ लाभाच्या पदाबाबत संयुक्त समिती - ही एकमेव अशी समिती यामध्ये केंद्र आणि राज्य या दोन्हीसाठी काम करते.

- 15 सदस्य (लोकसभा - 10, राज्यसभा - 5)

★ कामकाज सल्लागार समिती -

- दोन्ही सभागृहासाठी वेगळी समिती असते.
- समितीचा अध्यक्ष संबंधीत सभागृहाचा पिठासिन अधिकारी
- लोकसभा - 15 सदस्य
- राज्यसभेत - 11 सदस्य.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

* ग्रंथालय समिती-

- 9 सदस्य (लोकसभा - 6, राज्यसभा - 3)
- याचा अध्यक्ष लोकसभेचा उपाध्यक्ष असतो.

* नियम समिती-

- दोन्ही सभागृहांची विभक्त.
- लोकसभा - 15
- राज्यसभा - 11
- दोन्हीचा अध्यक्ष सभागृहाचे पिठासिन अधिकारी.

* संसदीय मंच -

- संसदीय मंच ही संसदीय व्यवस्थेमधील एक नवीन संकल्पना समजण्यात येते.

एखाद्या विषयावर संसदेला वास्तविक परिस्थितीची जाणीव करून देण्यासाठी, सभागृहाचा चर्चेचा स्तर उंचावण्यासाठी. सभागृहामध्ये एखाद्या विषयावर चर्चा घडवुन आणण्यासाठी संसदीय मंचाची स्थापना करण्यात येते.

— संसदीय मंचाचे जनक म्हणून सोमनाथ चटर्जी यांना ओळखण्यात येते. (कम्युनिस्ट पक्ष (जावा))

- 12 मे 2005 रोजी, 5 संसदीय मंचाची स्थापना करण्यात आली, परंतु सद्द्या 8 संसदीय मंच कार्यरित आहे.

1. जलसंधारण व व्यवस्थापन संसदीय मंच - 2005
2. युवकासंदर्भाति संसदीय मंच - 2006.
3. लोकसंख्या व सार्वजनिक आरोग्य संसदीय मंच.
4. जागतीक तापमान आणी हवामान बदल संसदीय मंच 2008.

- या संदर्भाति विशेश उल्लेखनिय बाब म्हणजे याचे अध्यक्ष स्वत: पंतप्रधान व या मंचाच्या कारकीर्दीचा परिणाम म्हणजे National Action plan on climate change सद्द्या हा मंच आंतराष्ट्रीय पर्यावरणीय वादामध्ये पर्यावरण मंत्रालयाची think tank म्हणून काम करतो.

⑤ आपातकालीन व्यवस्थापन संसदीय मॅच.

⑥ कारागिर संसदीय मॅच

⑦ SDG & MDG (Sustainable Dev. Goals & Millennium Dev. Goals) संसदीय मॅच 2013

⑧ बालकांसंदर्भाति संसदीय मॅच.

— या मॅचासध्ये लोकसभा अध्यक्ष व राज्यसभा सभापती यांचाही समावेश होतो. व दोघे सह अध्यक्ष असतात.

— अध्यक्ष व उपाध्यक्ष वगळता संसदीय मॅचात 31 सदस्य असतात. त्यापैकी लोकसभा - 21, राज्यसभा - 10

— या व्यतिरिक्त विशेष ज्ञान असलेले व्यक्ती यावर नियुक्त केल्या जाऊ शकतात.

— लोकसभा महासचिव या संसदीय मॅचाचा सचिव असतो.

★ संसदीय मॅचाचा कार्यकाळ -

— हा सभागृहाच्या कार्यकालाप्रमाणे असतो व त्या आधी सदस्य आपल्या राजीनामा लोकसभा अध्यक्ष किंवा राज्यसभा सभापतीकडे देऊ शकतो.

★ SRI - Speaker Research Initiative -

— संसदेमध्ये सदस्य ज्या पार्श्वभूमिमधुन आलेले असतात. त्यापैकी काही सदस्यांना ग्राखादया विशिष्ट बाबीचे तांत्रिक व सैद्धांतिक माहिती नसते. त्यामुळे त्याचा परिणाम चर्चेवर पडतो. व चर्चेचा परिणाम धोरणावर त्यामुळे संबंधीत सदस्यांना त्याची माहीती उपलब्ध करून देण्यासाठी SRI ची स्थापना करण्यात आली.

– त्यामुळे महिन्यातुन 3वेळा कार्यशाळेचे आयोजन करुन तंत्राकडून तो मुद्दा अवगत करुन दिल्या जातो.

* प्रस्ताव –

① विश्वास दर्शक ठराव /प्रस्ताव –;

– प्रस्ताव नेहमी लोकसभेत्च सादर केला जातो.

– कारण संसदीय शासन पद्धतीमुळे सामुहिक जबाबदारी तत्व नेहमी लोकसभेलाच लागु पडते. हा

– हा प्रस्ताव नेहमी सत्तारूढ पक्षाकडून सादर होईल.

त्यावर पिठासिन अधिकारी आवाजी मतदानाने किंवा मतदानाने निर्णय घेतो.

② अविश्वास ठराव –

– हा विरोधी पक्षाकडून सादर केला जातो. या द्वारे सत्तारूढ पक्षाला सभागृहाचे बहुमत नाही हे सुचित करण्यासाठी हा प्रस्ताव मांडला जातो.

③ स्थगन प्रस्ताव –

– एखादया सामाजिक प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधण्यासाठी प्रस्ताव सादर केल्या जातो.

– हा प्रस्ताव लोकसभेच्या 50 सदस्यांनी लेखी सुचना सकाळी 10 च्या आधी सभागृह सचिवांना दिल्या गेली पाहिजे यावर अंतिम निर्णय लोकसभा अध्यक्ष घेत असुन दुपारी 4.30 नंतर 2.30 तासाची चर्चा यावर घेऊन आणल्या जाते.

– हा प्रस्ताव पारित झाला असता ती कक्त शरकारची निंदा असते.

– एका प्रस्तावामध्ये एकच मुद्दा असावा.

– स्थगन प्रस्तावाचा मुद्दा ही न्यायालयीन बाब नसावी.

– एखादया मुद्दयावर सभागृहात चर्चा झाली असेल तर त्यावर स्थगन प्रस्ताव आणता येत नाही.

– सामाजिक मुद्दा हा नुकताच घडलेला असावा.

★ ध्यान आकर्षण प्रस्ताव-

— एखादया मंत्र्याचे लक्ष एखादया विशिष्ट बाबीकडे आकर्षित करण्यासाठी व त्या मंत्र्याला त्या बाबीसंबंधी तत्थ्यात्मक माहिती सभागृहापुढे मांडण्यासाठी या प्रकारचा प्रस्ताव मांडण्यात येतो.

★ धन्यवाद प्रस्ताव-:

★ अर्धातासाची चर्चा-

— प्रश्नोत्तरादरम्यान एखादा नविन मुद्दा उपस्थित झाल्यास व त्यावर चर्चा करण्याची गरज भासल्यास सोमवार, बुधवार, व शुक्रवार या दिवशी, पिठासिन अधिकारी चर्चा घडवून आणतो.

—परंतु हा मुद्दा त्या संबंधित प्रश्नाशी निगडीत असावा.

★ औचित्याचा प्रश्न-

— जर सभागृहचि कामकाज सभागृहाच्या नियमाप्रमाणे चालत नसेल तर अशा वेळी सभागृहचे लक्ष स्वत:कडे वेधण्यासाठी हा मुद्दा उपस्थित केल्या जातो.

यावर कोणत्याही प्रकारची चर्चा घडत नसुन सभागृहचे कामकाज हे कसे नियमानुसार चालत नाही. या विषयी बोलण्याचा अधिकार सदस्याला दिला जातो.

★ नियम 377 अंतर्गत चर्चा:

— नियम 377 हे लोकसभेशी संबंधित आहे याला राज्यसभेमध्ये special mention या नावाने ओळखल्या जाते.

एखादा मुद्दा प्रश्नोत्तरात नसेल, स्थगित प्रस्तावात, औचित्याच्या प्रश्नात, अर्धातासाच्या चर्चेत इ. नसेल तर अशा वेळी त्या मुद्दयाचे लक्ष वेधण्यासाठी नियम 377 अंतर्गत नोटीस दिली जाते.

संसदीय मंच / गट -

— ज्या देशावर ब्रिटिशांचे साम्राज्य होते. स्वातंत्र्यानंतर त्या देशाची सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थिती समान होती. त्यामुळे त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी व सौहार्द उपयोगितावादी सिद्धांताला चालना देण्यासाठी कॉमनवेल्थ संघटनेची स्थापना करण्यात आली.

— या संघटनेची मुख्य - ब्रिटनची राणी.

— या संघटनेमध्ये भारताचे प्रातिनिधित्व हे संसदीय गट करते.

— संसदिय गटाचे मुख्य कार्य जागतिक स्तरावर म्हणजेच त्या देशातील संसदेमध्ये ज्या घडामोडी घडत आहे. त्याचा अभ्यास करणे. व त्यानुसार भारतामध्ये कायदा करण्यास सिकारस करणे हे आहे.

— 1995 पासुन हा गट उत्कृष्ट संसदीय सदस्य पुरस्कार प्रदान करते.

— लोकसभा अध्यक्ष हा संसदीय गटाचा अध्यक्ष असतो.

— लोकसभा महासचिव हा या गटाचा पदसिद्ध सचिव असतो.

— संसदीय गटाचे सदस्यत्व संसदेच्या सर्व सदस्यांसाठी त्यात माजी सदस्यांचापण समावेश होतो. साठी खुले असो

— संसदीय गटाची स्थापना संविधान सभेच्या कार्यविषयक ठरावानुसार 1949 मध्ये झाली.

* पक्षांतरबंदी कायदा -

52 वी घटना दुरुस्ती, 1985 नुसार पक्षांतर बंदी कायदा करण्यात आला. ज्यानुसार कलम, 101, 102, 190, 191 यामध्ये बदल करण्यात आला.

हा कायदा लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद सभागृहाच्या विद्यमान सदस्याला लागु होतो.

– एखादया सदस्य ज्या पक्षाच्या सदस्यावर / चिन्हावर निवडून आला असेल व निवडणूकीनंतर दूसऱ्या पक्षात प्रवेश केला असेल व तर तो सभागृह सदस्य म्हणून अपात्र ठरतो.

– एखादा अपक्ष सदस्य निवडणूकीनंतर एखादया पक्षात प्रवेश केला असेल तरच अपात्र ठरतो.

– अपक्ष सदस्याने कोणाला मतदान केले यावरून अपात्र ठरत नाही.

– नामनिर्देशित सदस्य 6 महिन्यापर्यंत एखादया पक्षात गेल्यास अपात्र ठरत नाही, पण 6 महिन्यानंतर पक्षात प्रवेश केल्यास अपात्र ठरतो.

– पिठासिन अधिकाऱ्याला पक्षांतर बंदी कायदा लागु पडत नाही.

– सहकार निवडणूकीत हा कायदा लागु पडत नाही.

– विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे सहकार निवडणूक आयोग ही स्वतंत्र यंत्रणा आहे.
व त्याची स्थापना ही राज्य सरकारमार्फत होते.

– पक्षांतर बंदी कायदा विषयी अपात्रता घोषीत करण्याचा अधिकार हा सभागृह अध्यक्षाला आहे.

– 1993 ज्या को-हो-ते-होलो हॉन या केसमध्ये पिठासिन अधिकारी निर्णयाचे न्यायालयाने पुनरावलोकन होते.

* पक्षांतर बंदी कायदयानुसार मतदानानंतर झालेले पक्षांतर –
– ते मतदान ग्राह्य धरल्या जाते.
–

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक CAG

- CAG : Comptroller and Auditor General of India.
- घटनेच्या भाग V मधील प्रकरण V मध्ये कलम 148 ते 151 – भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी संबंधीत.
- कलम 148 : भारताचे नियंत्रक व महालेखारिक्षक या स्वतंत्र घटनात्मक पदाची तरतुद.
- महालेखापरीक्षक – भारतीय लेखापरिक्षण व लेखा विभागाचे प्रमुख.
- सार्वजनिक वित्ताचे पालक, देशातील संपुर्ण वित्तीय व्यवस्थेचे नियंत्रण. CAG
- प्रमुख कार्य – भारतीय घटना आणि वित्तीय प्रशासनाशी संबंधीत संसदीय कायदे उन्नत राखणे.

नेमणूक व पदावधी

- कलम 148 : राष्ट्रपती भारताच्या नियंत्रण व महालेखापरिक्षकाची नियुक्ती करतात.
- शपथ : राष्ट्रपती / त्यानी प्राधीकृत केलेल्या व्यक्तीसमोर – शपथेचा नमुना तिसऱ्या अनुसुचीत.
- पदावधी : घटनेत निश्चित नाही – संसदीय कायद्याने – ती सर्वोच्च न्यायलयाच्या न्यायाधिशांप्रमाणे पदग्रहण केल्यापासून सहा वर्षे किंवा वयाची 65 वर्षे पूर्ण होईपर्यंत.
- राजीनामा : राष्ट्रपतींना संबोधून
- पदावरून दूर करण्याची पद्धत : सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाप्रमाणे.
- केबळ घटनेत सांगितलेल्या पद्धतीनेच पदावरून दूर.
- नियुक्ती जरी राष्ट्रपतीमार्फत पण पद राष्ट्रपतीमार्फत पण पद राष्ट्रपतींच्या मर्जीत राम नाही.
- वेतन : सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाइतके.
- वेतन / सोईसुविधांमध्ये पदावधीदरम्यान अहितकारक बदल नाही.
- पदावधी संपल्यानंतर भारत / राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील कोणतेही लाभाचे पद धारण करू शकत नाहीत.
- महालेखापरिक्षक, त्यांचे कार्यालय कर्मचारी – सर्वांचा पगार, भत्ते, पेंशन – भारताच्या संचीत निधीवर प्रभारीत.

कर्तव्य व अधिकार :

- कलम 149 – महा लेखापरिक्षकांची कर्तव्ये व अधिकार निश्चित करण्याचा अधिकार संसदेला.
- त्यानुसार – नियंत्रक व महालेखापरिक्षक (कर्तव्ये, अधिकार व सेवशर्ती) कायदा – 1971.
- 1976 मध्ये वरील कायद्यात सुधारणा – महा लेखापरिक्षकांची लेखाविषयक कागे काढून घेण्यात आली. केवळ लेखा परिक्षणविषयक ठेवण्यात आली.
- भारताचा / प्रत्येक राज्याचा / विधानसभा असलेल्या केंद्रशासित प्रदेशाच्या संचीत निधीतून झालेल्या सर्व प्रदेशाच्या संचीत निधीतून झालेल्या सर्व खर्चांशी संबंधीत लेख्यांचे लेखापरिषण.
- केंद्र / राज्य सरकारांच्या प्रत्येक विभागाचे लेखापरिक्षण.
- केंद्र / राज्यांच्या जमाखर्चाचे लेखापरिक्षण.
- केंद्र/राज्यसरकारचा वाटा असणाऱ्या निकाय/प्राधीकारी- लेखा परिक्षण
- सरकारी कंपन्या / इतर महामंडळे व निकाय यांचे लेखापरिक्षण

परिवर्तन Competitive Forum – अभिजीत राठोड
PARIVARTAN COMPETITIVE FORUM CLASS NOTES

- केंद्र व राज्यांच्या सर्व देवाणघेवाणीचे लेखापरिक्षण
- राष्ट्रपतींच्या सांगण्यावरून जमा रकमा, स्टॉक लेखे यांचे लेखा परिक्षण.
- राष्ट्रपती/राज्यपालांनी टाकलेली लेख्यांविषयक इतर जबाबदारी जसे स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण.
- कलम 150 – केंद्र व राज्य सरकारचे लेखांच्या नमुन्यांबाबत राष्ट्रपतींना सल्ला.
- कलम 151(1) : केंद्रसरकारचे लेख्यांविषयक अहवाल राष्ट्रपतींना सादर – राष्ट्रपती संसदेसमोर मांडण्याची व्यवस्था.
- कलम 151(2) : राज्यांच्या लेख्यांविषयक अहवाल राज्यपालास सादर – राज्यपाल विधीमंडळा समोर मांडण्याची व्यवस्थ.
- कलम 279 – एखाद्या प्रदेशाशी संबंधित असलेल्या कोणत्याही कराचे / शुल्काचे निव्वळ उत्पन्न महालेखापीरक्षकांकडून सुनिश्चित व प्रमाणीत केले जाईल व त्यांचे प्रमाणपत्र अंतिम असेल.
- महालेखापरीक्षक संसदेच्या लोकसेवा समितीचे मित्र मार्गदर्शक व तत्त्वस म्हणून कार्य – म्हणून त्यांना या समितीचे कान व डोळे म्हणतात.
- 1976 मध्ये केंद्र सरकारच्या लेख्यांचे संकलन व अनुरक्षणाची (maintain) महालेखापरिक्षकांची जबाबदारी काढली. परंतु राज्यांच्या लेख्यांचे संकलन व अनुरक्षण याची जबाबदारी आतापण त्यांच्याकडेच आहे.
- महालेखापरिक्षक राष्ट्रपतींना पुढील तीन अहवाल सादर करतात.

1) विनियोजन लेख्यांचा लेखापरिक्षण अहवाल
2) वित्तीय लेख्यांचा लेखापरिक्षण अहवाल
3) सार्वजनिक उपक्रमांचा लेखापरिक्षण अहवाल

- राष्ट्रपती हे अहवाल संसदेच्या दोन्ही सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करतात त्यानंतर ते अहवाल संसदेच्या लोकलेखा समितीकडे पाठवले जातात. परिक्षणानंतर समिती आपला अहवाल ससदेत सादर करते.
- महालेखापरिक्षकांवर निर्गतवणूकीच्या व्यवहारांची तपासणी जबाबदारी सन 2000 पासुन.
- महालेखापरिक्षक सरकारच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याचे काम करणारे संसदेचे एजंट – तो केवळ संसदेला जबाबदार.
- लेखापरिक्षण करताना महालेखापरिक्षक पुढील बाबी तपासतात.
- लेख्यामध्ये दाखवलेले पैसे सरकारला कार्यान्वने उपलब्ध होते का?
- पैसे ज्या उद्देशासाठी उपलब्ध होते त्याचसाठी ते वापरले का? झालेला खर्च त्याच्या प्राधिकारानुरूप झालेला आहे का?
- महालेखापरिक्षक सरकारी खर्चाची वैधसंगतता, मितव्ययता यांच्या परिक्षणातून अपव्यय व उधळपट्टीवर टिपण्णी करू शकतात. याला औचित्य लेखापरिक्षण म्हणतात.
- औचित्य लेखापरिक्षण हे महालेखापरिक्षकांवर बंधनकारक नसुन स्वेच्छाधिन आहे.

कार्यावरील मर्यादा :

- कार्यकारी अभिकरणाने कार्यकारी अभिकरणाने केलेल्या खर्चाच्या तपशीलाची मागणी करू शकत नाहीत.
- संबंध खर्चाच्या तपासणी वेळी, तोपर्यंत खर्च होऊन गेलेला. संचित निधीतून पैसे काढण्याच्या प्रक्रियेवर नियंत्रण नाही.

•••

परिवर्तन Competitive Forum – अभिजीत राठोड

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

सर्वोच्च न्यायालय
[Supreem Court]

- न्यायालयाची संसदीय व्यवस्थेत सैद्धांतिक भुमिका भारतामध्ये कल्याणकारी राज्याचे तत्व स्वीकारल्यामुळे कार्यपालिकेचे सदस्य हे संसदेकडूनच निवडले जातात. म्हणजेच कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यामध्ये कार्यसिंबंधी एकरूपता दिसुन येते. म्हणजेच कायदेमंडळाने एखादा कायदा केला की. त्याची अंमलबजावणी होतेच.

—परंतु हा कायदा कल्याणकारी राज्याच्या विरोधी असेल, तर या तत्वाला तडे जातात. त्यामुळे या कायदयाची अंमलबजावणी रोखण्यासाठी एक संस्थेची गरज निर्माण होते. व ही संस्था म्हणजे: न्यायव्यवस्था

—म्हणूनच, न्यायव्यवस्थेला लोकशाहीचे तिसरे स्तंभ असे म्हणतात कार्यपालिकेपासुन न्यायपालीका ही वेगळी असावी हे तत्व प्रथम मॉन्टेस्क्यु याने मांडले. यालाच सत्ताविभाजनाचा सिद्धात म्हणतात.

— न्यायव्यवस्थेची दुसरी सैद्धांतिक बाजु म्हणजे भारतामध्ये संपूर्ण न्यायाचे तत्व प्रत्यक्षात उतरविण्याचे काम हे न्यायालया-कडे होते. याची प्रचिती ही भारतीय संविधानाच्या कलम-13 मध्ये: कि असात: न्यायालयिन पुर्नविलोकन चे तत्व स्पष्ट केले. आहे. व कलम-142 मध्ये कल्याणकारी व न्यायाचे राज्य. निर्माण करण्यासाठी न्यायव्यवस्था स्वत: हुन कायदा करू शकते.

- भारतीय न्याय व्यवस्थेचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट म्हणजे. भारतीय न्याय व्यवस्था कायदयाचे राज्य आणि नैसर्गिक. न्यायाचे तत्व या दोन्ही तत्वावर काम करते.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

ऐतिहासिक पार्श्वभूमी - न्यायव्यवस्था

- भारतामध्ये न्यायव्यवस्थेचे लक्षण प्राचिन कालापासुन दिसुन येते.
- भारतामध्ये भरलेली सभा आणि समिती हे न्यायदानाचे काम करत.
- या सभा आणि समितीने राज्याला दंड केल्याचे उदाहरणपन दिसुन येते.
- आधुनिक काळात न्याय व्यवस्थेची सुरुवात ही 1773 च्या रेग्युलेटिंग ॲक्ट नुसार, मानन्यात येते कि ज्यामध्ये कलकत्ता येथे सर्वोच्च न्यायालय स्थापन करणे प्रस्तावित होते व याच्या मुख्य न्यायाधीश पदी - सर एलिजा इंपे यांची नियुक्ती सुद्धा करण्यात आली होती.

परंतु काही अपरिहार्य कारणामुळे हे स्थापन होऊ शकले नाही, तर गव्हर्नरच्या अध्यक्षतेखाली जी कौन्सिल स्थापन करण्यात आली. तीच कौन्सिल हे न्यायदानाचे काम करत.

- 1861 च्या गव्हर्मेंट of India Act नुसार कलकत्ता, मद्रास, बॉम्बे या उच्च न्यायालयाची स्थापना.
- महाराष्ट्रात न्यायालयीन यंत्रणा निर्माण करण्याचे श्रेय हे एलफिस्टनला जाते.
- 1823 मध्ये, मुंबई येथे सर्वोच्च न्यायालयाची स्थापना झाली व 1861 च्या कायदयानुसार जी प्रांतीक न्यायालय निर्माण झाली. त्यात या बॉम्बे उच्च न्यायालयाचा समावेश होता. [14 ऑगस्ट 1862]
- 1935 पर्यंत हेच प्रांतीक न्यायालय, उच्च न्यायालयाचे काम करत.
- 1935 च्या कायदयानुसार यावर आणखी एका न्यायालयाची स्थापना केली ते म्हणजे फेडरल कोर्ट, 1937 मध्ये स्थापना.
- हेच फेडरल कोर्ट म्हणजे स्वतंत्र भारताचे सर्वोच्च न्यायालय
- 26 जानेवारी 1950 रोजी संविधानाच्या अंमलबजावणी सोबत सर्वोच्च न्यायालयाची स्थापना झाली.

— परंतु सर्वोच्च न्यायालयाचे उद्घाटन 28 जाने 1950 रोजी झाले.

— संसद भवनातील चेंबर ऑफ प्रिन्सेस हे काम चालत. व 1958 मध्ये सर्वोच्च न्यायालयाची स्वतंत्र इमारत उभारण्यात आली.

— भारतीय न्यायव्यवस्था —

— भारतीय न्याय व्यवस्था ही एकात्म स्वरूपाची असुन सर्वोच्च स्थानी-सर्वोच्च न्यायालय.

— राज्याच्या ठिकाणी- उच्च न्यायालय

— इतर ठिकाणी — दुय्यम न्यायालय

— अशी व्यवस्था आहे.

— भारतीय न्याय व्यवस्थेचे एक अद्वितीय लक्षण म्हणजे. कालानुरूप व वेळेनुरूप Alternative Dispute Resolution (पर्यायी न्यायीक व्यवस्था) पर्यायी न्याय व्यवस्थेची निर्मिती करण्यात आली आहे.

उदा. NGT; Social bench., Tribunals.

— हा याचाच भाग आहे.

—म्हणून सुभाष कश्यप यांनी भारतीय न्याय व्यवस्था ही. एकात्म कमी आणि बहुआयामी जास्त दिसुन येते.

—भारतीय न्याय व्यवस्थेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, न्यायव्यवस्था ही सर्वोत्तम पूर्णपणे नाही. परंतु पूर्णपणे कार्यपालीकेच्या नियंत्रणात सुद्धा नाही.

—एस. आर. बोम्मई केस मध्ये भारतीय न्याय. व्यवस्था ही संघराज्य व्यवस्थेचा आधारस्तंभ असल्याचे दिसुन येते.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

सर्वोच्च न्यायालय

– संविधानाच्या भाग-5 मध्ये कलम 124 ते 147 दरम्यान सर्वोच्च न्यायालयाचा उल्लेख मिळतो.

* सर्वोच्च न्यायालयाची संरचना –

– कलम 124 (1) नुसार, सर्वोच्च न्यायालयाची तरतूद असून त्यात * 1 मुख्य न्यायाधीश व इतर अन्य न्यायाधीश असतील.

– अन्य न्यायाधिश किती असेल हे ठरविण्याचा अधिकार संसदेला आहे.

– संसद कायदा करून न्यायाधिशांची संख्या ठरविते.

– स्थापनेच्या वेळी 1 + 7 संख्या होती.
परंतु वास्तविक संख्या 6 होती.

– नंतर काळानुरूप यात वाढ करण्यात आली.
1956 मध्ये, 10, 1960 – 13, 1977 – 17, 1986 – 25 व 2009 – 30

– सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांची नेमणूक ही राष्ट्रपतीमार्फत होते. व राष्ट्रपती ही नेमणूक करताना ज्येष्ठतेचा आधार घेतो.

– येथे ज्येष्ठता म्हणजे वय नसून न्यायालयीन अनुभव असा होतो.

– 1950 ते 1973 चा दरम्यान सेवा ज्येष्ठता निकष पाळला गेला परंतु केशवानंद भारती केस च्या पार्श्वभूमीवर सिक्री, शेलार, हेगडे व ग्रोव्हर यांना डावलून एम. एच. बे यांची सरन्यायाधीश पदी-

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
Class Notes

राष्ट्रपतींनी नियुक्ती केली.


– या नियुक्तीचा आधार देताना कायदामंत्री- गोखले यांनी विचारधारेचा (पूरोगामी- प्रतिगामी) आधार दिला, ज्यात सेवा ज्येष्ठतेसोबत विचारधारेचा आधार द्यायला हवा व सेवाज्येष्ठता ~~विचारधारेच~~ आधी आणी विचारधारेचा यामध्ये विचारधेला महत्व दिले पाहिजे ना की ज्येष्ठतेला.

– व वरिल न्यायाधिशांना याच कारणामुळे डावल्याचे समर्थन केले.

– परंतु P.N भगवती व चंद्रचुड यांनी आणीबाणीचे समर्थन केले. व त्यामुळे त्यांच्यावर प्रश्नचिन्ह न्यायालयाच्या या फेरप्रसंगामुळे वकिलांचा एक गट सर्वोच्च न्यायालयात गेला. व ही केस म्हणजे 1993 ची एस.पी. गुप्ता केस यालाच 2nd Justice केस. असेपण म्हणतात.

– व या केसमध्ये सेवा ज्येष्ठता म्हणजे विचारधारा नसुन इतर न्यायाधिशात जो सेवाज्येष्ठ असेल त्याचीच सरन्यायाधीशपती नियुक्ती करावी.

– इतर सर न्यायाधिशांची नियुक्ती :-



I Justice case :- यामध्ये राष्ट्रपतींनी सरन्यायाधिशाचा सल्ला (1982) - 5 सदस्य घेणे म्हणजे कक्त विचाराचे आदान-प्रदान

- II Guges Case (1993) – 7 सदस्य -


यामध्ये राष्ट्रपतीला दिलेला सल्ला हा विचारांचे आदान-प्रदान नसुन हा सल्ला राष्ट्रपतीवर बंधनकारक असेल. परंतु सरन्यायाधीशाने राष्ट्रपतीला सल्ला देताना तो इतर दोन ज्येष्ठ न्यायाधीशांचा सल्ला घेऊन द्यावा.

- III Guges Case (1998) - 9 सदस्य.

- यामध्ये सरन्यायाधीशाने सल्ला देताना 4 इतर ज्येष्ठ न्यायाधीशांचे (Coligium) एक मंडळ स्थापन करावे. व त्यानुसार नाव सुचवावे.

- परंतु दोघांनी जरी नकारात्मक सल्ला दिला. तर ते नाव पाठवु नये.

न्यायपिठाच्या विरुद्ध अपील करता येते. पण, खंडपीठाविरुद्ध अपील करता येत नाही.



	1982	1993	1998
सर्वोच्च न्यायालय →	I case 5 सदस्य ↓ विचारांची आदानप्रदान	II case. 7 सदस्य ↓ बंधनकारक ↓ राष्ट्रपती ↓ 1 + 2 इतर (CJI) सल्ला.	III case. 9 सदस्य ↓ बंधनकारक ↓ राष्ट्रपती ↓ 1 + 4 इतर (CJI) सल्ला
उच्च न्यायालय →	विचारांचे आदानप्रदान	बंधनकारक ↓ राष्ट्रपती ↓ 1 (CJI)	बंधनकारक ↓ राष्ट्रपती ↓ 1 + 2 इतर (CJI)

→ National Judicial Appointment commision. (NJAC)

③
- 1 CJI
- 2 इतर SC चे

③
- कायदामंत्री
- 2 PM
- विरोधी पक्ष लोकसभा
- कायदामंत्री

2 ची निवड.

- वरिल तीनही केसमध्ये, प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे कार्यपालीकेचा न्याय पालिकेमध्ये हस्तक्षेप दिसतो. व यासाठीचे National Judicial Appointment commision आणण्यात आले.

- याचा उद्देश कार्यपालिका आणि न्यायपालिका यांच्या समन्वयातून न्यायपालिकेची नियुक्ती हा होता.

- व या विरोधात प्रशांत भुषण व रामशेठमलानी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. व

- सर्वोच्च न्यायालयाने ने ही 99 वी घटनादूरूस्ती (राष्ट्रीय न्यायिक नेमणूक आयोग) रद्द केली.

- सद्ध्या न्यायाधीशांची नियुक्ती ही III केस नुसार चालते.

- न्यायालयाने ही घटनादूरूस्ती रद्द करून पूढील तर्क दिला,

① स्वतंत्र न्यायपालिका हे भारतीय संविधानाचे वैशिष्ट्य आहे. व ही घटनादूरूस्ती त्याचे उल्लंघन करते.

② कलम 50, नुसार, भारतामध्ये सत्ता विभाजनाच्या सिद्धांत नुसार भागु पडतो (कार्यपालिकेपासून न्यायपालिका वेगळी असेल). व ही घटना दूरूस्ती वरिल सिद्धांताचे उलंघन करते.

- भारतीय संविधानाच्या कलम 126 नुसार, सरन्यायाधिशाचे पद रिक्त असेल. तर अशा वेळी राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयामधील एखादया न्यायाधिशाची हंगामी सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करू शकतो.

- कलम 127 नुसार, - सर्वोच्च न्यायालयाचे काम चालविण्यासे लागणाऱ्या गणसंख्येइतके न्यायाधीश उपलब्ध नसतील तर भारताचे सरन्यायाधीश उच्च न्यायालयाच्या एखादया न्यायाधीशास तात्पूरत्या कामासाठी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून ~~घोषीत~~ नेमणूक करू शकतात.

– अशावेळी राष्ट्रपती व संबंधीत राज्याचे मुख्य न्यायाधीश यांचा सल्ला घेणे आवश्यक व सोबत ज्याची नेमणूक करायची आहे. त्या न्यायाधीशाकडे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाची जी पात्रता लागते. ती पात्रता असणे आवश्यक.

– निवृत्त न्यायाधिशांची उपस्थिती –

— सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशास सर्वोच्च न्यायालयात तात्पूरते काम करणेसंबंधी नियुक्त केल्या जाऊ शकते.

– अशा वेळी राष्ट्रपती नियुक्ती करत असताना
– सरन्यायाधिशाचा सल्ला आवश्यक.

सर्वोच्च न्यायालय

- न्यायव्यवस्था : शासन संस्थेतचे तिसरे महत्त्वाचे अंग.
- भारतीय न्यायव्यवस्था : एकात्म स्वरूपाची.
- संपुर्ण गणराज्यासाठी न्यायालयांची एकच शृंखला : सर्वोच्च स्थानी सर्वोच्च न्यायालय.
- ऑक्टोबर 1937 मध्ये 1935 च्या कायद्याने स्थापन झालेल्या फेडरल कोर्ट ऑफ इंडियाच्या जागी - 28 जाने 1950 रोजी सर्वोच्च न्यायालयाची स्थापना.
- संघराज्यीय न्यायव्यवस्थेची तरतुद - भाग V, प्रकरण IV कलम 124 ते 147.

सर्वोच्च न्यायालयाचे संघटन :

- कलम 124(1) - भारताचे एक सर्वोच्च न्यायालय असेल. ज्यात एक सरन्यायाधीश आणि अन्य न्यायाधीश - अन्य न्यायाधीशांची संख्या ठरविण्याचा अधिकार संसदेला.
- मुख्य घटनेत संस्था वेळावेळो वाढवूनं (संसदिय कायद्याने) 2009 मध्ये अन्य न्यायाधीशांची संख्या 30.
- सध्या सर्वोच्च न्यायालयात 1 सरन्यायाधीश + 30 अन्य न्यायाधीश.
- न्यायाधीशाचे नेमणूक = राष्ट्रपती.
- सरन्यायाधीशांची नेमणूक राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालय व काही उच्च न्यायालयातील त्यांना आवश्यक वाटतील तेवढ्या न्यायाधीशांचा विचार घेऊन करतात.
- अन्य न्यायाधीशांची नेमणूक - राष्ट्रपती सरन्यायाधीश + वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयातील त्यांना आवश्यक वाटतील एवढे न्यायाधीश यांचा विचार घेऊन.
- अन्य न्यायाधिशांची नेमणूक करतांना सरन्यायाधिशांचा विचार घेणे राष्ट्रपतींवर बंधनकारक

विचार घेण्याबाबतचा विवाद :

1) पहिला न्यायाधीशांचा खटला 1982 : विचार घेणे म्हणजे एकमत होणे नसुन केवळ मतांचे आदानप्रदान.

2) दुसरा न्यायाधिश खटला 1993 : विचार घेणे म्हणजे एकमत होणे. सरन्यायाधीशांचा सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक परंतु सल्ला देतांनाही दोन ज्येष्ठतम सहकाऱ्यांचा सल्ला सरन्यायाधीशांनी घेणे आवश्यक.

3) तिसरा न्यायाधीश खटला 1998 : न्यायाधीशांच्या नियुक्ती बाबत राष्ट्रपतींना सल्ला देतांनी सरन्यायाधीशांनी चार ज्येष्ठतम न्यायाधिशांच्या कॉलेजियमचा सल्ला घेणे आवश्यक.

- त्यापैकी दोघांनी जरी प्रतीकूल मत दिले तर शिफारस राष्ट्रपतीकडे पाठवू नये. अशावेळी ती राष्ट्रपतींवर बंधनकारक नसेल.

सरन्यायाधीशांची नेमणूक :

- सर्वोच्च न्यायालयाच्या जेष्ठतम न्यायाधीशाची नेमणूक सरन्यायाधिश म्हणून कण्याचा संकेत.
- 1973 मध्ये तीन ज्येष्ठ न्यायार्धीशांना डावलून ए.एन.रे. यांची सरन्यायाधीशपदी नेमणूक.
- 1977 मध्ये त्यावेळचे ज्येष्ठ न्यायाधीश डावलून एम.यु.बेग यांची सरन्यायाधीश पदी नेमणूक.
- दुसऱ्या न्यायाधीश खटल्याने सरकारचा हा स्वच्छाधीन अधिकार संपुष्टात - भारताच्या सरन्यायाधीशपदावर केवळ ज्येष्ठतम न्यायाधीशांची नेमणूक करण्यात यावी असा निकाल.

न्यायाधीशांसाठी पात्रता :

1) भारताचा नागरिक.

2) अ) उच्च न्यायालयातील पाच वर्षे न्यायाधीश म्हणून कामाचा अनुभव

किंवा

ब) उच्च न्यायालयात सलग दहा वर्षांच्या वकीलीचा अनुभव.

किंवा

क) राष्ट्रपतींच्या मते ती व्यक्ती कायदेपंडीत.

- सर्वोच्च न्यायालयाच्या न्ययाधीशांना शपथ राष्ट्रपती/त्यांनी नियुक्त केलेली व्यक्ती देते.

पदावधी

- घटनेत पदावधी निश्चित नाही.
- संसदीय कायद्याने वयाची 65 वर्षे
- राजीनामा - राष्ट्रपतींना संबोधून
- संसदेच्या शिफारशीने राष्ट्रपती न्यायाधीशांना पदावरून दुर करू शकतात. कलम 124(4)
- न्यायालयांना पदावरून दुर करण्याचा प्रस्ताव लोकसभेच्या 100 तर राज्यसभेच्या 50 सदस्यांनी सही करून अध्यक्ष/सभापतींना

सादर करणे आवश्यक.

- प्रस्ताव अध्यक्ष / सभापती – स्वीकारू / नाकारू शकतात.

पगार व भत्ते :

- संसदीय कायद्याने
- 2009 पासून सरन्ययाधीश – 1 लाख, अन्य न्यायाधीश 90 हजार.
- निवृत्तीनंतर शेवटच्या पगाराच्या 50% मासिक पेंशन

कार्यार्थ/हंगामी सरन्यायाधीश नेमणूक

- कलम 126– जेव्हा सरन्यायाधीश पद रिक्त तात्पुरते अनुपस्थित/कार्यकरण्यास असमर्थ – तेव्हा राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयातील एका सरन्यायाधीशाची हंगामी सरन्ययाधीश म्हणून नियुक्ती करतात.

तदर्थ न्यायाधीश :

- कलम 127 – तात्पुरते न्यायाधीश.
- सर्वोच्च न्यायालयात एखाद्या वेळी सत्र भरण्यासाठी आवश्यक गणसंख्या कमी पडत असेल तेव्हा सरन्यायाधीश एखाद्या उच्च न्यायालयातील न्यायाधीशाची राष्ट्रपती आणि संबंधीत उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाच्या संपमतीने नेमणूक करतात.
- तदर्थ न्यायाधीश म्हणून काम करतांना सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाचे सर्व अधिकार

निवृत्ती न्यायाधीशांची उपस्थिती :

- कलम 128 – सरन्यायाधीश कोणत्याही वेळी सर्वोच्च / उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशास राष्ट्रपती आणि त्या व्यक्तीची पूर्व संमती घेऊन सर्वोच्च न्यायालयात तात्पुरते न्यायाधीश म्हणून कार्य करण्याची विनती करू शकतात. – त्यावेळी त्या व्यक्तीला सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाप्रमाणे सर्व अधिकार.
- कलम 129 – सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय.
- कलम 130 – कार्यस्थान (सर्वोच्च न्यायालय) दिल्ली.

सर्वोच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य :

- फेडरल न्यायालय.
- अपिलाचे सर्वोच्च न्यायालय.
- घटनेचा संरक्षणकर्ता
- नागरिकांच्या मुलभूत हक्कांचे संरक्षक.
- कायदेकारी व कार्यकारी मंडळाच्या हस्तक्षेपापासून मुक्त.
- न्यायालयीन नेमणुकीवेळी राष्ट्रपतींवर न्यायाधीशांचा विचार बंधनकारक.
- आणीबाणीच्या काळ वगळता न्यायाधीशांच्या सेवाशर्तीमध्ये अहितकारक बदल नाही. कलम 125(2).
- खर्च संचीत निधीवर प्रभारीत – कलम 146(3)
- न्यायालयीन कामकाज पारपाडतांना न्यायाधीशांनी केलेल्या वर्तणुकीवर संसदेत चर्चा निर्बंध – कलम 121.
- निवृत्तीनंतर वकिली करण्यावर बंदी कलम 124 (7)
- सर्वोच्च न्यायालयाला स्वतःच्या अवमानाबद्दल कोणत्याही व्यक्तीला शिक्षा करण्याचा अधिकार – कलम 129
- आपल्या स्टाफची नेमणूक करण्याचे स्वातंत्र्य.
- संसदेला सर्वोच्च न्यायालयाचे अधिकारकक्षेत व अधिकार घटविण्याचा अधिकार नाही. वाढ घडवून आणु शकते.
- कार्यकारी अधिकाऱ्यांना न्यायीक अधिकार नाही. कलम 50.

सर्वोच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र व अधिकार :

१) प्रारंभीक अधिकारक्षेत्र

- कलम 131 – सर्वोच्च न्या.प्रारंभीक अधिकार क्षेत्र पुढील तंटे थेट सर्वोच्च न्यायालयात.

1) केंद्रशासन वि. एक/अनेक घटकराज्ये
2) केंद्रशासन + एक/अनेक घटकराज्ये वि. एक/अनेक घटकराज्ये
3) घटकराज्यांतील आपापसातील तंटे

- सर्वोच्च न्यायालयाचे प्रारंभीक अधिकारक्षेत्र असमावेशक म्हणजेच वरील तंट्यांबाबत सर्वोच्च न्यायालया वगळता अन्य कोणतेही न्यायालय निर्णय देऊ शकत नाही.
- असे तंटे थेट सर्वोच्च न्यायालयात दाखल – म्हणून त्याला प्रारंभीक अधिकारक्षेत्र म्हणतात.

पुढील बाबी प्रारंभीक अधिकार क्षेत्रात नाही.

1) घटनेच्या प्रारंभापूर्वी करण्यात आलेल्या आणि त्यानंतरही अंमलात राहिलेले तह, करार, प्रसंवीदा, सनद इत्यादीबबत उद्भवणारे तंटे.
2) कोणताही तह / करार यातुन उद्भवणारा तंटा ज्यात हे तह / करार प्रारंभीक अधिकारक्षेत्रात येत नाहीत. अशी तरतुद आहे.
3) आंतरराज्यीय जल विवाद.
4) वित्त आयोगाशी संबंधीत बाबी
5) केंद्र राज्य खर्च पेंशनचे समायोजन.
6) राज्याने केंद्राकडून वसुल करण्याची नुकसान भरपाई.

२) प्राधिलेख अधिकार क्षेत्र

- नागरिकांचे उल्लंघन झालेले हक्क त्यांना पुन्हा मिळवून देण्यासाठी अेबीयस कॉर्पस, मँडमस, प्रोहिबिशन, सर्शिओराराय आणि को वारंटो काढण्याचा अधिकार.
- सर्वोच्च न्यायालयाचा हा अधिकार उच्च न्यायालयाबरोबर समवर्ती.

Competitive Forum

- सर्वोच्च न्यायालय केवळ मुलभूत हक्क बजावण्यासाठीच प्राधिलेख काढू शकते. तर उच्च न्यायालय मुलभूत हक्क बजावण्याबरोबरच इतरही उद्देशांसाठी काढु शकते.
- उच्च न्यायालयाने प्राधिलेख अधिकारकक्षेत सर्वोच्च न्यायालयापेक्षा अधिक व्यापक.

३) अपिलाचे / पुरर्विचाराचे अधिकार क्षेत्र

1) घटनात्मक प्रश्नासंबंधी अपील – कलम 132
2) दिवाणी प्रकरणामध्ये अपील – कलम 133
3) फौजदारी प्रकरणामध्ये अपील – कलम 134
4) विशेष अनुज्ञेद्वारे अपील – कलम 136.

४) सल्ला देण्याचे अधिकारक्षेत्र

- कलम 143 – राष्ट्रपतींना सर्वोच्च न्यायालयाकडून पुढील दोन बाबतीत सल्ला.

अ) सार्वजनिक महत्त्वाचा प्रश्न

ब) घटनेच्या प्रारंभापूर्वी केलेल्या व नंतरही अमलात राहिलेल्या तह/करार/सनद/प्रसंविदा याच्यातून उदभवलेल्या तंट्या बाबत.

- वरील पहिल्या बाबतीत सर्वोच्च न्यायालय राष्ट्रपतींना सल्ला देऊ शकते / नाकारू शकते.
- दुसऱ्या बाबतीत (ब) सर्वोच्च न्यायालयाला सल्ला देणे बंधनकारक
- वरील सल्ले राष्ट्रपतींवर बंधनकारक नाहीत.

५) कलम १२९ – सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय असेल.

- कार्यालय अवमान या शब्दाची घटनेत व्याख्या नाही. 1971 साली न्यायालयाचा अवमान कायदा 1971 ने ती केली. – दिवाणी / फौजदारी अवमान.

६) न्यायायीन पुनर्विलोकनाचा अधिकार.

- केंद्र / राज्याच्या कायद्यांची / कार्यकारी आदेशांची घटनात्मकता तपासण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार.
- न्यायिक पुनर्विलोकन – घटनेत शब्दाचा उल्लेख नाही.

७) इतर अधिकार

- राष्ट्रपती / उपराष्ट्रपती निवडीच्या तंट्यावर निर्णय
- राष्ट्रपतींनी संदर्भीय केल्यास संघलोकसेवा आयोगाचे अध्यक्ष/सदस्यांच्या वागणुक आचरणाची तपासणी – दोषी आढळलेल्या पदावरून दुर करण्याची शिफारस – राष्ट्रपतींवर बंधनकारक
- कलम 137 – स्वतः घोषीत केलेल्या न्यायीक निर्णयाचे पुनर्विलोकन
- उच्च न्यायालयासमोरील खटले स्वतःकडे घेऊन निकाल लावण्याचा अधिकार.
- कलम 141 – सर्वोच्च न्यायालयाने घोषीत केलेला कायदा भारताच्या सर्व्यक्षेत्रातील सर्व न्यायालयांवर बंधनकारक.

घटनेचा अंतिम अर्थ लावण्याचा अधिकार :

- राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती हे दोघेही अनुपस्थितीत असतील त्यांची पदे रिक्त असतील तेव्हा सरन्यायाधीश राष्ट्रपतीपदाचे कार्य पार पाडतात.

परिवर्तन Competitive Forum

परिवर्तन Competitive Forum
– अभिजित राठोड

(भारतीय संविधान–राजकारण–कायदे)
राज्यव्यवस्था
(राज्यसेवा पुर्व व मुख्य संपूर्ण पेपर-2)

- राज्यसेवा मुख्यपरीक्षा व साहाय्यक मुख्य परीक्षा संपूर्ण पेपर–2 घेण्यात येईल.
- मुलभूत संकल्पनेवर भर – धर्मनिरपेक्षता– समान नागरी कायदा
– राज्यघटनेची मुलभूत चौकट – समाजवाद
– आरक्षण – प्रतिनिधाक लोकशाही
– अल्पसंख्याक – राष्ट्रीय सरकार
– कायदेमंडळातील राजकीय पक्ष – एकात्मता
– नक्षलवाद – आतंकवाद
– प्रजासत्ताक – अस्पृश्यता
– न्यायलयीन सक्रियता
- न्यायालयीन निर्णयाची विषयासोबत सांगड.
- राज्यव्यवस्थेविषयी चालू घडामोडी स्वतंत्रपणे घेण्यात येईल व नोट्स देण्यात येतील.
- सर्व राष्ट्रीय पुस्तकांचा सदर्भ घेऊन शिकवण्यात येईल.
- निबंधासाठी उपयुक्त (राजकीय व्यवस्थेवर आधारित निबंध)
- कायद्यावर भर नोट्स व विश्लेषण
- राज्यव्यवस्था व मानव संसाधन विकास आणि मानवी हक्क यामध्ये जे घटक सारखे आहेत ते सखोलपणे घेण्यात येईल. उदा.शिक्षण, अस्पृश्यता, अल्पसंख्याक, मानवी हक्क, अनुसूचीत जाती व जमाती इ.

– अभिजीत राठोड

उत्तम मोती बिल्डींग, रमेश डाईंगजवळ,
नागनाथपार–शनिपार रोड, सदाशिवपेठ, पुणे–३०
9272100500

राज्यसेवा २०१८ (पूर्व-मुख्य-मुलाखत)

परिवर्तन
Competitive Forum

Foundation Batch लवकरच...

General Studies : अभिजीत राठोड सर घेतील.
CSAT : सचिन ढवळे सर घेतील.

Integrated Batch एकत्रित बॅच

राज्यसेवा पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम प्रथम घेण्यात येईल.

- The Hindu वर्तमानपत्र दररोज मराठीमध्ये करून शिकवण्यात येईल.
- अभ्यासक्रमातील जे घटक संदर्भग्रंथात उपलब्ध नाही त्यावर स्वतंत्र नोट्स देण्यात येतील.
- बेसीक गोष्टीवर भर देण्यात येईल. (NCERT, Maharashtra State Board)
- दर आठवड्याला टेस्ट, त्यावर सविस्तर चर्चा स्वत: राठोड सर.
- दर रविवार : वैयक्तिक मार्गदर्शन.

दररोज चालु घडामोडीवर नोट्स व बेसिक विषयावर टेस्ट.

- मर्यादित जागेमुळे नाव नोंदणी आवश्यक.
- संयुक्त परीक्षा (PSI/STI/ASO) चा अभ्यासक्रम यामध्येच पूर्ण करण्यात येईल.

- अभिजीत राठोड

उत्तम-मोती बिल्डिंग, नागनाथपार-शनिपार रोड,
रमेश डाईंगजवळ, जनसेवा बँकेच्या वर,
सदाशिवपेठ, पुणे- 411 030

9272100500

उच्च न्यायालय

- सर्वोच्च न्यायालयाच्या खालच्या पातळीवर राज्यस्तरावर उच्च न्यायालये कार्य करतात.
- भारतीय उच्च न्यायालयाचा कायदा 1861 नुसार- सर्वप्रथम 1862 मध्ये कलकत्ता, बॉम्बे आणि मद्रास या ठिकाणी उच्च न्यायालये.
- 1866-अलाहाबाद येथे उच्च न्यायालय (चौथे)
- कालांतराने प्रत्येक ब्रिटीश प्रांतात उच्च न्यायालये.
- 1950- मध्ये जेवढे उच्च न्यायालये होती ती सर्व संबंधीत प्रांताचे उच्च न्यायालये बनली.

भाग-VI-कलम-214 ते 231- उच्च न्यायालयांचे संघटन, स्वातंत्र्य, अधिकारक्षेत्र, अधिकार, कार्यपद्धती इ. तरतुद.

- कलम -214 प्रत्येक राज्यासाठी एक उच्च न्यायालय.
- 7 वी घटनादुरुस्ती-दोन/अधिक राज्ये/केंद्रशासीत प्रदेश यांच्यासाठी सामायीक उच्च न्यायालय स्थापन्याचा संसदेला अधिकार.
- उच्च न्यायालयाचे प्रादेशिक अधिकारक्षेत्र-संबंधीत राज्ये, केंद्रशासीत प्रदेशाच्या राज्यक्षेत्राच्या समव्यापी.
- सध्या देशात 29-राज्य व 7 केंद्रशासित प्रदेशासाठी 24 उच्च न्यायालय कार्यरत.
- 24 पैकी 3 सामाईक उच्च न्यायालये- बॉम्बे, गुवाहटी, पंजाब व हरियाणा
- स्वतःचे उच्च न्यायालय असलेला एकमेव केंद्रशासित प्रदेश-दिल्ली
- इतर केंद्रशासित प्रदेश आणि संबंधीत उच्च न्यायालये

1. अंदमान व निकोबार बेटे-कलकत्ता
2. दिव व दमण आणि दादरा नगरहवेली-बाम्बे
3. लक्षद्विप-अर्नाकुलम (केरळ)
4. पुदुचेरी-मुद्रास
5. चंदिगड-पंजाब व हरियाणा

कार्यस्थान राजधानीच्या ठिकाणी नसलेले उच्च न्यायालये-राज्य

1. ओडिशा-कटक
2. मध्यप्रदेश-जबलपूर
3. उत्तरप्रदेश-अलाहाबाद
4. राजस्थान-जोधपूर
5. छत्तीसगड-बिलासपूर
6. केरळ-अर्नाकुलम
7. उत्तराखंड-नैनिताल

2013 मध्ये-

1. 25 मार्च-मणीपूर उच्च न्यायालय
2. 25 मार्च-मेघालय उच्च न्यायालय
3. 26 मार्च- त्रिपुरा उच्च न्यायालय (ट्रीक- **ममेत्री-मणिपूर, मेघालय, त्रिपुरा)**

कलम-216- प्रत्येक उच्च न्यायालयाला एक मुख्य न्यायाधिश आणि राष्ट्रपतींना वेळोवेळी आवश्यक वाटतील ऐवढे अन्य न्यायाधीश असतील.

- भारताचे सरन्यायाधीश व संबंधीत राज्याचा/राज्यांचे राज्यपाल यांचा विचार घेऊन राष्ट्रपती मुख्य न्यायाधीशाची नेमणुक करतो.
- अन्य न्यायाधीशांची नेमणुक करतांना-सरन्यायाधीश, मुख्य न्यायाधिश व राज्यपाल यांचा विचार घेऊन राष्ट्रपती नियुक्त करतात.
- सामायीक न्यायालयातील न्यायाधीशांची नेमणुक करतांनी संबंधीत सर्व राज्यांच्या राज्यपालांचा विचार घेणे आवश्यक.

उच्च न्यायालयांतील न्यायाधिशांची पात्रता-

- भारताचा नागरिक

- भारतीय राज्यक्षेत्रात किमान 10 वर्षे न्यायीक पदावर काम.
- उच्च न्यायालयांत सलग 10 वर्षे वकीली.

उच्च न्यायालयातील न्यायाधिकशांना शपथ –राज्यपाल देतात.

- पदावदी– घटनेत निश्चित केला नाही–मात्र पुढील तरतुदी

  1. वयाची 62 वर्षे पूर्ण होईपर्यंत पदावर
  2. वयाबाबत प्रश्न निर्माण– सरन्यायाधिशांच्या विचाराने राष्ट्रपती सोडवतील
  3. पदाचा राजीनामा– राष्ट्रपतींना संबोधून–लेखी
  4. संसदेच्या शिफारशीने राष्ट्रपती त्यांना पदावरून दूर करू शकतात.

- कलम 217– उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाला पदावरून दूर करण्याची पद्धत सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाला पदावरून दूर करण्यासारखीच.
- शाबीत झालेली गैरवर्तणुक किंवा अकार्यक्षमता या आधारांवर पदावरून दूर करता येते.
- आतापर्यंत कोणत्याही उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला पदावरून दूर करण्यात आलेले नाही–मात्र डी.पी.दिनकरन (कर्नाटक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश) व सौमित्र सेन (कलकत्ता उच्च न्यायालयाचे न्यायाधीश) यांच्या गैरवर्तवणुक व भ्रष्टाचाराचे आरोप होऊन संसदेत त्यांना पदावरून दूर करण्याची प्रक्रिया सुरु केली होती. परंतु प्रस्ताव पारित होण्यापूर्वीच राजीनामा दिला.

पगार व भत्ते–

- मुख्य न्यायाधीश–1,00,000 रु इतर न्यायाधिश–80,000 रु
- राज्याच्या संचित निधीवर प्रभारीत मात्र निवृत्त न्यायाधिशांचे पेन्शन खर्च भारताच्या संचीत निधीवर प्रभारीत
- कलम–222– राष्ट्रपती सरन्यायाधिशांचा विचार घेऊन एखाद्या न्यायाधिशाची एका उच्च न्यायालयातून दुसऱ्या उच्च न्यायालयात बदली करू शकतात.
- कलम 223– राष्ट्रपती उच्च न्यायालयातील अन्य न्यायाधिशांपैकी एखाद्या न्यायाधिशाची मुख्य न्यायाधीशांच्या अनुपस्थितीत हंगामी/कार्यार्थ मुख्य न्यायाधिश म्हणून नेमणुक करू शकतात.
- कलम 224– अतिरिक्त व हंगामी न्यायाधीशांच्या नेमणुकीची तरतुद.

  – अतिरिक्त न्यायाधिशांची नेमणुक 2 वर्षेपर्यंतच मात्र 62 वर्षे पुर्ण होईपर्यंतच होते.

  – हंगामी न्यायाधीशाची नेमणुक मुळे न्यायाधीश पद ग्रहण करेपर्यंत किंवा वयाची 62 वर्षे होईपर्यंतच.

- कलम224–A निवृत्त न्यायाधीशांच्या नियुक्तीबाबत तरतुदी

उच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य–

- उच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य आणि निःस्पृह कार्यपद्धती अबाधीत रहावी म्हणून घटनेत विविध तरतुदी करण्यात आल्या.

  1. नेमणुकीची पद्धत– न्यायाधीशांच्या नेमणुकीवेळी न्यायव्यवस्थेतील न्यायाधिशांचा विचार घेण्याचे राष्ट्रपतींवर बंधन– सरकारचा हस्तक्षेप नष्ट–कलम–217
  2. न्यायाधीशांच्या पदावधीची सुरक्षा–कलम–217
  3. न्यायालयाचा खर्च संचित निधीवर–राज्याच्या उच्च न्यायालयांच्या न्यायाधिशांचा पेन्शनवरील खर्च भारताच्या संचित निधीवर
  4. कलम–121– नुसार उच्च न्यायालयातील न्यायाधिशांनी न्यायालयीन कर्तव्य पार पाडतांनी केलेल्या वर्तणुकीबाबत संसद/राज्यविधीमंडळात चर्चा करण्यास प्रतिबंध.
  5. कलम 220 मध्ये उच्च न्यायालयातील न्यायाधिशांना सर्वोच्च न्यायालय व इतर उच्च न्यायालये वगळता भारतात कोणत्याही न्यायालय/प्राधीकाऱ्यासमोर वकीली करण्यास बंदी.

- अवमानाबद्दल शिक्षा करण्याचा अधिकार–कलम 215
- आपल्या स्टाफची नेमणुक करण्याचे स्वातंत्र्य
- अधिकारक्षेत्र घटवता येत नाही.
- कार्यकारी मंडळापासून विभक्त
- घटनेत मार्गदर्शक तत्वात कलम 50–कार्यकारी अधिकाऱ्यांना न्यायीक अधिकार असू नयेत.

उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र व अधिकार–

- राज्यात अपिलाचे अंतिम न्यायालय

Competitive Forum

- घटनेचा संरक्षणकर्ता, नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा हमीदार
- घटनेत उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राबाबत तपशीलवार तरतुदी नाहीत- केवळ कलम 225 मध्ये अशी तरतुद आहे की, उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र व अधिकार घटनेच्या प्रारंभाच्या लगतपुर्वी जसे होते तसेच असतील.
- त्यात घटनेच्या प्रारंभापुर्वी नसलेलया महसुलाविषयक मुद्याचे अधिकारक्षेत्राचा समावेश नव्याने केला आहे.

प्रारंभीक अधिकारक्षेत्र-


- या अधिकारात उच्च न्यायालयात थेट येणारे दावे सोडविण्याच्या अधिकाराचा समावेश.
- मृत्युपत्र, विवाह, घटस्फोट, ॲडमिरल्टी, कंपनी कायदा व न्यायालयाचा अवमान यांच्याशी संबंधीत मुद्दे.

प्राधिलेख अधिकारक्षेत्र-

- कलम 226- नुसार उच्च न्यायालयाला मूलभूत हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा तर प्रयोजनासाठी निदेश/आदेश/ प्राधिलेख काढण्याचा अधिकार.
- प्राधिलेख हे हेवियस कॉर्पस, मँडमस, प्रोहिबिशन, सर्शिओराराय आणि को-वॉरंटो या स्वरुपातील असू शकतात.
- मूलभूत हक्क बजावण्यासाठी कलम 32 अंतर्गत थेट सर्वोच्च न्यायालयात तर कलम 226 अंतर्गत उच्च नयायालयात जाता येते.
- दोन्ही न्यायालयांचा (उच्च/सर्वोच्च) प्राधिलेख काढण्याचा अधिकार प्रारंभीक आहे-असमावेशक नाही तर परस्परांना समवर्ती आहे.
- सर्वोच्च न्यायालय केवळ मूलभूत हक्क बजावण्यासाठीच प्राधिलेख काढू शकते तर उच्च न्यायालय मूलभूत हक्कांची बजावणी करण्याबरोबरच इतर कोणत्याही प्रयोजनार्थ प्राधिलेख काढू शकते- म्हणून उच्च न्यायालयाचा प्राधिलेख काढण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारापेक्षा व्यापक आहे.
- उच्च न्यायालय आपल्या प्रादेशिक अधिकारक्षेत्राच्या बाहेरही प्राधिलेख काढू शकते तर वादाचे कारण त्याच्या अधिकारक्षेत्रात उद्भवल्यास.
- उच्च न्यायालय मुलत: अपिलाचे न्यायालय म्हणून कार्य करते.
- अपिलाचे अधिकारक्षेत्र प्रारंभीक अधिकारक्षेत्रापेक्षा अधिक व्यापक- दिवाणी तसेच फौजदारी प्रकरणात अपिलाचे अधिकारक्षेत्र उपलब्ध
- कलम 227 अन्वये-(लष्करी न्यायालये/न्यायाधिकरणे वगळता) उच्च न्यायालयास [illegible] अधिकारक्षेत्रातील सर्व न्यायालये व न्यायाधिकरणे यांच्यावर परिर्वक्षणाचा अधिकार
- अधिनस्त न्यायालयांवर अपिलाच्या, परिवेक्षणात्मक अधिकारव्यतिरिक्त प्रशासकीय नियंत्रणाचे अधिकार प्राप्त.
- उच्च न्यायालयाचा कायदा त्याच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रातील सर्व अधिनस्त न्यायालयास बंधनकारक
- कलम 215- अभिलेख न्यायालय- उच्च न्यायालयाला अभिलेख न्यायालय या नात्याने पुढील अधिकार प्राप्त.
  1. उच्च न्यायालयाचे सर्व निकाल/ कार्यवाही व कायदे भविष्यकालीन स्मृती व साक्षीसाठी अभिलेखीत व जतन केली जातात- भविष्यात पुरावा म्हणुन ग्राह्य
  2. उच्च न्यायालयाला आपल्या अवमानाबदल शिक्षा करण्याचा अधिकार.
- केंद्र तसेच राज्यांचे कायदे तसेच कार्यकारी आदेशांची घटनात्मक तपासून घटनेतील तरतुदींशी विसंगत असल्यास अवैध, घटनाविरोधी घोषीत करण्याचा उच्च न्यायालयाला अधिकार.
- घटनेत कोठेही 'न्यायीक पुनर्विलोकन' शब्दप्रयोगाचा उल्लेख नाही.
- केंद्रीय कायद्यांची घटनात्मकता तपासण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार 42 व्या घटनादुरुस्तीने काढून घेतला होता परंतु. 43 व्या घटनादुरुस्तीने पुन्हा प्रदान केला.
- बॉम्बे उच्च न्यायालयाची स्थापना-14 ऑगस्ट 1862
- सध्या 75 न्यायाधीश
- औरंगाबाद, नागपूर आणि पणजी येथे खंडपीठे
- सध्या सर्वाधिक न्यायाधिश अलाहाबाद उच्च न्यायालय 160

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

PARIVARTAN Competitive Forum अभिजीत राठोड



PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Ratbod
CLASS NOTES

* Advocate on Record :-

- फक्त याच प्रकारचे वकील सर्वोच्च न्यायालयात बाजु मांडू शकतात.
- Adv. on Record साठी Seniour Adv. व 5 वर्षाचा अनुभव लागतो.
- व सोबत सर्वोच्च न्यायालयाकडून जी परिक्षा घेतली जाईल. ती परिक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक.
- या प्रकारच्या वकीलाला एक विशिष्ट प्रकारचा नोंदणी क्रमांक दिल्या जातो. व याची यादी सर्वोच्च न्यायालयाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध केल्या जाते.

* Seniour Advocate -

- या प्रकारच्या वकीलाला SC व HC मान्यता देते.
- कायदयाचे उत्तम ज्ञान असलेल्या वकीलाला हा दर्जा देण्यात येतो.
- उच्च न्यायालयाचे ~~न्या~~ निवृत्त न्यायाधीश जेव्हा ~~HC~~ SC मध्ये वकीली करतात तेव्हा त्यांना या प्रकारचा दर्जा आपोआप मिळतो.

* इतर Advocate -

- अधिवक्ता अधिनियम 1961 नुसार, राज्याच्या, बार कौन्सिल मध्ये त्याची नोंदणी झालेली असावी.


PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

Bar Council of India

- 1953 मध्ये, एस. आर. दास यांच्या अध्यक्षतेखाली आखिल भारतीय बार समितीची स्थापना.
- याच समितीच्या शिकारशिच्या आधारावर,
- Advocate Act 1961 पारित करण्यात आला. व यात. बार कौन्सिल ऑफ इंडियाची तरतुद करण्यात आली. याचा मुख्य उद्देश वकिली व्यवसायाची मानके ठरविने गरिबांना कायदेशीर सहाय्य मिळुन देणे. व न्यायीक सुधारणा प्रत्येक राज्य स्तरावर याची तरतुद करण्यात आलेली. आहे.

न्यायालयिन अवमान

- सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय म्हणून ओळखल्या जाते यांच्या अनेक कारणापैकी एक कारण म्हणजे, हे न्यायालय स्वतःच्या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्यास किंवा न्यायदानामध्ये अडचन निर्माण झाल्यास दंड करु शकते.
- न्यायालयीन अवमान या शब्दाची व्याख्या संविधानात स्पष्ट करण्यात आलेली नाही. तर यासाठी संन्याळ समितीची स्थापना. करण्यात आली.
- सध्या भारतात, न्यायालयीन अवमान कायदा 1971 चालत असुन या अंतर्गत दिवानी अवमान व कोददारी अवमान. अशी करण्यात आलेली आहे.



- न्यायालयीन अवमानाचा अधिकार हा फक्त सर्वोच्च व उच्च न्यायालयाला आहे. परंतु ही दोन्ही न्यायालये इतर न्यायालयाबाबतीत सुरक्षा याचिका दाखल करून घेऊ शकते.

—— जनहित याचिका

- जनहित याचिका हे कल्याणकारी राज्याच्या दृष्टीने एक महत्वाचे पाऊल समजण्यात येते.

- जनहित याचिका हे भारतीय न्याय व्यवस्थेचे एक बदलते स्वरूप आहे.

- सार्वजनिक अन्यायाचे निराकरण
  सार्वजनिक कर्तव्यपालनाची सक्ती.
- हक्काचे संरक्षण या हेतुने न्यायालयापुढे उभे केले जाणारे खटले म्हणजे जनहित याचिका होय.

- जनहित याचिकेची सुरुवात प्रथम अमेरिकेत झाली. त्याला " गिडन केस " म्हणतात.

- भारतात याची सुरुवात,

केस- **हुसेन आरा खातुन V/S बिहार राज्य.**

- या केसपासुन मानन्यात येते.

- या केसमध्ये, P.N. भगवती यांनी हुसेन आरा खातुन या महिलेच्या याचिकेवर निर्णय दिला.

- या केसमध्ये वकिलाची भूमिका - कपिला हिंगोराणी यांनी बजावली त्यामुळे त्यांना जनहित याचिकेची " माता " असे म्हणतात, तर P.N भगवती यांना जनहित याचिकेचा " पिता " म्हणतात.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

- जनहित याचिकेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने, डिसेंबर 1988 मध्ये काही दिशा निर्देश प्रसिद्ध केले.

- त्यानुसार, जनहित याचिका ही कोणत्या मुद्द्यांवर असावी. याचे स्पष्टीकरण केले. त्यामध्ये.

① स्त्रीया
② वेठबिगार
③ असंघटीत कामगार
④ अल्पसंख्यांक समाज
⑤ दुर्बल घटक
⑥ कैदी.
⑦ दंगलग्रस्त पिडितांची याचिका.
⑧ खाद्य पदार्थ भेसळ
⑨ पर्यावरण
⑩ अ.जाती व अ.जमाती यांच्यावर पोलिसांकडून अत्याचार.

— या बाबीसंदर्भात याचिका दाखल होऊ शकते.

— प्रस्तावनेचे जे तत्व आहे ते तत्व प्रत्यक्षात उतरावयाचे काम जनहित याचिका करते. सर्वोच्च न्यायालयाने याचा दूरूपयोग होऊ नये म्हणून, 1994 मध्ये काही निर्देश स्पष्ट केले आहे.

— ① जनहित याचिका फक्त HC आणि SC मध्येच दाखल करता येते. याचिका ही जनहितासाठी दुर्बलांनी असावी.

— ② याचिकेमागे वैयक्तिक हित नसावे.

— ③ न्यायदानास विलंब होत असेल किंवा न्याय मिळत नसेल तरच याचिकेचा वापर करावा.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

NALSA [National Legal Service Authority]

① व्यक्तींना मोफत न्यायविषयक सल्ला देण्यासाठी.
~~1988~~ 1987 मध्ये, NALSA पारित करण्यात आला. ज्याचा संबंध DPSP च्या कलम-39(A) संदर्भात येतो.

— मोफत व न्यायविषयक सल्ला देण्याचे दृष्टीने.
पाऊल उचलनारे पहिले राज्य - बॉम्बे.
पहिले संस्थान - त्रावणकोर

— मुंबई प्रांताने 1950 साली या संदर्भात P.N. भगवती यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती.
— व या समितीच्या आधारावरच,
न्यायिक सहाय्यता मंडळाची स्थापना
अध्यक्ष - PN भगवती.
— यांच्या अध्यक्षतेखाली समिती.
— याने प्रभावित होऊन केंद्र सरकारने, कृष्णा अय्यर यांच्या अध्यक्षतेखाली,
The committee on Free Legal Aid.
ची स्थापना.
— व या समितीचा प्रभाव म्हणजे, 42 व्या घटना दुरूस्तीने कलम-39(A) हे कलम समाविष्ट करण्यात आले.
— या कायदयानुसार, मोफत आणि न्यायिक सल्ला देण्यासाठी,
① राष्ट्रीय विधी सहाय्यता प्राधिकरण
② राज्य विधी सहाय्यता प्राधिकरण
③ जिल्हा विधी सहाय्यता प्राधिकरण
④ तालुका विधी सहाय्यता प्राधिकरण.
— यांची स्थापना करण्यात आली.

— या कलमा अंतर्गत, लोक अदालत चा सुद्धा स्थापना करण्यात आली.

— या कायद्यानुसार पुढील व्यक्तींना मोफत आणि न्यायिक सल्ला मिळु शकतो.

① अ.जाती व अ.जमा चे सदस्य.

② BPL प्रवर्गातील सर्व सदस्य.

③ SC मध्ये, मध्ये मोकत सल्ला मिळण्यासाठी संबंधीत व्यक्तीचे उत्पन्न 50,000 पेक्षा जास्त. असता कामा नये. व.
इतर न्यायालयासाठी ही तरतुद 25000 ची.

④ मानवी व्यापार व भिकोकरी पीढी.

⑤ औद्योगिक कामगार.

— या व्यतिरिक्त जर NALSA संस्थेला खात्री झाली. तर व्यक्तीला मोफत न्यायिक सल्ला दिला जाऊ शकतो.

लोकअदालत

- लोकअदालत ही गांधीजींच्या तत्वावर चालणारी संस्था आहे.
- जलद गतीने न्यायालयाचा निपटारा व्हावा हा याचा मुख्य उद्देश.
- लोकअदालताचा दर्जा हा दिवानी न्यायालयाचा असतो.
- लोकअदालतेचा निर्णय मान्य केल्यास हे बंधनकारक असतात.
  - म्हणजे याविरुद्ध अपिल करता येत नाही.
- व अमान्य असल्यास ति केस मुळ स्थितित परत जाते.
- दोन्ही पक्षकार सहमत असेल तरच केस लोक अदालत मध्ये जाऊ शकते.
- लोक अदालतिला peoples court असेही म्हणतात.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

ग्रामन्यायालय

- सुरुवातीला ग्रामपंचायत हीच ग्रामन्यायालय होती परंतु या वेगळे करण्याचे काम Village court Act 1888 ने केले.

- 1909 च्या कायद्यानुसार जेव्हा भारतामध्ये विकेंद्रीकरणाला सुरुवात झाली तेव्हा ग्राम न्यायालयाला उर्जित अवस्था प्राप्त झाली.

- मे 1915 मध्ये सरकारने ठराव पारित करून हा विषय राज्य शासनाकडे सोपविला. तेव्हापासून, ग्रामन्यायालय हा राज्यसूचीचा विषय आहे.

- स्वातंत्र्यानंतर सुद्धा ही तरतूद तशीच राहिली.

- DPSP मधील काही तरतुदी सुद्धा याला प्रमोट करतात.

- 1980 नंतर जेव्हा भारतामध्ये विकेंद्रीकरणाला सुरुवात झाली तेव्हा ग्रामन्यायालय व ग्रामपंचायत यांना उर्जित अवस्था प्राप्त झाली.

- 2004 मध्ये सर्वप्रथम- उपेंद्र बक्षी समिती स्थापना.
- या समितीच्या शिफारशीच्या आधारावर ग्रामन्यायालय 2008 पारित करण्यात आला.

- आतापर्यंत 7 राज्यांनी ग्राम न्यायालय स्थापन केले आहे.

- महाराष्ट्राचा यात समावेश होत नाही.

- यामध्ये आरक्षणाची तरतूद लागू होऊ शकते.

- याविरुद्ध अपील जिल्हा न्यायालय किंवा जिल्हासत्र न्यायालयात करता येऊ शकते. परंतु ६ महिन्याच्या आत.

- या कायद्याचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक कार्यकर्त्यांना मध्यस्थ भूमिका पार पाडण्यासंबंधी स्वीकार केला आहे.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

कौटुंबिक न्यायालय [Family court]

- 1953 मध्ये, दुर्गाबाई देशमुख यांच्या चीन दौऱ्यानंतर भारतामध्ये कौटुंबिक न्यायालयांची चळवळ निर्माण झाली.

- 1914 आ विधी आयोगाने या प्रकारची तरतुद केली होती. व याचा परिणाम म्हणजे Family Court, 1984 पारित करून भारतामध्ये कौटुंबिक न्यायालयाची स्थापना करण्यात आली.

- घटस्फोट, पोटगी, मुलाचे पालकत्व व विवाह यासंबंधी मुद्दे हे या न्यायालयात चालतात.


- 10 लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरात हे न्यायालय प्रस्थापित आहे.

- महाराष्ट्रातील पहिले कौटुंबिक न्यायालय - पुणे.
  दूसरे कौटुंबिक न्यायालय - मुंबई.

  - याला civil court चा दर्जा प्राप्त आहे.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

जिल्हा न्यायालय [Distric Court]



PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

केंद्र - राज्य संबंध

- भारतामध्ये संघराज्यीय व्यवस्था स्वीकारल्यामुळे भारतामध्ये लिखित राज्यघटना हे एक वैशिष्ट्य आढळून येते.

- या राज्य घटनेमध्ये केंद्र - राज्य यांच्या अधिकाराची स्पष्टपणे विभागणी करण्यात आली आहे.

- भारतीय संविधानाचे संपूर्ण भाग - 11 व भाग - 12 मध्ये. कलम - 268 ते कलम - 293 (वित्तीय) मध्ये. विभागणी करण्यात आलेली आहे.

- केंद्र व राज्य यांच्या अधिकारांची विभागणी भूप्रदेश व विषय यांच्यानुसार करण्यात आलेली आहे.

- जरी केंद्र आणि राज्य यांच्या अधिकाराची विभागणी करण्यात आली असली तरी दोघांच्या संबंधांमध्ये एकवाक्यता दिसून येत नाही.

  - याचे कारण, संविधान निर्मितीच्या वेळी. भारतामध्ये एका पक्षाचे सरकार होते.

  - परंतु, 1967 च्या निवडणूकीत कित्येक राज्यात. बिगर. कांग्रेस सरकार आले. व येथुन केंद्र राज्य संबंध बिघडायला. सुरुवात.

- हे संबंध बिघडण्याचा आधार म्हणजे,
  1. राज्यपाल नियुक्ती
  2. राष्ट्रपती राजवट / राज्य आणीबाणी
  3. राष्ट्रपतिच्या विचारार्थ राज्यपालाकडून विधेयक पाठवणे.
  4. कायदा व सुव्यवस्थेसाठी केंद्र दलाची नियुक्ती करणे.
  5. राज्य सुचीतील विषयांवर केंद्राचे अतिक्रमण.
  6. आर्थिक बाबतीत राज्यात मतभेद.

परिवर्तन
Competitive Forum

MPSC/UPSC

परिवर्तन

Competitive Forum

- अभिजीत राठोड

IAS / राज्यसेवा / PSI/ STI/ ASO

नवीन बॅचसाठी

रजिस्ट्रेशन चालू

अर्थव्यवस्था

- आतापर्यंत MPSC च्या सर्व परीक्षामधील अर्थव्यवस्था या घटकातील 85%प्रश्न जशासतसे (जुन्या विद्यार्थ्यांकडून पडताळणी करून घेणे किंवा क्लास नोटस् व प्रिंटेड नोटस् पाहणे.)
- पहिल्या 15 तासिकामध्ये The Hindu News Paper मधील Business Page वरील News समजण्याची हमी.
- Datt & Sundaram, Uma Kapila, Shriram IAS नोटस् व इतर राष्ट्रीय पुस्तके मराठीमध्ये करून शिकविण्यात येईल.
- अर्थव्यवस्थेवरील आधारीत निबंध घेण्यात येईल.(राज्यसेवा मुख्य व UPSC मुख्य परीक्षेमधील)
- Banking, S.S.C. ची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी क्लासला येवू नये. फक्त क्लास MPSC/UPSC ची तयारी करणाऱ्यांसाठी.

राज्यव्यवस्था

- राज्यसेवा मुख्यपरीक्षा व साहाय्यक मुख्य परीक्षा संपूर्ण पेपर-2 घेण्यात येईल.
- मुलभूत संकल्पनेवर भर
  - धर्मनिरपेक्षता – समाजवाद
  - अल्पसंख्यांक – एकात्मता
  - प्रजासत्ताक – अस्पृश्यता
- न्यायालयीन निर्णयाची विषयासोबत सांगड.
- राज्यव्यवस्थेविषयी चालू घडामोडी स्वतंत्रपणे घेण्यात येईल व नोटस देण्यात येतील.
- सर्व राष्ट्रीय पुस्तकांचा संदर्भ घेऊन शिकवण्यात येईल.
- निबंधासाठी उपयुक्त (राजकीय व्यवस्थेवर आधारित निबंध)
- कायद्यावर भर (नोट्स व विश्लेषण)
- 3 ते 3.5 महिन्याची बॅच असेल (तीन महिने सलग वेळ असेल तरच येणे.)

अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel-
@abhijitrathod join करा.

– अभिजीत राठोड

ी चिंतामणी बिल्डींग (दुसरा मजला), न्यु इंग्लिश स्कूल समोर,
ानप्रबोधिनीच्या पाठीमागे, टिळक रोड, सदाशिव पेठ, पुणे. 9272100 50

केंद्र-राज्य संबंध

- केंद्र – राज्य संबंधाचा अभ्यास 3 आधारावर

1. कायदेविषयक संबंध
2. प्रशासकीय संबंध
3. वित्तीय संबंध

कायदेविषयक संबंध

- घटनेतील भाग XI मधील कलम 245 ते 255.
- केंद्र–राज्य कायदेविषयक संबंधाच्या 4 बाजू
  1. केंद्र व राज्यांच्या कायद्यांचा प्रादेशिक विस्तार
  2. कायदेविषयक विषयांची विभागणी
  3. राज्य विषयांवर कायदे करण्याचा संसदेचा अधिकार
  4. राज्य कायद्यांवरील केंद्राचे नियंत्रण

१. केंद्र व राज्यांच्या कायद्यांचा प्रादेशिक विस्तार–

- भारताच्या राज्यक्षेत्राच्या सर्व किंवा कोणत्याही भागासाठी साठी कायदे करण्याचा अधिकार संसदेला.
- राज्याच्या सर्व किंवा कोणत्याही भागासाठी कायदे करण्याचा अधिकार राज्य विधीमंडळाला.
- राज्य विधीमंडळाने केले कायदे केवळ राज्यातच लागू.
- राज्यक्षेत्राबाहेरील कायदे करण्याचा अधिकार केवळ संसदेला त्यामुळे हे कायदे भारतीय नागरीक व त्याच्या संपत्तीला जगाच्या कोणत्याही भागात लागू.

मर्यादा–

- एखादा संसदीय कायदा राज्यातील अनुसूचित क्षेत्रास लागू होणार नाही किंवा बदल/अपवादांसहित लागू होईल असा निर्देश देण्याचा अधिकार राज्यपालास.
- अंदमान व निकोबार बेटे, लक्षद्वीप, दादरा नगरहवेली आणि दमण व दीव या 4 केंद्रशासित प्रदेशांच्या शांतता, प्रगती व सुशासनासाठी नियमने करण्याचा अधिकार राष्ट्रपतीस.
- अशा नियमनास संसदीय कायद्याचा दर्जा व अंमल प्राप्त
- मेघालय, त्रिपुरा व मिझोराम या राज्यातील आदिवासी क्षेत्रांना व आसाममधील आदिवासी क्षेत्रांना एखादा संसदीय कायदा लागू होणार नाही किंवा बदल/अपवादांसहित लागू होईल असा निर्देश देण्याचा अधिकार अनुक्रमे राष्ट्रपतीला व आसामच्या राज्यपालास.

२. कायदेविषयक विषयांची विभागणी (सातव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट)

संघसूची	राज्यसूची	समवर्तीसूची
1. कायदा करण्याचा अधिकार केवळ संसदेस	1. कायदा करण्याचा अधिकार राज्यविधी-मंडळाला	1. कायदा करण्याचा अधिकार संसद व राज्यविधीमंडळाला
2. मूळ घटनेत 97 विषय सध्या 100 विषय	2. मूळ घटनेत 66 विषय सध्या 61 विषय	2. मूळ घटनेत 47 विषय सध्या 52विषय
3. 2ए, 192ए, 92बी आणि 92 सी क्रमांकाचे विषय नव्याने समाविष्ट	3. 11, 19, 20, 29 व 36 क्रमांकाचे विषय वगळले.	3.11ए, 17ए, 17बी 20ए,33ए क्रमांकाचे विषय नव्याने समाविष्ट
4. संरक्षण, बँकिंग, अणू ऊर्जा, चलन, परकीय कामकाज, विमा, संचार, आंतर-राज्यीय व्यापार व वाणिज्य, लेखा-परिक्षण, जनगणना इ. विषयांचा समावेश	4. सार्वजनिक व्यवस्था, पोलीस, सार्व. आरोग्य व स्वच्छता, कृषी, तुरुंग स्थानिक शासन, मत्स व्यवसाय, बाजारपेठा सिनेमागृहं, जुगार इ. विषयांचा समावेश	4. फौजदारी कायदा, नागरी कायदा, विवाह व घटस्फोट, लोकसंख्या, नियंत्रण व कुटुंब नियोजन, वीज, कामगार कल्याण, आर्थिक व सामाजिक नियोजन, वजने व मापे इ.विषयांचा समावेश

शेषाधिकार (वरील तीन्ही समाविष्ट नसलेले विषय)

- विषयांवर कायदे करण्याचा अधिकार संसदेस (कॅनडाप्रमाणे). कर लावण्याचाही कर अधिकार अंतर्भूत.
- युएसए आणि ऑस्ट्रेलियाच्या घटनेत केवळ संघराज्य सरकारचे अधिकार दिलेले, शेषाधिकार राज्यांकडे.
- कॅनडाच्या घटनेत संघराज्यीय व प्रांतिक अधिकार, शेषाधिकार केंद्राकडे.
- भारत शासन कायदा 1935 नुसार शेषाधिकार भारताच्या गव्हर्नर जनरलकडे होते.
- संघ व राज्य सुचीतील विषयांवर केलेल्या कायद्यांमध्ये संघर्ष निर्माण झाल्यास केंद्राचा कायदा वरचढ ठरतो.
- समवर्ती सूचीतील विषयांवरील केंद्र व राज्य कायद्यात विसंगती/संघर्ष निर्माण झाल्यास केंद्राचाच कायदा वरचढ ठरतो.

३. राज्य विषयांवर कायदे करण्याचा संसदेचा अधिकार–

- पुढील 5 परिस्थितीत राज्य सुचीतीत कोणत्याही विषयावर कायदा

करण्याचा अधिकार संसदेला.

1. राज्यसभेच्या ठरावाद्वारे–

- राज्यसभेने हजर व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या 2/3 बहुमताने तसा ठराव पारित केल्यास.

2. राष्ट्रीय आणीबाणीदरम्यान–

- राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा चालू असताना.
- आणीबाणी संपुष्टात आल्यानंतर अशा संसदीय कायद्याचा अंमलही 6 महिन्यानंतर संपुष्टात येतो.

3. राज्यांमधील कराराद्वारे–

- दोन/अधिक राज्यांच्या विधीमंडळांनी ठराव पारित करून संसदेस विनंती केल्यास.

अशा तरतुदींच्या आधारे संमत करण्यात आलेले काही कायदे–

- पारितोषिक स्पर्धा कायदा,1955
- वन्यजीव (संरक्षण) कायदा, 1972
- जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, 1974
- शहरी भूमी (कमाल मर्यादा व नियमन) कायदा, 1976
- मानवी अंगे रोपण कायदा, 1994 इ.

4. आंतरराष्ट्रीय करारांच्या अंमलबजावणीसाठी–

यासाठी केलेले कायदे–

- संयुक्त राष्ट्रे (विशेषाधिकार व संरक्षण) कायदा, 1947
- जिनेव्हा कन्व्हेन्शन कायदा, 1960
- ॲन्टी हायजॅकिंग ॲक्ट, 1982

5. राष्ट्रपती राजवटी दरम्यान–

- राज्यातील राष्ट्रपती राजवट संपुष्टात आल्यानंतरही हा कायदा त्या राज्यासाठी लागू राहतो.
- वित्तीय आणीबाणीदरम्यान धनविधेयके आणि इतर वित्तीय विधेयक राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवण्याचे ते राज्यांना निर्देश देऊ शकतात.

४. राज्य कायद्यांवरील केंद्राचे नियंत्रण–

- राज्य विधीमंडळामध्ये राज्य सुचीतील काही विषयांशी संबंधीत विधेयके केवळ राष्ट्रपतींच्या पूर्वसंमतीनेच मांडता येतात.
- वित्तीय आणीबाणीदरम्यान धनविधेयके आणि इतर वित्तीय विधेयके राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवण्याचे ते राज्यांना निर्देश देऊ शकतात.
- राज्यपालाने राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवलेल्या विधेयकांबाबत पूर्ण नकाराधिकार प्राप्त.

प्रशासकीय संबंध–

- भाग XI मधील कलम 256-263
- संघसूचीतील ज्या विषयांबाबत संसदेला कायदेकारी अधिकार आहे. त्याबाबतचे सर्व कार्यकारी अधिकारही प्राप्त आहेत.
- राज्यसूचीतील ज्या विषयांबाबत घटकराज्यांना कायदेकारी अधिकार आहे. त्याबाबतचे सर्व कार्यकारी अधिकारही आहेत. मात्र ते राज्याच्या प्रदेशापुरतीच मर्यादित.
- समवर्ती सूचीतील विषयांबाबत कायदेकारी अधिकार केंद्र व राज्य दोघांना प्राप्त मात्र कार्यकारी अधिकार सामान्यतः राज्यांना प्राप्त.

केंद्राचे राज्यांना निर्देश

- राज्यात अनुसूचित जमातींच्या कल्याणासाठी विशिष्ट योजनांच्या अंमलबजावणीबाबत
- राज्यात रेल्वेच्या संरक्षणासाठी घ्यावयाच्या उपायांबाबत
- राष्ट्रीय/लष्करी महत्त्वाच्या म्हणून घोषित करण्यात आलेल्या दळणवळणाच्या साधनांची बांधी व त्यांचा रखरखाव ठेवण्याबाबत.
- भाषिक अल्पसंख्यांक गटांतील मुलांना त्यांच्या मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण देण्यासाठी पर्याप्त सुविधांची तरतुद करण्याबाबत.

परस्परांना कार्यकारी अधिकार प्रदान करणे.

- केंद्र व राज्यांमध्ये कायदेकारी अधिकारांची विभागणी ताठर असल्याने केंद्र आपले कायदेविषय अधिकार राज्यांना प्रदान करू शकत नाही.
- मात्र कार्यकारी अधिकारांच्या विभागणीबाबत ताठरता कमी असल्याने केंद्र व राज्ये परस्परांना आपले कार्यकारी अधिकार प्रदान करू शकतात.

केंद्र व राज्यांमध्ये सहकार्य–

- आंतरराज्यीय जलविवाद अधिनियम, 1956 (कलम 262)नुसार, आंतरराज्यीय नद्या/नदीखोरे यांतील पाण्यांच्या वाटपासंबंधी वाद मिटविण्याचा अधिकार संसदेला.
- आंतरराज्यीय परिषद (कलम 263)–राष्ट्रपतींच्या आदेशाद्वारे 1990 मध्ये स्थापन

कार्य–

- राज्याराज्यांमधील तंटे-वादांची चौकशी करून त्याबाबत सल्ला देणे.
- केंद्र व राज्यांमधील सामाईक हिताच्या विषयांचे अन्वेषण व चर्चा करणे.

अखिल भारतीय सेवा–

- IAS (भारतीय प्रशासकीय सेवा), IPS (भारतीय पोलीस सेवा), IFS(भारतीय वन सेवा)
- नवीन अखिल-भारतीय सेवा निर्माण करण्याचा अधिकार राज्यसभेला (कलम 312)

लोकसेवा आयोग–

- राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष व सदस्याची नेमणूक राज्यपालामार्फत, मात्र पदावरून दूर करण्याचा अधिकार केवळ राष्ट्रपतीला.
- संयुक्त लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्याची नियुक्ती राष्ट्रपतीमार्फत.
- संघ लोकसेवा आयोग एखाद्या राज्याच्या राज्यपालाच्या विनंतीनुसार व राष्ट्रपतीच्या संमतीनुसार त्या राज्यात मदत करू शकतो.

उत्तम-मोती बिल्डींग (दुसरा मजला), नागनाथपार-शनिपार रोड, रमेश डाईंग जवळ, सदाशिव पेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.
9272100500

एकात्मिक न्यायव्यवस्था-

- भारतात दुहेरी शासनपद्धती मात्र एकेरी/एकात्मक न्यायव्यवस्था- (न्यायदान प्रक्रियेतील राज्याराज्यातील वैविध्य कमी करण्याची अशी व्यवस्था)
- उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाची नेमणूक राष्ट्रपतीमार्फत (सर्वोच्च न्यायालयाने सरन्यायाधीश व राज्याचे राज्यपालाचा विचार घेऊन), तसेच त्यांना पदावरून दूर करण्याचा/बदली करण्याचा अधिकार केवळ राष्ट्रपतीला.

आणीबाणी दरम्यानचे संबंध

- राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केल्यास (कलम 356) राष्ट्रपती राज्य शासनाची कार्ये व राज्यपालाचे अधिकार आपल्याकडे घेऊ शकतो.
- आर्थिक आणीबाणी दरम्यान (कलम 360), राज्य सेवेतील व्यक्तींचे तसेच उच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे पगार कमी करण्याबाबत राष्ट्रपती राज्यांना निर्देश देऊ शकतात.

इतर तरतुदी-

अ. केंद्र शासनावरील कर्तव्ये (कलम 355)-

- बाह्य आक्रमणा व अंतर्गत अशांततेपासून प्रत्येक राज्याचे संरक्षण करणे.
- प्रत्येक राज्याचे प्रशासन घटनात्मक तरतुदींना अनुसरुन असल्याचे सुनिश्चित करणे.

ब. राज्याचे घटनात्मक प्रमुख म्हणून कार्य करीत असतांनाच राज्यपाल राष्ट्रपतीचे प्रतिनिधी म्हणून कार्य करतात. (कारण राज्यपालाची नेमणूक राष्ट्रपतीमार्फत, राष्ट्रपतीची मर्जी असे पर्यंत ते आपले पद धारण करतात.)

क. राज्य निवडणूक आयुक्ताची निवड राज्यपालाद्वारे, पदावरून दूर करण्याचा अधिकार केवळ राष्ट्रपतीला

वित्तीय संबंध-

- भाग XII मधील कलम 268 ते 293

कराधिकारांची विभागणी-

- संघ सूचीतील विषयांवर कर आकारण्याचा अधिकार केवळ संसदेस
- राज्य सूचीतील विषयांवर कर आकारण्याचा अधिकार केवळ राज्य विधानमंडळाला
- समवर्ती सूचीतील विषयांवर कर आकारण्याचा अधिकार संसद तसेच राज्य विधानमंडळाला.
- कर आकारणीची शेषाधिकार संसदेकडे.

राज्यांच्या कराधिकारावरील बंधने-

अ. व्यवसाय, व्यापार, आजिविका आणि नोकऱ्या यांवर कर आकारण्याचा अधिकार राज्य विधानमंडळाला

ब. वस्तूंच्या (वर्तमानपत्रे वगळता) खरेदी विक्रीवर कर आकारण्याचा अधिकार राज्य विधानमंडळाला, मात्र या अधिकारावर बंधने-

1. केवळ राज्यांतर्गत खरेदी-विक्रीकर कर आकारण्याचा अधिकार

2. आयात-निर्यातीदरम्यान, आंतरराज्यीय व्यापार व वाणिज्यादरम्यान झालेल्या खरेदी-विक्रीवरकर आकारता येत नाही.

3. तंबाखू, साखर, रेशीम, सुती व वूलन कपडे सारख्या महत्त्वाच्या म्हणून घोषित केलेल्या वस्तूंच्या खरेदी-विक्रीवर लावण्यात आलेल्या कर संसदेने निश्चित केलेल्या बंधनांच्या व अटींच्या अधीन

क. 1.भारत सरकारने वापरलेल्या/भारत सरकारला विकलेल्या.

2. भारत सरकारने/संबंधित रेल्वे कंपनीने रेल्वेची बांधणी, देखभाल/रेल्वे चालविण्याच्या कामासाठी वापरलेल्या/त्यांना विकण्यात आलेल्या विजेवर राज्य विधानमंडळ कर आकारू शकत नाही.

कर महसुलाची विभागणी-

- 80 व्या घटनादुरुस्तीनुसार (2002), केंद्राने आकारणी व वसुली केलेल्या सर्व करांची सरचार्ज व सेस वगळता विभागणी केंद्र व राज्यामध्ये.
- 268 ए- सेवा कराशी संबंधीत नवीन कलम.
- 92 सी- नवीन विषय (सेवांकरीता कर)
- वरील बदल 88 वी घटनादुरुस्तीनुसार, 2003
- सेवा कराची आकारणी-केंद्र सरकार
- वसुली व नियोजन -केंद्र व राज्ये दोघेमिळून

कलम 268- केंद्राची आकारणी, वसुली व विनियोजन राज्यांनी केलेले कर

1. संघ सूचीतील मुद्रांक शुल्के- विनिमय पत्रे, धनादेश, विमा पॉलिसी, वचनपत्रे, शेअरचे हस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क.

2. औषधीय व प्रसाधन पदार्थांवरील उत्पादन शुल्के.

- वरील करांचे उत्पन्न भारताच्या संचित भाग होणार नसून, राज्याला नेमून दिले जातील.
- कलम 268 A केंद्राची आकारणी, केंद्राने व राज्यांनी वसुली व विनियोजन केलेला सेवा कर.
- कलम 269- केंद्राची आकारणी व वसुली, पण राज्यांना नेमून दिलेले कर.
- आंतरराज्यीय व्यापाऱ्यादरम्यान होणाऱ्या वस्तूंच्या (वर्तमानपत्रे वगळून) खरेदी विक्रीवरील कर, पाठवणीवरील कर.
- कलम 270- केंद्राची आकारणी व वसुली, केंद्र व राज्यांत वितरित करण्यात येणारे कर.
- कलम 268, 268A- आणि 269 मधील उल्लेखलेले कर व शुल्के
- कायद्याने ठरविलेले उपकर
- कलम 271 मध्ये उल्लेखलेल्या करव शुल्कांवरील अधिभार
- कधीही कलम 269 आणि 270 मध्ये उल्लेखलेल्या कर व शुल्कांवर अधिभार आकारण्याचा अधिकार संसदेला.

राज्यांची आकारणी, वसुली व विनियोजन करावयाचे कर-

- संपूर्णपणे राज्यांच्या अखत्यारितील कर

1. जमीन महसूल

2. कृषि उत्पन्न, उत्तराधिकार यावरील कर, तसेच कृषि भूमीवरील मालमत्ता कर

Parivartan Competitive Forum CLASS NOTES PARIVARTAN COMPETITIVE FORUM

3. जमीन व इमारती, खनिज हक्क, प्राणी व नौका, वाहने, करमणूक, सट्टेबाजीवरील कर, विक्री कर (वर्तमानपत्रे वगळून)

4. मानवी सेवनाकरता मद्यार्कयुक्त दारू, डोईपट्टी, पथकर

5. अफू, भांग, अन्य अंमली औषधीद्रव्ये व अंमली पदार्थ (मद्यार्कयुक्त औषधी व प्रसाधन पदार्थ वगळता) इ.

करेतर महसुलाचे वितरण–

अ.केंद्राच्या करेतर महसुलाचे स्त्रोत– पोस्ट व टेलिग्राफ, रेल्वे, बँकिंग, प्रसारण, नाणे व चलन, केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रम

ब. राज्यांच्या करेतर महसुलाचे स्त्रोत– जलसिंचन, वने, मत्स्य व्यवसाय, राज्य सार्वजनिक क्षेत्र उपक्रम.

राज्यांना सहाय्यक अनुदाने

वैधानिक अनुदाने
(राज्यांना वित्त आयोगाच्या शिफरशीनुसार)

साधारण अनुदाने – वित्तीय सहाय्याची गरज असलेल्या राज्यांनाच (अशी अनुदाने सर्व राज्यांसाठी नसतात)

विशिष्ट अनुदाने –कोणत्याही राज्यातील अनु. जमातींच्या कल्याणासाठी/अनु. क्षेत्राच्या प्रशासनाचा दर्जा उंचावण्यासाठी नसलेला तरी अशी स्वेच्छाधिन अनुदाने देता येतात. अशी अनुदाने देणे बंधनकारक नाही.

स्वेच्छाधिन अनुदाने – केंद्र व राज्यांना कोणत्याही सार्व.उद्देशासाठी अनुदाने देण्याचा अधिकार संसदेला/राज्य विधानमंडळाला.

वित्त आयोग (कलम २८०)–

- अर्ध–न्यायिक संस्था
- वित्त आयोगाची स्थापना–राष्ट्रपती–दर 5 वर्षांनी किंवा त्या आधीच

वित्त आयोगाचे कार्ये (राष्ट्रपतींना शिफारशी करण्याबात)–

- केंद्रीय विभाजनक्षम कर महसुलाची विभागणी केंद्र व राज्यांमध्ये तसेच विविध राज्यांमध्ये करण्याबाबत शिफारशी.
- केंद्राने संचित निधीतून राज्यांना द्यावयाच्या सहाय्यक अनुदानांची तत्वे.

केंद्र व राज्यांची कर्ज उभारणी–

- राज्य विधानमंडळ राज्याच्या संचित निधीच्या प्रतिभूतीवर भारतातून कर्जे घेऊ शकते, कर्जहमी देऊ शकते. (राज्य शासन परदेशातून कर्जे घेऊ शकत नाही.)
- केंद्राने राज्यांना द्यावयाच्या कर्जाची रक्कम भारताच्या संचित निधीवर प्रभारीत.
- केंद्राने राज्याला दिलेल्या कर्जाचा कोणताही भाग थकित असल्यास राज्याला केंद्राच्या संमतीविना कर्ज घेणे अशक्य. ●●●

Competitive Forum

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

पहिला - प्रशासकीय सुधारणा आयोग, 1966

[1st Administrative Reform commission]

अध्यक्ष - मोरारजी देसाई.

व यानंतर, एन. हनुमंत राय. अध्यक्ष बनले.

- या आयोगाने केंद्र - राज्य संबंधाविषयी एकुण 22 शिफारशी सादर केल्या. त्यापैकी,

- ① केंद्राने कलम. 356 चा वापर करताना तो देशाच्या एकता आणि अखंडतेसाठी करावा.

- ② राज्यांना जास्तीत जास्त विविध सहाय्यता देण्यात यावी.

- ③ समवर्ति सुचित कायदा करत असताना तो परस्पर संमतीने करावा.

④ राज्यपालाची नियुक्ती करताना मुख्य मंत्र्याला विश्वासात घ्यावे आवश्यक

-- राज्यपालपदी अशा व्यक्तीची निवड करावी त्याचा राजकारणाशी काही संबंध नसेल.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

राजमन्नार समिती, 1969

- 1969 मध्ये DMK कडून स्थापन
- याचा मुख्य उद्देश, केंद्र-राज्य संबंधाचे सर्वांगिन परिक्षण करणे.

व या समितीने पुढील काही शिकारशी दिल्या.

- ① संरक्षण, परराष्ट्र धोरण या व्यतिरिक्त अन्य सर्व मुद्दयांसाठी राज्यांना विश्वासात घ्यावे.
- ② नियोजन आयोगाच्या जागी एक संविधानिक संस्था स्थापन करण्यात यावी.
- ③ All India service ची समाप्ती.
- ④ शेषाधिकाराची समाप्ती करण्यात यावी. किंवा त्याची आणखी जास्त विभागणी करावी.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
CLASS NOTES
By-Abhijit Rathod

आनंदपूर शाही प्रस्ताव

- 1973 मध्ये पंजाब येथे भरलेल्या अकाली दलाचा संम्मेलनामध्ये काही राजकीय व काही धार्मिक अशा मागण्या असणारा हा ठराव पारित करण्यात आला यामध्ये,

- ① केंद्राकडे फक्त 3- संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, दळणवळण. आणि चलने इत्यादी मर्यादित अधिकार असावे.

- ② संविधान खऱ्या अर्थाने संघराज्य करण्यात यावे.

- ③ केंद्रामध्ये सर्व राज्यांना समान प्रतिनिधित्व

↓

हे दोन्ही प्रस्ताव अमान्य

↑

पश्चिम बंगाल स्मरण

- 1977 साम्यवादी पक्षाकडून

- ① संविधान मध्ये Union या शब्दाऐवजी Fedration. हा शब्द टाकावा.

- ② शेषाधिकार व उर्वरित विषय राज्याकडे असावे.

- ③ केंद्राचा अधिकार क्षेत्रात. फक्त संरक्षण, चलन, परराष्ट्र संचार आर्थिक समन्वय हेच विषय असावे.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES


सरकारीया आयोग

- वेगवेगळ्या राज्याकडून वारंवार केंद्र राज्य संबंधांची समिक्षा करण्यासाही वेगवेगळे आयोग स्थापन झाले व यामुळे कुटीरतादी प्रवृत्ती ला चालना.

- व या पार्श्वभुमीवर एक समग्र अभ्यास करणे आवश्यक व यासाठीचा इंदिरा गांधींनी. " सरकारिया आयोगाची स्थापना केली.

— हा आयोग त्रिसदस्यीय असुन. Jan - 1988 मध्ये याचा अहवाल प्रसिद्ध झाला.

- या अहवालचे सर्वात महत्वचे वैशिष्ट म्हणजे., हा अहवाल दोन भागात प्रसिद्ध करण्यात आला.



- याच्या एकुण 2.65 शिकारशी व या शिकारशी काही भागामध्ये विभागल्या होत्या.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

मदन मोहन पुंछी आयोग

- April-2007 मध्ये, माजी न्यायमुर्ती मदन मोहन पुंछी. यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रराज्य संबंधाचा पुर्नअभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली.

- ही समिती म्हणजे केंद्रराज्य संबंधांचा अभ्यासाविषयी एक समग्र अवलोकन करणारी समिती मानन्यात येते.

- या आयोगाने 1455 पानाचा अहवाल हा सादर केला.


- या आयोगाचा सर्वात महत्वाचा वैशिष्ट्य म्हणजे या आयोगाचे दूसऱ्या प्रशासकीय आयोगाचा शिफारशींचा आधार घेतला.

- या आयोगाला काही शिफारशी लागु केल्या असुन काही शिफारशी या अजुन बाकी आहे.

- 12 व्या आंतराष्ट्रीय परिषदेचा ~~बैठकीमधे~~ बैठकीमध्ये या समितीच्या शिफारशींचा पूर्नउच्चार केला गेला.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

अदिवासी क्षेत्र, अनुसुचित क्षेत्र



— आदिवासी क्षेत्र —

① आसाम
② मेघालय
③ त्रिपूरा
④ मिझोराम.

— या राज्यासाठी एक संकल्पना वापरण्यात येते.

— वरिल राज्यांमध्ये आदिवासी स्वायत्त जिल्ह्याची निर्मिती करण्यात येऊन तेथील प्रशासनामध्ये आदिवासींचा सहभाग वाढवला जातो.

— या भागाला 73 वी व 74 वी घटनादुरूस्ती लागु पडत नाही.

— प्रत्येक जिल्ह्यात एक स्वायत्त जिल्हा परिषद निर्माण करण्यात येत असुन त्यात 30 सदस्य असतात.

— त्यापैकी 4 हे राज्यपाल नियुक्त व उरलेले 26 हे लोकनियुक्त असतात.

कार्यकाळ - 5 वर्षे.

— प्रत्येक स्वायत्त जिल्ह्याची स्वतंत्रपणे विभागीय परिषदात विभागणी करण्यात येते.

- ही जिल्हा परिषद व विभागीय परिषद भूमी, वने, कालवे, स्थलांतरित शेती, ग्राम प्रशासन, वारसा विवाह. घटस्फोट, सामाजिक प्रथा इ. विषयावर कायदे करू शकते.

- या जिल्हा परिषदा व विभागीय परिषदा त्याच्या अधिकार क्षेत्रामध्ये जाती-जमातीतील दावे व खटले चालविण्यासाठी न्यायालय स्थापन करू शकते.

  - या न्यायालयावरिल, उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र संबंधीत राज्यपाल, उच्च न्यायाधीशाच्या सल्याने करेल.

- या जि.प. प्राथमिक शाळा, दवाखाने, बाजारपेठा सत्रम उदयोग इ. निर्माण करू शकतात.

- या जिल्हा परिषदा आदिवासी नसलेल्या लोकांनी पैसे व्याजाने देणे, अदिवासी नसलेले व्यक्तीने व्यापार करणे.

- यासाठी राज्यपालाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक

- संसदेने किंवा राज्य विधी मंडळाने एखादा कायदा पारित केला. तर तो स्वायत्त जिल्हाला लागु होत नाही. किंवा काही काही अपवादासह लागु होतो.

- स्वायत्त जिल्हे व त्यांच्या कार्याच्या पर्यवेक्षणासाठी राज्यपाल आयोग स्थापन करू शकतो.

★ अनुसुचित क्षेत्र

- आदिवासी क्षेत्र ही संकल्पना ही वरिल ५ राज्यांसाठी आहे. परंतु इतर राज्यांमध्ये जर आदिवासी बहुल क्षेत्र असेल. तर त्या क्षेत्रामध्ये त्यांच्या प्रशासनात सहभाग वाढवण्यासाठी अनुसुचित क्षेत्र ही संकल्पना आणण्यात आली.

- कुठलेही क्षेत्र हे अनुसुचित क्षेत्र हे ठरविण्याचा अधिकार राष्ट्रपतीला असेल.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

- अनुसूचित क्षेत्रात एक सल्लागार परिषद स्थापन करण्यात येते. यात 20 सदस्य असून त्यापैकी 75 % सदस्य हे राज्य विधिमंडळातील अनुसूचित जमातींचे प्रतिनिधित्व करणारे असतात.

- विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे. अनुसूचित जमाती क्षेत्र असलेल्या (आदिवासी क्षेत्र)

- परंतु 6 व्या परिशिष्टामध्ये समाविष्ट होत नसलेल्या क्षेत्राचा समावेश. राष्ट्रपती अनुसूचित क्षेत्रात करू शकतात.

- अनुसूचित क्षेत्रात संसद आणि राज्यविधीमंडळाचा कोणताही कायदा लागू पडत नाही. किंवा अपवादासह लागू पडतो.

- राज्यपाल आदिवासी सल्लागार परिषदेशी चर्चा करून या भागामध्ये शांततेसाठी नियम तयार करू शकतो.

* — आदिवासी क्षेत्र व अनुसूचित क्षेत्राच्या प्रश्नांच्या संबंधी व त्यांच्या कल्याणासंबंधी अभ्यास करण्यासाठी राष्ट्रपती कितीही आयोग स्थापन करू शकतो.

- या प्रकारचा पहिला आयोग 1960 मध्ये, यु. एन. ढेबर. यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन

- सध्या भारतामध्ये 10 राज्यात अनु. क्षेत्र असून महाराष्ट्राचा त्यात समावेश होतो.

- दुसरा आयोग 2002 मध्ये, दिलीप सिंग भुरिया यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन

- सर्वात जास्त अनु. क्षेत्र. महाराष्ट्रात - 27%.

- या भागामध्ये पंचायत राज्याचा अद्दी लागत नसून येथे PESA Act लागू पडतो.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

* आणीबाणी *

- भारताच्या संविधानात "पोलिस स्टेट" संबंधी काही तरतुदी आढळून येतात. व त्यातील एक घटक म्हणजे आणीबाणी

आणीबाणी

राष्ट्रीय आणीबाणी -राज्य आणीबाणी -वित्तीय आणीबाणी
-राष्ट्रपती राजवट

* राष्ट्रीय आणीबाणी-

*

राष्ट्रीय आणीबाणी

बाह्य

- युद्ध (Hade of the state घोषणा.)
- परकीय आक्रमण (घोषणा न करता)

अंतर्गत

- सशस्त्र बंड - 44 वी. घ.दु. (कृती) Action
- अंतर्गत अशांतता (फक्त बोलणे.) Speech.

अंतर्गत अशांतता यामुळे आणीबाणी लागू शकत नाही. 44 वी घ.दु. ने. "सशस्त्र" बंड हा शब्द वाक्यात आला.

- युद्ध, परकीय आक्रमन, सशस्त्र बंड / अंतर्गत अशांतता

✓ yes. ✗ No.

— 44 वी घटना दुरुस्तीने.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
Babasaheb Nidhi-y8
CLASS NOTES

*

वित्तीय आणीबाणी
राष्ट्रीय आणीबाणी
कितीही वर्ष चालते
व ~~का~~ राज्य आणीबाणी
3 वर्षे चालते.

राष्ट्रपती → कलम 352 / 356 राज्य / 360 वित्तीय → राष्ट्रीय आणीबाणी

संसद → लेखी
PM + मंत्रिमंडळ

राज्य - 2 महिना / वित्तीय 2 महीना
राष्ट्रीय

→ 1 महिन्या आत. मान्यता → संसदची → लोकसभा राज्यसभा

→ 6 महिने आणीबाणी लागू.
- 3 वर्षपर्यंत

तिनही प्रकारच्या आणीबाणीचे न्यायालयीन पुनर्विलोकन होऊ शकते. (44 वी घटना दुरूस्ती.)


इंदीरा गांधी सरकारने 38 व्या घ.दु. ने न्या.पु. रद्द केले होते. ते पुन्हा 44 व्या घटना दु. नी करण्यात येते.

आणीबाणी लावल्यानंतर संसद कायदे करू शकते व घ.दु. सुद्धा करू शकते

- आणीबाणीसाठी राज्यपालांची संमती चालतेपण (नाहीपण चालत.
- राज्य आणीबाणीची शिफारस राज्यपाल करू शकतो. (राष्ट्रपतीला)

- संसदेची परवानगी लागते.
- आणीबाणी लागू करण्यासाठी – विशेष बहुमत
- आणीबाणी संपवण्यासाठी – साधे बहुमत.
- आणीबाणी संपवण्यासाठी संसदेची परवानगीची आवश्यकता नाही.

आणीबाणी मागे घेणे.



PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

- 44 व्या घटना दुरुस्तीने आणीबाणी समाप्त करण्यासंबंधी एक विशेष तरतुद करण्यात आली. त्यानुसार लोकसभेच्या एकुण सदस्य संख्येपैकी 1/10 सदस्यांनी लेखी नोटीस अधिवेशनादरम्यान लोकसभा अध्यक्षाला व अधिवेशन चालु नसल्यास राष्ट्रपतीना दिल्यास 14 दिवसाच्या आत आणीबाणी समाप्त करण्यासंबंधी चर्चा करण्यासाठी विशेष बैठक बोलवण्यात येते.

* राष्ट्रीय आणीबाणीचे परिणाम-

① राष्ट्रीय आणीबाणी दरम्यान संसदेला राज्यसुचीतील विषयावर कायदा करण्याचा अधिकार प्राप्त होतो.

② संघराज्यीय व्यवस्था ही राकान्त बनते.

③ राष्ट्रीय आणीबाणी चालु असताना संसदेचे अधिवेशन चालु नसेल. तर राष्ट्रपती अध्यादेश काढू शकतो.
[राज्यसुचीवर सुद्धा]


④ राष्ट्रीय आणीबाणी दरम्यान ~~घटक~~ राज्यसरकारचे अस्तीत्व संपुष्टात येत नाही. मात्र नियंत्रण केंद्र सरकार कडे येते.

⑤ केंद्र सरकार राज्यांना कोणत्याही मुद्दयावर निर्देश देऊ शकते.

⑥ राष्ट्रपती केंद्राकडून राज्याकडे हस्तांतरित केल्या जाणाऱ्या महसुलात घट करु शकते.

⑦ राष्ट्रीय आणीबाणीचा लोकसभेच्या कार्यकाळावर परिणाम पडतो. म्हणजे 5 वर्षाच्या सामान्य कार्यकाळापेक्षा 1 वर्षाने वाढवता येतो. असा ती कितीही वेळा वाढवता येतो.

- पाचव्या लोकसभेचा काळ हा दोनदा वाढवण्यात आला.



- आतापर्यंत 1962, 1965, 1971, 1975 (25 June 1975 - अंतर्गत आणि बाह्य अशा दोन आणिबाणी) आणीबाणी लावण्यात आल्या आणीबाणीच्या दरम्यान आतापर्यंत एकुण 28 घटना - दुरूस्त्या करण्यात आल्या.

राष्ट्रपती राजवट

कलम - 355
- घटनेनुसार राज्याचा राज्यकारभार चालत नसेल, तर केंद्राने - राज्याला निर्देश देते. राज्यावर अंकुशकारक

→ राज्यकारभार संविधानानुसार चालत नसेल (पक्षाला बहुमत नसेल) → कलम - 356 [राष्ट्रपती राजवट]

→ कायदा व सुव्यवस्था ची गरज भासली (मार्शल लॉ) → कलम - 365

- राष्ट्रपती राजवट ही भारतीय राजकारणातला एक वादग्रस्त विषय आहे.
- कारण, संविधानिक पेचप्रसंग म्हणजे काय याचा उल्लेख संविधानात नाही. त्यामुळे राजकीय सोयीनुसार याचा अर्थ लावण्यात येतो. व राजकीय हुल्ल्या प्रत्यक्षात याचा गैरवापर सुद्धा होतो. (स्वातंत्र्यानंतर केरळपासुन अरूणाचल प्रदेश पर्यंत)
- या संदर्भात एस. आर. बोम्मई केस मध्ये सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपती राजवट संदर्भात काही दिशा निर्देश दीले.
- त्यात केव्हा आणीबाणी लावायची व केव्हा लाऊ नये या - संदर्भात निर्देश आहे.

राष्ट्रपती राजवट / राज्य आणीबाणी केव्हा लावु नये.

- राज्यात गैरप्रशासनाची स्थीती आहे. मात्र मंत्रीमंडळ अजुनही विधान सभेत विश्वासात असेल.
- राज्यपालाने बहुमताचा पर्यायी विचार न करता.
- पक्षाच्या संख्याबळाबाबत व्यक्तीशः निर्णय घेऊन आणीबाणी लावली.
- लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत राज्यातील सरकारी पक्षाचा पराभव झाला असल्यास.

- अंतर्गत अशांततेच्या परिस्थितीत केंद्राने सर्व उपयोजना केल्या नसेल.
- सत्ताधारी पक्षातील अंतर्गत कुटीवरून आणीबाणी.
- राज्यमंत्रीमंडळाच्या विरुद्ध गंभीर भ्रष्टाचाराचे आरोप आहे. या कारणावरून आणीबाणी लाऊ नये.

~~सध्दीस~~ राष्ट्रपती राजवट / राज्य आणीबाणी केव्हा लावावी?

- विधान सभेच्या सार्वत्रिक निवडणूकीत स्पष्ट बहुमत न मिळाल्यास व सर्व शक्यतांची पडताळणी केली असल्यास.
- विधानसभेत पराभव झाल्याने मंत्रीमंडळाने राजीनामा दिला. व दुसरा पक्ष सरकार स्थापन करण्यास नकार देत असेल.
- केंद्र सरकारचे घटनात्मक निर्देशाचे पालन न केल्यास.
- राज्य सरकार मुद्दाम घटनेविरोधी कृती करत असेल.
- राज्य सरकारने मुद्दामुन आपली घटनात्मक जबाबदारी पार पाडण्यास नकार दिला.

वित्तीय आणीबाणी ——— कलम-360

- देशामध्ये आर्थिक पेचप्रसंग निर्माण झाल्यास आर्थिक स्थिती. जागेवर आणण्यासाठी कलम-360 नुसार राष्ट्रपती वित्तीय आणीबाणीची घोषणा करतो.

वित्तीय आणीबाणीचे परिणाम -

① कोणत्याही राज्याला वित्तीय शिस्तीचे तत्व पाळण्यास केंद्र सरकार आदेश देऊ शकते.

② केंद्र शासनाच्या सेवेतील सर्व कर्मचारी सर्वोच्च व उच्च न्यायालय न्यायाधिश व्यक्तिच्या पगारामध्ये घट होऊ शकते.

लवाद [Tribunal]

उद्देश - काही विशेष केस न्यायालयात जाऊ न देता बाहेर केस सोडवणे.

- मूळ संविधानामध्ये लवादासंदर्भात कोणतीही तरतुद नव्हती. तर 42 व्या घटना दुरूस्तीने भाग-14 मध्ये 14(A) समाविष्ट करण्यात आला व त्याला "लवाद" असे म्हणतात

- यात पुढील 2 कलमांचा समावेश होतो.

① कलम - 323(A)
② कलम - 323(B)

- 323(A) मध्ये फक्त प्रशासकीय Tribunal
- 323 (B) मध्ये फक्त इतर लवाद

① प्रशासकीय लवाद - [Administrative tribunal]

- 323A नुसार, प्रशासकीय लवाद स्थापन करण्याचा अधिकार संसदेला.

H9.
CAT - दिल्ली - 17 ठिकाणी शाखा.

- संसदेने या संदर्भात 1985 मध्ये कायदा करून [CAT - Central Administrative Tribunal] & [SAT - State Administrative Tribunal] या संबंधी तरतुदी केल्या आहे.

- CAT चे मुख्यालय - नवी दिल्ली असुन त्याची भारतात 17 ठिकाणी शाखा (Regular bench) आहे.

- 17 पैकी 15 शाखा ही उच्च न्यायालयाच्या ठिकाणी; तर उर्वरित 2 - लखनऊ व जयपूर

- कारण, संरक्षण दलाचे सदस्य, सर्वोच्च न्यायालय अधिकारी संसदीय सचिवालयातील कर्मचारी यांचा समावेश CAT अंतर्गत होत नाही.

आणीबाणीविषयक तरतुदी

- भाग XVIII, कलम 352 ते कलम 360

आणीबाणीचे प्रकार–

- **राष्ट्रीय आणीबाणी (कलम 352)**–युद्ध, परकीय आक्रमण व सशस्त्रबंडामुळे.
- **राष्ट्रपती राजवट/राज्य आणीबाणी/घटनात्मक आणीबाणी (कलम 356)**–राज्यतील घटनात्मक यंत्रणा अपयशी ठरल्यामुळे.
- **वित्तीय आणीबाणी (कलम 360)**– भारताचे वित्तीय स्थैर्य/पत धोक्यात आल्यास.

राष्ट्रीय आणीबाणी (कलम ३५२)–

1. **बाह्य आणीबाणी**– युद्ध/परकीय आक्रमणाच्या कारणावरून राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा केल्यास.
2. **अंतर्गत आणीबाणी**– सशस्त्र उठावाच्या कारणावरून घोषित केल्यास.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM By-Abhijit Rathod CLASS NOTES

आणीबाणीच्या उद्घोषणेशी संबंधित महत्त्वाच्या तरतुदी–

- राष्ट्रीय आणीबाणीची उद्घोषणा संपूर्ण भारतासाठी/त्याच्या एखाद्या भागासाठी (42 व्या घटनादुरुस्तीने)
- युद्ध/परकीय आक्रमण/सशस्त्र उठाव प्रत्यक्षात घडण्यापूर्वीही त्यांचा गंभीर धोका असल्याबद्दल खात्री झाल्यास – त्याचे अधिकार राष्ट्रपतींना.
- मूळ घटनेत आणीबाणीच्या घोषणेचा तिसरा आधार–'अंतर्गत अशांतता' संदिग्ध असल्याने 'अंतर्गत अशांतता' या शब्दप्रयोगाऐवजी 'सशस्त्र उठाव' हा शब्द (44 वी घटनादुरुस्ती कायदा–1978).
- राष्ट्रपतीद्वारे राष्ट्रीय आणीबाणीची उद्घोषणा–केंद्रीय कॅबिनेटने त्यांना तसा लेखी निर्णय कळविल्यावरच म्हणजेच केंद्रीय कॅबिनेटच्या सहमतीशिवाय एकटे पंतप्रधान राष्ट्रपतींना आणीबाणीची घोषणा करण्याची शिफारस करू शकत नाही. (44 वी घटनादुरुस्ती कायदा, 1978)
- राष्ट्रीय आणीबाणीची उद्घोषणा न्यायिक पुनर्विलोकनाच्या कक्षेच्या बाहेर (38 वी घटनादुरुस्ती, 1975)
- ही तरतुद 44 वी घटनादुरुस्ती कायद्याद्वारे, 1978 वगळली.
- राष्ट्रीय आणीबाणीच्या उद्घोषणेला न्यायालयात आव्हान देता येत शकेल. (मिनर्व्हा मिल खटल्यात 1980, सर्वोच्च न्यायालयाचा निकाल).

परिवर्तन Competitive Forum – अभिजीत राठोड

संसदेची संमती व आणीबाणीचा कालावधी–

- राष्ट्रपतींद्वारे आणीबाणीची घोषणा केल्याच्या तारखेपासून 1 महिन्याच्या आत संसदेच्या दोन्ही सभागृहाची मान्यता आवश्यक. (अन्यथा अंमल संपुष्टात येतो.)
- मूळ घटनेत– संसदेच्या मान्यतेसाठीचा कालावधी 2 महिने. (44 वी घटनादुरुस्ती कायद्याने 1 महिना)
- आणीबाणीची घोषणा– लोकसभा विसर्जित केलेली असताना/एक महिन्याच्या आत लोकसभेचे विसर्जन झाल्यास, नवीन लोकसभेच्या पहिल्या बैठकीपासून 30 दिवसाच्या आत लोकसभेने मान्यता देणे आवश्यक, अन्यथा अंमल संपुष्टात येतो.
- 44 वी घटनादुरुस्तीपूर्वी संसदेने आणीबाणीस मान्यता दिल्यावर कॅबिनेटची मर्जी असेपर्यंत अंमलात राहील अशी तरतुद होती.
- आता, आणीबाणीस दोन्ही सभागृहांनी मान्यता दिल्यानंतर, दुसरा ठरावा पारित झाल्याच्या दिवसापासून 6 महिने.
- एका वेळी संसदीय कायद्याद्वारे सहा महिने वाढविता येतो, असा तो कितीही वेळा वाढविता येतो.
- आणीबाणीच्या घोषणेचा ठराव/आणीबाणी पुढे ढकलण्याचा ठराव संसदेच्या दोन्ही सभागृहांमार्फत विशेष बहुमताने पारित होणे गरजेचे (44 वी घटनादुरुस्ती, 1978)
- पूर्वी साध्या बहुमताने ठराव पारीत व्हायचा.

आणीबाणी समाप्त करणे–

- संसदेच्या संमतीशिवाय राष्ट्रीय आणीबाणी समाप्तीची उद्घोषणा करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना.
- पूर्वी आणीबाणीची घोषणा समाप्त करण्याचा अधिकार केवळ राष्ट्रपतींना, लोकसभेची कोणतीही भूमिका नव्हती.
- 44 वी घटनादुरुस्ती कायद्याद्वारे 1976 लोकसभेने आणीबाणी चालू ठेवण्याचा ठराव अमान्य केल्यास, राष्ट्रपतींवर आणीबाणीची घोषणा समाप्त करणे बंधनकारक.

आणीबाणी अंमलात ठेवण्याचा ठराव	आणीबाणी समाप्त करण्याचा ठराव
1. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी पारित करणे गरजेचे.	1. केवळ लोकसभेने पारित करणे गरजेचे
2. विशेष बहुमताने पारित होणे गरजेचे.	2. साध्या बहुमताने पारित होणे गरजेचे.

राष्ट्रीय आणीबाणीचे परिणाम–

अ) केंद्र–राज्य संबंधांवरील परिणाम–

1. कायदेकारी अधिकारातील बदल–

- संसदेला राज्य सूचीतील कोणत्याही विषयांवर कायदे करण्याचा अधिकार प्राप्त.
- विधानमंडळाच्या कायदेकारी अधिकारावर संसदेचा वरचढ कायदेकारी अधिकार निर्माण.
- संघराज्यीय शासनव्यवस्था एकात्म बनते.
- राष्ट्रीय आणीबाणी दरम्यान, राज्य सूचीतील विषयांवर संसदेने केलेल्या कायद्याचा अंमल आणीबाणी संपुष्टात आल्यावर 6 महिन्यांनंतर संपुष्टात.
- राष्ट्रीय आणीबाणी चालू, संसदेचे अधिवेशन बंद, राज्य सूचीतील विषयांबाबत अध्यादेश काढण्याचा अधिकार राष्ट्रपतींना.
- जेव्हा राष्ट्रीय आणीबाणी भारताच्या केवळ एखाद्या भागासाठी घोषित, तर त्या भाग / राज्यातील घडामोडींमुळे भारताची/इतर कोणत्याही भागाची सुरक्षा धोक्यात, त्या भागाच्या बाहेरील राज्यांवरही केंद्राचे अधिकार (42 वी घटनादुरुस्ती, 1976)

2. कार्यकारी अधिकरातील बदल–

- आणीबाणी दरम्यान राज्य सरकारांचे अस्तित्व नष्ट होत नसले तरी पूर्णपणे केंद्र सरकारच्या कार्यकारी नियंत्रणाखाली.
- आणीबाणी दरम्यान, राज्य सरकारांना 'कोणत्याही' मुद्यावर कोणतेही निर्देश देण्याचा अधिकार केंद्र सरकारला.

3. वित्तीय अधिकारातील बदल–

- आणीबाणी दरम्यान, केंद्र व राज्यांदरम्यानच्या घटनात्मक महसूल विभागणीमध्ये फेरबदल करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना (कलम 354).
- म्हणजेच केंद्राकडून राज्यांकडे हस्तांतरित केल्या जाणाऱ्या महसूलात घट करण्याचा/ रद्द करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना.

ब. लोकसभा व विधानसभांच्या कार्यकालावर परिणाम–

- लोकसभेचा व विधानसभेचा कार्यकाल संसदीय कायद्याद्वारे एक वर्षाने वाढविता येतो (कितीही वेळा), मात्र आणीबाणी संपुष्टात आल्यावर 6 महिन्यांपेक्षा अधिक काळासाठी वाढविता येत नाही.
- उदा. 5 व्या लोकसभेचा कार्यकाळ 5 वर्षे, 10 महिने व 6 दिवस इतका.

क. मूलभूत हक्कांवरील परिणाम–

- परिणामांचे वर्णन कलम 358 व 359 मध्ये आणीबाणीदरम्यान कलम 19 व्या तरतुदी निलंबित (कलम 358) मूलभूत हक्कांची बजावणी निलंबित (कलम 359)

1. कलम 358– कलम 19 मधील मूलभूत हक्कांचे निलंबन–

- राष्ट्रीय आणीबाणीच्या घोषणेनंतर कलम 19 मधील 6 मूलभूत स्वातंत्र्ये आपोआप निलंबीत (कलम 358)
- आणीबाणीचा अंमल संपुष्टात आल्यास, कलम 19 आपोआप पुनरुज्जीवीत (पुन्हा अंमलात येते).

परिवर्तन Competitive Forum
उत्तम–मोती बिल्डींग (दुसरा मजला), नागनाथपार–शनिपार रोड, रमेश डाईंग जवळ, सदाशिव पेठ, पुणे–३०
• अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.
9272100500

कलम 358 च्या व्याप्तीवरील मर्यादा–

- केवळ युद्ध/परकीय आक्रमणाच्या कारणामुळेच घोषित करण्यात आलेल्या राष्ट्रीय आणीबाणी दरम्यान कलम 19 मधील 6 मूलभूत स्वातंत्र्ये निलंबित होतात.

2. कलम 359 : आणीबाणीदरम्यान मूलभूत हक्कांची बजावणी निलंबित असणे.

- कलम 359 नुसार, मूलभूत हक्क निलंबित होत नसून ते बजावण्याचा हक्क निलंबित होतो म्हणजेच मूलभुत हक्कांचे उल्लंघन झाल्यास न्यायालयाकडून ते पुन्हा प्राप्त करण्याचा (बजावण्याचा) हक्क निलंबित
- आणीबाणी दरम्यान आदेशाद्वारे भाग 3 मधील मूलभूत हक्क (कलम 20 व 21 मधील हक्क वगळता) बजावण्याचा हक्क निलंबित करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना
- हक्क निलंबनाचा कालावधी आदेशात उल्लेखित केलेला असावा
- निलंबनाचा आदेश – संपूर्ण भारतासाठी/एखाद्या भागासाठी
- राष्ट्रपतींचा आदेश लवकरात लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर मान्यतेसाठी ठेवावा लागतो.

कलम 359 च्या व्याप्तीवरील मर्यादा

- निलंबित न होणारे हक्क– कलम 20 व 21 मधील मूलभूत हक्क
  - कलम 20 – अपराध्यांच्या दोषसिद्धिबाबत संरक्षण
  - कलम 21 – जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षण

कलम ३५८ व ३५९ मधील फरक–

कलम 358	कलम 359
• केवळ कलम 19 मधील मुलभूत हक्कांशी संबंधित	• राष्ट्रपतींच्या आदेशात उल्लखलेल्या सर्व मूलभूत हक्कांशी संबंधितबाबी
• आणीबाणी दरम्यान कलम 19 मधील मूलभूत हक्क आपोआप निलंबित होतात.	• कोणतेही हक्क आपोआप निलंबित होत नाही (केवळ राष्ट्रपतींच्या आदेशाद्वारेच
• केवळ बाह्य आणीबाणीशी संबंधित (युद्ध व परकीय आक्रमण-कारण)	• बाह्य तसेच अंतर्गत आणीबाणीशी संबधीत
• कलम 19 मधील मूलभूत हक्क आणीबाणीच्या संपूर्ण काळासाठी निलंबित	• राष्ट्रपतींच्या आदेशात उल्लेखलेल्या प्रमाणे आणीबाणीच्या संपूर्ण/त्यापेक्षा कमी कालावधीसाठी निलंबित
• संपूर्ण देशासाठी लागू	• संपूर्ण देशासाठी/त्याच्या एखाद्या भागासाठी लागू
• संपूर्ण कलम 19 निलंबित	• राष्ट्रपतींना कलम 20 व 21 मधील हक्क निलंबित करण्याचा अधिकार नाही.
• कलम 19 मधील मूलभूत स्वातंत्र्यांचे उल्लंघन करणारा कायदा/कार्यकारी कृती करण्याचा अधिकार	• राज्यसंसख्येला राष्ट्रपतींच्या आदेशात उल्लेखलेल्या सर्व मूलभूत हक्कांचे उल्लंखन करणारा कायदा/कार्यकारी कृती करण्याचा अधिकार

परिवर्तन
Competitive Forum
– अभिजीत राठोड

कलम 358 व कलम 359 मधील साम्य

- केवळ आणीबाणी संबंधित अल्लंघनकारी कायद्यांना/कार्यकारी कृतींनाच आव्हान दिले जाण्यापासून संरक्षण, इतर कायद्यांना नाही.

आतापर्यंत घोषित करण्यात आलेल्या राष्ट्रीय आणीबाणी

- घोषणा 3 वेळा (1962, 1972, 1975)
- 1962 व 1971 – परकीय आक्रमणाच्या कारणावरून
- 1975 – अंतर्गत अशांततेच्या कारणावरून

1) ऑक्टोंबर 1962 – अरूणाचल प्रदेशावरील चिनी आक्रमणाच्या करणावरून
   – अंमल जाने 1968 पर्यंत चालू
   – 1965 : पाकिस्तान युद्धावेळी वेगळी घोषणा नाही
2) डिसेंबर 1971 – पाकिस्तान आक्रमणाच्या कारणावरून
3) जून 1975 – दुसरी आणीबाणी सुरू असतानीच तिसऱ्या आणीबाणीची घोषणा (अंतर्गत अशांततेच्या कारणावरून)
   – दुसरी व तिसरी आणीबाणी मार्च 1977 मध्ये समाप्त
   – सर्वात विवादास्पद आणीबाणी
   – सार्वत्रिक निवडणुकांमध्ये इंदिरा गांधी सरकारचा पराभव झाल्यावर सत्तेवर आलेल्या जनता पार्टी सरकारने 1975 च्या आणीबाणीची घोषणा करण्यामागील परिस्थितीची चौकशी करण्यासाठी 'शाह आयोगा' ची स्थापना

राज्यातील राष्ट्रपती राजवट (कलम 356)

- प्रत्येक राज्याचे शासन घटनात्मक तरतुदींना अनुसरून चालविले जाण्याची सुनिश्चिती करण्याचे कर्तव्ये केंद्र सरकारचे (कलम 355)
- राष्ट्रपती राजवटीचे 2 आधार – 1) कलम 365 मधील आधारावर
  2) कलम 356 मधील आधारावर

1) **कलम 356 : राज्यातील घटनात्मक यंत्रणा बंद पडल्यास –**

- एखाद्या राज्याचे शासन घटनात्मक तरतुदींना अनुसरून चालत नसल्याची राष्ट्रपतींना खात्री झाल्यास राज्यात राष्ट्रपती राजवटीची घोषणा
- अशी घोषणा संबंधित राज्याच्या राज्यपालकडून तसा अहवाल प्राप्त झाल्यास/न झाल्यासही

संसदेची मान्यता व राष्ट्रपती राजवटीचा कालावधी

- राष्ट्रपतींद्वारे राष्ट्रपती राजवटीची घोषणा झाल्यापासून 2 महिन्यांच्या आत संसदेच्या दोन्ही सभागृहांची मान्यता आवश्यक (अन्यथा अंमल संपुष्टात येतो.)
- आणीबाणी घोषणा – लोकसभा विसर्जित केलेली असताना/ 2 महिन्याच्या आत लोकसभेचे विसर्जन झाल्यास, नवीन लोकसभेच्या पहिल्या बैठकीपासून 30 दिवसांच्या आत लोकसभेने मान्यता देणे आवश्यक, अन्यथा राजवटीचा अंमल संपुष्टात
- संसदेच्या दोन्ही सभागृहांनी राष्ट्रपती राजवटीस मान्यता दिल्यास – अंमल दुसरा ठराव पारित झाल्यापासून 6 महिने
- एका वेळी संसदीय कायद्याद्वारे 6 महिन्यांसाठी वाढविता येतो. मात्र महत्तम 3 वर्षांसाठीच.
- राष्ट्रपती राजवटीच्या घोषणेचा ठराव/तो पुढे ढकलण्याचा ठराव दोन्ही सभागृहांमधून साध्या बहुमताने पारित होणे गरजेचे.
- राष्ट्रपती राजवटीचा अंमल 2 वर्षापेक्षा अधिक काळासाठी वाढविण्यासाठी अजी (44 वी घटनादुरूस्ती, 1978)

1) संपूर्ण भारतात/संपूर्ण राज्यात/ त्याच्या एखाद्या भागात राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा अंमलात असावी.
2) संबंधित राज्याच्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूका घेणे अडचणीचे असल्याने राष्ट्रपती राजवटीचा अंमल चालू ठेवणे आवश्यक आहे असे निवडणूक आयोगाने प्रमाणित केल्यास.

राष्ट्रपती राजवट समाप्त करणे

- संसदेच्या संमतीशिवाय राष्ट्रपतींद्वारे संसदेच्या समाप्तीची उद्घोषणा केव्हाही

राष्ट्रपती राजवटीचे परिणाम

1) राज्यशासनाची सर्व/काही कार्ये. राज्याच्या राज्यपालाचे व विधानमंडळ वगळता इतर संस्था व प्राधिकारी यांचे सर्व/काही अधिकार स्वत:कडे घेण्याचा अधिकार राष्ट्रपतींना
2) राज्याच्या विधानमंडळाचे अधिकार संसदेकडून वापरले जाण्याची घोषणा राष्ट्रपतींद्वारेच
3) राष्ट्रपतींना नसलेले अधिकार – उच्च न्यायालयाचा कोणताही अधिकार स्वत:कडे घेण्याचा/उच्च न्यायालयाशी संबंधित असलेल्या कोणत्याही घटनात्मक तरतुदींचे कार्यचालन पूर्णत:/अंशत: निलंबित करण्याचा
4) राष्ट्रपती राजवटी दरम्यान, उच्च न्यायालयाची घटनात्मक स्थिती, दर्जा, अधिकार व कार्ये समान राहतात व त्यांमध्ये बदल होत नाही.

परिवर्तन Competitive Forum – अभिजीत राठोड

- राष्ट्रपती राजवट राज्यात लागू केल्यावर, राष्ट्रपती मुख्यमंत्र्याच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळ भंग करतात.
- राज्याच्या मुख्य सचिवाच्या मदतीने/राष्ट्रपतींनी नेमलेल्या सल्लागारांच्या मदतीने राज्यपाल राष्ट्रपतींच्या वतीने राज्याचे प्रशासन चालवितात.

कलम 357 अंतर्गत अधिकार

- राष्ट्रपती राजवटीखालील राज्याची विधानसभा निलंबित/विसर्जित करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना

राष्ट्रपती राजवटीदरम्यान राज्याच्या विधानमंडळाचे अधिकार संसदेमार्फत वापरले जातील असे घोषित केल्यास –

1) संसदेद्वारा राज्यविधानमंडळाचा कायदे करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना प्रदान, तसेच राष्ट्रपतींना असा अधिकार इतर प्राधिकाऱ्याकडे सोपविण्यासाठी प्राधिकृत करू शकते.

2) संसदेचे अधिवेशन बंद असल्यास, राज्याच्या प्रशासनासाठी अध्यादेश काढण्याचा राष्ट्रपतींना अधिकार

3) लोकसभेचे अधिवेशन बंद असल्यास, राष्ट्रपती राज्याच्या संचित निधीतून खर्चास संसदेकडून त्यास मंजुरी मिळेपर्यंत मान्यता देऊ शकतात.

4) संसदेने/राष्ट्रपतींनी/इतर प्राधिकऱ्यांनी केलेल्या कायद्याचा अंमल राष्ट्रपती राजवट संपुष्टात आल्यानंतरही मात्र, राज्य विधानमंडळाला असा कायदा रद्द करण्याचा/बदल करण्याचा/त्यात सुधारणा करण्याचा अधिकार

कलम 356 चा वापर

- 'कलम 356 चा वापर 'मृत-पत्रा' प्रमाणेच राहील व त्याचा वापर केवळ शेवटचा पर्याय म्हणूनच केला जाईल' – डॉ. आंबेडकर
- कलम 356 – घटनेतील सर्वात विवादास्पद व टिकास्पद कलम
- सर्वप्रथम राष्ट्रपती राजवट – पंजाब राज्यात (1951), घटनेच्या प्रारंभापूर्वी – विंध्य प्रदेशात – 1949
- सर्वाधिक राष्ट्रपती राजवट केरळ व उत्तरप्रदेश (8 वेळा) त्याखालोखाल, पंजाब राज्यात (7 वेळा)
- महाराष्ट्रात दोनदा –1) 17 फेब्रु – 8 जून 1980
  2) 28 सप्टें – 31 ऑक्टो 2014
- धर्मनिरपेक्षता हे घटनेचे एक 'मूलभूत वैशिष्ट्य' असल्याच्या आधारावर सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपती राजवटीची विधीग्राह्यता मान्य केली [एस.आर. बोम्मई खटला (1994)]
- मात्र, न्यागालँड (1988), कर्नाटक (1989) व मेघालय (1991) या राज्यामधील राष्ट्रपती राजवटीची न्यायालयाकडून विधी ग्राह्यता अमान्य

राष्ट्रपती राजवट व न्यायिक पुनर्विलोकन

- कलम 356 संबंधी राष्ट्रपतींची खात्री अंतिम व निर्णायक.
- तिला कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कारणावरून आव्हान देता येणार नाही (38 वी घटना दुरुस्ती कायदा, 1975)
- राष्ट्रपतींची खात्री न्यायिक पुनर्विलोकनाच्या अधीन (44 वी घटना दुरुस्ती कायदा 1978)
- एस.आर. बोम्मई खटल्यातील (1994) सर्वोच्च न्यायालयाचे कलम 356 अंतर्गत राष्ट्रपती राजवट लागू करण्याबाबतचे महत्त्वाचे निर्णय.

1) कलम 356 अंतर्गत

– अपवादात्मक अधिकार, विशेष परिस्थितीत आवश्यकता असल्यावरच वापर करावा.

2) राष्ट्रपती राजवटीच्या उद्घोषणेला न्यायिक पुनर्विलोकनाचे तत्त्व लागू.

3) नवीन राजकीय पक्षाचे सरकार केंद्रात स्थापन झाल्यास त्याला राज्यातील इतर पक्षांची सरकारे बरखास्त करण्याचा अधिकार नाही.

4) राष्ट्रपती राजवट घोषणा करण्यासाठी योग्य परिस्थिती असल्याची सिद्ध करण्याची जबाबदारी केंद्राची.

5) राष्ट्रपती राजवट असंवैधानिक व अवैध असल्याचे न्यायालयाला आढळल्यास, निलंबित राज्यशासन पुनर्स्थापित करण्याचा व राज्य विधानसभा पुनरुज्जीवित करण्याचा अधिकार न्यायालयाला.

6) संसदेने राष्ट्रपती राजवटीच्या घोषणेला संमती दिल्यावरच राज्य विधानसभा विसर्जित, तत्पूर्वी विधानसभा केवळ निलंबित करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना संसदेची संमती नसल्यास निलंबित विधानसभा पुनर्जिवित.

कलम 356 चा अयोग्य वापर :

1) राज्यात गैरप्रशासनाची स्थिती असतांनाही मंत्रिमंडळ विधानसभेचा विश्वास धारण करत असेल तर.

परिवर्तन Competitive Forum – अभिजात राठोड

2) मंत्रिमंडळ बरखास्त केल्यावर राज्यपालाने पर्यायी सरकार स्थापन करण्याच्या शक्यतेचा शोध न घेताच राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिफारस केल्यास.

3) लोकसभेच्या निवडणूकांमध्ये राज्यातील सरकारी पक्षाचा पराजय झाल्यास.

4) अंतर्गत अशांततेची परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी केंद्राने आवश्यक असलेले सर्व उपाय घेतले नसल्यास

5) सत्ताधारी पक्षातील पक्षांतर्गत समस्या सोडवितांना अधिकाराचा वापर करून राष्ट्रपती राजवट लावण्याचा प्रयत्न केल्यास.

कलम 356 चा योग्य वापर :

1) विधानसभेच्या निवडणुकीनंतर कोणत्याही बहुमत प्राप्त पक्ष नसल्याने सरकार स्थापणे अवघड झाल्यास.

2) विधानसभेत बहुमत प्राप्त पक्षाने सरकार स्थापण्यास नकार दिल्यास, बहुमत साध्य करू शकेल अशी युती शक्य नसल्याची राज्यपालाची खात्री झाल्यास.

3) केंद्र सरकारचा निर्देश राज्य सरकारने पाळला नसल्यास.

4) भौतिक विखंडनाची स्थिती.

वित्तीय आणीबाणी (कलम 360) :

- भारताचे एखाद्या भागाचे आर्थिक स्थैर्य/पत धोक्यात असल्याची राष्ट्रपतींची खात्री झाल्यास वित्तीय आणीबाणी घोषीत करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना.
- वित्तीय आणीबाणी संदर्भातील राष्ट्रपतींच्या खात्रीला न्यायालयात आव्हान देता येते (44वी घटनादुरुस्ती 1978)

संसदेची संमती व आणीबाणीचा कालावधी

- राष्ट्रपतींद्वारे वित्तीय आणीबाणीची घोषणा झाल्यापासून 2 महिन्यांच्यात आत संसदेच्या दोन्ही सभागृहांची मान्यता आवश्यक (अन्यथा अंमल संपुष्टात)
- आर्णीबाणीची घोषणा : लोकसभा विसर्जित केलेली असतांना/दोन महिन्यांच्या आत लोकसभेचे विसर्जन झाल्यास, नवीन लोकसभेच्या पहिल्या बैठकीपासून 30 दिवसांच्या आत लोकसभेने मान्यता देणे आवश्यक, अन्यथा अंमल समुष्टात.
- वित्तीय आणीबाणीचा अंमल चालू राहण्यासाठीचा महत्तम कालावधी सांगितलेला नाही.
- वित्तीय आणीबाणी घोषणेचा ठराव दोन्ही सभागृहामार्फत साध्य बहुमताने पारित होणे गरजेचे.
- वित्तीय आर्णीबाणी समाप्त करणे : संसदेच्या संमतीशिवाय वित्तीय आणीबाणीची उद्घोषणा समाप्त करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना.
- वित्तीय आणीबाणीचे परिणाम : कोणत्याही राज्याला वित्तीय शिस्तीच्या तत्त्वांचे पालन करण्याबाबतचे निर्देश देण्याचा अधिकार केंद्राला.

अशा निर्देशामध्ये

अ) एखाद्या राज्याच्या सेवेतील सर्व / कोणत्याही वर्गातील व्यक्तींच्या वेतनात व भत्त्यात घट करण्याची तरतूद.

ब) सर्व धन विधेयके (राज्य विधानमंडळाने पारित केल्यानंतर) राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवण्याची तरतूद.

- पुढील व्यक्तींच्या पगार व भत्त्यांमध्ये कपात करण्याचा निर्देश देण्याचा अधिकार राष्ट्रपतींना

अ) सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश

ब) केंद्र शासनाच्या सेवेतील सर्व / कोणत्याही वर्गातील व्यक्ती

- भारतात एकदाही वित्तीय आणीबाणी घोषित करण्यात आलेली नाही.

परिवर्तन Competitive Forum
- अभिजीत राठोड

- CAT मध्ये - 1 अध्यक्ष व 65 सदस्य असतात.
- यातील काही सदस्य न्यायिक तर काही सदस्य प्रशासकीय शाखेतील असतात.
- यांचे कार्य हे नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार चालते.
- याविरुद्ध अपील 1st - ~~सर्वोच्च~~ उच्च न्यायालयात (HC)
  2nd - ~~सर्वोच्च~~ न्यायालयात (SC)
  जरी यांचा दर्जा उच्च न्यायालयाच्या बरोबरीचा असला तरी.

MAT
- अध्यक्ष - गिरिश बापट.

- MAT [Maharashtra Administrative Tribunal]
- MAT हे महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासना अंतर्गत येते.
- महाराष्ट्रात प्रशासकीय अधिकाऱ्यांची भरती व सेवांच्या संदर्भात निर्णय यात देतात.
- स्थापना - 8 जुलै 1991
- मुख्यालय - मुंबई.
  व नागपूर व औरंगाबाद येथे खंडपीठे.
  यात, 1 अध्यक्ष, 3 - उपाध्यक्ष, 6 सदस्य.
- या लवादांना न्यायालयाचि अवमानाची तत्वे लागु पडतात. व याचा दर्जा दिवानी न्यायालया प्रमाणे असतो.
- MAT च्या अध्यक्षाला मंत्रालयिन सचिवाचा दर्जा प्राप्त असतो.

* कलम - 323 (B) -
- कर प्रणाली [Taxation]
- परकीय चलन.
- आयात - निर्यात
- उद्योग श्रम.
  - इ. बाबी संदर्भात लवाद केंद्र सरकार स्थापन करु शकते.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

राजकीय पक्ष पद्धती

★ राज्य पक्ष -

— राज्याच्या विधानसभेच्या निवडणूकीत एकुण वैद्य मतांपैकी 6% मते आणि सोबत विधान सभेत 2 जागा किंवा 6% मते आणि लोकसभेत 1 जागा.

OR

— विधानसभेच्या 3% मते व 3 जागा किंवा दर 25 जागांपैकी लोकसभेच्या 1 जागा जिंकणे आवश्यक

[महाराष्ट्र - 48 जागा म्हणजे 2 जागा जिंकणे आवश्यक.]

★ राष्ट्रीय पक्ष -

— लोकसभेच्या किंवा विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीत 4 किंवा त्यापेक्षा अधिक राज्यांमध्ये एकुण वैद्य मतांच्या 6% मते मिळाली असल्यास आणि कोणत्याही राज्यातुन 4 जागा जिंकुन आल्यास.


— संबंधीत राजकीय पक्षाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीमध्ये 2% जागा जिंकल्यास आणि त्या पक्षाचे उमेदवार किमान 3 राज्यात जिंकुन येणे आवश्यक किंवा संबंधीत पक्षात 4 राज्यात राज्य पक्षाचा दर्जा मिळाल्यास [तृणमुल काँग्रेसला याच आधारावर राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाला.]

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

भारतीय पक्ष पद्धतीची वैशिष्ट्ये

- ① बहुपक्ष पद्धती (केंद्रामध्येपण, राज्यामध्येपण पक्ष)
- ② एकपक्ष पद्धतीकडून बहुपक्ष पद्धतीकडे
- ③ विचारधारेकडून मुद्द्यांकडे
- ④ पक्षांतरण –
- ⑤ राज्यपक्ष ते क्षेत्रीय महत्वकांशेला महत्व.
- पक्षाचे संविधान हे लोकशाही आधारित परंतु व्यवहार मात्र व्यक्ती केंद्रीत.
- विरोधी पक्षाचा आभाव.

संकल्पना - फ्रान्स → ✳ डावे पक्ष व उजवे पक्ष :-



- आधुनिक लोकशाही राज्यात पुढील 4 प्रकारचे राजकीय पक्ष दिसतात.
- जुन्या व्यवस्थेला चिकटून राहणारे – प्रतिगामी पक्ष.
- आहे त्या परिस्थितीवर विश्वास ठेवणार - पुराणमत वादी.
- सद्याच्या संस्थेमध्ये बदल आवश्यक आहे असे मत व्यक्त करणारा – उदारमतवादी पक्ष.
- सद्याच्या संस्था पूर्णपणे उलथुन टाकुन त्याजागी नवीन संस्था स्थापन करणे – पुरोगामी पक्ष.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijeet Dada

* निवडणूकीवर परिणाम करणारे घटक / मतदाराच्या वर्तनावर परिणाम करणारे घटक :-

① धर्म.
② भाषा
③ प्रदेश
④ व्यक्तीमत्व महत्व.
⑤ Music Power.
– "पॉल ब्रास. यांनी "जाट" मतदानाच्या वर्तनावर प्रभाव पाडणारे आधुनिक घटक असल्याचे नमुद केले आहे.
– या जातीमध्ये काही सामाजिक तर काही आर्थिक मुद्दयाचा समावेश होतो.
⑥ पक्षनिष्ठा
⑦ विचारधारा
⑧ वय
⑨ लिंग
⑩ शिक्षण
⑪ वस्तीस्थान.


* Post truth era –

– एखादी बाब (सत्य बाब) ही अशी सादर करणे की जेणेकरून लोकांचे लक्ष हे त्याच बाबीकडे जाईल आणि प्रेरित होऊन त्याला सहयोग करतील.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

दबावगट

हित पूर्ण करण्यासाठी अराजकीय एकत्र आलेले गट



- भारतामध्ये दबाव गटाचे पुढील काही प्रकार पडतात.-;

① उद्योग आधारित → किक्की, Asochamp. इ.

② कामगार संघटना → ITUC, हिंदू मजदूर सभा. इ.

③ कृषी गट → भारतीय किसान संघ, United किसान सभा.

④ व्यावसायिक गट → इंडियन मेडिकल असो., Bar council. of India. इ.

⑤ विद्यार्थी संघटना → All India Student Fedration. इ.

⑥ धार्मिक → RSS, बजरंग दल, जमात-ए-इस्लामे. इ.

⑦ जातीय संघटना → मारवाडी संघटना, अखिल भारतीय ब्राह्मण महासभा, आखिल भारतीय कुणबी संघटना. इ.

⑧ आदिवासी संघटना → नागा, बोडो, मिझो.

⑨ भाषिक संघटना → दक्षिण भारत, हिंदी प्रचार सभा, तमिळ संघ

⑩ विशिष्ट मुद्दयावर आधारित → गांधी शांती प्रतिष्ठान नर्मदा बचाव आंदोलन, चिपको आंदोलन.

MPSC/UPSC

परिवर्तन
Competitive Forum
– अभिजीत राठोड

परिवर्तन

Competitive Forum
– अभिजित राठोड

राज्यसेवा

पूर्व + मुख्य परीक्षा फोकस

General Studies : अभिजीत राठोड सर घेतील.
CSAT : सचिन ढवळे सर घेतील.

- The Hindu वर्तमानपत्र दररोज मराठीमध्ये करून शिकवण्यात येईल.
- अभ्यासक्रमातील जे घटक संदर्भग्रंथात उपलब्ध नाही त्यावर स्वतंत्र नोट्स देण्यात येतील.
- बेसीक गोष्टीवर भर देण्यात येईल. (NCERT, Maharashtra State Board)
- दर आठवड्याला टेस्ट, त्यावर सविस्तर चर्चा स्वत: राठोड सर.
- दर रविवार : वैयक्तिक मार्गदर्शन.

दररोज चालु घडामोडीवर नोट्स व बेसिक विषयावर टेस्ट.

- मर्यादित जागेमुळे नाव नोंदणी आवश्यक.
- संयुक्त परीक्षा (PSI/STI/ASO) चा अभ्यासक्रम यामध्येच पूर्ण करण्यात येईल.

राज्यसेवा
पूर्व परीक्षेचा
अभ्यासक्रम प्रथम
घेण्यात येईल.

उत्तम–मोती बिल्डिंग, नागनाथपार–शनिपार रो
रमेश डाईंगजवळ, जनसेवा बँकेच्या वर,
सदाशिवपेठ, पुणे– 411 030

– अभिजीत राठोड


9272100500

परिवर्तन
Competitive Forum

परिवर्तन

Competitive Forum


– अभिजीत राठोड



NATIONAL PARTIES OF INDIA



– राजकीय पक्ष, दबाव गट आणि – प्रसार माध्यमे



PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

– अभिजीत राठोड

उत्तम मोती बिल्डींग, नागनाथपार–शनिपार रोड,
रमेश डाईंग जवळ, जनसेवा बँकेच्यावर, सदाशिव पेठ, पुणे–30

9272100500

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

राजकीय पक्ष आणि दबावगट

राजकीय पक्ष

- एखाद्या देशातील शासनव्यवस्थेच्या कामकाजाची पद्धत ही तेथील पक्षपद्धतीच्या स्वरुपावर अवलंबून असते.
- राजकीय पक्ष हे लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये अनोपचारिकरीत्या काम करणाऱ्या महत्त्वपुर्ण यंत्रणा आहेत.
- राजकीय पक्ष हे लोकमत अभिव्यक्त करतात तसेच लोकमताला आकार देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात.
- लोकशाही शासन व्यवस्थेत जनतेच्या आशा आकांक्षांना पुर्ण करण्याचे कार्य शासन करत असते.
- संसदीय शासन व्यवस्थेमध्ये बहुमतप्राप्त पक्ष सत्ता स्थापन करतो व जाहीरनाम्यात ठरवलेल्या धोरणांची आंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करतो.
- दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष विरोधीपक्षाची प्रभावी भूमिका बजावत असतो.
- पक्षपद्धतीचे, एकपक्ष पद्धती, द्विपक्षपद्धती, बहुपक्षपद्धती असे प्रकार पडतात.

भारतीय स्वातंत्र्यानंतरचा सुरुवातीचा काळ-

- स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतर सुद्धा 1967 पर्यंत भारतात काँग्रेस या एकाच पक्षाचे वर्चस्व होते.
- काँग्रेसने जनमानसात आपले स्थान निर्माण केले होते.
- स्वातंत्र्यानंतर जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने सत्ता स्थापन केली. नेहरूंचे प्रभावी नेतृत्व स्वातंत्र्य चळवळीची पार्श्वभूमी, सर्व गटाचे नेतृत्व, सर्वांना सोबत घेऊन जाण्याचे उद्दिष्ट यामुळे काँग्रेस एक वर्चस्वशाली पक्ष बनला होता.
- म्हणून 1952 ते 1967 या काळाचे वर्णन रजनी कोठारी यांनी 'एक पक्ष वर्चस्वपद्धती' तसेच 'काँग्रेस व्यवस्था' असे केले.
- भारताने बहुपक्षपद्धतीचा स्वीकार केलेला आहे.
- 1951 मध्ये 14 राष्ट्रीय पक्ष आणि 35 प्रादेशिक पक्ष होते.
- 1967-77 हा काँग्रेसच्या ऱ्हासाचा कालखंड मानता येईल. या काळात स्थानिक पातळीवर प्रादेशिक आणि स्थानिक पक्षाचा उदय आणि विकास झाला.
- प्रादेशिक पक्षांच्या उदयमुळे बहुपक्षपद्धतीच्या खऱ्या अर्थाने विकासाला सुरुवात झाली.
- सुरुवातीच्या काळात काँग्रेसचेच वर्चस्व असल्याने प्रबळ विरोधी पक्षाचा अभाव होता.

भारतीय राजकीय पक्षपद्धतीचे वैशिष्ट्ये-

Competitive Forum

- सुरुवाती[illegible] काळात (1[illegible]7) [illegible] काँग्रेस [illegible] पक्षाचे वर्चस्व
- प्रादेशिक पक्षांच्या उदयामुळे बहुपक्ष पद्धतीचा विकास.
- प्रारंभीच्या काँग्रेस वर्चस्वाच्या काळात दुर्बल विरोधी पक्ष/प्रभावी विरोधी पक्षाचा अभाव.
- व्यक्तीकेंद्री पक्षपद्धती
- वैचारिक बांधीलकीचा अलिकडील काळात होत जाणारा ऱ्हास. (कारण सत्ताप्राप्ती हे मुख्य ध्येय)
- प्रादेशिक अस्मितेच्या आधारावर प्रादेशिक पक्षांचा उदय आणि भूमिका.
- घटकराज्यानुसार प्रादेशिक पक्षाची कमी-जास्त संख्या व वर्चस्व
- आघाड्यांचे राजकारण (प्रादेशिक पक्षांच्या उदयामुळे)
- पक्षांतर्गत फुट-अनेक विचारांचे गट काँग्रेसमधुन बाहेर पडुन वेगवेगळे पक्ष स्थापन केले आहेत.

- आता राष्ट्रीय स्थरावर द्विधृवीकरण दिसून येत आहे.

  अ) सत्ताधारी पक्ष/पक्ष गट ब) विरोधी पक्ष/पक्षगट

- व्यक्तिकेंद्री/नेतृत्वकेंद्री पक्ष पद्धतीमुळे पक्षांतर्गत लोकशाहीचा अभाव दिसून येतो.
- स्त्रीयांचे अत्यल्प प्रतिनिधीत्व

भारतातील पक्षपद्धतीची वाटचाल-

- लोकशाहीमध्ये शासन हे निवडणुकीशिवाय असुच शकत नाही, त्यासाठी लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये राजकीय पक्षांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.
- भारतात सुरुवातीला एकाच पक्षाचे वर्चस्व होते ते म्हणजे काँग्रेस. नंतरच्या काळात अनेक पक्ष स्थापन झाले सध्याची भारताची पक्षपद्धती ही 'बहुपक्षीय आघाडी व्यवस्था' आहे.

भारतीय पक्षपद्धतीच्या विकासाचे टप्पे-

1) स्वातंत्र्यपूर्व कालखंड-

- भारतात 1935 च्या कायद्याने प्रांतीय विधीमंडळामध्ये भारतीयांनी खऱ्या अर्थाने वर्चस्व स्थापन केले. त्यासाठी काँग्रेसने स्वातंत्र्य चळवळ आणि राजकीय पक्ष अशी दुहेरी वाटचाल सुरु केली. त्यावेळी, हिंदु महासभा, मुस्लीम लिग, कम्युनिस्ट पक्ष आणि स्वतंत्र मजुर पक्ष हे पक्षसुद्धा अस्तित्वात होते. परंतु स्वातंत्र्याच्या चळवळीतील काँग्रेसच्या प्रमुख भुमिकेमुळे या पक्षांचा तेवढा दबदबा नव्हता. हे सर्व पक्ष, गट काँग्रेसविरोधी होते.

2) स्वातंत्र्यानंतरचा कालखंड-

- स्वातंत्र्योत्तर कालखंड भारतीय पक्षपद्धतीच्या विकासाच्या वेगवेगळ्या कालखंडामध्ये विभागलेला आहे.

अ) 1947 ते 1967- या काळात काँग्रेस पक्षाचा सर्वत्र प्रभाव होता. या काळात झालेल्या 3 सार्वत्रिक निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्ष बहुमताने विजयी झाला होता. या काळात देशात एकपक्षीय वर्चस्व निर्माण झाले होते. काँग्रेसला विरोध करणारा प्रभावी पक्ष एकही नव्हता.

ब) 1967 ते 1971- 1967 नंतर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व कमी होण्यास सुरुवात झाली. 1967 साली झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसने 8 राज्यांगधील सत्ता गमावली. अनेक राज्यांत विरोधी पक्षांनी आघाडी सरकारे स्थापन केली.

- भारतीय पक्षपद्धतीची बहुपक्षाकडे वाटचाल सुरु झाली.
- याच काळात काँग्रेस पक्षात फुट पडुन काँग्रेस (आय) आणि संघटना काँग्रेस निर्माण.
- माकप आणि जनसंघ हे पक्षही या काळात सक्रिय झाले.

क) 1971 ते 1975- 1971 सालच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने प्रचंड विरोध असतानांसुद्धा बहुमत प्राप्त केले. त्यामुळे आघाडीचे राजकारण केंद्रस्तरावर निर्माण होण्यास प्रतिबंध झाला.

ड) 1975 ते 1977- या काळात 1975 साली आणीबाणी लावल्या गेली. पंतप्रधानाचे कार्यालय हे सत्तेचे प्रमुख केंद्र बनले. विरोधकांना तुरुंगात डांबण्यात आले या काळातील हे एक वैशिष्ट्ये आहे.

इ) 1977 ते 1979- काँग्रेसने लादलेल्या आणीबाणीमुळे जनतेच्या मनात काँग्रेसबद्दल नाराजी निर्माण झाली.

- लोकांनी काँग्रेसला नाकारले. जनता पक्ष या काळात प्रमुख पक्ष ठरला. या काळात आघाडीचे राजकारण निर्माण झाले.

फ) 1980 ते 1989- काँग्रेस (आय) ची सत्ता या काळात पुन्हा आली. विरोधकांशी संवाद साधण्याचे बंद केले. विरोधकांना वगळण्याचे राजकारण या काळात झाले.

- 1984 च्या निवडणुकीत काँग्रेस जरी केंद्रात प्रबळ बहुमती असली तरी अनेक राज्यांत काँग्रेसविरोधी सरकारे होती.

Competitive Forum

ग) 1989 ते 2004- केंद्रात बहुपक्षीय सरकार अस्तीत्वात आले. आपापल्या हितसंबंधाची पाठराखण करण्यासाठी अनेक पक्ष एकत्र येवून आघाड्या स्थापन करू लागले.

- 1996 साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रीय पक्षाचे स्थान घसरले आणि प्रादेशिक पक्षांचे संख्याबळ तसेच महत्त्व वाढले. आता प्रादेशिक पक्ष राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची भूमिका बजाऊ लागले.
- केंद्रस्तरावर आघाडीच्या सत्ता स्थापन झाल्या.

ह) 2004 ते 2014- या काळात द्विधृवीय आघाड्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली त्यामध्ये काँग्रेसप्रणित युपीए आणि भाजपप्रणित एनडीए आघाड्या होत्या.

- या काळात युपीए या आघाडीने सत्ता स्थापन केली. काँग्रेस हा त्यात सर्वात मोठा पक्ष होता.

- 2009 सालच्या निवडणुकीनंतर प्रादेशिक पक्षांचे संख्याबळ परत कमी झाले आणि राष्ट्रीय पक्षांचे महत्त्व वाढले.
- या काळात भाजपचे संख्याबळ कमी झाले तर काँग्रेसचे वाढले.
- 2009 साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत परत काँग्रेस पक्षाने सर्वाधिक जागा मिळवल्या व मित्रपक्षाच्या पाठींब्याने यूपीए आघाडीचे सरकार स्थापन केले.

आय) 2014-19- 2014 च्या निवडणुकीत भाजपने लोकसभेच्या 282 जागा जिंकुन स्वबळावर सत्ता स्थापन्यास समर्थ झाला. भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले होते तरी निवडणुकीपूर्व भापजने आपल्या मित्र पक्षांबरोबर 'एनडीए' आघाडी स्थापन केली होती. त्यामुळे भाजपने सत्तेमध्ये त्यांनासुद्धा स्थान दिले.

- या काळात भाजपचे वर्चस्व निर्माण झाले तर आघाड्यांचे राजकारण सुद्धा सुरुच आहे.

आत्तापर्यंतचे आघाडीचे सरकारे-

- 1. **मोरारजी देसाई**- संघटना काँग्रेस, भारतीय लोकदल, जनसंघ, समाजवादी पक्ष या घटक पक्षांनी आघाडी निर्माण करून मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले. या आघाडीला 'जनता पक्ष' हे नाव देण्यात आले होते.
- जनता पक्षात फुट पडल्याने जनता सरकार पायउतार झाले.
- 24 मार्च 1977 ते 28 मार्च 1979 पर्यंत जनता सरकार सत्तेत होते.
- 2. **चरनसिंग**- 'भारतीय कम्युनिस्ट पक्ष ऑफ इंडिया' आणि 'मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी' यांच्या पाठिंब्याने तसेच इंदिरा गांधीच्या नेतृत्वाखालील काँग्रेसच्या बाहेरून पाठींब्याने चरनसिंग पंतप्रधान झाले.
- 25 जुलै ते जानेवारी 1980 पर्यंत हे सरकार सत्तेवर होते. इंदिरा काँग्रेसने पाठींबा काढून घेतल्याने चरनसिंगांनी राजीनामा दिला.
- 3. **व्ही.पी.सिंग**- भाजप आणि मित्र पक्षांनी मिळून स्थापन केलेल्या राष्ट्रीय आघाडीचे व्ही.पी.सिंग यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले.
- हे सरकार 2 डिसेंबर 1989 ते 10 नोव्हेंबर 1990 या 11 महिन्यांसाठी सत्तेत होते.
- भाजपने पाठींबा काढल्याने सरकार पडले.
- 4. **चंद्रशेखर**- इंदिरा काँग्रेसने पाठींबा दिल्याने चंद्रशेखर यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा सरकार स्थापन झाले. जे.व्ही.पी.सिंग यांच्या नेतृत्वाखाली असतांना पडले होते.
- हे सरकार 11 नोव्हेंबर 1990 ते 21 जुलै 1991 या कालावधीत सत्तेवर होते.
- काँग्रेसने पाठींबा काढल्याने सरकार कोसळले. लोकसभा विसर्जित करण्यात आली.
- 5. **एच.डी.देवेगौडा**- 1 जून 1996 ते 20 एप्रिल 1997 या काळात एच.ओ.देवेगौडा यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त आघाडीचे सरकार सत्तेतआले होते. त्यानंतर 21 एप्रिल 1997 ते 19 मार्च 1998 या काळात इंद्रकुमार गुरजाल यांनी संयुक्त आघाडी सरकारचे नेतृत्व केले.
- 6. **अटल विहारी वाजपेयी**- भाजपच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीने सत्ता स्थापन केली. तिचे नेतृत्व वाजपेयी यांनी केले. सुरुवातीला 19 मार्च 1998 ते 10 ऑक्टोबर 1999 पर्यंत व पुन्हा लोकसभेच्या निवडणुका घेऊन 11 ऑक्टोबर 1999 ते 27 मे 2004 हा 5 वर्षाचा पुर्ण काळ हे सरकार सत्तेत होते.
- एखाद्या आघाडी शासनाने आपली 5 वर्षे पुर्ण करण्याची ही पहिलीच वेळ होती.
- या संपूर्ण काळात वाजपेयी पंतप्रधान होते.
- 7. **मनमोहनसिंग**- मे 2004 ते 2009 या काळात काँग्रेसच्या नेतृत्वाखाली संयुक्त पुरोगामी आघाडी शासन सत्तेत होते या शासनाला डाव्यांच्या पाठींबा होता.
- याचे नेतृत्व मनमोहनसिंग यांनी केले.
- त्यानंतर निवडणुका घेऊन काँग्रेसच्या नेतृत्वाखाली संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार 2009 ते 2014 या काळात मनमोहनसिंग यांच्याच नेतृत्वाखाली सत्तेवर आले.
- 8. **नरेंद्र मोदी**- 2014च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपाला लोकसभेच्या 282 जागा मिळून बहुमत प्राप्त झाले होते परंतु निवडणुकीआधी भाजपच्या नेतृत्वाखाली मित्रपक्षांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) निर्माण केली होती. त्यामुळे सत्तेत मित्रपक्षांसुद्धा सामावून घेण्यात आले.
- सध्या भाजपच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आहे.

पक्षपद्धतीसमोरील आव्हाने आणि समस्या-

1. पक्षांतर्गत लोकशाहीचा अभाव-

Competitive Forum
शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ, हॅपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.
9272100500

- भारतीय पक्षपद्धतीमध्ये पक्षातील वरिष्ठ नेत्यांकडेच निर्णयाचे सर्व अधिकार किंवासत्ता केंद्रीकरण झालेले पाहवयास मिळते.
- पक्षांमध्ये नियमीत अंतर्गत निवडणुका होत नाहीत.
- वरिष्ठांनी घेतलेले कोणतेही निर्णय कार्येकते एकनिष्ठतेने स्वीकारतात.
- पक्षाच्या वरिष्ठ पातळीवर घेतले जाणारे निर्णय तळागाळातील सामान्य कार्यकत्यापर्यंत पोहचत नाहीत.
- पक्षांतर्गत लोकशाहीपेक्षा नेतृत्वाप्रती एकनिष्ठ ठेवणे याला महत्त्व दिले जाते.

2. **योग्य राजकीय पक्षाचा अभाव–**

- बऱ्याच वेळा जनतेला प्रमुख राजकीय पक्षांबद्दल अविश्वास निर्माण होतो. राजकीय पक्ष बहुतांश वेळा जनतेच्या प्रमुख अडचणी सोडवण्यावर व मुख्य गरजांवर लक्ष देण्यापेक्षा कमी महत्त्वांच्या गोष्टींभोवतीच पक्षांची ध्येयधोरणे फिरवितात. अशावेळी जनतेसमोर योग्य, राजकीय पक्षाचा पर्याय उपलब्ध नसतो.

3. **वारसा हक्काची राजकीय परंपरा–**

- बऱ्याचवेळा पक्षातील प्रमुख पदावर ठराविक घराण्यातील सदस्यांचेच वर्चस्व असते. अशावेळी पक्षातील सामान्य कार्यकर्ता वरिष्ठ स्तरावर जाऊन पक्षाचे नेतृत्व करू शकत नाही. वरीष्ठ पदावर राजकीय वारसाहक्काने बसलेल्या व्यक्तीस तळागाळातील प्रश्नांची जाणीव नसते. घराणेशाही पद्धतीने पक्षप्रमुख पद किंवा पक्षाच्या उच्चस्तरीय पदावर निवड होणे ही बाब लोकशाहीस मारक आहे. यामुळे एखादा कर्तबगार सर्वसामान्य कार्यकर्ता उच्चपदावर पोहचू शकत नाही.

4. **संघटनात्मक बांधणी–**

- भारतात धर्मनिरपेक्ष स्वरुपात पक्षाची बांधणी केल्यास लोकांना तेवढा प्रतिसाद मिळणार नाही याची पक्ष संघटकांना जाणीव आहे. भारतीयांच्या मनावर जात, धर्म, प्रांत यांचा प्रचंड पगडा आहे. हे ओळखून पक्ष लोकांना भावनीक आव्हान करतात आणि आपल्या राजकारणाची पोळी भाजून घेतात. वरील कारणाने संपूर्ण भारतभरआपल्या पक्षाची संघटनात्मक बांधणी करणे एखाद्या पक्षाला कठीण जाते कारण भारताच्या वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या जातीधर्माचे लोक वसलेले आहेत.
- भाजप आणि साम्यवादी पक्षाने आपली संघटनात्मक बांधणी प्रबळ करण्याचा प्रयत्न केलेला आहे.
- पक्षाच्या संघटना बांधणीतील आणखी एक प्रमुख अडथळ म्हणजे 'फुटीरतावाद'

5. **निवडणुकीत पैसे आणि बळाचा वापर–**

- निवडणुक जिंकने या एकमेव ध्येयासाठी पक्ष अनेक गैरमार्गाचा वापर करतात. निवडणुक काळात पैसा आणि बळाचा वापर करून निवडणुकीवर प्रभाव टाकण्यात पक्षांत स्पर्धा वाढली आहे. नेतृत्वगुण, संघटनात्मक कौशल्ययांच्या आधारावर उमेदवार उभा करण्यापेक्षा जास्त पैसा खर्च करू शकणाऱ्या व्यक्तिला पक्षाचे तिकीट मिळते. अनेक कपंन्या, धनाड्डे व्यक्ती पक्षाला निवडणुकीच्या वेळी पैसा पुरवतात व पक्ष निवडून सत्तेवर आल्यावर त्यांच्या धोरण निर्मितीवर व निर्णयावर प्रभाव पाडून आपल्याला अनुकुल धोरण राबवण्यास भाग पाडतात. लोकशाहीमध्ये ही बाब अत्यंत धोकादायक आहे.

6. **पक्षांतर–**

- दुर्बल पक्षनेतृत्वामुळे पक्षनिष्ठता संपुष्टात येते. अशावेळी पक्षांतरण होण्याची समस्या निर्माण होते. पक्षांतरामुळे राजकीय अस्थैर्य निर्माण होत तसेच पक्ष कमकुवत बनतो.

7. **पक्षनिधी उभारतानी गैरमार्गांचा वापर–**

- निवडणुक काळात होणारा खर्च भागवण्यासाठी तसेच पक्षाचा दैनंदिन खर्च भागवण्यासाठी पैशाचा आवश्यकता असते. यासाठी राजकीय पक्ष निधी उभारण्यासाठी अनेक गैरमार्गांचा वापर करतात.

Competitive Forum

8. **महिलांचे अत्यप्रतिनिधित्व–**

- देशात महिलांची मतदारांची संख्या जवळपास पुरुषांच्या संख्येएवढी असते. परंतु कायदेमंडळात प्रतिनिधीत्वाची महिलांची संख्या पाहिल्यास ती अल्पच दिसते. यावरून सर्वच राजकीय पक्ष महिलांच्या कायदेमंडळातील सदस्यत्वाबाबत उदासीन असल्याचे दिसते.
- लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये महिलांसुद्धा समान प्रतिनिधीत्व दिल्या गेले पाहिजे. परंतु महिलांच्या कायदेमंडळातील आरक्षणाबाबतच्या विधेयकावर राजकीय पक्षांची भूमिका निराशाजनक आहे.

9. **उच्च विचारसणी व मुल्यांचा राजकारणात अभाव–**

सत्ता स्थापन करणे हे एकच प्रमुख ध्येय असल्याने उच्च मुल्य आणि विचारसरणीचा पक्षपद्धतीमध्ये अभाव दिसून येतो. सत्तासंघर्षात पक्षांना मुल्यांचा व विचारसरणीचा विसर पडतो.

10. **नेतृत्वगुणांचा पक्षश्रेष्ठीतील अभाव–**

शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ, हॅपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.
9272100500

- कोणत्याही मार्गाचा अवलंब करून पक्षप्रमुख पदापर्यंत पोहोचलेल्या पक्षश्रेष्ठींमध्ये सध्याच्या काळात नेतृत्वगुणांचा अभाव दिसून येतो. अनेक गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोकसुद्धा पक्षाचे नेतृत्व करू लागत आहेत. विविध गुन्ह्यांचे आरोप असलेल्या व्यक्तींना पक्षाने पक्षप्रमुख पदावर नेमणे हे समाजव्यवस्थेच्या व लोकशाहीच्या विकासास धोकादायक आहे.

राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांना मान्यता-

- निवडणुकीसाठी निवडणुक आयोगाकडे नोंदणी झालेल्या पक्षांना त्यांच्या निवडणुकीतील कामगिरीनुसार राष्ट्रीय किंवा प्रादेशिक पक्ष म्हणुन मान्यता मिळते.
- निवडणुक आयोगाला राजकीय पक्षांना मान्यता देण्याबाबत काही विशेषाधिकार आहेत-

1. राष्ट्रीय पक्षाला मान्यता देणे.
2. पक्ष चिन्हांचे वाटप करणे.
3. दुरदर्शन, आकाशवाणी यांसारख्या सार्वजनिक प्रसारमाध्यमावरून राजकीय प्रसारणाच्या वेळा ठरवणे.
4. मतदार याद्या तयार करणे.
5. निवडणुकांचे वेळापत्रक बनवून त्याप्रमाणे निवडणुकांचे आयोजन, संचलन करणे.
6. प्रादेशिक पक्षाला मान्यता देणे.

- राष्ट्रीय पक्षांना दिलेली चिन्हे हे संपुर्ण देशभर त्या पक्षासाठी आरक्षीत असतात.
- प्रादेशिक पक्षाला देण्यात आलेले चिन्ह त्या पक्षाला ज्या ज्या राज्यात मान्यता आहे तेथे त्या पक्षासाठी आरक्षीत असतात.

राष्ट्रीय पक्षचा दर्जा मिळण्याबाबतचे निकष-

1. त्या पक्षाला कोणत्याही 3 राज्यांमधून लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये किमान 2% जागांवर विजय मिळालेला असावा.

किंवा

2. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत किंवा राज्य विधानसभेच्या निवडणुकीत देशातील कोणत्याही किमान 4 राज्यांमध्ये एकूण वैध मतांपैकी किमान 6% मते आणि एक किंवा अधिक राज्यांमधून लोकसभेच्या 4 जागा मिळाल्या पाहिजे.

किंवा

3. एखाद्या प्रादेशिक पक्षाला किमान कोणत्याही 4 घटकराज्यामध्ये प्रादेशिक पक्ष म्हणुन मान्यता मिळाली असेल तर तो पक्ष राष्ट्रीय पक्ष म्हणुन निवडणुक आयोग घोषीत करते.

प्रादेशिक पक्षाचा दर्जा मिळवण्याचे निकष-

1. एखाद्या राज्यातून लोकसभेची किमान एक जागा मिळालेली असावी व लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकींमध्ये त्या राज्यात त्या पक्षाला एकूण वैध मताच्या किमान 6% मते मिळालेली असावी.

किंवा

2. संबंधीत राज्याच्या विधानसभेच्या किमान 2 जागा प्राप्त झालेल्या असाव्या आणि त्या राज्याच्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये एकूण वैध मतांच्या 6% मते प्राप्त असावे.

किंवा

3. संबंधीत राज्यातून लोकसभेवर निवडून जाणाऱ्या एकूण जागांपैकी प्रत्येक 25 जागेमध्ये 1 (25:1) या प्रमाणात विजय मिळवावा अथवा लोकसभे[illegible] दर 25 [illegible] विजय मिळवलेला असावा.

Competitive Forum

किंवा

4. संबंधीत राज्यातील विधानसभेच्या 3 जागा अथवा विधानसभेच्या एकूण सदस्य संख्येच्या 3% जागा यापैकी जे जास्त असेल ते मिळविणे आवश्यक आहे.


भारतातील राष्ट्रीय पक्ष-

1. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस-

काँग्रेसची स्थापना व पार्श्वभूमी-

- ब्रिटिश शासनात सचिव या पदावरून निवृत्त झालेले माजी सनदी अधिकारी ॲलन ऑक्टेव्हिअन ह्युम यांनी भारताच्या प्रगतीला हातभार

लावण्यासाठी सुशिक्षीत भारतीयांना एकत्र आणण्याच्या उद्दिष्टाने 'इंडियन नॅशनल युनियन' नावाची संघटना स्थापन करण्याबाबत काही भारतीय नेत्यांना एकत्र करून डिसेंबर 1885 मध्ये अखील भारतीय स्तरावर एक अधिवेशन भरवण्याचे ठरविले.



- हे अधिवेशन पुण्यात घेण्याचे ठरले होते. परंतु कॉलराची साथ पुण्यात पसरल्याने ते मुंबईला 28 डिसेंबर 1885 रोजी भरवण्यात आले.
- 28 डिसेंबर 1885 रोजी याच अधिवेशनात 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस'ची स्थापना करण्यात आली.
- हे अधिवेशन मुंबईच्या गोकुळदास तेजपाल संस्कृत पाठशाळेत भरविण्यात आले होते.
- ॲलन ऑक्टेव्हिअन ह्युम हे काँग्रेसचे संस्थापक व सचिव होते.
- काँग्रेसचे पहिले अधिवेशन व्योमेशचंद्र बॅनर्जी यांच्या अध्यक्षतेखाली 28 ते 31 डिसेंबर 1885 या कालावधीत पार पडले.
- काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाला उपस्थित काही महत्त्वाचे नेते- गो.ग.आगरकर, दादाभाई नौरोजी, दिनशा वाच्छा, फिरोजशहा मेहता, रहीमतुल्ला सयानी, बद्रुदीन तयबजी, न्या.के.टी.तेलंग, न्या.रानडे, डॉ.रा.ग.भांडारकर, वीर राघवाचारी, सुब्रम्हण्यम अय्यर, आनंद चारलू, रंगय्या नायडू इत्यादी.
- काँग्रेसची स्थापना ह्युम व इतरांनी ब्रिटीश भारत शासन व भारतीय जनता यांच्यात 'सुरक्षा झडप' म्हणुन केली असा एक मतप्रवाह आहे.
- सुरुवातीला काँग्रेस ही संघटना राजकीय पक्ष नसुन चळवळ होती. ब्रिटीश साम्राज्याच्या विरोधात या चळवळीने व्यापक रुप धारण केले होते. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली या चळवळीला जनचळवळीचे स्वरुप प्राप्त झाले. या चळवळीला कुशल नेतृत्व लाभल्याने ही चळवळ देशाच्या कान्याकोपऱ्यात जाऊन पोहचली.
- काँग्रेसने भारतीय जनतेच्या मनात राजकीय व सामाजिक स्वातंत्र्याची उत्कट भावना निर्माण केली.
- 1935 च्या कायद्याने प्रांतात निवडणुका घेण्याचे ठरले आणि बहुतांश ठिकाणी काँग्रेसने प्रांतीक सरकारे स्थापन केले. यानंतर काँग्रेस पक्षाने सामाजिक व राजकीय अशा दोन्ही भुमिका बजावल्या.
- भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेस पक्षच सत्ताधारी पक्ष म्हणून समोर आला.

काँग्रेस पक्षाचा उद्देश–

- भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या घटनेनुसार, एक संसदीय लोकशाही असलेले समाजवादी राष्ट्र जिथे संधी तसेच राजकीय, आर्थिक आणि सामाजिक हक्कांत समानता व जागतिक शांततेचे उदिद्ष्ट आहे, अशा भारतीय नागरिकांचे आणि भारतीय प्रशासनाची शांततापुर्वक आणि घटनात्मक मार्गाने प्रगती व कल्याण करणे हा काँग्रेस पक्षाचा उद्देश आहे.

काँग्रेसची विचारसरणी–

- सुरुवातीपासुनच काँग्रेस पक्षाने लोकशाही, समाजवाद यांचा पुरस्कार केलेला आहे.
- काँग्रेसने नियोजनाच्या माध्यमातून आर्थिक विकास तसेच अर्थव्यवस्थेत शासनाची महत्त्वपूर्ण भूमिका यावर भर दिला.
- पक्षाने पंचायत राजच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हातात सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचे ध्येय बाळगले.
- सहकारी चळवळींना प्रोत्साहन देऊन तळागाळात लोकशाही रुजवण्याचा प्रयत्न केला.
- काँग्रेसने परराष्ट्र धोरणाबाबत अलिप्ततावादाचा पुरस्कार केला.
- काँग्रेसने सामाजिक न्याय, जमातवादाला विरोध, न्यायव्यवस्थेतील सुधारणा, स्त्रिया व बालकांचे सक्षमीकरण या मुद्यांवर विशेष भर दिला.
- इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस (आय) पक्षाच्या विचारधारेत, धर्मनिरपेक्षता, समाजवाद लोकशाही प्रती बांधीलकी या मुद्यांचा अंतर्भाव होता.
- काँग्रेसचे मुळ धोरणानुसार समाजवादी दृष्टीकोन असला परंतु तरीही त्या परिस्थितीअनुरुप पक्षाने 1991 साली खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचे धोरण अवलंबवले आहे.
- पक्षाची परराष्ट्र धोरणाबाबतची मुळ विचारसरणी अलीप्ततावादी असली तरी इंदिरा गांधीच्या काळात सोव्हित युनियनशी जवळीक साधली तर मनमोहनसिंह यांच्या काळात अमेरिकेसोबत मैत्री वाढविली.

स्वातंत्र्यानंतर काँग्रेस–

- स्वातंत्र्य चळवळीतील काँग्रेसची महत्त्वपूर्ण भूमिका जवाहरलाल नेहरूंचे दिव्यवलयंकीत नेतृत्व यामुळे स्वातंत्र्यानंतर जवळपास 1969 पर्यंत संपुर्ण भारतभर काँग्रेसपक्ष एक प्रमुख पक्षाची भुमिका निभावत होता.
- 1964 साली नेहरुंचे निधन झाल्यानंतर 1967 साली झालेल्या राज्यांच्या विधान सभांच्या निवडणुकांत निम्म्यापेक्षा अधिक राज्यांत काँग्रेसने सत्ता मगावली.
- 1969 साली काँग्रेस पक्षात फुट पडली.

Competitive Forum

- या फुटीनंतर काँग्रेसचे नेतृत्व इंदिरा गांधींनी केले.
- इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील 1971 च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत तसेच 1972 सालच्या विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाला प्रचंड बहुमत मिळून पक्षाचे पुन्हा वर्चस्व निर्माण झाले. 1971 सालच्या निवडणुकीचा इंदिरा गांधींच्या निवडीसंबंधीत वाद, राजनारायण विरुद्ध इंदिरा गांधी या खटल्याचा निकाल अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी विरोधात दिला.
- 1975 ते 1977 या काळात इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने देशात आणीबाणी लागु केली.
- आणीबाणीच्या काळातच भारतीय लोकदल, भारतीय जनसंघ, समाजवादी पक्ष आणि काँग्रेसमधुन फुटुन बाहेर पडलेला गट काँग्रेस (संघटन) या पक्षांच्या एकत्रीकरणातून 'जनता पक्षा'ची स्थापना.
- आणीबाणीनंतर घेण्यात आलेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर जगजीवनराम यांच्या नेतृत्वाखाली **'काँग्रेस फॉर डेमोक्रसी'** नावाचा आणखी एक गट काँग्रेसमधून बाहेर पडून जनता पक्षाला जाऊन मिळाला.
- जनता पक्षाने सरकार स्थापन केले परंतु अनेक विचारांचे गट एकत्र आले होते. त्यांच्यात मतभिन्नता होती. त्यांच्यात नेतृत्वामध्ये वाद झाल्याने दोनच वर्षात सरकार कोसळले.
- 1979 सालच्या लोकसभेच्या सार्वजनिक निवडणुकीत इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस (आय) पक्षाला बहुमत प्राप्त झाले.
- इंदिरा गांधींची त्यांच्या शिख अंगरक्षकांकडून 31 ऑक्टोबर 1984 रोजी हत्या.
- तत्कालीन राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांनी राजीवगांधींना पंतप्रधानपदी नेमले.
- त्यानंतरच्या 8 व्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसला प्रचंड बहुमत.
- 1991 साली मध्यावधी निवडणुका व राजीव गांधींची हत्या. मध्यावदी निवडणुकीत काँग्रेसला सर्वाधिक जागा-पी.व्ही.नरसिंहराव पंतप्रधान.
- 1998- सोनिया गांधींकडे पक्षाचे अध्यक्षपद
- 2004- काँग्रेस पक्ष प्रणीत संयुक्त पुरोगामी आघाडीचे (यूपीए) सरकार स्थापन-मनमोहनसिंग पंतप्रधान
- 2009- यूपीएचे काँग्रेसच्या नेतृत्वाखाली सरकारच्या स्थापन मनमोहनसिंह पुन्हा सलग दुसऱ्यांदा पंतप्रधान
- 2014- काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखालील युपीएचा पराभव नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपाचे सरकार स्थापन.

पक्षांतर्गत संरचना-

- या पक्षात 'अध्यक्ष' हा पक्षाचा प्रमुख असतो.
- आवश्यकता वाटल्यास अध्यक्ष उपाध्यक्ष पदाची नेमणुक करू शकतो.
- अध्यक्षपदाची निवडणुक दरवर्षी होते. मात्र एकाच व्यक्तीने सलग किती वेळा अध्यक्ष व्हावे यावर बंधन नाही.
- पंडीत नेहरू पंतप्रधान असेपर्यंतच्या काळात ते फार क्वचित अध्यक्ष होते. मात्र श्रीमती इंदिरा गांधी यांनी पक्षाचे अध्यक्षपद व पंतप्रधानपद हे एकाच व्यक्तीने भुषवायची प्रथा सुरु केली. जी पी.व्ही.नरसिंह राव यांच्यापर्यंत चालन आली.
- त्यानंतर श्रीमती सोनिया गांधी यांनी पंतप्रधानपद दुसऱ्या व्यक्तीकडे सोपवून पुन्हा सत्ताकेंद्राची विभागणी केली.
- काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदांची निवडणुक झाल्यावर अध्यक्ष हा उपाध्यक्ष, जनरल-सेक्रेटरीज, कोशाध्यक्ष, प्रभारी आणि सेक्रेटरीजची निवड करतो. या पदांवर किती व्यक्तींची निवड करावी यावर कोणतेही बंधन नाही.
- सध्या- अध्यक्ष - सोनिया गांधी, उपाध्यक्ष-राहूल गांधी, कोषाध्यक्ष-श्री मोतीलाल व्होरा, पॉलेटिकल सेक्रेटरी-श्री अहमद पटेल.

काँग्रेस वर्किंग कमिटी-

- या कमिटीलाच पक्षाची हायकमांड असे म्हटले जाते. हा एक अधिकारी गट आहे.
- या गटाला काँग्रेस पक्षाच्या [illegible] अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.
- या गटाने घेतलेला निर्णय हा अंतिम आणि सर्वोच्च मानला जातो.
- पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष व उपाध्यक्ष या गटाचे पदसिद्ध अध्यक्ष व उपाध्यक्ष असतात.
- या गटात किती व्यक्ती असाव्यात यावर बंधने नाहीत. तरी अध्यक्ष व उपाध्यक्ष सोडून साधारणतः 15 ते 20 व्यक्ती या गटात असतात.
- सध्या गटाचे 19 सदस्य आहेत. ज्यात श्रीमती सोनिया गांधी अध्यक्षा आणि श्री राहूल गांधी हे उपाध्यक्ष आहेत.
- याच बरोबर 6 अधिकृत पक्षप्रवक्ते आहेत. शिवाय विविध विषयावर अनेक समित्या आहेत.

राज्यस्तरावर प्रदेश काँग्रेस कमिटी-

- राज्यस्तरावर प्रदेश काँग्रेस कमिटी (PCC) नावाची समिती असते. जीचे स्वरुप केंद्रीय समितीप्रमाणेच, फक्त राज्यस्तरावर असते.
- पक्षाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत राष्ट्रीय ऑफिस बेअरर्स तसेच प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सदस्यांना मताधिकार असतो.

Competitive Forum

काँग्रेस पक्षाचा केंद्रीय निवडणुक विभाग–

- केवळ काँग्रेस असा एकच पक्ष आहे ज्यात 'केंद्रीय निवडणुक विभाग'नावाचा स्वायत्त विभाग आहे.
- सदर विभाग, पक्षांतर्गत निवडणुका झाल्यास त्या निष्पक्ष होतील याची खबरदारी घेतो.

काँग्रेस पक्षाची धोरणे आणि जाहीरनामा–

- स्वातंत्र्यानंतर साम्राज्यवादाने पिळून काढलेल्या भारतीय जनतेची दारिद्र्यावस्था दूर करून सर्वसमावेशक विकास साधण्यासाठी काँग्रेसन नियोजनबद्ध आर्थिक विकासाचे धोरण आखले.
- काँग्रेसच्या आवडी अधिवेशनामध्ये (1955) 'समाजवादी समाजरचना' हे पक्षाने आपले उद्दिष्ट स्विकारले.
- 1969 साली 14 बँकांचे राष्ट्रीयीकरण.
- 1971 साली पक्षाने 20 कलमी कार्यक्रम घोषीत केला आणि 'गरिबी हटाव'चा नारा दिला.
- 1991 साली पक्षाने महत्त्वपूर्ण असे नवीन आर्थिक धोरण स्वीकारले.

काँग्रेस पक्षाच्या 2014 सालच्या जाहीरनाम्यातील काही महत्त्वाचे मुद्दे–

- शेतकऱ्यांना जास्तीत जास्त किमान आधारभूत किंमत मिळवून देणे.
- संसदीय लोकशाहीचे जतन व संघटन अल्पसंख्यांक व दलितांना अस्वासन हे 1977 च्या जाहीरनाम्यात हक्क घोषीत केले होते. त्यात 201 सालच्या जाहीरनाम्यात विस्तार करून निवास आणि आरोग्याचा हक्क देण्याचे जाहीर केले.
- पायाभूत सुविधांच्या वृद्धी व विकासावर विशेष भर
- देशात 100% विजपुरवठ्याचे लक्ष
- स्वतंत्रपणे नियमनाद्वारे नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन

काँग्रेस पक्ष आणि महाराष्ट्र–

- मुंबई या द्विभाषीक राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात काँग्रेसची त्याचवेळी आपल्या संघटना व नेतृत्वगुणांच्या कौशल्याद्वारे पायाभरणी केली.
- महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली तेव्हा यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री बनले.
- काँग्रेसने महाराष्ट्रात बहुजन समाजाचे बेरजेचे राजकारण करत आपले वर्चस्व निर्माण केले.
- 1978 नंतर पक्षात फाटाफुट, त्यामुळे काँग्रेसचे महाराष्ट्रातील वर्चस्व धोक्यात.
- 1978 साली काँग्रेसमधून बाहेर पडून शरद पवारांनी महाराष्ट्रात पुरोगामी लोकशाही दलाचे बिगर काँग्रेसी सरकार स्थापन करून काँग्रेसची महाराष्ट्रातील सत्ता संपुष्टात आणली.
- 1986 – शरद पवार पुन्हा काँग्रेसमध्ये
- 1999 च्या विधानसभेत 249 पैकी सर्वाधिक 75 जागा तरी स्वबळावर सत्ता स्थापन करता आली नाही यावेळी शरद पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर युती करून काँग्रेसने महाराष्ट्रात सरकार स्थापन केले.
- त्यानंतर 2004 आणि 2009 सालच्या विधानसभेच्या निवडणुकीनंतरसुद्धा स्पष्ट बहुमत नाही मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर आघाडी करून सत्ता स्थापन केली.
- सोनिया गांधींच्या परकीय असण्याच्या मुद्यावरून काँग्रेसमध्ये 1999 साली बाहेर पडून शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला.
- काँग्रेसचा मुख्य जनाधार सुरुवातीला मराठा–कुणबी होता. नंतरच्या काळात काँग्रेसने हा जनाधार बऱ्याच अंशी गमावला.

Competitive Forum

2. भारतीय जनता पक्ष (BJP)

पार्श्वभूमी–



- भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेचे मुळ शामाप्रसाद मुखर्जी द्वारा 1951 मध्ये स्थापन करण्यात आलेल्या 'जनसंघ पक्षात' जाते.
- काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांना एक राजकीय पर्याय म्हणुन 21 ऑक्टोबर 1951 रोजी जनसंघ पक्षाची स्थापना.
- जनसंघ पक्षाचे उद्दिष्ट– कायद्याचे राज्य, एक संस्कृती, एक राष्ट्र आणि या आधारावर आधुनिक भारत निर्माण करणे.
- राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) हा भाजपाचा महत्त्वाचा संघटनात्मक आधार आहे.

शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ,
हॅपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे–३०
• अतिरिक्त नोट्ससाठी
Telegram Channel-
@abhijitrathod
Join करा.
9272100500

- आणीबाणीच्या समाप्तीनंतर 1977 मध्ये जनसंघ आणि भारतीय लोकदल, काँग्रेस (ओ), समाजवादी पार्टी या पक्षांनी एकत्र येऊन जनता पक्षाची स्थापना केली.
- काँग्रेस पक्षाचा 1977 च्या निवडणुकीत पराभव करून जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले.
- हे सरकार 3 वर्षे चालले.
- जनसंघ पक्ष राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची राजकीय शाखा म्हणुन ओळखल्या जात होता. हाच वारसा पुढे भाजपकडे आला.
- गौहत्याबंदी, जम्मुकाश्मीरला देण्यात आलेला विशेष अधिकार काढून घेणे, समान नागरी कायदा लागू करणे हे जनसंघ पक्षाचे प्रमुख मुद्दे होते.
- 1952 च्या पहिल्या लोकसभा निवडणुकीत जनसंघ पक्षाला केवळ 3 जागा प्राप्त झाल्या होत्या.
- जनसंघ आणि मीत्रपक्षांनी 1977 साली स्थापन केलेल्या जनता पक्षाला 1977 सालच्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रचंड यश मिळाले आणि मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली जनता पक्षाने सरकार स्थापन केले.
- त्यावेळी जनसंघ पक्षाचे प्रमुख अटल बिहारी वाजपेयी होते आणि त्यांना जनता पक्षाच्या सरकारमध्ये परराष्ट्रमंत्रीपदी नेमले होते.
- 1980 साली जनता पक्षात फुट पडली जनसंघ पक्ष जनतापक्षातून बाहेर पडला आणि भारतीय जनता पक्षाची स्थापना करण्यात आली.
- भारतीय जनता पार्टी तसे पाहता जनसंघाचेच नवीन रुप होते.
- भारतीय जनता पक्षाचे पहीले अध्यक्ष म्हणुन अटल बिहारी वाजपेयी यांची निवड करण्यात आली होती.
- भाजपवर RSS चा प्रभाव वाढत गेला. भाजपने हिंदु राष्ट्रवादाचा व्यापक प्रचार-प्रसार केला परंतु तरीसुद्धा सुरुवातीच्या काळात पक्षाला यश मिळाले नाही.
- 1984 च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपला केवळ दोन जागेवर समाधान मानावे लागले.
- 1984 च्या निवडणुकीआधीच इंदिरा गांधींची हत्या झाली होती. काँग्रेस पक्षाला जनतेची सहानुभुती मिळाल्यामुळे 1984 च्या निवडणुकीत प्रचंड यश मिळाले.
- वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली सुरुवातीच्या काळात भाजपचे उदारवादी रणनिती धोरण अवलंबले होते. परंतु ते धोरण अपयशी ठरल्याने भाजपने हिंदुत्व आणि हिंदु कट्टरतावाद याचे पूर्ण कट्टरपणे पालन करण्याचे उरवले.
- त्यासाठी 1984 मध्ये लालकृष्ण अडवाणी यांना भाजपने अध्यक्ष बनवण्यात आले.
- लालकृष्ण अडवाणींच्या अध्यक्षतेखाली भाजप रामजन्मभुमीची आवाज बनली.
- 1980 च्या दशकाच्या पुर्वार्धात विश्व हिंदु परिषदेने अयोध्यामध्ये बाबरी मस्जिदच्या जागेवर राममंदीर बनवण्याचे एक अभियान सुरु केले होते. तेथे मस्जितची निर्मिती मुघल बादशाह बाबरने केली होती. यावर एक वाद आहे की, तेथे पुर्वी राममंदीर होते व रामजन्मभुमीच्या ठिकाणी मस्जिद निर्माण केली, यासाठी मंदीर उध्वस्त करण्यात आले.
- भाजपने विहींपच्या या आंदोलनाला साथ दिली आणि आपल्या निवडणुक प्रचाराचा प्रमुख हिस्सा त्या मुद्याला बनविण्यात आले.
- याच्या परिणामस्वरुप 1989 च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत भाजपला 86 जागांवर विजय प्राप्त झाला आणि समान विचारधारा असलेल्या नॅशनल फ्रंटच्या विश्वनाथ प्रतापसिंह सरकारला समर्थन दिले.
- सप्टेंबर 1990 मध्ये राममंदीराच्या समर्थनासाठी लालकृष्ण अडवाणी यांच्या 'रथयात्रेला' प्रारंभ.
- बाबरी मस्जिदच्या प्रकरणानंतर झालेल्या निवडणुकीत भाजपला लोकसभेच्या 120 जागा मिळाल्या तसेच उत्तर प्रदेशात सर्वात मोठा पक्ष म्हणुन भाजपसमोर आला.
- न्यायमुर्ती मनमोहनसिंह लिब्रहान' यांच्याद्वारे लिब्रहान 2009 च्या एका अहवालात भाजपच्या अनेक नेत्यांसहीत 68 लोकांना बाबरी मस्जिद [illegible] जबाबदार ठरविण्यात आले.

Competitive Forum

- 1996 च्या सार्वजनिक निवडणुकीत सांप्रदायीकतेवर आधारित मुद्यांवर लोकसभेच्या 161 जागा मिळवून भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला. वाजपेयी यांनी पंतप्रधान म्हणुन शपथ घेतली परंतु लोकसभेत बहुमत सिद्ध करता न आल्याने केवळ 13 दिवसातच वाजपेयी यांना राजीनामा द्यावा लागला.
- वाजपेयी हे भाजपचे पहिले पंतप्रधान बनले होते.
- 1998 मध्ये भाजप आणि समविचारी पक्षांनी 'राष्ट्रीय जनतांत्रिक गठबंधन (NDA)' नावाची एक आघाडी निर्माण करून सार्वजनिक निवडणुकीत 1998 च्या लोकसभा निवडणुकी NDA ने विजय मिळवला व भाजपच्या नेतृत्वाखाली आघाडी सरकार स्थापन झाले आणि वाजपेयी पुन्हा पंतप्रधान बनले.
- राष्ट्रीय जनतांत्रिक गठबंधनमध्ये पुढील प्रादेशिक पक्षांचा समावेश होता- समता पार्टी, शिरोमणी, अकाली दल, शिवसेना, अन्ना द्रमुक (AIDMK), बीजु जनतादल यांचा समावेश होता. यामध्ये शिवसेनासोडून इतर कोणत्याही पक्षाशी भाजपची विचारधारा मिळत नव्हती.

शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ, हॅपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.
9272100500

- अमर्त्यसेन यांनी या आघाडीला 'अनोपचारिक (एड-हॉक) सामुहिकरण' असे म्हटले होते.
- या आघाडीला तेलगु देसम पार्टीने बाहेरुन पाठींबा दिला होता.
- जयललितांच्या नेतृत्वाखालील अन्नाद्रमुक पक्षाने 1999साली पाठींबा काढून घेतला आणि सरकार कोसळले.
- पुन्हा निवडणुका घेतल्यानंतर भाजपला 1999 सालच्या लोकसभा निवडणुकीत 183 जागा मिळाल्या आणि भाजप+मित्रपक्षांना मिळून एकूण 303 जागा प्राप्त झाल्या.
- वाजपेयी पुन्हा तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले. लालकृष्ण अडवाणी उपपंतप्रधान आणि गृहमंत्री बनले. या सरकारने आपला 5 वर्षाचा कार्यकाळ पुर्ण केला.
- वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली NDA ने 'उदय भारत' चा नारा दिला होता ज्यात NDA सरकारला देशात आर्थिक बदल घडवून आणल्याचे श्रेय देण्यात आले होते.
- 2004 ते 2009 च्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील UPA ने सत्ता मिळवली त्यावेळी भाजपच्या नेतृत्वाखाली NDA ने विरोधीपक्षाची भुमिका बजावली.
- 2014 च्या लोकसभेच्या निवडणुकीत भाजपने 282 जागा मिळवून सर्वात मोठा पक्ष ठरला.
- भाजपच्या नेतृत्वाखालील भाजपसहीत सर्व घटकपक्षांच्या मिळून NDA ला 336 जागा प्राप्त झाल्या.
- 1984 नंतर भारतीय संसदेच्या इतिहासात पहिल्यांदा एखाद्या पक्षाला पूर्ण बहुमत प्राप्त झाले.
- भाजपचे नेते नरेंद्र मोदी 26 मे 2014 रोजी भारताचे 15 वे पंतप्रधान बनले तर भाजपचे दुसरे व्यक्ती पंतप्रधान झाले.

भाजपच्या दोन्ही पंतप्रधानांबाबत महत्त्वाचे-

अ.क्र.	पंतप्रधान	वर्षे	मतदारसंघ (लोकसभा)
1.	अटलबिहारी वाजपेयी	1996, 1998-2004	लखनौ
2.	नरेंद्र मोदी	2014 ते पदस्थ	वाराणसी

अलिकडील काळातील भाजपचे अध्यक्ष-

1. 2006-09 राजनाथसिंह
2. 2009-13 नितीन गडकरी
3. 2013-14 राजनाथसिंह (दुसऱ्यांदा)
4. 2014 ते आतापर्यंत अमित शाह

भाजपची विचारसरणी-

- हिंदुराष्ट्राप्रती बांधीलकी
- सुरुवातीला गांधीवादी समाजवादाचा पुरस्कार
- भाजपच्या समाजवादावर गांधी, दीनदयाळ उपाध्याय आणि जयप्रकाश नारायण यांच्या विचारांचा प्रभाव
- हिंदुत्वावर विशेष भर देतो परंतु जाहीरनाम्यात सर्वांना समान न्यायाची भुमिका घेतो.
- सत्तेत नसतांना स्वदेशीवर भर देऊन जागतिकीकरण व बहुराष्ट्रीय कंपन्यांना विरोध करण्याचे सांगतो तर सत्तेत आल्यावर मात्र जागतिकीकरणाच्या धोरणाचा पुरस्कार करत असल्याचे दिसते.
- कलम 370 ला भाजपचा नेहमीच विरोधी राहीला आहे. परंतु जम्मु-काश्मीरमध्ये सरकार स्थापन करण्यासाठी जम्मु-काश्मीरच्या पिपल्स डेमोक्रेटिक पार्टी सोबत युती करतांना कलम 370 ला विरोध भाजपने बाजुला ठेवला.
- भाजप नेहमी समान नागरी कायद्याचा आग्रह धरतो.

Competitive Forum

पक्षाची कृती-कार्यक्रम व जाहीरनामा-

- काँग्रेस आणि अन्य पक्षांना पर्याय निर्माण करणे हा भाजपचा सुरुवातीच्या काळातील उद्देश होता.
- भाजपने आणीबाणीच्या विरोधात आवाज उठवला.
- सुरुवातीच्या काळात गांधीवाद, समाजवादाचा पुरस्कार भाजपने केला.
- जवळपास प्रत्येक निवडणुकीत भाजपने रामजन्मभुमीवरील बाबरी मस्जिद व त्या ठिकाणी निर्माण करायचे राममंदीर हे मुद्दे चघळीत ठेवले.
- मंडल आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीला भाजपचा विरोध.
- भाजपच्या काळात पराष्ट्रधोरण अमेरिकेकडे वळलेले दिसते.

- भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत राहुनच राममंदीर निर्माण करण्याबाबत प्रयत्न
- कलम 370 रद्द करण्याबाबत आग्रही
- उच्च व्याजदर व सतत भेडसावणारी मंदीचे चक्र कायमचे दुर करण्याच प्रयत्न करणार.
- परकीय गुंतवणुक रोजगार जास्तीत जास्त निर्माण करणाऱ्या क्षेत्राकडे वळवणार.

भाजपची संरचना–

- अध्यक्ष– पक्षाच्या अध्यक्षाकडे पक्षाचे सर्व अधिकार असतात. त्याचे पक्षातील निर्णय अंतिम असतात.
- 2012 पर्यंत पक्षाच्या घटनेनुसार पक्षाचा अध्यक्ष सलग एकावेळी सलग 3 वर्षांपर्यंतच अध्यक्ष पदावर राहील.
- 2012 मध्ये पक्षाच्या घटनेत दुरुस्ती करण्यात आली त्यानुसार पक्षाचा अध्यक्ष आपला 3 वर्षाचा पदाचा काळ कार्यकाळ संपल्यानंतर पुन्हा सलग पुढील 3 वर्षापर्यंत पदावर राहू शकतो. म्हणजेच अध्यक्ष पदाच्या दोन टर्म सलग पुर्ण करू शकतो.
- **राष्ट्रीय कार्यकारणी–** यात पक्षाचे देशभरातील काही महत्त्वाचे वरिष्ठ नेते असतात. पक्षाचे महत्त्वाचे निर्णय या राष्ट्रीय कार्यकारिणीद्वारे घेतले जातात.
- याच कार्यकारिणीतील काही सदस्य उपाध्यक्षपदी, महासचिव, कोषाध्यक्ष तसेच सचिव पदावर नियुक्त केल्या जातात.
- राज्यपातळीवर पक्षाचे प्रदेश प्रमुख व त्यांच्या नेतृत्वाखाली राज्यस्थरावर कार्यकारीणी असते. राज्यातील महत्त्वाचे निर्णय राज्य स्थरावरील कार्यकारिणीत घेतले जातात.
- पक्षाच्या स्थानिक पातळीवरसुद्धा प्रादेशिक, जिल्हा, मंडळ, ग्राम पातळीवर समित्या असतात.

भाजपची महाराष्ट्रातील वाटचाल–

- 1980 साली स्थापना झालेल्या भाजपची 1986 च्या रामजन्मभुमीच्या वादापासून खऱ्या अर्थाने प्रचार–प्रसारास सुरुवात झाली.
- हिंदुत्वाच्या मुद्यावर समविचारी पक्षांना सोबत घेऊन आपली हिंदुत्ववादी विचारधारा बळकट करत पुढे जाणे हे प्रयोग भाजपने महाराष्ट्रापासूनच सुरु केले.
- शिवसेनेसोबत 1989 साली युती.
- भाजपचे महाराष्ट्रात 1980 साली 14 तर 1985 साली 16 सदस्य निवडून आले.
- सेना–भाजप युतीने 1995 साली महाराष्ट्रात सत्ता स्थापन केली.
- गोपीनाथ मुंडे, वसंतराव भागवत अण्णा डांगे यांच्या नेतृत्वामुळे बहुजनांबरोबरच इतर समाजाचाही पाठींबा पक्षाला मिळाला.
- 2014 च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत भाजपला सर्वाधिक 122 जागा मिळवून सर्वात मोठा पक्ष ठरला.
- शिवसेनेसोबत (63 जागा) निवडणुकीनंतर युती करून भाजपने देवेंद्र फडणवीस यांच्या नेतत्वाखाली सरकार स्थापन केले.

3. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी–

पार्श्वभूमी–

- काँग्रेसमधील घराणेशाही व जमातवादी भाजप यांना पर्याय म्हणुन काँग्रेस (आय) पक्षातील शरद पवार, पी.ए.संगमा आणि तारीक अन्वर या नेत्यांनो सोनिया गांधी यांच्या विदेशीपणाचा मुद्द उपस्थित करून काँग्रेसमधुन बाहेर पडले व 25 मे 1999 रोजी राष्ट्रवादी काँग्रेस या नव्या पक्षाची स्थापना करण्याची घोषणा केली.
- त्यानंतर 10 जून 1999 रोजी 13 व्या लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना करण्यात आली.
- शरद पवार यांना पक्षाचे अध्यक्ष करण्यात आले.
- धार्मिक, जातीय, सामाजिक, प्रादेशिक, लिंगाधारित किंवा सामाजिक स्थानावर आधारित कोणतेही भेदभाव न करता कायद्याचे राज्य आणणे हे या पक्षाचे ध्येय आहे.

Competitive Forum

पक्षाची पायाभूत तत्वे–

- राष्ट्रवादी भावनांना जागृत करणे, राष्ट्रवादी शक्तींना बळकटी देणे, समाजवादी धर्मनिरपेक्ष या मुल्यांवर विशेष भर.
- देशाची एकता व अखंडता कामय रहावी यासाठी संघराज्य व्यवस्थेला भक्कम पाठींबा देणे.
- स्त्रीया, अनु.जाती–जमाती, इतर मागासवर्ग, दुर्बल घटक यांचे सक्षमीकरण करणे.
- समाजीक न्याय व समतेवर भर

शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ,
हॅपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे–३०
• अतिरिक्त नोट्ससाठी
Telegram Channel-
@abhijitrathod
Join करा.
9272100500

- संसदीय लोकशाहीवर आधारीत घटनात्मक व्यवस्था व कायद्याचे राज्य याचे दृढीकरण करणे.

पक्षाची संरचना–

- राष्ट्रीय समिती– ही पक्षाची राष्ट्रीय पातळीवरील सर्वोच्च समिती आहे. राष्ट्रीय पातळीवरील पक्षाचे निर्णय या समितीत घेतले जातात. पक्षातील जेष्ठ सदस्यांचा या समितीत समावेश करतात.
- राज्य समिती– ही राज्याच्या पातळीवरील समिती असुन या समितीची रचनासुद्धा राष्ट्रीय समितीप्रमाणेच असते परंतु राज्यपातळीवरील कार्य करते.
- प्रादेशिक समिती– एका राज्याचे अनेक प्रदेशात विभाजन झालेले असते. अशा प्रदेश स्तरावर ही समिती पक्षाचे निर्णय होते.
- जिल्हा समिती–जिल्हा स्तरावरील पक्षाचे निर्णय ही समिती घेते.
- स्थानिक पातळीवरील समित्या

पक्षाची विचारसरणी–

- धर्मनिरपेक्ष, उदारमतवादी व संसदीय लोकशाही पद्धतीवर पुर्ण विचार ठेवणारी विचारसरणी.

पक्षाचा जाहीरनामा–

- भ्रष्टाचार निर्मुलनास प्रभावी उपाय करणे.
- समान नागरी कायद्याला पाठींबा नाही.
- अल्पसंख्यांकांना त्यांच्या हक्काची हमी देणे.
- शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळण्यासाठी योग्य किमान आधारभूत किंमत.
- शेतकऱ्याला जास्तीत जास्त नफा कसा मिळेल याचा प्रयत्न करणे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि इतर महाराष्ट्र–

- 1999 साली राष्ट्रवादी पक्षाची स्थापना झाल्यानंतर अनेक पक्षातील असंतुष्ट व्यक्ती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सामील झाल्या.
- 1999 साली आर.पी.आय. विदर्भ शेतकरी संघटना, शेकाप, समाजवादी पक्ष, यांच्याशी युती करून राष्टवादी काँग्रेस पक्षाने निवडणुक लएवली.
- 1999 सालच्या निवडणुकीनंतर काँग्रेस पक्षासोबत युती करून हा पक्ष महाराष्ट्रात सत्तेवर आला.
- या पक्षात मराठा उमेदवार संख्येने जास्त आहेत.
- या पक्षाला मराठी, इतर मागासवर्गीय यांचा जास्त पाठींबा मिळाला.
- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने विविध जाती जमातींच्या नेतृत्वांना पक्षात सोबत घेतल्यामुळे या सर्वांचा पक्षाला पाठींबा मिळतो.
- काँग्रेसबरोबर युती करून हा पक्ष 2014 पर्यंत सत्तेत होता.
- खासगीकरण, बांधकाम, विजनिर्मिती, पाठबंधारे खाजगीकरण पश्चिम महाराष्ट्राकडे जास्त झुकणारे राजकारण हे राष्ट्रवादी काँग्रेसचे राजकीय सुत्र राहीले आहे.

4. बहुजन समाज पक्ष (BSP) –

पार्श्वभूमी–



- स्फोटक संशोधन आणि विकास प्रयोगशाळेमध्ये शास्त्रज्ञ असलेल्या कांशीराम यांनी SC, ST, OBC व वर्गातील सर्व कर्मचाऱ्यांना (BAMCEF (ऑल इंडिया ऑफ मायनॉरिटीज कम्युनिटी स्तरावरील एम्प्लॉईज फेडरेशन) या अखिल भारतीय स्तरावरील संघटनेची 1978 मध्ये स्थापना केली.
- BAMCEF या संघटनेद्वारे शासकीय सेवेतील जातीच्या अल्पप्रमाणावर प्रकाश टाकणे, समाजामध्ये जागृती करणे, असे कामे सुरु केली.
- BAMCEF च्या आधी दलित समुह काँग्रेसचा खुप मोठा सामाजिक आधार होता.
- 1981 साली कांशीराम यांनी DS4 (डी एस फोर) ची स्थापना केली. DS4 म्हणजे (D- दलित, S– शोषित. S– समाज, S– संघर्ष, S– समिती)
- DS4 द्वारे कांशीराम यांनी समाजातील दुर्बल घटकांना एकत्र करून शोषणाविरुद्ध संघर्ष करण्यास प्रोत्साहीत केले.
- लोकसंख्येमध्ये जवळपास 85% असलेल्या बहुजांचे (अनु.जाती, अनु.जमाती, इतर मागासवर्गीय यांचे) राजकीय संघटन असले पाहिजे

Competitive Hub

जेणेकरून हा मागास समाज विकास करून घेऊ शकेल या उद्देशाने कांशीराम यांनी 14 एप्रिल 1984 रोजी बहुजन समाज पक्षाची (बसप) स्थापना केली.

- बहुजन हा शब्द तथागत गौतम बुद्धांच्या त्रिपिटक या धर्मोपदेशातून घेतला आहे. बहुजन शब्दाचा सर्वप्रथम वापर गौतम बुद्धांनी केला.
- स्वातंत्र्यता, समता, बंधुभाव या महान विचारांचे अनुकरण करणारा हा पक्ष आहे.
- बसपला राष्ट्रीय पक्ष म्हणुन मान्यता मिळालेली आहे.
- या पक्षाला बहुजनांचा पाठींबा आहे यात दलित, अनु.जाती, अनु.जमाती, तसेच इतर मागासवर्गीय यांचा समावेश आहे.
- दलित, इतर मागासवर्गीय यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, सामाजिकदृष्ट्या वंचित वर्गाचे शिक्षण, दलित इतर मागासवर्ग यांच्यावरील अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे व त्यांना न्याय मिळवून देणे. समाजाला सत्तेत वाटा मिळवून देणे हे पक्षाचे मुख्य ध्येय आहेत.
- बसप हा राष्ट्रीय पक्ष असला तरी त्याचे उत्तर भारतातच जास्त संघटन आहे.

पक्षाबद्दल थोडक्यात महत्त्वाचे–

- अध्यक्ष– मायावती
- महासचिव–सतीश चंद्र मिश्र
- विचारधारा– दलित, मागासवर्गीय यांना सशक्त व स्वाभिमानी बनवण्यावर लक्ष केंद्रीत करणे.
- प्रकाशन– मायायुग, आदिल जाफरी
- निवडणुक चिन्ह– हत्ती


- 1999 च्या 13 व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाला एकूण 14 जागा मिळाल्या. (सर्व उत्तरप्रदेशमधुन)
- 2004 च्या 14 व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत 19 जागा (सर्व उत्तर प्रदेशमधुन)
- 2009 च्या 15 व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत 21 जागा जिंकल्या (1 मध्यप्रदेश, 20 उत्तर प्रदेशमधून)
- 2014 च्या 16 व्या लोकसभा निवडणुकीत पक्षाला एकसुद्धा जागा जिंकता आली नाही. पक्षाला 4.3% मते पडली.
- पक्षाचा मुख्य आधार उत्तर प्रदेश आहे.

उत्तरप्रदेशात सरकार स्थापन–

- मे 2007च्या उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीत मायावतीच्या नेतृत्वाखाली पक्षाला 403 पैकी 206 जागा मिळून स्पष्ट बहुमत प्राप्त झाले. ही उत्तरप्रदेशची 15 वी विधानसभा निवडणुक होती.
- बसपा अध्यक्ष मायावतीने 13 मे 2007 रोजी उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.
- 1991 पासून उत्तरप्रदेशमध्ये कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नव्हते.
- 2012 मध्ये झालेल्या उत्तरप्रदेशच्या 16 व्या विधानसभा निवडणुकीत पक्षाला 80 जागा मिळाल्या.
- आता 2017 मध्ये झालेल्या उत्तरप्रदेशच्या विधानसभा निवडणुकीत पक्षाची कामगिरी आणखी घसरली व केवळ 19 जागांवर समाधान मानावे लागले.
- सुरुवातीला एकटेपणाने राजकीय संघर्ष करणाऱ्या या पक्षानेनंतर काँग्रेस, भाजप, समाजवादी पक्ष या पक्षांसोबत कालानुरुप आघाड्या स्थापन केल्या.

5. भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप)–

Competitive For



पार्श्वभूमी–

- या पक्षाच्या स्थापनेच्या स्थितीबद्दल विवाद आहेत.
- भाकपचे म्हणणे आहे की, या पक्षाची स्थापना 25 डिसेंबर 1925 रोजी कानपूरमध्ये झाली.
- परंतु मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष जोकी 1964 मध्ये भाकपमधून फुटून बाहेर पडला. याचे म्हणणे आहे की, या भाकपची स्थापना 17 ऑक्टोबर 1920 ला कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या दुसऱ्या सभेनंतर लगेचच झाली.
- 1925 मध्ये पार्टीची स्थापना मानवेंद्रनाथ राय, अबनी मुखर्जी, मोहम्मद अली आणि शफीक सिद्दीकी इत्यादींनी केली.
- 1920 पासूनच पार्टीच्या स्थापनेबाबत तयारी करण्याची सुरुवात झाली होती.
- पक्षाच्या औपचारिक स्थापनेच्यापूर्वीच अनेक सक्रिय कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना कानपूर बोल्शेविक षडयंत्रांतर्ग ब्रिटीश शासनाने खटले दाखल

शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ, हॅपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.
9272100500

केले होते. यामध्ये एम.एन.राय, एस.ए.डांगेसहीत अनेक कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली.

- यामुळे कम्युनिस्ट भारतभर चर्चेत झाले. या पार्टीबद्दल लोकांना माहिती झाली. त्यानंतर 20 मार्च 1929 रोजी भाकपशी संबंधीत सर्व महत्त्वाच्या नेत्यांना मेरठ षडयंत्रांतर्गत अटक करण्यात आली त्यांना 1933 मध्ये मुक्त करण्यात आले. या काळात पार्टी नेतृत्वहीन बनली होती.
- 1920 आणि 1930 च्या दशकात कामगार संघटना आणि कामगार शेतकरी संघटना उभारल्या गेल्या.
- 1934 मध्ये कम्युनिस्ट इंटरनॅशनलचे सदस्यत्व भाकपने स्विकारले. त्यामुळे पक्ष आंतरराष्ट्रीय स्तरावरील कम्युनिस्ट इंटरनॅशनलचा भारतातील महत्त्वाचा घटक बनला.
- 1935 पासून पी.सी.जोशी यांनी भाकपच्या पुनर्बांधणीचे काम सुरु केले आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला. या काळात भाकपने राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळ कामगार वर्गाच्या अधिपत्याखाली आणण्याचा प्रयत्न केला. तसेच काँग्रेसच्या जिल्हा आणि प्रांतीक समित्यांमध्येही काही महत्त्वाची पदे प्राप्त केली.
- भाकपने 1936 ते 42 दरम्यान आंध्र, पंजाब, केरळ या भागामध्ये शेतकऱ्यांच्या प्रबळ चळवळी उभारल्या.
- 1942 साली काँग्रेसने युद्धविरोधी भुमिका घेतली आणि ब्रिटीशांना भारत छोडोचे आदेश दिले. या आंदोलनात भाकपने काँग्रेसच्या विरोधात भुमिका घेतली. त्यामुळे भाकपपासून जनसमुदाय दुरावला.
- जुलै 1942 मध्ये ब्रिटीश शासनाने 1934 मध्ये भाकपवर घालेली बंदी उठवली.कारण सोव्हीएत रशिया मित्रपक्षाच्या गटामध्ये सामिल झाला. भाकपने हे युद्ध जनयुद्ध असल्याचे घोषीत केले आणि भारतीय लोकांनी युद्धाला पाठींबा द्यावा असे आव्हान केले आणि ब्रिटीश शासनाचे समर्थन केले.
- बहुतांशवेळा पार्टीच्या ध्येयधोरणावर आणि निर्णयावर कम्युनिस्ट इंटरनॅशनल या आंतरराष्ट्रीय संघटनेचा व सोव्हीएत युनियनच्या निर्देशांचा प्रभाव असायचा. त्यामुळे अनेक वेळेस पक्षाचे निर्णय काँग्रेसच्या विरोधी असायचे.
- 1942 च्या छोडो भारत आंदोलनाच्या काळात काँग्रेसच्या ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसवर भाकपचे वर्चस्व होते.
- मार्क्सवाद-लेनिन वादाच्या तत्वानुसार क्रांती करण्याच्या डावपेचावरून भाकपमध्ये दोन गट पडले. पी.सी.जोशींच्या नेतृत्वाखालील गटाने सत्ताहस्तांतरण आणि नेहरूंच्या नेतृत्वाखालील नवीन राज्य व्यवस्था स्वीकारणे पसंद केले. तर दुसऱ्या गटातील बी.टी.रणदिवे यांच्या नेतृत्वाखालील गटाने काँग्रेस विरोधी भुमिका घेऊन क्रांतीच्या मार्गाने भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याची भूमिका स्वकारली.
- 1946 मध्ये झालेल्या प्रांतीक निवडणुकीमध्ये भाकपने भाग घेऊन सर्वप्रांताच्या मिळून 1545 विधानसभा जागांपैकी फक्त 8 जागांवर पक्षाला विजय मिळविता आला.
- भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीच्या काळात भारतातील राज्यांच्या निर्मितीबाबत भाकपमध्ये तीव्र मतभेद झाले. त्यामुळे पक्षाने संविधान सभेमध्येसुद्धा भाग घेतला नाही.
- भारत स्वातंत्र्य झाला त्यावेळी पक्षाचे महासचिव पी.सी.जोशी होते.
- 1948 साली बी.टी.रणदिवे पक्षाचे महासचिव झाले, भाकपने जहालवादी डावा मार्ग स्विकारला होत. परंतु रशियाचे अध्यक्ष ख्रुश्चेव आणि नेहरू यांच्यात मैत्रीपूर्ण संबंध असल्यामुळे भाकपने आपल्या भूमिकेत बदल केला.
- 1952 च्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये भाकपने 587 जागा लढवून त्यापैकी 198 जागा प्राप्त केल्या विधानसभांच्या सर्वाधिक जागा मिळविणारा दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष बनला.
- 1957च्या विधानसभा निवडणुका पक्षाने केरळमध्ये पूर्ण बहुमत मिळवून कम्युनिस्ट पक्षाचे भारतातील पहिले सरकार स्थापन झाले.
- 1958 साली अमृतसर ठरावाद्वारे भाकपने संसदीय साधनांद्वारे सत्ता प्राप्ती आणि सामाजिक बदल करण्याचे धोरण स्वीकारले. त्या अनुषंगाने पक्षाने काँग्रेस पक्षाला समर्थन दिले.
- 1962 साली भारत-चीन युद्धाच्या भुमिकेवरून पक्षात 1964 साली फुट पडली. या फुटीतून बाहेर पडलेल्या गटाने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षा (माकप)ची स्थापना केली. माकपचे प्रभाव क्षेत्र केरळ, त्रिपुरा, आंध्रप्रदेश, पंजाब, पश्चिम बंगाल हे होते.
- सध्या भाकपचे पक्षाचे सरकार देशात कोणत्याच राज्यात नाही.
- सुशिक्षीत व राजकीयदृष्ट्या जागृत वर्गाचा पक्षाला पाठींबा मिळतो. पक्ष सध्या बिहार, आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश, तामिळनाडू, केरळ, त्रिपुरा, पश्चिम बंगाल तसेच पंजाब या राज्यांमध्ये सक्रिय आहे.
- ग्रामीण तसेच शहरी भागातूनही पक्षाला पाठींबा मिळतो.

पक्षाचा जाहीरनामा-

- थेट परकीय गुंतवणुक (FDI) ला किरकोळ क्षेत्रात विरोध.
- सुधारणात्मक उपाययोजना स्विकारून नवउदारमतवादाच्या धोरणाचे पुनरावलोकन करणे.

Competitive Forum


- सार्वजनिक क्षेत्राला बळकटी देणे.
- सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे.
- राज्यसंस्थेच्या भुमिकेची पुर्नस्थापना करणे.
- नफ्यातील सार्वजनिक उपक्रमाचे खाजगीकरण करण्यास प्रतिबंध करणे.

पक्षाची रचना–

- अखिल भारतीय पक्ष सभा– ही पक्षाची ध्येयधोरणे ठरविणारी देशपातळीवरील सर्वोच्च संस्था आहे.
- राष्ट्रीय कार्यकारिणी– पक्षाचे दैनंदिन कामकाज व पर्यवेक्षण राष्ट्रीय कार्यकारिणी मार्फत पार पाडले जाते.
- केंद्रीय महासभा– या सभेत पक्षातील प्रमुख नेत्यांचा समावेश होतो. साधारणतः 125 एवढी सदस्य संख्या असते.
- पक्षाची लोकशाही केंद्रीकरण या तत्वावर संघटनात्मक संरचना आहे.

6. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (माकप)–

पार्श्वभूमी–



- 31 ऑक्टोबर ते 7 नोव्हेंबर 1964 या काळात भाकपचे कोलकाता येथे भरलेल्या 7 व्या अधिवेशनात वैचारिक मतभेदामुळे भारतीय कम्युनिस्ट पक्षात फुट पडली.
- त्यावेळी भाकप आणि भाकप (मार्क्सवादी) अशी दोन अधिवेशने भरली आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष भाकपमधून वेगळा झाला.
- पक्षाचे संस्थापक–एम.एन रॉय
- स्थापना– 7 नोव्हेंबर 1964
- या विभाजनाचा 1962 च्या भारत–चीन या युद्धाशी संबंध आहे असे मानले जाते.
- कामगारांची हुकुमशाही राज्यव्यवस्था आणणे हे माकपचे उद्दिष्ट आहे.
- हा पक्ष कार्ल मार्क्स, लेनिन यांच्या तत्वांना प्रमाण मानुन आपले ध्येय धोरणे ठरवितो. या पक्षाच्या मते, भारतीय स्वातंत्र्य हे काँग्रेस आणि ब्रिटीश सरकार यांच्यातील तडजोड होती आणि केवळ सरंजामशाही व भांडवलदार वर्गाचे हितसंबंध टिकून ठेवण्याचे स्वातंत्र्यानंतर प्रयत्न झाले.
- सुरुवातीला या पक्षाने समाजवादाचा कट्टर व जहाल पुरस्कार केला. त्याच अनुषंगाने भारत–चीन युद्धाच्या वेळी पक्षाने चीनविरोधी भुमिका घेण्यास नकार दिला.
- नंतर हळुहळु पक्षाने आपल्या चीनधार्जिनी धोरणात बदल करून भारताच्या ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय स्वरुपाला अनुसरुन कम्युनिस्ट चळवळ सुरु केली.
- माकप हा जहाल लोकशाहीवादी पक्ष म्हणुन ओळखला जातो.
- केंद्र–राज्य संबंधात सुधारणा करण्याची माकपची मागणी आहे.
- पक्ष भारताच्या अखंडतेवर नेहमीच भर देतो.
- पक्षाचा केरळ, पश्चिम बंगाल आणि त्रिपुरा या राज्यांमध्ये विशेष प्रभाव आहे.
- माकपतर्फे पिपल्स डेमोक्रॅसी, गणशक्ती, देशाभिमानी हे वृत्तपत्र चालविल्या जातात.
- विचारधारा– साम्यवाद, मार्क्सवाद, लेनिनवाद, माओवाद, अंतर्गत ध्येयधोरणे
- पक्षाचे निवडणुक चिन्ह– विळा– हातोडा– तारा
- आघाड्या– डावा गट (पश्चिम बंगाल), डावा गट (त्रिपुरा), डावी लोकशाही आघाडी (केरळ), डावी लोकशाही मंच (आसाम) यांच्याबरोबर पक्षाच्या आघाड्या.
- 2016 मध्ये झालेल्या विधानसभांच्या निवडणुकांमध्ये त्रिपुरा आणि केरळमध्ये माकपने सत्ता स्थापल्या.
- पक्षाचे सध्याचे सेक्रेटरी जनरल– सिताराम येचूरी
- पक्षाचे सध्याचे लोकसभा नेते – पी.करुणाकरण
- पक्षाचे सध्याचे राज्यसभा नेते– सिताराम येचूरी

मार्क्सवादी हिंसाचार–

- मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (माकप) हिंसेचे समर्थन करणारा पक्ष आहे असे आरोप या पक्षावर सतत होतात.

Competitive Forum

शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ, हॅपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.
9272100500

1980 च्या दशकात माकपची कामगार संघटना 'सीटू' आणि काँग्रेसची कामगार संघटना 'इंटक' यांच्या केरळ मधील कार्यकर्त्यांमध्ये वेलदोड्याच्या बागांमधील रोजगाराच्या मुद्यांवरून नेहमीच मारामार होत असे.

यावरून माकप कार्यकर्त्यांनी 1980 च्या दशकात काँग्रेसच्या 13 कार्यकर्त्यांची हत्या केली होती. तसेच माकपच्या कार्यकर्त्यांकडून गोळीबार, बेदम मारहाण करून ठार मारणे असे हिंसवादी प्रकार घडायचे. यावरूनच 4 मे 2012 रोजी रिव्होल्युशनरी मार्क्सवादी पार्टीचे नेते टी.पी.चंद्रशेखरन यांची क्रूर सुनियोजीत हत्या झाली.

टी.पी.चंद्रशेखरन यांच्या पक्षाची लोकप्रियता वेगाने वाढत होती. केवळ हिंसेवरच विश्वास असलेले मार्क्सवादी ही पचवू शकले नाही माकपने नेहमीच हिंसाचाराचा मार्ग अवलंबला.

महाराष्ट्र आणि माकप–

- 1964 साली पक्षात भारत–चीन युद्धाच्यावेळी नेहरुंच्या धोरणांना पाठींबा द्यायचा की नाही यावरुन फुट पडली आणि परुळेकर, कोल्हटकर, रणदिवे इ. कार्यकर्ते भाकपमधून बाहेर पडले आणि माकपमध्ये सामिल झाले.
- 1980 साली लोकसभा निवडणुकीत माकपने काँग्रेस, शेकाप यांच्यासोबत निवडणूक लढविली.

1985 च्या विधानसभा निवडणुकीत शरद पवारांच्या नेतृत्वाखाली पुलोद आघाडीत माकप सामिल झाला.

- माकप, जनतादल, शेकाप या पक्षांच्या आघाडीबरोबर 1989 सालच्या विधानसभा निवडणुकीत सामील झाला.

माकपचा जाहीरनामा–

- लोकाभिमुख आर्थिक धोरणे, संघराज्यवाद, स्वतंत्र परराष्ट्र धोरण, धर्मनिरपेक्षता, सामाजिक समतेची तरतूद यावर आधारित धोरणे राबवणे.
- जनतेसमोर भाजप, काँग्रेस यांना पर्याय.

७. अखिल भारतीय अण्णा द्रविड मुन्नेत्र कझगमः–



- हा तमिळनाडूतील एक प्रमुख राजकीय पक्ष आहे. त्याची स्थापना तमिळ चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय नट मरूदूर गोपालमेनन रामचंद्रन (एम.जी.रामचंद्रन) यांनी केली. रामचंद्रन हे 1972 पर्यंत तमिळनाडूचे पहिले काँग्रेसेत्तर मुख्यमंत्री आणि सी.एन.अण्णादुराई यांच्या द्रविड मुन्नेत्र कझगम (द्रमुक) पक्षाचे महत्त्वाचे नेते होते. अण्णादुराई यांच्या निधनानंतर पक्षाची सूत्रे एम.करुणानिधी यांच्याकडे गेली. त्यांच्याशी झालेल्या मतभेदांमुळे रामचंद्रन यांनी 'अण्णा द्रविड़ मुन्नेत्र कझगम' या त्यांच्या नव्या पक्षाची स्थापना केली.
- 30 एप्रिल 1973 रोजी नव्या पक्षाने 'दोन पाने' हे निवडणूक चिन्ह स्वीकारले. 16 मे 1976 रोजी रामचंद्रन यांनी पक्षाचे नाव बदलून 'अखिल भारतीय अण्णा द्रविड मुन्नेत्र कझगम' हे ठेवले. त्यादरम्यान अ.भा.अण्णाद्रमुक पक्ष केंद्रात सत्तेत असलेल्या काँग्रेस पक्षाचा मित्रपक्ष बनला. एम.जी.रामचंद्रन यांनी एम.करुणानिधी यांच्या सरकारवर केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे केंद्र सरकारने करुणानिधींचे सरकार 1976 मध्ये बरखास्त केले.
- जून 1977 मध्ये राज्य विधानसभेच्या निवडणुका झाल्या. त्यात अ.भा.अण्णाद्रमुक पक्षाने 234 पैकी 130 जागा जिंकल्या तर द्रमुक पक्षाने 48 जागा जिंकल्या. एम.जी.रामचंद्रन स्वतः अरुपकोट्टाई विधानसभा मतदारसंघातून विजयी झाले. 30 जून 1977 रोजी त्यांचा तमिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून शपथविधी झाला. दरम्यान काँग्रेस आणि द्रमुक पक्षातले संबंध सुधारले आणि अ.भा.अण्णाद्रमुक इंदिरा काँग्रेसपासून दूर गेला. काँग्रेस आणि द्रमुक पक्षांनी 1980 च्या लोकसभा निवडणुका युती करून लढवल्या. या निवडणुकांमध्ये अण्णाद्रमुकचा मोठा पराभव झाला. काँग्रेस आणि द्रमुक युतीने 39 पैकी 36 जागा जिंकल्या तर अ.भा.अण्णाद्रमुक पक्षाला केवळ 2 जागा जिंकता आल्या.
- एम.करुणानिधी सत्तेत पुनरागमन झाल्यानंतर इंदिरा गांधींनी विरोधी पक्ष सत्तेत असलेली अनेक राज्य सरकारे बरखास्त केली. त्यात एम.जी.रामचंद्रन यांचे सरकारही बरखास्त झाले. ते 1984 मध्ये राज्य विधानसभेची निवडणूक झाला. या निवडणुकांमध्ये 234 पैकी 129 विधानसभा जागा जिंकून हा पक्ष सत्तेत आला. लोकसभा निवडणुकांमध्ये झालेल्या पराभवाची भरपाई एम.जी.रामचंद्रन यांनी काँग्रेस–द्रमुक युतीने 68 जागा जिंकल्या. 9 जून,1980 रोजी .एम.जी.रामचंद्रन यांनी दुसऱ्यांदा राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतली.

Competitive Forum

- एम.जी.रामचंद्रन यांची तमिळ जनतेमधील लोकप्रियता लक्षात घेता त्यांच्या पक्षाशी इंदिरा गांधींनी संबंध सुधारले. इंदिरा गांधींची हत्या झाल्यानंतरच्या 1984 मधील लोकसभा निवडणुका आणि त्याबरोबरच झालेल्या राज्य विधानसभा निवडणुका काँग्रेस आणि अ.भा.अण्णाद्रमुक पक्षाने युती करून लढवल्या. लोकसभा निवडणुकीत त्यांच्या युतीने 39 पैकी 37 तर विधानसभा निवडणुकीत 234 पैकी 193 जागा जिंकल्या. पक्षाचे नेते एम.तंबीदुराई याची निवड 8व्या लोकसभेचे उपाध्यक्ष म्हणून झाली. विशेष म्हणजे युतीने हे यश रामचंद्रन यांच्या अनुपस्थितीत मिळवले. राज्यात सर्वत्र एम.जी.रामचंद्रन यांची अ.भा.अण्णाद्रमुक–काँग्रेस युती जिंकणार आणि द्रमुकचा धुव्वा उडणार असे वातावरण होते. त्यामुळे द्रमुकचे नेते .करुणानिधी यांनी विधानसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला. 10 फेब्रुवारी 1985 रोजी एम.जी. रामचंद्रन यांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रे तिसऱ्यांदा हाती घेतली.
- जुलै 1987 मध्ये राजीव गांधींच्या सरकारने श्रीलंकेतील तमिळ लोकांच्या प्रश्नावर त्या देशाचे अध्यक्ष जुनियस जयवर्धने यांच्याशी केलेल्या

शास्त्री रोड, गाजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ, हॅपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.
9272100500

श्रीलंका करारसंबंधीच्या वाटाघाटींमध्ये रामचंद्र यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

- 24 डिसेंबर 1987 रोजी .एम.जी.रामचंद्रन यांचे वयाच्या 70 व्या वर्षी निधन झाले. त्यानंतर अ.भा.अण्णाद्रमुक पक्षात नेतृत्वावरून संघर्ष झाला. एम.जी.रामचंद्रन यांच्या निधनानंतर त्यांची पत्नी जानकी रामचंद्रन या राज्याच्या मुख्यमंत्री झाल्या. त्यांना पक्षाच्या दुसऱ्या नेत्या जयललिता यांनी आव्हान दिले. परिणामी पक्षात फूट पडून जानकी रामचंद्रन यांचे सरकार जानेवारी 1988 च्या शेवटी कोसळले. राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली.
- राज्य विधानसभेसाठी जानेवारी 1989 मध्ये निवडणुका झाल्या. या निवडणुका काँग्रेसने स्वतंत्रपणे लढवल्या. अ.भा.अण्णाद्रमुक पक्षात पडलेली फूट आणि काँग्रेस पक्षाने त्याची सोडलेली साथ याचा फायदा द्रमुक पक्षाला झाला. निवडणुकीत द्रमुकने 234 पैकी 150, काँग्रेसने 26, जयललिता गटाने 27 तर जानकी रामचंद्रन गटाने 2 जागा जिंकल्या. एम.करुणानिधींनी 13 वर्षांच्या खंडानंतर 27 जानेवारी 1989 रोजी दुसऱ्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.
- त्यानंतर अ.भा.अण्णाद्रमुक पक्षात जयललिता नेत्या बनल्या आणि जानकी रामचंद्रन नेतेपदाच्या शर्यतीत मागे पडल्या. नोव्हेंबर 1989 मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुका काँग्रेस आणि अ.भा.अण्णाद्रमुक पक्षांनी युती करून लढवल्या. युतीने 39 पैकी 38 जागा जिंकून निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आणि द्रमुकचा मोठा पराभव झाला.
- 30 जानेवारी 1991 रोजी पंतप्रधान चंद्रशेखर यांच्या सरकारने करूणानिधींचे सरकार राज्यात आश्रय घेतलेल्या श्रीलंकेतील तमिळ अतिरेक्यांविरूध्द पावले उचलण्यात अपयशी ठरले आहे असा ठपका ठेऊन बरखास्त केले. 1991 मध्ये लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकांबरोबरच राज्य विधानसभेच्या निवडणुका झाल्या. त्या निवडणुका काँग्रेस आणि अ.भा.अण्णाद्रमुक पक्षांनी युती करून लढवल्या. निवडणूक प्रचारादरम्यान श्रीपेरुम्बुदुर येथे 21 मे 1991 रोजी राजीव गांधीची हत्या झाली. त्यामुळे राज्यातील मतदान पुढे ढकलून 12 आणि 15 जून 1991 रोजी झाले. त्यात अ.भा.अण्णाद्रमुक-काँग्रेस युतीने अभूतपूर्व यश संपादन केले.युतीने राज्यातील लोकसभेच्या सर्व 39 जागा जिंकल्या तर विधानसभेच्या 234 पैकी 224 जागा जिंकल्या. तर द्रमुकला केवळ 2 जागा मिळाल्या. 24 जून 1991 रोजी जयललिता यांनी राज्याच्या मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.
- जयललितांची मुख्यमंत्रीपदाची कारकीर्द वादग्रस्त ठरली. त्यांच्या सरकारने मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केल्याचे आरोप झाले. त्यात सरकारी जमिनी जयललितांच्या संस्थेला बाजारभावापेक्षा कमी भावाने विकणे, ग्रामपंचायतींना दिलेल्या रंगीत दूरदर्शन संचांच्या वाटपात गैरव्यवहार, दारिद्र्यरेषेखालील लोकांना दिलेल्या साड्या आणि धोतर यांच्या वाटपात गैरव्यवहार अशा अनेक आरोपांचा समावेश होता. नोव्हेंबर 1995 मध्ये जयललितांचे दत्तकपुत्र सुधाकरन यांचा विवाह झाला. त्यासाठी जयललितांनी सरकारी यंत्रणा स्वतःच्या खाजगी कामासाठी दावणीला लावल्याचा आरोप झाला. त्यांच्या सरकारविरुद्ध जनमत जाऊ लागले. त्यातच तमिळ चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय कलाकार रजनीकांत यांनी जयललितांविरुद्ध बाजू घेऊन 'तमिळ जनतेने जयललितांना परत निवडून दिल्यास ईश्वर कधीच माफ करणार नाही' असे जाहीर विधान केले. या सर्वांचा परिणाम म्हणून 1996 च्या निवडणुकींमध्ये अ.भा.अण्णाद्रमुक-काँग्रेस युतीचा मोठा पराभव झाला. लोकसभेच्या 39 पैकी सर्व जागांवर युतीचा पराभव झाला तर विधानसभा निवडणुकीत 234 पैकी केवळ 6 जागा जिंकण्यात युतीला यश मिळाले. स्वतः जयललितांचा बारगूर मतदारसंघातून पराभव झाला. अ.भा.अण्णाद्रमुक पक्षाची स्थापना झाल्यानंतर हा त्याचा सर्वात मोठा पराभव ठरला.
- 15 मे 1996 रोजी करुणानिधींनी तिसऱ्यादा मुख्यमंत्री झाले. त्यानंतर त्यांच्या सरकारने जयललितांच्या सरकारने केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करायचे आदेश दिले. स्वतः जयललिता आणि त्यांच्या सरकारमधील सेल्वगणपती, इंदिरा कुमारी यांच्यासारख्या मंत्र्यांना काही दिवस तुरुंगवास घडला.
- नोव्हेंबर 1997 मध्ये राजीव गांधी हत्याकांडाच्या कटाची चौकशी करणाऱ्या जैन आयोगाचा अंतरिम अहवाल इंडिया टुडे या नियतकालिकाकडे फुटला. राजीव गांधींची हत्या करणाऱ्या एल.टी.टी.ई. या तमिळ अतिरेकी संघटनेला हातपाय पसरायला छुपी मदत केल्याबद्दल आयोगाने द्रमुक विरुद्ध ताशेरे ओढले आहेत असे इंडिया टुडेने जाहीर केले. द्रमुक हा संयुक्त आघाडीचा घटकपक्ष होता आणि त्या पक्षाचे 3 मंत्री गुजराल सरकारमध्ये होते. काँग्रेस पक्षाने आयोगाचा अंतरिम अहवाल संसदेत सादर करण्याची मागणी केली. सरकारने अहवाल 19 नोव्हेंबर, 1997 रोजी सादर केला. इंडिया टुडेने जाहीर केल्याप्रमाणे जैन आयोगाने खरोखरच द्रमुकविरुद्ध ताशेरे ओढले असल्याचे समजले.

Competitive Forum

- जयललितांनी द्रमुक-तमिळ मनिला काँग्रेस युतीविरूध्द अ.भा.अण्णाद्रमुक, पटटाली मक्कल काची, भारतीय जनता पक्ष, मरूमलार्चि द्रविड मुन्नेत्र कझगम, तमाझिगा राजीव काँग्रेस आणि जनता पक्ष अशी आघाडी उभारली. जयललितांच्या 6 पक्षांच्या या आघाडीस 39 पैकी 30 तर द्रमुक- तमिळ मनिला काँग्रेस युतीला 9 जागी विजय मिळाला. त्यानंतर केंद्रात स्थापन झालेल्या भाजपप्रणित सरकारमध्ये अ.भा.अण्णाद्रमुक सामील झाला. पक्षाचे 4 मंत्री वाजपेयी सरकारमध्ये समाविष्ट झाले.
- अ.भा.अण्णाद्रमुक पक्षाने नौदलप्रमुख विष्णू भागवत उचलबांगडी प्रकरणी संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांना जबाबदार धरून त्यांच्यावर श्रीलंकेतील एल.टी.टी.ई. या अतिरेकी संघटनेशी त्यांचे लागेबांधे आहेत असा आरोप केला. विष्णु भागवत यांना परत नौदलप्रमुख पदावर नियुक्त करावे अशी अ.भा.अण्णाद्रमुक पक्षाने मागणी केली. केंद्रातील वाजपेयी सरकारने यामागणीला नकार दिल्याने अ.भा.अण्णाद्रमुक पक्षाने भाजपप्रणित आघाडीचा पाठिंबा काढून घेतला. वाजपेयींनी 15 एप्रिल रोजी लोकसभेत विश्वासदर्शक ठराव मांडला. ठराव 269 विरुद्ध 270 अशा एका मताने फेटाळला गेला आणि वाजपेयींनी राजीनामा दिला.

शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ,
हॅपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी
Telegram Channel-
@abhijitrathod
Join करा.
9272100500

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

- त्यानंतर अ.भा.अण्णाद्रमुक पक्ष पुन्हा एकदा काँग्रेस पक्षाचा मित्रपक्ष बनला तर द्रमुक भाजप आघाडीत सामील झाला. 1999 च्या लोकसभा निवडणुका दोन्ही पक्षांनी अनुक्रमे काँग्रेस आणि भाजप यांच्याशी युती करून लढवल्या. 2001 च्या राज्य विधानसभा निवडणुकींसाठी अ.भा.अण्णाद्रमुक-काँग्रेस-तमिळ मनिला काँग्रेस-भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष अशी मजबूत आघाडी जयललितांनी उभारली. मात्र त्याआधी तमिळनाडूतील विशेष न्यायालयाने जयललितांना भ्रष्टाचाराच्या एका प्रकरणात दोषी ठरवून 2 वर्षांची शिक्षा केली. जयललितांनी त्याविरूध्द उच्च न्यायालयात अपील करून शिक्षेला स्थगिती मिळवली. पण कायद्याप्रमाणे जयललिता मे 2001 च्या निवडणुका लढवू शकल्या नाहीत. त्यांच्या आघाडीने 234 पैकी 196 जागा जिंकल्या.जयललिता स्वतः निवडणुका लढवायला अपात्र ठरल्यामुळे त्यांना राज्यपाल सरकार स्थापण्यासाठी बोलवणार नाहीत असा अंदाज होता. पण राज्यपाल मीर साहेबा फातिमा बिवी यांनी जयललितांनाच सरकार स्थापण्यासाठी आमंत्रित करून 14 मे 2001 रोजी त्यांना मुख्यमंत्रिपदाची शपथ दिली.
- 24 सप्टेंबर 2001 रोजी सर्वोच्च न्यायालयाने जयललितांना सरकार स्थापण्यासाठी आमंत्रित करायचा तत्कालीन राज्यपाल मीर साहेबा फातिमा बिवी यांचा निर्णय रद्दबादल ठरवला. त्यानंतर जयललितांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यांच्याजागी पक्षाचे ज्येष्ठ नेते ओ.पन्नीरसेल्वम मुख्यमंत्री झाले. नोव्हेंबर 2001 मध्ये न्यायालयाने भ्रष्टाचार प्रकरणातून जयललितांची निर्दोष मुक्तता केली आणि त्यांचा निवडणुका लढवायचा मार्ग मोकळा झाला. 24 फेब्रुवारी 2002 रोजी आंदिपट्टी विधानसभा मतदारसंघातून पोटनिवडणुक जिंकून जयललितांनी आपल्या पुन्हा मुख्यमंत्री बनण्यातील सर्व अडसर दूर केले. 2 मार्च 2002 रोजी ओ.पन्नीरसेल्वम यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि जयललिता पुन्हा एकदा मुख्यमंत्री बनल्या.


धर्मांतर बंदी:-

- जयललितांनी मुख्यमंत्रिपदाच्या तिसऱ्या कारकिर्दीत संप करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्याविरुद्ध कडक कारवाई केली. त्यामुळे सरकारी कर्मचार्यांमध्ये असंतोष पसरला. त्यांनी धर्मांतरवर बंदी घातली, त्यामुळे मुसलमान आणि ख्रिश्चन त्यांच्यावर नाराज झाला. तसेच पोटा कायद्याखाली मरुमलार्चि द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाचे सरचिटणीस व्हो.गोपालस्वामी (वायको) यांना तुरुंगात टाकण्याचा त्यांचा निर्णय वादग्रस्त ठरला.
- 2004 च्या लोकसभा निवडणुकींच्या आधी द्रमुक पक्षाने भाजपची साथ सोडली. जुने वैर विसरून जयललितांच्या अभाअण्णाद्रमुक पक्षाने भाजपशी पुन्हा एकदा युती केली. पण वर उल्लेख केलेल्या कारणांमुळे जनमत अ.भा.अण्णाद्रमुक पक्षाविरुद्ध गेले होते.लोकसभा निवडणुकीत अ.भा.अण्णाद्रमुक-भाजप आघाडीचा पराभव झाला. 39 पैकी एकही जागा त्या आघाडीच्या हाती लागली नाही.
- नोव्हेंबर 2004 मध्ये कांची कामकोटी पीठाचे शंकराचार्य जयेंद्र सरस्वती यांना एका खून खटल्यात अटक करायचा जयललिता सरकारचा निर्णय वादग्रस्त ठरला.
- 2006 च्या विधानसभा निवडणुकीसाठी अ.भा.अण्णाद्रमुक पक्षाने वायको यांच्या मरूमलार्चि द्रविड मुन्नेत्र कझगम पक्षाशी मतभेद संपवून युती केली. निवडणुकीत अ.भा.अण्णाद्रमुक-मरूमलार्चि द्रविड मुन्नेत्र कझगम युतीने 2004 च्या मानहानीकारक पराभवाची काही अंशी भरपाई केली, पण युतीला विधानसभेत बहुमत मिळवता आले नाही. द्रमुक प्रणीत आघाडीला 234 पैकी 163 तर अ.भा.अण्णाद्रमुक-मरूमलार्चि द्रविड मुन्नेत्र कझगम युतीला 67 जागा मिळाल्या. 14 मे 2006 रोजी एम.करुणानिधी यांनी चौथ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली.
- 2006 पासून अ.भा.अण्णाद्रमुक पक्ष राज्य विधानसभेत प्रमुख विरोधीपक्ष झाला.
- 2011 मध्ये झालेल्या तमिळनाडूच्या 14 व्या विधानसभा निवडणुकीत जयललिता यांच्या नेतृत्वाखालील अ.भा.अण्णाद्रमुक पक्षाला भरघोस यश मिळून जयललिता यांनी चौथ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.
- भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे जयललिता यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला आणि त्यांच्या जागी पक्षाने ओ.पन्नीरसेल्वम यांची मुख्यमंत्रीपदी नेमणुक केली.
- सर्वोच्च न्यायालयाने जयललिता यांना भ्रष्टाचाराच्या आरोपातून मुक्त केल्यानंतर त्यांनी 23 मे 2015 रोजी पाचव्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.

Competitive Forum

- 5 डिसेंबर 2016 रोजी यांच्या मृत्युनंतर पुन्हा ओ.पन्नीरसेल्वम यांची अ.भा.अण्णाद्रमुक पक्षाने मुख्यमंत्रीपदी नियुक्ती केली.
- सध्या अ.भा.अण्णाद्रमुक तमिळनाडुत सत्ताधारी पक्ष आहे.

८. शिरोमणी अकाली दल:-



या पक्षाची स्थापना 14 डिसेंबर 1920 मध्ये शिरोमणी गुरूद्वारा प्रबंध कमेटीच्या रूपाने एक धार्मिक संघटना म्हणून स्थापना झाली होती. अकाली दल स्वत:ला शिखांचा प्रमुख प्रतिनिधी मानतो सरदार सरमुख सिंह चुब्बल हे अकाली दलाचे पहिले अध्यक्ष होते. त्यांनी मास्टर तारासिंग यांच्या नेतृत्वाखाली अधिक लोकप्रियता प्राप्त केली होती. मास्टर तारासिंग हे कट्टर शिख नेते होते. महायुद्धाच्यानंतर मास्टर तारासिंगने शिख गुरूद्वाराबर मठाधिशांचे नियंत्रण काढून घेण्यासाठी पंजाबमधिल शिखांना एकत्रीत करून 1920 च्या दरम्यान अकाली दल चळवळ सुरू केली.

- 1925 च्या शिख गुरूद्वारा कायद्याअंतर्गत गुरूद्वाराची व्यवस्थापन आणि नियंत्रण करण्यासाठी शिरोमणी गुरूद्वारा

शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ, हॅपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.
9272100500

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

प्रबंध समितीची स्थापना करण्यात आली. परंतु या समितीवर अकाली दलाचेच नियंत्रण होते.

- गुरूद्वारा सुधारणा चळवळीच्या काळात मास्टर तारासिंग यांच्या नेतृत्वाखाली अकाली दल एक राजकीय चळवळ म्हणून उद्यास आली.
- फतेसिंग यांनी 1962 साली स्वतंत्र अकाली दल स्थापन केली. फतेसिंग यांच्या नेतृत्वाखालील हे दल 1967 च्या निवडणूकीत विजयी झाली. यागटाने काँग्रेसला विरोध करण्याचे धोरण अंगिकारले. या दलाने अनेक पक्षांशी समझोता केला.
- अकाली दल 1972-77 या काळात पंजाब मधिल एक प्रमुख विरोधी पक्ष होता.
- अकाली दल (तलवंडी) आणि अकाली दल (लोंगोवाल) असे दोन गट पडून 1980 साली पक्षात फुट पडली.
- जोगिंदर सिंग यांनी संयुक्त अकाली दल स्थापन करून जहालवादी चळवळ निर्माण केली.
- पंजाबचे माजी मुख्यमंत्री सुरजीत सिंह बरनाला हे देखील अकाली दलाचे पक्षाध्यक्ष होते.
- शिरोमणी अकाली दल हा भारतातील एक राजकीय पक्ष आहे. भारताच्या पंजाब राज्यामध्ये कर्यरत असलेल्या ह्या पक्षाचे ध्येय शीख लोकांचे हित जपणे हे आहे.
- 4 फेब्रुवारी 2017 रोजी घेतल्या गेलेल्या पंजाब विधानसभा निवडणुकीमध्ये पंजाब विधानसभेमधील सर्व 117 जागांसाठी नवे आमदार निवडण्यात आले. मागील निवडणुकीत प्रकाशसिंग बादल यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीला 68 जागांसह बहुमत मिळाले होते. शिरोमणी अकाली दलाला या निवडणूकीत केवळ 15 जागा मिळवून पराभवाचा सामना करावा लागला. या निवडणुकीत काँग्रेससोबत आम आदमी पार्टीचा देखील जोर होता.
- सध्या शिरोमणी अकाली दल पक्षाच्या लोकसभेत 4 व राज्यसभेत 3 जागा आहेत.
- या पक्षाची राष्ट्रीय लोकशाही आघाडी बरोबर भागीदारी आहे.

महाराष्ट्रातील महत्त्वाचे राजकीय पक्ष-

1. शिवसेना-

पार्श्वभूमी-

- संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे रणशिंग फुंगले गेल्यानंतर हा लढा प्रामुख्याने त्याचे नेतृत्व करणाऱ्या मोठ्या हिकमतींच्या नेत्यांभोवती केंद्रीत झाला.
- एस.एम.जोशी, कॉ.श्रीपाद अमृत डांगे, आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, सेनापती बापट, माधवराव बागल अशा अनेकांनी आपले पक्षाभिनिवेश कायम ठेवून देखील संयुक्त महाराष्ट्र समितीच्या माध्यमातून मराठी माणसाचा आवाज एक दिलाने उचरवात पुकारला.
- आचार्य अत्रे 'मराठा'च्या आणि बाळासाहेब ठाकरे मार्मिकच्या माध्यमातून या लढ्यात अग्रेसर राहीले.
- महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील नेते इतस्ततः विखुरले.
- स्वतंत्र राज्य मिळूनही त्याचे नेतृत्व करणे संयुक्त महाराष्ट्र समितीला जमले नाही.
- समाजवादी पक्ष, कम्युनिस्ट पक्ष, शेतकरी कामगार पक्ष आदींना त्यानंतर कधी राज्यपातळीवर जाता आले नाही. ही पार्श्वभूमी व परप्रांतीयांचे मुंबईत होणारे मोठ्या प्रमाणावरील स्थलांतर, परिणामी मराठी भाषीक राज्यात मराठी माणसाचीच गळचेपी होत आहे. या सार्वत्रिक समजुतीचा आधार घेऊन बाळासाहेब ठाकरे यांनी 60 च्या दशकात शिवसेनेची मुहुर्तमेढ रोवली.
- प्रबोधनकारांच्या खोलीत शिवसेनेची स्थापना 19 जून 1966 रोजी झाली. त्यावेळी केवळ अवघे 18 जण उपस्थित होते.
- 19 जून 2016 ला शिवसेनेला स्थापनेला 50 वर्ष पूर्ण झाली.
- शिवसेनेने 80% सामाजिकारण व 20% राजकारण करण्याचे तत्व स्थापनेपासून अंगीकारले होते.
- आपली मालमत्ता परप्रांतीयांना विकू नये, मराठी ग्राहकांशी विनयाने वागावे, मराठी नोकर नेमावे, मराठी शाळा संस्थांना मदत करावी, मराठी बांधवांची गृहरचना संस्था काढावी, मराठी बांधवांच्या मदतीला धावा, याबरोबरच मराठी माणसाने महाराष्ट्रात कोठेही काम करण्याची मानसिकता जोपासावी. ही शिवसेनेच्या शपथेमधील ठळक बाबी आहेत.
- 1970 च्या विधानसभेच्या पोटनिवडणुकीत सेनेचे वामनराव महाडीक विजयी झाले ते सेनेचे पहिले आमदार ठरले.
- त्यानंतर 1972 च्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत सेनेला केवळ 1 जागा मिळाली. प्रमोद नवलकर हे सेनेचे आमदार झाले.
- 1985 च्या विधानसभा निवडणुकीत छगन भुजबळ हे सेनेचे एकमेव विजयी उमेदवार होते.
- सेनेचा पहिला खासदार- विद्याधर गोखले हे सेनेकडून लोकसभेत जाणारे पहिले खासदार आहेत.
- रामजन्मभूमी आंदोलनाच्या वाढत्या लोकप्रियतेचा राजकीय फायदा घेण्याच्या उदिदष्टाने सेनेने भाजपशी युती केली.

Competitive Forum

- पक्षाचा आधार- मराठी भाषिक, कनिष्ठ मध्यम वर्गातील तरुण राहिला आहे.
- सुरुवातीला दलित विरोध, मंडल आयोगाच्या शिफारशींना विरोध, मुस्लिम विरोधी ही शिवसेनेची भूमिका राहीली.
- 2003 मध्ये शिवशक्ती-भीमशक्ती ऐक्याचा नारा देत शिवसेनेने दलितांचा पाठींबा मिळविण्याचा प्रयत्न केला.
- उद्धव ठाकरे यांच्याशी मतभेद झाल्याने राज ठाकरे यांनी शिवसेनेमधून बाहेर पडून 2006 साली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना केली.
- 2014 च्या विधानसभेच्या निवडणुकीनंतर भाजपसोबत युती करून पक्ष महाराष्ट्रात सत्तेमध्ये आहे.

1995 साली महाराष्ट्रात सत्ता-

- 1995 साली झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सेना-भाजप युतीने महाराष्ट्रात सत्ता हस्तगत केली. त्या निवडणुकीत शिवसेना महाराष्ट्र विधानसभेत सर्वाधिक जागा मिळविणारा पक्ष ठरला. मनोहर जोशी हे शिवसेनेचे पहिले मुख्यमंत्री ठरले.

सामना दैनिकाची सुरुवात-

- 23 जानेवारी 1989 रोजी मध्यरात्री शिवसेनेचे मुखपत्र सामना सुरु झाले.
- दादर येथील स्वातंत्र्यवीर सावकर स्मारकात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याहस्ते सामनाचे प्रकाशन करण्यात आले.

शिवसेनेची सद्यस्थिती-

- लोकसभेतील जागा- 18
- राज्यसभेतील जागा-4
- महाराष्ट्र विधानसभेतील जागा- 63
- पक्षाचे निवडणुक चिन्ह- धनुष्यबान

2. महाराष्ट्र नवनिर्माण सेना-

पार्श्वभूमी-



- महाराष्ट्र नवनिर्माण सेना किंवा मनसे हा महाराष्ट्रातील एक राजकीय पक्ष आहे.
- शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे पुतणे राज ठाकरे यांनी 9 मार्च 2006 रोजी ह्या पक्षाची स्थापना केली.

पक्षाची ध्येय आणि धोरणे-

- महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र प्रदेश आणि मराठी भाषा यांना भौतिक व सांस्कृतिक वैभव प्राप्त करून देणे हे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे ध्येय आहे.
- महाराष्ट्र राज्य व मराठी भाषा, महाराष्ट्रासंबंधीचे ज्ञान व महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास (भौतिक व सांस्कृतिक) या गोष्टींचा विचार हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या तत्त्वांचा मूळ गाभा आहे. हा विचार प्रत्यक्षात आणण्याकरता पक्ष बांधील आहे. मराठी संस्कृती विस्तार, मराठी भाषा विचार, मराठीमध्ये ज्ञानकक्षा रुंदावणे, भौतिक व सांस्कृतिक विकास करणे ह्या गोष्टी त्यामध्ये अंतर्भूत आहेत.
- महाराष्ट्राच्या विकासार्थ काम करण्यासाठी सर्व मराठी माणसांना (ज्यात सर्व जातींचे, धर्मांचे, पंथांचे आणि वर्गांचे लोक आले) एकत्र करून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या ध्वजाखाली त्यांना एकवटवणे ही गोष्ट महाराष्ट्र नवनिर्माण सेना आवश्यक मानते.
- जे मूल मराठी आई-वडिलांच्या पोटी जन्माला आले आहे ते तर मराठीच! पण त्याचबरोबर इतर भाषिकांमध्येही जो महाराष्ट्रात जन्माला आलेला आहे, जो महाराष्ट्रावर प्रेम करतो आणि मराठी भाषा उत्तम बोलतो, आणि महाराष्ट्रात राहतो त्या माणसाला महाराष्ट्र नवनिर्माण सेना मराठी माणूसच मानते. ती व्याख्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना मानते.

Competitive Forum

- महाराष्ट्राच्या व मराठी माणसाच्या विकासासाठी त्याच्या आड येणाऱ्या सर्व समस्यांची सोडवणूक करणे, सत्ताकारण, पंथ आणि समाजगट यांच्याशी सर्व पातळींवर संघर्ष करणे, यासाठी रचनात्मक व संघर्षात्मक कामांची उभारणी करणे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना रचनात्मक कामे व संघर्षात्मक कामे यात फरक मानत नाही. ही दोन्हीही मूलत: हातात हात घालून येणारी कामे यथाशक्ति करणे.
- मराठी माणसाला न्याय देताना मराठी भाषा अकादमी सारख्या संस्थेची स्थापना करण्यापासून अन्य महाराष्ट्रद्वेष्ट्या परप्रांतीयांविरुद्ध रस्त्यावर संघर्ष करण्यापासून ते सर्व शाळांमध्ये मराठी भाषा शिकवण्याचा, मराठी पाट्यांचा आग्रह धरणे, मराठी भाषेतील सर्व ज्ञानकक्षा रुंदावणे वगैरे साऱ्या गोष्टी एकाच वेळी रचनात्मक कामे करून व रस्त्यावर संघर्ष करून पक्षाला साध्य करायच्या आहेत.
- महाराष्ट्रातील रस्ते, आरोग्य, व्यापार, शेती, बीज, पाणी, शिक्षण, पर्यटन, महिला, कामगार, विद्यार्थी, आदिवासी, कायदा व सुव्यवस्था, क्रीडा, उद्योग, वित्त, गृहखाते, सहकार, रेल्वे, केंद्र-राज्य संबंध या क्षेत्रांतील सर्व प्रश्नांची तड लावणे आणि त्यात मराठी माणसाचे सर्वंकष वर्चस्व स्थापित करणे, ही पक्षाच्या कार्याची मुख्य दिशा आहे.

शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ, हॅपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.
9272100500

- महाराष्ट्राच्या सत्ताकारणात व समाजकारणात तीव्र संघर्षाद्वारे परप्रांतीयांचे वर्चस्व संपूर्णत: नेस्तनाबूत करणे आणि मराठी माणसासाठीच महाराष्ट्र' ह्यानुसार आग्रही असणे ही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची विचारधारा आहे.
- भौतिक व सांस्कृतिक समृद्धीचे शिखर गाठलेला, जगाला हेवा वाटेल असा महाराष्ट्र व मराठी माणूस बनवणे हे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे स्वप्न आहे.

2009 विधानसभा निवडणूक–

- मनसे ला 2009 च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीत लक्षणीय यश मिळाले. पुणे, मुंबई, नाशिक व ठाणे येथील एकूण 13 आमदार निवडून आले. मनसे'ला तेवढ्याच म्हणजे आणखी तेरा जागांवर क्रमांक दोनची मते मिळाली आहेत. एकोणतीस जागांवर मनसे'चे उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर आहेत.

3. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया–

- भारतीय रिपब्लिकन पक्ष हा भारतातील राजकीय पक्ष आहे. डॉ. भीमराव आंबेडकरांनी सुरू केलेल्या शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन या संघटनेतून हा पक्ष उदयास आला. या पक्षाचे मुख्य बलस्थान महाराष्ट्रात आहे.
- शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन हाही एक निवडणुकीत उतरणारा राजकीय पक्ष होता.
- भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अधिकृत नाव रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया असे आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आणि फाटाफूट हे दोन समानार्थी शब्द आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर 3 ऑक्टोबर 1957 रोजी त्यांच्या अनुयायांनी स्थापन केलेल्या या पक्षाचा संपूर्ण इतिहासच फाटाफुटींनी भरलेला आहे. दररोज 'रिपब्लिकन' हा शब्द असलेला एक राजकीय पक्ष (गट) स्थापन होतो आणि पुढे तो फुटतो, असे या प्रक्रियेचे वर्णन करता येईल.
- पहिल्यांदा हा पक्ष फुटला तो 1958 साली. म्हणजे पक्षस्थापनेनंतर एक वर्षांच्या आतच. तेव्हाही नेतृत्व कुणी करायचे, यावरूनच पक्ष फुटला होता. त्यातून खोब्रागडे-गायकवाड आणि कांबळे-रूपवते असे दोन गट निर्माण झाले. 1964 मध्ये गायकवाड गटातून आर. डी. भंडारे बाहेर पडले तर 1965 मध्ये कांबळे गटात फूट पडून रूपवते बाहेर पडले आणि गायकवाड गटाशी त्यांचे ऐक्य झाले (म्हणजे ज्यांना विरोध केला त्यांच्याकडेच गेले). त्यानंतर आजपर्यंतचा या पक्षाचा संपूर्ण प्रवास फाटाफूट आणि ऐक्य यांनी रंगलेला आहे. वारंवार झालेल्या या फाटाफुटी व ऐक्यामुळे 'फूट' आणि 'ऐक्य' या दोन्ही शब्दांचे रिपब्लिकन चळवळीच्या संदर्भातले गांभीर्यच नष्ट झाले आहे. आत्तापर्यंत या पक्षाची 50हून अधिक छकले झाली आहेत, आणि अशा प्रत्येक छकलाचा एक स्वतंत्र राजकीय पक्ष झाला. त्यांतल्या काही छकलांचो नावे : –
- भारतीय रिपब्लिकन पक्ष (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया)चे तुकडे
- यांपैकी 19 पक्षांची मान्यता आयकर विवरणपत्रे न भरल्याने रद्द झाली.(16-12-2016 रोजी सरकारने घेतलेल्या निर्णयानुसार राजकीय पक्षांना आयकरापासून मुक्ती देण्यात आली. मान्यता रद्द झालेले हे सर्व पक्ष आता मान्यताप्राप्त होतील)
- आंबेडकरवादी रिपब्लिकन पार्टी
- आर.पी.आय.(आठवले)
- इंडियन रिपब्लिकन पार्टी (दलित पँथर) – नामदेव ढसाळ यांची पार्टी
- उत्तर प्रदेश रिपब्लिकन पार्टी
- ऐक्यवादी रिपब्लिकन पार्टी (दिलीपदादा जगताप)
- खोब्रागडे रिपब्लिकन पार्टी डेमॉक्रॅटिक गट (खोरिप, उपेंद्र शेंडे) : आयकर विवरणपत्रे न भरल्याने या पक्षाची मान्यता 14 जुलै 2016 रोजी रद्द झाली.
- दलित कोब्रा (भाई विवेक चव्हाण)
- राष्ट्रीय रिपब्लिकन पक्ष (अण्णासाहेब कटारे राष्ट्रीय अध्यक्ष)
- दलित पँथर
- भारतीय दलित पँथर पार्टी – दयाळ बहादुरे यांचा पक्ष
- भारतीय युथ पँथर
- युवा दलित पँथर
- दलित सेना
- नॅशनल रिपब्लिकन पार्टी – अण्णासाहेब कटारे यांची पार्टी
- पँथर्स रिपब्लिकन पार्टी – गंगाधर गाडे यांची पार्टी

Competitive Forum
शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ, हॅपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.
9272100500

- पॉलिटिशियन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए), उत्तर प्रदेश
- पीपल्स रिपब्लिकन पक्ष - जोगेंद्र कवाडे यांची पार्टी
- प्रबुद्ध रिपब्लिकन पार्टी -शाम तांगडे व सतीश गायकवाड यांची पार्टी
- बहुजन भीम पँथर
- बहुजन महासंघ - मखराम पवार यांची पार्टी
- बहुजन रिपब्लिकन पार्टी
- बहुजन रिपब्लिकन युनायटेड - सुलेखा कुंभारे
- बहुजन समाज पार्टी (आंबेडकर-फुले)
- भारतीय युथ पँथर
- भीमशक्ती पार्टी
- भारतीय दलित पँथर पार्टी - दयाळ बहादुरे यांचा पक्ष
- भारतीय रिपब्लिकन पक्ष
- भारिप बहुजन महासंघ - प्रकाश आंबेडकर यांचा पक्ष
- भीमशक्ती रिपब्लिकन सेना : आयकर विवरणपत्रे न भरल्याने या पक्षाची मान्यता 14 जुलै 2016 रोजी रद्द झाली.
- महाराष्ट्र डावी लोकशाही समिती (मडालोस)
- युनायटेड रिपब्लिकन फ्रंट (गंगाराम इंदिसे)
- यूथ रिपब्लिकन (मनोज संसारे)
- राजगृह रिपब्लिकन पार्टी
- रिपब्लिकन जनशक्ती पक्ष (पक्षप्रमुख अर्जुन डांगळे; पक्षाचे पुण्यातील शहराध्यक्ष शैलेंद्र मोरे)
- रिपब्लिकन टायगर फोर्स
- रिपब्लिकन पँथर्स -
- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (राज घाडगे)
- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) : आयकर विवरणपत्रे न भरल्याने या पक्षाची मान्यता 14 जुलै 2016 रोजी रद्द झाली.
- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) (अध्यक्ष - रामेश्वर सूर्यभान गवई)
- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (कवाडे)
- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खोब्रागडे) आयकर विवरणपत्रे न भरल्याने या पक्षाची मान्यता 14 जुलै 2016 रोजी रद्द झाली.
- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया डेमॉक्रेटिक (टी.एम. कांबळे) : आयकर विवरणपत्रे न भरल्याने या पक्षाची मान्यता 14 जुलै 2016 रोजी रद्द झाली.
- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (बी.सी. कांबळे-आक्काताई बापूसाहेब कांबळे)
- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (महाराष्ट्र)
- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (मोघा)
- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (कोळी)
- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (राजा ढाले)
- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (युनायटेड)
- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया-आर्के. (आर्के म्हणजे राजाराम खरात)
- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया-ई. - (ई म्हणजे एकतावादी)
- रिपब्लिकन लेफ्ट डेमॉक्रॅटिक फ्रंट (रिपब्लिकनांची डावी लोकशाही समिती - रिडालोस - RIDALOS) (इ.स. 2014च्या निवडणुकांपाठी हिचे रूपांतर मडालोस (महाराष्ट्र डावी लोकशाही समिती) असे झाले आहे.)
- रिपब्लिकन संघर्ष दल (संस्थापक संजय भीमाले)
- रिपब्लिकन सेना (अनुज आनंदराज)

Competitive Forum

शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ,
हॅपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी
Telegram Channel-
@abhijitrathod
Join करा.
9272100500

- सत्यशोधक कम्युनिस्ट पार्टी (कार्ल मार्क्स, फुले आणि आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानांवर आधारित पक्ष – स्थापनकर्ते कॉम्रेड शरद पाटील)
- हरियाणा रिपब्लिकन पार्टी
- अन्य तत्सम पक्ष आणि त्यांचे अध्यक्षसंपादन
- लक्ष्मण माने (भटके विमुक्त संघटना), लक्ष्मण गायकवाड (भटके विमुक्त जाती जमाती संघटना), प्रा. मोतीराम राठोड (राष्ट्रीय बंजारा दल), बाळकृष्ण रेणके (भटके विमुक्त जमाती), एकनाथ आव्हाड (राष्ट्रीय मानवाधिकार संघटना), प्रफुल्ल पाटील, रोहिदास समाज पंचायत संघ (अध्यक्ष भागुराम कदम), व्ही. जी. गायकवाड, रविंद्र बागडे, कनुलाल जैन, अविनाश कुट्टी, इ.

आर.पी.आय. (आठवले गट)–

- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले); लघुरूप : आर.पी.आय. (ए) ही भारतातील भारतीय रिपब्लिकन पक्षाची एक शाखा असून याचे अध्यक्ष रामदास आठवले आहेत. हा पक्ष आंबेडकरवादी विचारसरणीचा एक राजकीय पक्ष आहे. हा पक्ष आंबेडकरी तत्त्वांस अनुसरून बहुजनहिताच्या उद्दिष्टाचा दावा करतो. रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली याची स्थापना झाली. रामदास आठवले या पक्षाच्या अध्यक्षपदाची धुरा वाहत आहेत. या पक्षाचा प्रभाव प्रामुख्याने महाराष्ट्र प्रदेशात आहे. पक्षाचे राष्ट्रीय सचिव दयाळ बहादुरे आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष उतम खोब्रागडे आहेत. इ.स. 2005 ते 2014 या काळातली आयकर विवरणपत्रे न भरल्याने या पक्षाची मान्यता रद्द झाली होती. दयाळ बहादुरे यांचा स्वतःचा 'भारतीय दलित पँथर पार्टी' नावाचा पक्ष काढला आहे.

4. शेतकरी कामगार पक्ष–

पार्श्वभूमी –



- 1946 च्या सप्टेंबर महिन्याच्या काळात शंकरराव काँग्रेस अंतर्गत कार्य करणाऱ्या सहकाऱ्यांना मोरे यांनी आपली खंत बोलून दाखविली. ते म्हणाले, काँग्रेस पक्षाने जनतेला वेळोवेळी दिलेल्या आश्वासनांना आणि निवडणूक जाहिरनाम्यातील बचतांना हरताळ फासलेला आहे.
- काँग्रेस सरकार हे भांडवलदारांचे हित पाहणारे आणि शेतकरी कामगारांचे राज्य स्थापन करण्याच्या घोषणेच्या विरोधात काम पाहत आहे. यामुळे आपणास वेगळा मार्ग निवडावा लागेल. उपरोक्त संत व्यक्त केल्यानंतर प्रत्यक्षात 11-09-1946 रोजी शंकरराव मोरे यांनी त्यांचे सहकारी भाऊसाहेब राऊत, केशवराव जेधे, तुळशीदास जाधव, दत्ता देशमुख, रामभाऊ नलावडे व इतर काही आमदारांच्या मदतीने 'शेतकरी -कामकारी संघ' स्थापन केला. सदर 'शेतकरी-कामकारी संघ' स्थापनेनंतर काँग्रेसमधील मोरे यांच्या विरोधकांनी टिकास्थ सोडले. त्यावेळेस 'नवयुग' सारख्या साप्ताहिकांमधून शंकरराव मोरे यांनी आपल्या लेखणीने त्यांना चोख उत्तर दिले.
- यानंतर दिनांक 11-01-1947 रोजी फणसवाडी येथील शंकररावजी मोरे यांच्या बंगल्यात पुनश्च एकदा काँग्रेस शेतकरी-कामकरी संघाची बैठक बोलावण्यास आली होती. सदर बैठकीत महाराष्ट्राचे उदगाते यशवंतराव चव्हाण यांनी प्रथम शेतकरी-कामकरी पक्ष स्थापनेस प्रखर विरोध केला होता. या विरोधाने खचून न जाता पूण्यात भाऊसाहेब शिरोळे यांच्या घरी केशवराव जेधे, औटे, मोहीते, आनंदराव चव्हाण, तुळशीदास जाधव, दत्ता देशमुख, भापकर, भाऊसाहेब शिरोळे यांना एकत्रित करून शंकररावजी मोरे यांनी 'शेतकरी-कामकरी' ऐवजी नवा 'शेतकरी-कामगार पक्ष' स्थापन करण्याचा मुहूर्त नारळ फोडला.
- परिणामी 3 ऑगस्ट 1947 रोजी आळंदी मुक्कामी शंकररावजी मोरे यांनी निवडक कार्यकर्त्यांना बोलावून ऐतिहासिक बैठक घेतली. याच बैठकित आजचा 'शेतकरी कामगार पक्ष' महाराष्ट्रात जन्मास आला.

शेतकरी कामगार पक्षांचे प्रारंभी कार्य –

- 1947 काळात शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेचे कार्य म्हणजे शंकरराव मोरे यांच्या करीअरीला कळस होता. या पक्षाला प्रारंभापासूनच शास्त्रीय समाजसत्तावादी विचारसरणीचे बैठक देऊन शंकररावांनी महाराष्ट्रातील असंख्य तरुणांना या पक्षाच्या झेंड्याखाली खेचून आणले.

Competitive Forum

- शंकररावांच्या सार्वजनिक जिवनातील तिसऱ्या व सर्वात तेजस्वी कालखंडाला शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेपासूनच सुरूवात झाली. शेतकरी कामगार पक्षाची धोरणे सर्वांना समजावी म्हणून पक्षाच्या कार्यकर्त्यांची वैचारिक बैठक भक्कम करण्यासाठी अनेक अभ्यास वर्गातून व शिबिरातून शंकररावांनी बौध्दिक वर्ग घेतले.
- महाराष्ट्रात शंकररावांनी तुफानी दौरे काढुन भांडवलदारांच्या व त्यांचे मुनीम बनलेल्या काँग्रेस सरकारच्या विरुध्द उभ्या महाराष्ट्रात जबरदस्त रान उठवून राज्यकर्त्यांच्या सिंहासनाला घाम फोडला.
- शंकररावांनी त्यांच्या 'जनसत्ता' ह्या साप्ताहिकांतून मार्क्सवाद आणि शेतकरी कामगार पक्षाचे एकसुत्री विचार लोकांसमोर मांडले. यावेळी 'शेकाप' हा जातीयवादी पक्ष असल्याचा काँग्रेस कडून आरोप करण्यात येत होता. वर्गविग्रहाच्या तत्वांवर अतूट निष्ठा असलेला शेतकरी कामगार पक्ष लोकांच्या पसंदीस जस-जसा खरा उतरत गेला तस-तसे काँग्रेसवाल्यांचे आरोप धांदात खोटे ठरु लागले.

शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ, हॅपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.
9272100500

- पक्षस्थापनेच्या निवेदनातच स्पष्ट ठरले होते की, यापूढे स्पष्टपणे समाजवादी तत्वानुसार कामगार शेतक-यांच्या वर्ग संघटना उभारणे व त्यांचे दैनंदिन वर्गलढे लढविणे हाच एक मार्ग आहे. त्यामुळे 'शेकाप' हा जातीयवादी पक्ष म्हणणाऱ्याची तोंडे आपोआपच बंद होत असत. त्याचप्रमाणे 3 ऑगस्ट 1947 ह्या पक्ष स्थापनेच्या बैठकित झालेल्या ठरावात देखील असे ठरले होते की, प्रखर लढ्याशिवाय किसान कामगारांचे राज्य स्थापन करता येत नाही.
- कोणताही पक्ष वर्ग संघटनांचे पाठबळ घेतल्याशिवाय सत्तारुढ झाला, तरीही तो पक्ष किसान कामगारांचे राज्य स्थापन करु शकणार नाही. त्याचवेळेस असे देखील म्हटले होते की, या वर्गसंघटना केवळ आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी अस्तित्वात न आणता त्या सामाजिक व आर्थिक क्रांतीच्या आधारस्तंभ बनल्या पाहीजेत. शेतकरी कामगार पक्षाचे हेच प्रमुख धोरण संस्थापक शंकरराव मोरे यांनी आखले होते. आजही शेतकरी कामगार पक्ष याच धोरणावर कार्यरत आहे'

'शेकाप'च्या जन्माची बीजे -

- शेतकरी कामगार पक्षाचे संस्थापक शंकरराव मोरे यांनी शेकापच्या जन्माची बीजे कशी रुजवली गेली याचे विवेचन उदबोधकरित्या केले आहे.
- शंकरराव मोरे विवेचनात म्हणतात, मार्क्सवादी तत्वज्ञान आणि कामगार वर्गाचे आंतरराष्ट्रीयत्व ही स्वातंत्रलढ्याला पोषक आहेत; परंतू या देशात कम्युनिस्ट पक्षाच्या पुढारीपणाने धोरणविषयक चूका करुन मार्क्सवादाचे विकृत स्वरुप भारतीय जनतेपुढे ठेवले, हे श्रमजीवी जनतेचे दुर्दैव्य म्हटले पाहिजे.
- कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या सातव्या काँग्रेसमध्ये (1935) वासाहातिक देशातील स्वातंत्र्यलढ्यासंबंधी मार्गदर्शन करण्याचे कार्य डिमिट्रोव्ह यांनी केले.
- हिंदूस्थानातील कम्युनिस्टांनी स्वातंत्र्यलढ्यात काँग्रेसजनांसह भाग घेतला पाहीजे असे धोरण जाहीर करुन देखील येथील कम्युनिस्टांनी 1930 व 1942 च्या स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला नाही. त्यामुळे भारतीय जनतेचा मोठा रोष कम्युनिस्टांना पत्कारावा लागला होता. तसेच या लढ्यातून कामगार वर्गीय पुढारीपणाही तो प्रस्थापित करु शकला नाही. त्यामुळे हिंदूस्थानात स्वातंत्र्यलढ्याचे कम्युनिस्ट शत्रु आहेत ही भावना जोपासली गेली. याउलट कम्युनिस्टांनी स्वातंत्र्यलढ्यात पुढारपण घेतले आसते तर 1947 साली तडजोड करण्याची ताकद काँग्रेसच्या भांडवलदारी पुढारीपणाच्या हाती राहीली नसती. परंतू कम्युनिस्टांच्या चुकांमुळेच देशातील कामगार-किसान हा काँग्रेसच्या मागे गेला. ब्रिटीश साम्राज्याशी हातमिळवणी करणे काँग्रेसला त्याचमुळे सोपे झाले. सदर घटनेस विरोध दर्शविण्यासाठी महाराष्ट्रात कामगार-किसान क्रांती जिवंत ठेवण्यासाठीच मला 'शेतकरी-कामगार पक्षाची' निर्मिती करावी लागली असेही शंकरराव मोरे यांनी ठामपणे सांगितले.

'शेकाप'चा सुवर्णकाळ-

- 1948 ते 1956 हा 'शेतकरी-कामगार पक्षाचा' सुवर्णकाळ होता म्हटल्यास जावगे ठरणार नाही. कारण याचकाळात शंकरराव मोरे यांचे झुंजार नेतृत्व या पक्षास लाभले होते.
- शंकररावांनी श्रमजीवी जनतेला समजेल अश्या सोप्या भाषेत हजारो खेड्यात नेण्याचे व जनतेला काँग्रेसच्या भांडवलदारी पुढारीपणा खालून काढून मार्क्सवादी छावणीत आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आपल्या सिध्दहस्त लेखणीने व जुगलबंद वक्तृत्वाने पार पाडले.
- 1952 च्या विधानसभा निवडणुकीत शेकापचे 28 आमदार निवडुन गेले होते तर शंकरराव मोरे व इतर लोकसभेमध्ये निवडून गेले होते. यामुळेच शेतकरी कामगार पक्षाचा हा सुवर्णकाळ होता. दुर्दैवाने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीस ऐन भर आला असतानाच शेकाप फुटली आणि पक्षाची वाताहात सुरू झाली. परंतू पक्षाची ध्येय धोरणे इतकी मजबुत आहेत की, शंकररावांचे शिष्य व मानसपूत्र एन. डी. पाटील यांनी त्यानंतर शेकापची धुरा आपल्या खांद्यावर घेतली.
- 'शेकाप'चे नेतृत्व 1947 ते 2009 पर्यंतचा शेतकरी कामगार पक्षाच्या नेतृत्वाकडे एक दृष्टीक्षेप टाकल्यास शंकरराव मोरे यांच्या समर्थ नेतृत्वाने गाजलेल्या पक्षाने महाराष्ट्रात ग्रामीण भागातील बहुजन समाजातील कर्तबगार तरुणांची एक नवी पिढी घडविली असे दिसून येते. या समर्थ नेतृत्वामध्ये यशवंतराव मोहिते, एन. डी. पाटील, उध्दवराव पाटील, अण्णासाहेब गव्हाणे, दाजीबा देसाई, कृष्णराव धुळप, विठ्ठलराव हांडे आणि आता घोडाडीचे आमदार विवेक पाटील यांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल.
- आमदार पाई जयवंत पाटील हे सध्या [illegible] आहेत.
- भाई गणपतराव देशमुख हे तब्बल 50 वर्षे पक्षाचे प्रतिनिधित्व करत आहेत, ते 1962 पासून विधानसभेवर निवडून येत आहेत. महाराष्ट्रामध्ये पक्षाचे 4 विधानसभा सदस्य, 1 विधान परिषद सदस्य आहेत.

Competitive Forum

दबावगट

- विशिष्ट उद्देशाने एकत्रित येवून कार्य करणाऱ्या लोकांच्या गटाला हितसंबंधी गट असे म्हणतात. जेंव्हा असे हितसंबंधी गट आपली विशिष्ट मागणी पुर्ण करण्यासाठी शासनावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करते तेव्हा त्या गाटाचे रुपांतर दबावगटात होते.
- विविध धार्मिक संघटना, शेतकरी संघटना, व्यावसायीक संघटना, कामगार संघटना, विद्यार्थी संघटना, व्यापारी संघटना, यासारखे हितसंबंधी गट भारतात आढळून येतात.

शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ,
हंपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी
Telegram Channel-
@abhijitrathod
Join करा.
9272100500

- राजकीय पक्ष आणि दबावगट यांच्यामध्ये फरक आहे. दबावगट हे आपले विशिष्ट हितसंबंध सुरक्षीत ठेवण्याचा प्रयत्न करतात, तर राजकीय पक्ष सत्ताप्राप्तीसाठी प्रयत्न करत असतात.
- अलीकडील काळात दबावगट आणि हिसंबंधी गट हे शब्द एकाच अर्थाने वापरत असले तरी त्यांच्यात फरक आहे.

दबावगटाचे प्रकार–

1. संघटनात्मक दबावगट–

- विविध व्यवसाय वा कामातून हे गट निर्माण झालेले असतात. सर्वाधिक विकसीत व कृतीशील हा गट असतो. दबाव, पाठपुरावा, प्रचार या तंत्राचा वापर करून आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्यात हा गट अग्रेसर असतो. या गटाची संघटनात्मक पातळी मजबुत असते त्यामुळे राजकीय व्यवस्थेवर प्रभाव पाडण्याची प्रचंड क्षमता या गटात असते.
- उदा. विद्यार्थी संघटना, शेतकरी संघटना, कामगार संघटना, शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटना

2. बिगर–संघटनात्मक दबावगट–

- हे गट जाणीवपुर्वक निर्माण झालेले नसतात तर ते अप्रत्यक्षपणे आपले हितसंबंध जोपासत असतात.
- उदा.धार्मिक गट, जातीय गट, जमातीय गट, भाषीक गट

3. संस्थात्मक दबावगट–

- औपचारिकरित्या हे गट संघटीत झलोले असतात. हे गट सतत आपल्या हितसंबंधाचा पाठपुरावा करत असतात. संस्थात्मक हीतसंबंधी गटांनी राजकीय व्यवस्थेत महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे.
- नोकरशाही, कायदेमंडळ, राजकीय पक्ष, यांमध्ये संस्थात्मक हितसंबंध गट आढळून येतात.

4. मुल्यविहीन दबावगट–

- विशिष्ट जनसमुदायांमध्ये साठलेल्या असंतोषाचा अचानक विस्फोट होऊन या गटाद्वारे त्यांच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्याची प्रेरणा निर्माण होते व हितसंबंधाचे अविष्करण होते. हे गट तात्पुरते असतात तसेच हिंसक व घटनाबाह्य कृतीद्वारे आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्याचा प्रयत्न करतात.

दबावगटाची कार्ये–

- लोकमत जागृत करणे, जनतेला कल्याणकारी योजनांचे महत्त्व पटवून देणे.
- आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्याचे कार्य करणाऱ्या उमेदवारालाच निवडणुकीत पाठींबा देणे.
- विविध मार्गांचा/माध्यमांचा वापर करून आपल्या मागण्या शासनापर्यंत पोहचवणे.
- शासन आणि जनता यांच्यातील दुव्याचे काम दबावगट करतो.
- कायदेमंडळातील सदस्य, वरिष्ठ शासकीय अधिकारी, मंत्री यांना आपल्या मागण्यांचे महत्त्व पटवून देणे.
- आपल्या मागण्या शासनाकडून मान्य करून घेण्यासाठी मोर्चे, संप, निदर्शने, रास्तारोको या मार्गांचा अवलंब करणे. उदा शेतकऱ्यांनी कर्जमाफीसाठी केलेले आंदोलन.
- आपल्या विशिष्ट धोरण/दृष्टीकोनाचा पाठपुरवा करणे.
- आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी पक्षाचे सहकार्य घेणे.
- विधीमंडळ अधिवेशन काळात कायदेमंडळातील सदस्यांना आपल्या मागण्यांचे महत्त्व पटवून देवून त्यांच्याकडून अनुकूल कायदे पास करून घेणे. (कायदे प्रक्रिया)

Competitive Forum

महत्त्वाचे दबावगट–

1. कामगार संघटना–

- बॉंबे मिल हँड्स असोसिएशन ही गिरणी कामगार संघटना 23 सप्टेंबर 1884 रोजी स्थापली. ही कामगार संघटना भारतातील संघटित कामगार चळवळीची सुरुवात मानली जाते. इ.स.च्या 19व्या शतकात प्रथमच सुरू झालेल्या भारतातील कामगार चळवळीचे जनक म्हणून नारायण मेघाजी लोखंडे ओळखले जातात.
- स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच भारतात कामगार संघटना मोठ्या प्रमाणावर सक्रिय झाली होती. 1920 मध्ये स्थापन झालेली साम्यवाद्यांच्या प्रभावाखाली ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (आयटक) तसेच स्वातंत्र्यानंतर 1948 साली स्थापन झालेली इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस (इंटक) या सुरुवातीच्या महत्त्वाच्या संघटना होत्या

शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ, हॅपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी Telegram Channel- @abhijitrathod Join करा.
9272100500

- हिंदु मजुर संघ, भारतीय मजुर सभा अशा कामगार संघटनेची स्थापना सुरुवातीच्या काळात झाली.
- वरील सर्व कामगार संघटनांवर राजकीय पक्षांचा प्रभाव आढळतो.
- इंटक संघटनेवर काँग्रेसचा तर आयटकवर साम्यवादी व डाव्या पक्षांचा प्रभाव दिसून आला.
- या संघटनांच्या मोठ्या प्रमाणातील सदस्यसंख्येमुळे व संघटीत परिणामामुळे शासनाच्या धोरणनिर्मितीवर नेहमीच प्रभाव पाडला.
- आपल्या मागण्यांसाठी कामगार संघटनांनी सप, हरताळ, बंद, टाळेबंदी, उपोषण, घेराव अशा विविध मार्गांचा अवलंब करून बोनस, वेतनवाढ इतर अन्य काही मागण्या मान्य करून घेतल्या.

2. जात संघटना–

- भारतीय समाजव्यवस्था जातीवर आधारीत असल्याने जातीय संघटनांनी शासनाच्या धोरण निर्मितीवर नेहमीच प्रभाव पाडलेला आहे.
- आपल्या जातीला अनुकुल असे धोरण मंजुर करून घेण्यासाठी जातीय संघटनांनी दबावगट निर्माण करून शासनाच्या धोरणावर प्रभाव पाडला.
- भारतीय समाजातील पारंपारिक संरचनेवर आधारीत हा दबावगट आहे.

3. शेतकरी संघटना–

- 1936 साली अखील भारतीय किसान सभेची स्थापना झाली.
- 1942 च्या काळात साम्यवादी पक्षाने भारतीय किसान सभेवर नियंत्रण प्रस्थापित केले.
- नंतरच्या काळात अनेक राजकीय पक्षांनी आपल्या पक्षांतर्गत शेतकरी संघटना स्थापन केल्या.
- अखिल भारतीय किसान संघ, संयुक्त किसान सभा, अखिल भारतीय किसान-कामगार संमेलन, शेतकरी संघटना, शेतकरी आणि कामगार पक्ष, भारतीय किसान युनियन, इत्यादी शेतकरी संघटनांनी भारतीय राज्यव्यवस्थेवर शेतकऱ्यांना अनुकूल धोरण निर्माण करण्यासाठी प्रभाव पाडलेला आहे.
- शेतकरी संघटनांच्या प्रमुख मागण्यांमध्ये खतावरील अनुदान, कर्जमाफी, कुळांचे हक्का, वीजबिल माफी, शेतमालाला योग्य हमीभाव इत्यादींचा समावेश होतो.
- जून 2017 मध्ये महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी संघटीत होवून कर्जमाफीसाठी आंदोलन केले. या दबावापुढे सरकारला कर्जमाफी करणे भाग पडले.
- महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या संघटीतपणामुळे प्रभानीत होऊन भारतातील अनेक राज्यातील शेतकऱ्यांनी आपआपल्या राज्यांमध्ये आंदोलन करून आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी सरकारवर दबाव आणला.

वरील दबावगटाव्यतिरिक्त काही महत्त्वाचे दबावगट पुढील प्रमाणे–

- स्त्रीयांच्या संघटना, विद्यार्थी संघटना, शिक्षक संघटना, धार्मिक गट, गांधीवादी विचार सरणीचा गट, व्यापारी गट असे अनेक दबावगट आपले हितसंबंध साधण्यासाठी व आपल्या मागण्या शासनाकडून मान्य करून घेण्यासाठी दबावगटाच्या स्वरुपात कार्य करतात.

दबावगटाचे वैशिष्ट्ये–

- दबावगट कायदे निर्मितीपेक्षा कायद्याच्या अंमलबजावणी प्रक्रियेवर जास्त प्रभाव पाडतात.
- आपले हितसंबंध साधुन घेण्यासाठी दबावगट साधारणतः राजकीय पक्षांचा आधार घेतात.
- भारतात धर्म, जात यांवर आधारीतसुद्धा दबावगट आहेत.
- भारतातील दबाव गटांचे कोणत्याच एका पक्षाबरोबर सख्यत्व नसते. आपल्याला अनुकूल धोरणे तयार करणाऱ्या राजकीय पक्षासोबत दबावगट हातमिळवणी करतात.
- बहुसंख्य दबावगट हे आपले हितसंबंध साध्य होण्यापूरतेच अस्तित्वात असतात, त्यानतर ते नामशेष होतात.
- पारंपारिक आणि आधुनिक अशा दोन्ही स्वरुपाचे दबावगट भारतात कार्यरत असताना दिसतात.
- आपले हितसंबंध साधुन घेण्यासाठी भारतातील दबावगट संवाद, प्रसार, प्रचार, लॉबी करणे या मार्गांचा अवलंब करण्याऐवजी मोर्चे, संप, बंद यांसारख्या थेट कृतीवर भर देतात.
- काही राजकीय पक्ष आपल्याच पक्षांच्या शाखांतर्गत दबावगट स्थापन करतात.
- भारतातील दबावगट पाश्चिमात्य राष्ट्रातील दबावगटाएवढे प्रभावशाली नाहीत.

●●●

Competitive Forum

प्रसार माध्यमे

पार्श्वभूमी–

आंतरराष्ट्रीय मुद्रण कला उदय

- जागतिक पातळीवर मुद्रण कलेचा शोध गटेनबर्ग याने 1439 साली लावला मुद्रण कलेमुळे मानवी संस्कृतीमध्ये ज्ञानाचे, ऐश्वर्याचे, लोकशाहीचे व मानवतेचे एक अपूर्व असे सुवर्णयुगच सुरू झाले.
- प्रसार माध्यमांमध्ये वर्तमानपत्रे, नियतकालिके, आकाशवाणी, दुरदर्शन, चित्रपट, इंटरनेट यांचा समावेश होतो.
- बदलत्या तंत्रज्ञानाबरोबर प्रसारमाध्यमांचे स्वरुप बदलत गेले.

भारतीय मुद्रण कला उदय –

- भारतामध्ये वृत्तपत्रांचा प्रारंभ ब्रिटीश आगमनाबरोबर झाला सर्व प्रथम पोर्तुगिजानी भारतात छापखाना आणला त्याच बरोबर 1557 मध्ये गोव्यांच्या ख्रिश्चन धर्मप्रचारकांनी पहिले पुस्तक छापले मुंबई प्रांतात 1684 मध्ये इस्ट इंडिया कंपनीने छापखाना सुरू केला तरीही जवळजवळ 100 वर्ष कंपनीच्या प्रदेशात कोणतेही वृत्तपत्र निघाले नाही.
- कंपनीच्या कर्मचाऱ्यांमध्ये असलेला भ्रष्टाचार आणि त्यांचे दुष्कृत्य चव्हाट्यावर आणण्याच्या उद्देशाने कंपनीच्या काही असंतुष्ट कर्मचाऱ्यांनी भारतात पहिले वृत्तपत्र सुरू करण्याचा प्रयत्न केला त्यापैकी एक असलेले विल्ययम बोल्ट्स ह्याने कंसिडरेशन ऑन इंडियन अफेर्स नावाने 1772 साली पुस्तक काढले त्यामध्ये त्यांनी कंपनीच्या कर्मचाऱ्यांमध्ये असलेल्या भ्रष्टाचार आणि त्यांचे दुष्कृत्य चव्हाट्यावर आणण्याच्या उद्देशाने हे पुस्तक लिहले मात्र यावर वादविवाद झाल्याने सेवटी त्याला आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला. या राजीनाम्या बरोबरच त्याच्या मनी असलेला वृत्तपत्र काढण्याचा असलेला मानस लयास गेला.
- शेवटी भारतातील पहिले वृत्तपत्र काढण्याचा मान जेम्स ऑगस्टस हिकी याने 1780 मध्येThe Bengal Gazette किंवा The Calcutta General Advertiser नावाचे वर्तमानपत्र प्रकाशित झाले पण ऑगस्टस हिकी याने आपल्या वर्तमान पत्रातुन सरकारी अधिकारी, मुख्यन्यायाधिश आणि गर्वनर जनरल वर टिका केल्याने त्याचा छापखाना 1782 मध्ये जप्त करण्यात आला.
- सुरूवातीच्या कालखंडात वृत्तपत्राचा हेतू हा फक्त ॲग्लो इंडियन लोकांचे मनोरंजन हा होता सुरूवातीला या वृत्तपत्रांवर कोणतेही नियंत्रण नव्हते. एखाद्या बाबतीत संपादक दोषी आढळला तर त्याला इंग्लंडला पाठवून दिले जात असत.
- इंग्रज येण्याच्या आधी आजच्या सारखी वृत्तपत्रे नव्हती.
- आधुनिक वृत्तपत्रांचा उदय ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतातील राजवटीच्या काळात झाला.
- प्रारंभीची वृत्तपत्रे हे इंग्रजी या भाषेतच असत तसेच त्यांचे संपादक व वाचक हे युरोपियन होते.
- बेंगॉल गॅझेटपुर्वी 15 व्या आणि 16 व्या शतकात ईसाई मिशनऱ्यांनी भारतात धार्मिक साहित्याचे प्रकाशन करण्यासाठी प्रिंटींग प्रेस आणली होती.
- 1849 मध्ये गिरीश चंद्र घोष यांनी 'बेंगाल रेकॉर्डर' नावाचे वृत्तपत्र सुरु केले. 1853 मध्ये याचे नाव बदलून 'हिंदु पेंट्रियट' ठेवण्यात आले.
- 1784 मध्ये फ्रान्सिस ग्लॅडविन यांनी 'द कलकत्ता गॅझेट' नावाचे वृत्तपत्र सुरु केले.
- 'बॉम्बे समाचार' हे आशिया खंडातील सर्वात जुने व सध्या सुरु असलेले गुजराती भाषेतील वृत्तपत्र 1822 साली सुरु करण्यात आले होते.
- बेनेट, कोलमन आणि कंपनीचे 'द टाईम्स ऑफ इंडिया' हे 1838 साली वर्तमानपत्र सुरु तर 1850 साली रॉबर्ट नाईट यांनी 'टाईम्स ऑफ इंडिया' हे वृत्तपत्र सुरु केले.
- मराठी भाषेतील 'महाराष्ट्र टाईम्स' हे वृत्तपत्र 1962 पासुन 'द टाईम्स ग्रुपद्वारे' प्रसिद्ध केले जाते.
- शिशिरकुमार घोष व मोतीलाल घोष यांनी 1868 साली 'अमृत बझार पत्रिका' हे साप्ताहिक सुरु केले.
- 1878 साली जी. सुब्रम्हण्यम अय्यर व वीर राघवाचार्य यांनी 'द हिंदु' हे वृत्तपत्र सुरु केले.
- लोक प्रबोधन, ब्रिटीशविरोध, जागृती, समाजसुधारणा, लोक चळवळी उभारण्यासाठी तत्कालीन समाजसुधारकांनी वृत्तपत्रांच्या माध्यमांतून अनमोल कार्य केले.
- ॲनी बेझंट यांनी 1914 साली 'न्यु इंडिया' नावाचे वृत्तपत्र सुरु केले.
- भारतीयांनी सुरु केलेली वृत्तपत्रमानपत्रे हे स्वातंत्र्य चळवळीला पुरक ठरली याच बरोबर सामाजिक सुधारणेला, जागृतीला मदत झाली.

Competitive Forum

ब्रिटीशांचे वृत्तपत्रांसंबंधी कायदे –

वृत्तपत्राचा तपासणी कायदा 1799 –

- वृत्तपत्राच्या प्रत्येक अंकावर संपादक, मुद्रक आणि मालक ह्यांचे नाव छापले जावे.

शास्त्री रोड, गांजवे चौक, पुणे हॉस्पीटल सिग्नल जवळ,
हॅपी हाऊस फर्निचरसमोर, नवीपेठ, पुणे-३०
• अतिरिक्त नोट्ससाठी
Telegram Channel-
@abhijitrathod
Join करा.
9272100500

- प्रकाशकाने प्रकाशित करावयाच्या सर्व गोष्टी सरकारी सचिवाकडे पुर्व-तपासणी साठी पाठवाव्या
- पुढे लॉर्ड हेस्टींग्जने ह्या नियमात शिथिलता आणली व 1818 मध्ये वृत्तपत्रांवरील पुर्व-तपासणीचे बंधन काढून घेतले.
- ग.ज.लॉर्ड वेलस्लीने आपल्या पाच जाहीरनाम्यांद्वारे अनेक बंधने लादली व वृत्तपत्रे सरकारच्या वर्चस्वाखाली आणली. त्याने पुढील बंधने लादली. 1. प्रसिद्धी पूर्व तपासणी, 2. वृत्तपत्रांवर मालक व संपादकांची नावे, 3. संपादकावर कारवाई, 4. युरोपातील बातम्या छापण्यास बंदी.

परवाना नियम 1823 –

- ग.ज.लॉर्ड हेस्टिंग्ज (1813-23) हा उदारमतवादी व वृत्तपत्र स्वातंत्र्याचा भोक्ता होता. त्याने वेलस्लीने लादलेली वृत्तपत्रांवरील नियंत्रणे, रद्द केली. तरीसुद्धा हेस्टिंग्जने गव्हर्नर जनरल व महत्त्वाच्या पदावरील सरकारी व्यक्ती यांच्या सार्वजनिक क्षेत्रातील वागणुकीवरील टिका करू नये असे बंधन घातले.
- हेस्टींग्ज नंतर ग.ज.पदावर आलेल्या लॉर्ड ॲडम्सने सर थॉमस मनरो यांना वृत्तपत्रीय स्वातंत्र्याच्या प्रश्नाबाबत अभ्यास करून अहवाल सादर करण्यास सांगितले.- वृत्तपत्रांना स्वातंत्र्यदिल्याने लष्करांमध्ये राष्ट्रवादी भावना जागृक होऊन लष्कर बंड करेल. तसेच लोकांमध्ये स्वातंत्र्याची भावना उत्पन्न उत्पन्न होईल असा अहवाल दिला.

1823 मध्ये जॉन ॲडम्सला कार्यकारी गर्व्हनर जनरल संधी मिळाल्याने आपल्या प्रतिगामी विचारांना लागु करण्यासाठी कठोर नियम लागु केले.

[illegible]साठी परवाना आवश्यक –

- बिगर परवाना छापखान्यास 400 रूपये दंड व छापखाना बंद करण्याचे अधिकार दंडाधिकाऱ्यांना
- यामुळेच राजा राममोहन रॉयचे मिरात-उल-अकबर बंद पडले.
- यामुळे कलकत्याला 3 बंगाली व 1 पारशी वृत्तपत्र छापले जात.

भारतीय वृत्तपत्र स्वातंत्र्य 1835 –

- 1823 चे नियम रद्द करून मुक्तिदाता म्हणविण्याचा मान कार्यकारी गर्व्हनर जनरल चार्ल्स मेटकाफ याला मिळाला.
- उदारमतवादी लॉर्ड मेकॉलेने सुद्धा वृत्तपत्र स्वातंत्र्यांचे समर्थन केले.
- हा कायदा 1856 पर्यंत होता.

परवाना कायदा 1857 –

- हा 1 वर्षांसाठीच लागु कारण 1857 चा उठाव
- छापखाना परवाना छापखाना ठेवणे व त्याचा उपयोग करणे यावर बंधन घालण्यात आले आणि कोणत्याही वेळी परवाना देण्याचा वा रद्द करण्याचा अधिकार सरकारला मिळाला.

पंजीकरण कायदा 1867 –

- ह्या कायद्याचा उद्देश वृत्तपत्रावर किंवा छापखान्यावर बंधने घालण्याचा नव्हता तर त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचा होता.
- हा कायदा 1890, 1914, 1952, 1953 ला संशोधित करण्यात आला.
- 1869-70 मधील वहावी आंदोलनावर लिखान केल्यास आयपीसी 124 व कलम 124-अ ज्यामुळे राजगृहाची भावना पसरवणाऱ्याला आजीवन हद्दपारी किंवा कमी काळासाठी हद्दपारी किंवा दंड अशी तरतुद करण्यात आली.

The Vemacular Press Act 1878-

- मुंबई प्रांत – 62 वृत्तपत्रे
- [illegible] प्रांत, अवध व मध्यप्रांत – 60 वृत्तपत्रे
- बंगाल – [illegible] वृत्तपत्रे
- मद्रास – 19 वृत्तपत्रे

Competitive Forum

- अशी भारतीय भाषांतील वृत्तपत्रांची संख्या होती.
- हा कायदा फक्त भारतीय भाषांतील वृत्तपत्रांसाठी लागु होता. त्यामुळे भारतीय लोकांत असंतोष वाढत गेला.
- जिल्हा अधिकाऱ्याला सर्व अधिकार देण्यात आले व त्याचा निर्णय म्हणजे अंतिम निर्णय मांडण्यात आला. त्यावर अपिल करता येणार नाही.
- या [illegible] अंतर्गत सोमप्रकाश, भारत मिहीर, ढाका प्रकाश, सहचर अशा वृत्तपत्रांवर कारवाई करण्यात आली.
- हा कायदा लिटन याने अमलात आणला तर 1882 मध्ये रिपनने रद्द केला.
- अमृत [illegible] पत्रिका या वृत्तपत्रांने या कायद्याच्या चौकटीत बसू नये म्हणून रातोरात बंगाली भाषे ऐवजी इंग्रजी भाषेतुन अंक प्रकाशित करण्यास सुरूवात केली.
- या कायद्याला सुरेंद्रनाथ बॅनर्जीयांनी आकाशातुन वज्राघात असे संबोधले.

1908 चा कायदा –

- जहालवाद्यांच्या चळवळीचा परिणाम
- वृत्तपत्रांच्या मुद्रक व प्रकाशकांचा छापखाना जप्त केल्यापासुन 15 दिवसांच्या आत उच्च न्यायालयात अपील करण्याचा परवानगी होती.
- या कायद्याअंतर्गत सरकारने 9 वृत्तपत्रांवर कारवाई व 7 छापखाने जप्त केले.

भारतीय वृत्तपत्र कायदा, 1910 –

- छापखाना काढण्यासाठी वृत्तपत्र मालकाला कमीतकमी 500 रूपये व जास्तीत जास्त 2000 रूपये अनामत रक्कम सरकारजवळ ठेवावी लागता होती व एकवार कारवाई झाल्यास पुन्हा पंजिकरण करण्यासाठी कमित कमी 1000 रूपये व जास्तीत जास्त 10,000 रूपये जमानत मागु लागले.
- या कायद्यानुसार 5 वर्षांत जवळपास 5 लाख रूपये दंड जमा केला.
- 1940 च्या लॉर्ड लिनलिथगो यांच्या 'ऑगस्ट ऑफर'द्वारे ब्रिटीश सरकारने पहिल्यांदा भारताची घटना 'मुख्यतः' भारतीयांनी तयार करावी, असे घोषीत केले व सोबतच 1942 च्या सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या तरतुदींमध्येही भारताची घटना पूर्णतः भारतीयांनी तयार करावी असे घोषीत करण्यात आले होते.
- मे 1946 मध्ये आलेल्या 'कॅबिनेट मिशन प्लॅन' मध्ये संविधान सभेच्या निर्मिती संबंधी तरतूद करण्यात आली होती व त्यानुसार संविधान सभेची स्थापना करण्यात आली.

संविधान सभेची निर्मिती व रचना (Formation and Structure of the Constituent Assembly)-

- संविधान सभेच्या सदस्यांच्या निवडणुका 1935 च्या कायद्यानुसार निर्माण झालेल्या प्रांतीक सरकारकडून /कायदेमंडळाकडून अप्रत्यक्षपणे एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणात प्रातिनिधीत्वाच्या पद्धतीने केल्या गेल्या. (संविधान सभा प्रत्यक्ष प्रौढ मतदानाच्या आधारावर निवडण्यात आली नव्हती.)
- 1935 च्या कायद्यानुसार कमालमता, शिक्षण या आधारावर मतदानाचा अधिकार देण्यात आला होता.
- 10 लाख लोकसंख्येमागे एक सदस्य, असे प्रमाण ठेवण्यात आले व सर्व समुदायांना प्रतिनिधीत्व मिळावे या कारणासाठी जागांचे वर्गीकरण तीन प्रमुख गटामध्ये (शिख, मुस्लिम व साधारण) केले गेले.

परिवर्तन Competitive Forum - अभिजीत राठोड

संविधान सभा (सदस्य-389)

- 292 (ब्रिटीश प्रांत)
- 4 (चीफ कमिशनर)
- 93 (भारतीय प्रांत)

292 (ब्रिटीश प्रांत) → जुलै-1946 निवडणुका व निकाल

- काँग्रेस (208)
- मुस्लीम लिग (73)
- इतर (15)

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

- 296 पैकी 292 जागा 11 प्रांतामधून म्हणजे मद्रास, बॉम्बे, संयुक्त प्रांत, बिहार, मध्यप्रांत, ओरीसा, पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, सिंध, बंगाल व आसाम यामधून निवडून द्यायच्या होत्या. तर 4 चीफ कमिशनरमध्ये दिल्ली, अजमेर-मारवाड, कुर्ग व ब्रिटीश बलुचिस्तान यामधून निवडून द्यायच्या होत्या.
- संस्थानिकांनी संविधान सभेत भाग न घेतल्यामुळे त्यांच्या जागा (93) रिक्त होत्या.
- भारतीय समाजाच्या सर्व गटांना संविधान सभेत प्रतिनिधीत्व होते. हिंदू, मुस्लिम, शिख, पारसी, ॲंग्लो इंडियन, भारतीय ख्रिश्चन, अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, महिला इ.
- महात्मा गांधी व मुहम्मद अली जीना यांचा संविधान सभेत समावेश नव्हता.
- आपल्या घटनासभेत आपल्या स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वपूर्ण योगदान देणारे व अंमलबजावणीत सर्व प्रमुख नेते सहभागी होते. याला पुढील

काही लक्षणीय ठरलेले अपवादही होते. की ज्यांचा संविधान सभेत सहभाग नव्हता.

1. महात्मा गांधी, 2.राम मनोहर लोहिया 3. जयप्रकाश नारायण 4. आचार्य नरेंद्र देव

- इतिहासकार रामचंद्र गुहा यांच्या मते गांधीजींचा काँग्रेसने अंतरिम सरकारमध्येय सहभागी होण्यास विरोध असल्यामुळे घटनासभेपासून ते दूर राहिले.
- घटनासभा सदस्यास आपले सदस्यत्व राजीनाम्याद्वारे त्यागता येईल अशी कार्यनियमावलीत तरतुद होती. त्यानुसार राजीनामा स्विकारण्याचा अधिकार अध्यक्षांना होता. घटनासभेच्या सल्लागार, उपसमिती, अध्यक्ष पदाबाबतही अशीच तरतुद होती. या तरतुदीनुसार घटनासभेच्या काही सदस्यांनी राजीनामे दिले ज्यात- एम.आर.जयकर व झेड.एच.लारी हे प्रमुख होते.

घटना समितीच्या निवडणुकांचे निकाल (जुलै १९४६)


पक्ष	जिंकलेल्या जागा	पक्ष	जिंकलेल्या जागा
काँग्रेस	208	युनियनिस्ट अनु.जाती	1
मुस्लिम लीग	73	कृषक प्रजा पक्ष	1
युनियनिस्ट पक्ष	1	अनु. जाती फेडरेशन	1
युनियनिस्ट मुस्लिम	1	शीख (बिगर काँग्रेस)	1
साम्यवादी पक्ष	1	अपक्ष	8

संविधान सभेच्या रचनेत बदल (Changes in the Composition of the Constituent Assembly)

1. संस्थानिकांच्या सहभागामुळे

2. जून 1947 म्हणजे फाळणीच्या योजनेनंतर

3. भारत स्वातंत्र्य कायदा 1947 नंतर



- सुरुवातीला संस्थानिकांचा संविधान सभेत सहभाग नव्हता. एप्रिल 1947 पर्यंत फक्त बडोदा, बिकानेर, जयपूर, पटीयाळा, उदयपूर व रेवा या संस्थानिकांचा सहभाग होता.
- जून 1947 नंतर मुस्लिम लीग व बऱ्याचशा संस्थानिकांनी संविधान सभेत सहभाग घेतला.
- भारतीय स्वातंत्र्याचा कायदा, 1947 अन्वये पुढील बदल-

1. संविधान सभेला पूर्ण सार्वभौम बनविण्यात आले. त्यामुळे संविधान सभेला कायदेमंडळाचा दर्जा प्राप्त झाला. संविधान सभेला पुढील दोन कार्य करावयाची होती.

Competitive Forum
– अभिजात राठोड

अ) स्वतंत्र भारतासाठी संविधान निर्मिती–संविधान सभा

ब) देशासाठी कायदे करणे– कायदेमंडळ (26 जानेवारी 1950 ते मार्च 1952 पर्यंत)

वरील दोन्ही कामे एकच सभागृह करत असे. संविधान सभेचे अध्यख डॉ.राजेंद्र प्रसाद तर कायदेमंडळाचे अध्यक्ष जी.व्ही.माळवणकर (17 नोव्हेंबर 1947 रोजी त्यांची अध्यक्ष म्हणून निवड) हे बघत असे.

3. फाळणीनंतर मुस्लिम लिगाने सदस्य संविधान सभेतून बाहेर पडल्याने सभेची सदस्यसंख्या 299 इतकी झाली होती. त्यात 229 हे पूर्वीच्या ब्रिटीश प्रांतांचे प्रतिनिधी तर 70 संस्थानिकांचे प्रतिनिधींचा समावेश होता.

संविधान सभेचे कामकाज (Working of the Constituent Assembly)–

- 9 डिसेंबर 1946 रोजी संविधान सभेची पहिली बैठक पार पडली. त्यात 211 सदस्य उपस्थित होते. मुस्लिम लिगच्या स्वतंत्र पाकिस्तानच्या मागणीमुळे मुस्लिम लीगने बैठकीवर बहिष्कार टाकला.
- जेष्ठतम सदस्य असलेल्या डॉ.सच्चिदानंद सिंन्हा यांची संविधान सभेची तात्पुरते अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. (फ्रान्सच्या ज्येष्ठतम सदस्याच्या प्रथेला अनुसरून)
- 11 डिसेंबर 1946 रोजी डॉ.राजेंद्र प्रसाद यांची अध्यक्ष तर एच.सी.मुखर्जी यांची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.
- प्रा.के.टी. शहा यांनी घटनासभेत घटनेच्या मसुद्यास सर्वाधिक दुरुस्तीप्रस्ताव सादर केल्या. त्यानंतर एच.व्ही.कामत यांचा क्रम येतो.
- सर बी.एन.राव यांची संविधान सभेचे कायदेशीर घटनात्मक सल्लागार म्हणून करण्यात आली. यांनी संविधानाचा पहिला कच्चा नमूना प्रसिद्ध केला होता.

- के.संथानम यांच्या सुचनेनुसार घटनेच्या कलम 40 मध्ये ग्रामपंचायत विषयक मार्गदर्शक तत्व समाविष्ट झाले.
- 13 डिसेंबर 1946 रोजी जवाहरलाल नेहरू यांनी संविधान सभेत **'उद्देश पत्रिका (Objectives Resolution)'** मांडली. त्यात संविधानाच्या संरचनेची मूलभूत तत्त्वे, तत्वज्ञान व विचार स्पष्ट करण्यात आले होते.
- 22 जानेवारी 1947 रोजी संविधान सभेने या उद्देशपत्रिकेचा स्विकार करण्यात आला.
- 25 नोव्हे.1949 रोजीच्या शेवटच्या भाषणात डॉ.आंबेडकरांनी घटनेच्या यशस्वीतेसाठी तीन अटी प्रमाणभूत सांगितल्या.
  1. घटनाबाह्य मार्गाचा त्याग करावा लागेल. (सत्याग्रह, सविनय कायदेभंग, क्रांती)
  2. विभुतीपुजा सोडावी लागेल.
  3. राजकीय लोकशाही सोबतच सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित झाली पाहिजे.
- डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचे घटनासभेतील शेवटचे भाषण 25 नोव्हेंबर 1949 रोजी केले. जे त्यांच्या सर्व भाषणापैकी सर्वाधिक गाजलेले आहे. त्यातून त्यांची घटनेने पारित केलेल्या घटनासभेची/घटनेची दृष्टी दिसून येते.
- या भाषणाचे वर्णन ग्रीनव्हिल ऑस्टीनने, 'घटनाकारांच्या घटनाविषयक भावनेची अभिव्यक्ती' असे संबोधले आहे

1. **मे 1949 रोजी** - भारताच्या राष्ट्रकूलाच्या सदस्यत्वाला अनमुमोदन दिले.
2. **22 जुलै 1947 रोजी** - भारताचा राष्ट्रीय ध्वज स्विकृत
3. **24 जानेवारी 1950 रोजी** - भारताचे राष्ट्रगीत आणि राष्ट्रगान स्विकृत
   - 26 जानेवारी पासून लोकसभेच्या निवडणुका होईपर्यंत संविधान सभेलाच तात्पुरती संसद (Provisional Parliament) म्हणून मान्यता.
   - घोषीत करण्यात आले तसेच निवडणुका होईपर्यंत भारतीय गणराज्याचे पहिले राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांची नेमणूक करण्यात आली.

संविधान सभेच्या समित्या (Committees of the Constituent Assembly)-

- संविधान सभेमध्ये एकूण 8 समित्या या महत्त्वाच्या समित्या होत्या. इतर उपसमित्याचा समावेश होतो.

क्र.	समित्या	अध्यक्ष
1.	मसुदा समिती	डॉ.बाबासाहेब आंबेडकर
2.	संघराज्य अधिकार समिती	जवाहरलाल नेहरू
3.	संघराज्य घटना समिती	जवाहरलाल नेहरू
4.	प्रांतिक घटना समिती	वल्लभभाई पटेल
5.	मूलभूत हक्क व अल्पसंख्याकविषयक सल्लागार समिती	वल्लभभाई पटेल
	अ. मूलभूतहक्क उप-समिती	जे.बी.कृपलानी
	ब.अल्पसंख्याक उप-समिती	एच.सी.मुखर्जी
6.	कार्यपद्धती नियम समिती	डॉ.राजेंद्र प्रसाद
7.	राज्यांशी चर्चेसाठी समिती	जवाहरलाल नेहरू
8.	सुकाणू समिती	डॉ.के.एम.मुन्शी

Objective Forum
अभिजीत राठोड

मसुदा समिती (Drafting Committee)-

- ही सर्वात महत्त्वाची समिती मानन्यात येते. 29 ऑगस्ट 1947 रोजी डॉ.आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली असून या समितीमध्ये एकूण सात सदस्य होते.

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर- अध्यक्ष
2. एन.गोपालस्वामी- सदस्य
3. अल्लादी कृष्णस्वामी अय्यर- सदस्य
4. सईद अहमद सादुल्लाह- सदस्य
5. डॉ.के.एम.मुन्शी- सदस्य
6. टी.टी.कृष्णमाचारी - सदस्य (1948 मध्ये डि.पी.खेतान यांच्या मृत्यूनंतर कृष्णमाचारी यांची नियुक्ती)
7. एन.माधव राव- सदस्य (बी.एल.मिश्र यांनी आरोग्याच्या कारणामुळे राजीनामा दिल्याने एन. माधव राव यांची नियुक्ती)

उपसमित्या–

उपसमित्या	अध्यक्ष	उपसमित्या	अध्यक्ष
1. घटनेचा मसुदा परिक्षण समिती	पंडीत जवाहरलाल नेहरू	2. गृह समिती	बी. पट्टाभी सीतारामय्या
3. भाषावार प्रांतासंबंधी समिती	एस.के.दार	4. राष्ट्रध्वजासंबंधी हंगामी समिती	डॉ.राजेंद्र प्रसाद
5. वित्त व कर्मचारी समिती	डॉ.राजेंद्र प्रसाद	6. नागरिकत्व समिती	एस.वरदाचारी
7. आर्थिक तरतुदीविषयक समिती	नलिनी रंजन सरकार	8. अधिकारपत्रे समिती	अ. अय्यर
9. कार्याविषयी समिती	ग.वा.मावळंकर	10. वृत्तपत्र कक्ष समिती	उषा नाथ सेन
11. प्रांतांच्या मुख्य आयुक्तांची समिती	बी.पट्टभी सीतारामय्या	12. कामकाज क्रम समिती	डॉ.के.एम.मुन्शी
13. सर्वोच्च न्यायालयाबाबत समिती	एस.वरदाचारी		

- घटनासभेत अल्पसंख्यांकांच्या हितरक्षणाचा मुद्दा सर्वप्रथम डॉ.आंबेडकर, झेड.एच.लारी, हसरत मोहानी यांनी उपस्थित केला. मात्र मद्रासमधून निवडणुन आलेले बी. पोकर साहिब हा मुद्दा सर्वाधिक आक्रमपणे लावून धरणारे होते.

घटनेची स्विकृती व अंमलबजावणी (Enactment of the Constitution & Enforcement)–

- राज्यघटना मंजूर केली गेली तेव्हा महावीर त्यागी सारख्या ज्येष्ठ सदस्यांने ही राज्यघटना मुळात लोकांनी तयारच केलेली नाही अशी भूमिका घेवून प्रस्तावनेतील 'आम्ही भारतीय लोक' हे शब्द टाकण्यास विरोध केला आणि सभेने मंजूर केलेली घटना भारतीय जनतेकडून सार्वमताद्वारे मंजुर करावी असे सुचवले.
- डॉ.आंबेडकरांनी 4 नोव्हेंबर 1948 रोजी घटनेचा अंतिम मसुदा संविधान सभेत मांडला. 26 नोव्हेंबर 1949 रोजी घटना स्विकृत करण्यात आली. त्यावेळी उपस्थित असलेल्या 284 सदस्यांनी घटनेवर सह्या केल्या. त्यामुळे या तारखेचा उल्लेख संविधानाच्या प्रास्ताविकेमध्ये करण्यात आला आहे. 24 जानेवारी 1950 रोजी संविधान सभेची पुन्हा एकदा बैठक भरवण्यात आली असून त्यावर इतर सदस्यांनी स्वाक्षऱ्या केल्या.
- घटनेचा अंमल 26 जानेवारी 1950 पासून सुरु झाला. 26 जानेवारी 1950 हा दिवस संविधानाचा प्रारंभाचा दिन म्हणून ओळखण्यात येतो व प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो.
- कलम 394 नुसार, घटनेतील काही तरतुदी 26 नोव्हेंबर 1949 रोजीच सुरु झाला. त्यात कलम 5, 6, 7, 8, 9, 60, 324, 366, 367, 379, 380, 388, 391, 392 आणि 393 या कलमांचा समावेश.
- 26 नोव्हेंबर 1949 रोजी स्विकृत करण्यात आलेल्या मूळ घटनेत एकूण 22 भाग, 395 कलमे व 8 अनुसूचींचा समावेश होता.

महत्त्वपूर्ण बाबी–

- घटनेत इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणाचाही तरतुद असावी अशी मागणी पंजाबराव देशमुख यांनी केली. तशीच मागणी चंद्रीकाराम यांनीही केली. कृष्णचंद्र शर्मा व लक्ष्मीकांत मिश्रा यांनी त्यास ठाम विरोध केला.
- घटनेचे 31 वे कलम घटना बनवली जात असताना सर्वाधिक वादग्रस्त ठरले. घटना अंमलबजावणीत पुढील कलमे सर्वाधिक वादग्रस्त ठरली. 44, 370, 356 व 31. डी.डी.बसून यांनी 31 व्या कलमाचे वर्णन 'घटनेच्या सुरुवातीच्या 25 वर्षातील सर्वात वादग्रस्त कलम असे केले जे पुर्णपणे योग्य ठरते असा वाद थेट घटनासभेतच होता.' हे कलम सध्यास्थितीत घटनेत नाही त्यात संपत्तीविषयक हक्क निहीत होता. या कलमातील तरतुदीचे घटनासभेतील सी. गोपालाचारी हे प्रमुख समर्थक ठरले. त्यांच्याशिवाय सर्व जमिनदार व त्यांचे प्रतिनिधी या कलमाचे समर्थन करत.
- घटनासभेत सोमनाथ लाहिरी (समाजवादी विचारांचे) यांनी घटनेत मूलभूत हक्कांवरील मर्यादा व त्यांना केले अपवाद यांना टिका करीत, 'हे मूलभूत हक्क म्हणजे एखाद्या पोलीसाच्या नजरेतील मूलभूत हक्क आहेत' असे म्हटले होते.
- एक सदस्य पी.आर. ठाकूर यांनी घटनेत आर्थिक मूलभूत हक्कही स्पष्टपणे सांगावेत व त्यांना न्याययोग्य असावेत असा प्रस्ताव मांडला. त्यांनी सभेत भारतातील मूलभूत उद्योगाचे घटनेद्वारेच राष्ट्रीयीकरण करावे असे सूचवले हे दोन्ही प्रस्ताव नाकारले गेले.

घटना दुरुस्ती संबंधी काही महत्त्वपूर्ण न्यायलयीन निवाडे

संसद मुलभूत हक्कामध्ये कलम 368 नुसार दुरुस्ती करू शकते का या प्रश्नाबाबत नेहमीच संदिग्धता असल्यामुळे त्याबाबत काही महत्त्वपूर्ण निकाल पुढे दिलेले आहेत.

शंकर प्रसाद खटला

1951 साली झालेल्या पहिल्या घटना दुरुस्तीद्वारे संपत्तीच्या हक्कात घट घडवून आणली होती.
शंकरी प्रसाद खटल्यात या घटना दुरुस्तीच्या घटनात्मक वैधतेस आव्हान देण्यात आले होते. या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिली की 368न्वये संसदेच्या घटना दुरुस्तीच्या अधिकारात मुलभूत हक्काच्या दुरुस्तीचाही समावेश होतो.
संसद घटना दुरुस्ती कायद्याद्वारे कोणत्याही मुलभूत हक्कात घट करू शकते किंवा ते काढून घेऊ शकते.

1967 साली गोलकनाथ खटला

या खटल्यात 7 व्या घटना दुरुस्ती कायद्याच्या वैधतेस आव्हान दिले.

- सर्वोच्च न्यायालयाने शंकरीप्रसाद खटल्याचा आपला निर्णय बदलला आणि असा निर्णय दिली की,
- संसद मुलभूत हक्कामध्ये घट करून शकत नाही किंवा ते काढून घेऊ शकणार नाही.
- कारण मूलभुत हक्क हे अलौकीक व अपरिवर्तनीय आहेत.

परिवर्तन Competitive Forum - अभिजीत राठोड

1973 साली केशवानंद भारती खटला

गोलकनाथ खुटला निर्णय आल्यानंतर संसदेने 1971 साली 24 वी घटना दुरुस्ती केली आणि असे घोषित केले की,
संसदेला कलम 368 अंतर्गत कोणत्याही मुलभूत हक्कात घट करण्याचा किंवा काढून घेण्याचा अधिकार आहे.
1973 साली सर्वोच्च न्यायालयाने 24 वी घटना दुरुस्ती मान्य केली. परंतु

- मुलभूत संरचना आणि
- मुलभूत वैशिष्ट्ये
- या तत्वाची मांडणी केली.
- आणि असा निर्णय दिला कलम 368 अंतर्गत संसद घटनेच्या मूलभूत संरचना बदलू शकत नाही आणि संसदेला मुलभूत हक्कात घट घडवून आणण्याचा किंवा तो काढून टाकणारा घटना दुरुस्ती कायदा करता येणार नाही.
- कारण मुलभूत हक्क हे घटनेच्या मुलभूत संरचनेचा भाग आहेत.

1980 साली मिनर्व्हा मील खटला

सर्वोच्च न्यायालयाने केश्वानंद भारती खटल्यात मुलभूत संरचना या तत्त्वाचा समावेश केला होता.
संसदेने पुढे जाऊन '42 वी घटना दुरुस्ती 1976 साली' केली आणि
- कलम 368 अंतर्गत 368(4) हे नवीन कलम जोडण्यात आले.
- या कलमात असे घोषित केले की संसदेचया संविधानिक अधिकारावर मर्यादा नाही.
- आणि संसदेने केलेली कोणतीही घटना दुरुस्ती कोणत्याही न्यायालयात आवाहन देता येणार नाही.

मिनर्व्ह मील (1980) खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने 386(4) कलम अवैध ठरविली आणि असे स्पष्ट केले की, त्यामुळे न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार नाहीसा होतो.
आणि न्यायालयीन पुनर्विलोकन मुलभूत संरचनेचा भाग आहे.

1981 साली वामन राव खटला

सर्वोच्च न्यायालयाने 'मुलभूत संरचना'तत्त्वाला अधिक महत्त्व दिले आणि वामन राव खटल्यात असे नमुद केले की,
'मुलभूत संरचना तत्त्व' 24 एप्रिल 1973 नंतर सर्व घटना दुरुस्त्यांना लागू होईल.
24 एप्रिल 1973 ही तारीख केशवानंद भारती खटला-निकालाची तारीख होती.

मुलभूत संरचना

संसद घटनादुरुस्ती करू शकते. परंतु घटनेच्या 'मुलभूत संरचना'यात बदल करू शकते असा याचा अर्थ नाही.
- संसद मुलभूत हक्कामध्ये बदल करू शकते.
- संसद कोणत्याही तरतुदीमध्ये बदल करू शकते.
- परंतु हे सर्व करताना मुलभूत संरचना तत्त्वाला हरताष्ठ फासला जाऊ नये किंबहुना त्यात बदल करू नये.

मुलभूत संरचनेत कोणत्याही बाबीचा समावेश होतो.

सर्वोच्च न्यायालयाने केश्वानंद भारती खटल्याद्वारे 'मुलभूत संरचना' 'Basic Structure' या तत्त्वाचा समावेश केला तरी ही मुलभूत संरचना किंवा मुलभूत वैशिष्ट्ये कोणती असे केले नाही. परंतु विविध खटल्यांचा संदर्भ निकालावरून मूलभूत संरचनेत पुढील बाबींचा समावेश होतो असे स्पष्ट झाले आहे.

- घटना सर्वोच्चता Supremacy
- संसदीय शासन व्यवस्था
- धर्मनिरपेक्षता
- घटनेच्या प्रास्ताविकेत दिलेली उद्दिष्टे
- व्यक्तीचे स्वातंत्र्य आत्मसन्मान राष्ट्राची एकता एकात्मता
- कायद्याचे राज्य
- अधिकाराच्या विभागणीचे तत्त्व
- न्यायीक पुनर्विलोकन
- कलम32
- कलम 226, 227
- संघराज्य
- समानतेचे तत्त्व (सामाजिक न्यायाचे सारतत्त्व)
- भाग 3 मधील मूलभूत हक्कांचा सार
- संपूर्ण भाग 4
- सामाजिक आर्थिक न्याय, कल्याणकारी राज्य निर्मिती
- मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे यांमधील संतुलन
- मुक्त व न्याय निवडणूकाचे तत्त्व
- न्यायव्यवस्था स्वातंत्र्य (घटनेच्या चौकटीत) राहून
- कलम 368 ने प्रदान केलेल्या घटना दुरुस्ती अधिकारावरील मर्यादा

परिवर्तन Competitive Forum - अभिजीत राठोड

घटनादुरुस्ती

- भारतीय राज्यघटनेच्या भाग XX मधील कलम 368 मध्ये संसदेचा घटनादुरुस्तीचा अधिकार आणि घटनादुरुस्तीच्या पद्धती नमुद.

कलम 368(1)–

- संसद घटनेतील कोणतीही तरतुद बदलू शकते, भर घालू शकते किंवा काढून टाकू शकते.
- घटनादुरुस्तीची पद्धत पूर्णपणे लवचीक नाही आणि पुर्णतः ताठर नाही.
- अमेरिका– ताठर
- ब्रिटन–लवचिक
- संसद घटनादुरुस्तीने घटनेच्या मूलभूत संरचनेत बदल करू शकत नाही. –सर्वोच्च न्यायालय– केशवानंद भारती खटला.

घटनादुरुस्तीची पद्धत–

- कलम 368 (2) नुसार –घटनादुरुस्ती विधेयक संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडता येते.
- मंत्री किंवा खाजगी सदस्य मांडू शकतो.
- राष्ट्रपतीच्या पुर्वसंमतीची गरज नाही.
- घटनादुरुस्ती विधेयक दोन्ही सभागृहात स्वतंत्रपणे आणि विशेष बहुमताने पारीत होणे आवश्यक.
- मतभेद निर्माण झाल्यास संयुक्त बैठक होत नाही.
- कलम 108 नुसार संयुक्त बैठक फक्त साधारण विधेयकासाठी.

घटनादुरुस्तीचे प्रकार–

- घटनेत तीन प्रकारे दुरुस्ती करता येते.

1. संसदेच्या साध्या बहुमताने– कलम 368च्या बाहेरील दुरुस्ती
2. संसदेच्या विशेष बहुमताने – कलम 368 (2) नुसार
3. संसदेचे विशेष बहुमत+निम्म्या राज्यांचे साधे समर्थन– कलम 368 (2) नुसार

1. साध्या बहुमताने–

- संसदेच्या साध्या बहुमताने घटनादुरुस्ती विधेयक मंजुर–कलम 368 च्या बाहेरील दुरुस्ती.

उदा. 1. नवीन राज्य निर्मिती क्षेत्रफळ, सीमा.
2. विधान परिषद निर्मिती / नष्ट करणे.
3. संसद गणसंख्या
4. सर्वोच्च न्यायालयात न्यायाधिशांची संख्या
5. नागरिकत्व
6. पाचवी व सहावी अनुसूची इ.

2. संसदेच्या विशेष बहुमताने–

बहुतांश घटनादुरुस्ती कलम 368 नुसार विशेष बहुमताने उदा. मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्वे.

3. संसदेचे विशेष बहुमत+निम्म्या राज्यांच्या साध्या बहुमताने घटनादुरुस्ती–

- कलम 368 नुसार घटनेच्या संघराज्यीय तरतुदींमध्ये दुरुस्ती करण्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहाचे विशेष बहुमत+निम्म्या राज्यांचे साधे बहुमत

परिवर्तन Competitive Forum – अभिजीत राठोड

- राज्यांवर कालावधीचे बंधन नाही.

उदा. 1. संघराज्य/घटकराज्यांच्या कार्यकारी अधिकारांची व्याप्ती. 2. सर्वोच्च/उच्च न्यायालये

3. सातव्या अनुसुचीतील सुची 4. संसदेत रज्यांचे प्रतिनिधीत्व

मूलभूत हक्कांमध्ये दुरुस्ती–

- 'संसदेला मूलभूत हक्कांत दुरुस्ती करण्याचाही अधिकार–असा कायदा कलम 13 अंतर्गत अवैध नाही'–सर्वोच्च न्यायालय शंकरीप्रसाद खटला 1951
- 'संसद मूलभूत हक्क काढून घेऊ शकत नाही/गदा आणणारा कायदा करू शकत नाही–असा कायदा कलम 13 नुसा अवैध ठरेल'– सर्वोच्च न्यायालय–गोलखनाथ खटला–1967
- **24 वी घटनादुरुस्ती–** संसदेला घटनेच्या कलम 368 अंतर्गत कोणत्याही मूलभूत हक्कात घट करण्याचा किंवा तो काढून टाकण्याचा अधिकार.
- कलम 13 अंतर्गत हा घटनादुरुस्ती कायदा अवैध नसणार.
- 'कलम 368 अंतर्गत संसदेला घटनेच्या मूलभूत संरचनेत बदल करण्याचा अधिकार नाही. मूलभूत हक्क हे घटनेच्या मूलभूत संरचनेचा भाग'– सर्वोच्च न्यायालय– केशवानंद भारती खटला–1973

42 वी घटनादुरुस्ती–1976

- कलम 368 (4) घटनेत समाविष्ट–संसदेच्या घटना दुरुस्तीच्या अधिकारावर कोणतीही मर्यादा नाही. कोणत्याही न्यायालयात भाग तीनच्या तरतुदींसह कोणत्याही घटनादुरुस्तीला आव्हान दिले जाणार नाही/प्रश्नास्पद करता येणार नाही.

मिनर्व्हा मील खटला–1980

- कलम 368 (4) तरतुद अवैध मूलभूत संरचनेचा भाग असलेल्या न्यायीक पुनर्विलोकनाचा अधिकार त्यामुळे नष्ट होत होता.
- 'मूलभूत संरचनेचे तत्व 24 एप्रिल 1973 (केशवानंद भारती खटला निकाल तारीख)नंतर सर्व घटनादुरुस्त्यांना लागू राहील'–सर्वोच्च न्यायालय–वामनराव खटला 1981

संसद आणि न्यायालय यांच्यातील घटनादुरुस्तीच्या विवादाची सध्यस्थिती–

- संसद कलम 368 अंतर्गत घटनेतील मूलभूत हक्कांसह घटनेतील कोणत्याही तरतुदीमध्ये दुरुस्ती करू शकते, परंतु असे करत असताना संसद घटनेच्या 'मूलभूत संरचनेत' बदल करू शकत नाही.

परिवर्तन Competitive Forum – अभिजीत राठोड

अलिकडील महत्वाच्या घटनादुरुस्त्या–

- **96 वी घटनादुरुस्ती– 2011–**
  - –भाषेशी संबंधीत आठव्या अनुसूचीत बदल–ओरिया शबदाऐवजी–ओडिया शब्द
- **97 वी घटनादुरुस्ती–2011–**
  - सहकारी संस्थांच्या स्थापनेस घटनात्मक दर्जा.
  - भाग IX B नवीन समावेश–सहकारी सोसायट्या–शिर्षक
  - 243ZH ते 243ZT कलमे भाग IX B मध्ये समाविष्ट
- **99 वी घटनादुरुस्ती–2014**
  - राष्ट्रीय न्यायिक नेमणुक आयोग स्थापन्यासंबंधी
  - –16 ऑक्टोबर 2015– सर्वोच्च न्यायालयाने ही घटनादुरुस्ती बाद ठरवली.
- **100 वी घटनादुरुस्ती– 2015–**
  - भारत–बांग्लादेश भूसीमा करार करण्यासाठी 7 मे 2015

घटनात्मक आयोग

१.निवडणूक आयोग-

- कलम 324 (1) नुसार राज्यविधिमंडळ सदस्य (विधानसभा, विधान परिषद), राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, संसद सदस्य यांच्या पदांच्या निवडणुक केंद्रीय निवडणुका आयोग घेतो.
- निवडणुक आयोग घटनात्मक, स्थायी आणि स्वायत्त आहे.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्य निवडणुक आयोग घेतो.
- राज्य निवडणुक आयोगाची स्थापना 73 व 74 व्या घटनादुरुसतीने करण्यात आली आहे.

केंद्रीय निवडणुक आयोगाची रचना (कलम 324 (2))

- एक मुख्य निवडणुक आयुक्त
- राष्ट्रपतीला आवश्यक वाटल्यास इतर निवडणुक आयुक्तांची संख्या ठरवतील.
- 1988च्या 61 व्या घटनादुरुस्तीने मतदाराचे वय 21 वर्षावरून 18 वर्षे करण्यात आल्याने निवडणुक आयोगावर कामाचा व्याप वाढला. हा व्याप कमी करण्यासाठी 16 ऑक्टोबर 1989 रोजी राष्ट्रपतींनी इतर दोन निवडणुक आयुक्तांची नेमणूक केली.
- अन्य अनवडणुक आयुक्तांची नियुक्ती करण्याचा राष्ट्रपतींना विशेष अधिकार- कलम 324 (2)
- सध्या एक मुख्य निवडणुक आयुक्त व इतर दोन निवडणुक आयुक्त आहेत.
- **वेतन भत्ते-** सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाप्रमाणेच मुख्य निवडणुक आयुक्त आणि अन्य दोन निवडणुक आयुक्तांना वेतन भत्ते आणि सोयीसुविधा मिळतात.
- मुख्य निवडणुक आयुक्त आणि अन्य निवडणुक आयुक्त यांच्यात एखाद्या कामाबाबत/निर्णयाबाबत मतभेद निर्माण झाल्यास अशा वेळी अतर निवडणुक आयोग यांना सारखेच अधिकार आहेत.

परिवर्तन Competitive Forum - अभिजीत राठोड

कार्यकाळ-

- निवडणुक आयुक्त वयाच्या 65 व्या वर्षापर्यंत किंवा नियुक्तीनंतर 6 वर्षापर्यंत जो काळ आधी संपेल तोपर्यंत पदावर राहतात.
- आयुक्त आपल्या पदाचा राजीनामा राष्ट्रपतींकडे स्वइच्छेने सुपूर्त करून पदमुक्त होऊ शकतात.
- इतर निवडणुक आयुक्तांना व प्रादेशिक निवडणुक आयुक्त राष्ट्रपती मुख्य निवडणुक आयुक्तांच्या शिफारशीनेच पदावरून काढू शकतात.
- सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांना ज्या कारणासाठी व ज्या पद्धतीने पदावरून काढता येते त्याच कारणाने व त्याच पद्धतीने राष्ट्रपती मुख्य निवडणुक आयुक्तांना पदावरून काढू शकतात या पद्धती व्यतिरिक्त इतर पद्धतीने त्यांना काढता येत नाही.

आयोगाची कार्य व अधिकार-

- आयोग अर्ध न्यायीक तसेच सल्लागार स्वरुपाची कामे पार पाडतो.
- मतदार संघाचे परिसिमन करणे.
- मतदार याद्या तयार करणे.
- राजकीय पक्षांना मान्यता देणे.
- निवडणुक चिन्हांचे वाटप करणे.
- निवडणुका आयोजीत करून निपक्षपाती व भयमुक्त वातावरणात निवडणुका पार पाडण्याची जबाबदारी.
- निवडणुकांचे वेळापत्रत ठरवते.
- उमेदवारांच्या अर्जाची छाननी करते.

- एखाद्या राज्यात राष्ट्रपती राजवट लागू असेल तर तिथे निवडणुका घेण्याची अनुकूल स्थिती आहे की नाही या व त्यासंबंधी इतर बाबींवर राष्ट्रपतींना सल्ला देते.
- निवडणुक चिन्ह किंवा राजकीय पक्षांच्या मान्यतेसंबंधी वाद निर्माण झाल्यास न्यायालयासारखे कार्य पार पाडतो.
- निवडणुकीवेळेस आचार संहीता ठरवते.
- अनुचीत प्रकार एखाद्या मतदान केंद्रावर घडल्यास तेथील मतदान रद्द करते.
- संसद सदस्यांच्या अपात्रतेसंबंधी राष्ट्रपतीला तर राज्य विधी मंडळाच्या सदस्याच्या अपात्रतेसंबंधी राज्यपालांना सल्ला देते.
- निवडणुकांचे नियंत्रण, संचलन आणि पर्यवेक्षण करते.

मुख्य निवडणुक आयुक्तांचे अधिकार /स्वातंत्र्य-

- कलम 324 (1) नुसार-
- मुख्य निवडणुक आयुक्तांच्या सेवा शर्तींमध्ये त्यांना अपायकारक होईल असा बदल त्यांच्या नियुक्तीनंतर करता येत नाही.
- त्यांच्या पदाच्या कार्यकाळाची सुरक्षीतता आहे म्हणजेच त्यांना सहजासहजी पदावरून दूर करता येत नाही. त्यासाठी महाभियोग प्रक्रियेचा अवलंब करावा लागतो.
- मुख्य निवडणुक आयुक्तांना तसेच प्रादेशिक आयुक्तांना पदावरून दूर करू शकत नाहीत.
- आयोगाचे मुख्यालय- नवी दिल्ली येथे.
- निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर आयोग पुनर्विलोकन करत नाही.
- संसद सदस्य किंवा राज्यविधीमंडळाच्या सदस्यनिवडी संबंध वाद निर्माण झाल्यास उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात याचीका दाखल करता येते.
- राष्ट्रपती, उपराष्ट्रपतीच्या निवडणुकीबाबत वाद निर्माण झाल्यास याचीका फक्त सर्वोच्च न्यायालयातच.

२. केंद्रीय लोकसेवा आयोग-

- घटनेच्या कलम 315 नुसार संघ आणि राज्यांसाठी लोकसेवा आयोगांची स्थापना.
- गुणवत्ताधारक, निर्भीड, सक्षम उमेदवाराची प्रशासक पदावर निवड करण्याचे कार्य आयोग पार पाडते.



रचना-

- केंद्रीय लोकसेवा आयोगात एक अध्यक्ष+इतर नऊ सदस्य.

कार्यकाळ-

- सदस्यांचा कार्यकाळ नियुक्तीपासून 6 वर्षे किंवा वयाची 65 वर्षे यात आधी पूर्ण होईल तो काळ.
- कलम 316 नुसार राष्ट्रपती आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करतो.
- यांच्या कार्यकाळात त्यांना हानीकारक ठरतील असे सेवाशर्तीत बदल करता येत नाहीत.
- कलम 317 नुसार पुढील कारणास्तव राष्ट्रपती आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांना पदावरून दूर करू शकते.
- राष्ट्रपतीच्या मते वा शारीरिक कारणाने ती व्यक्ती पदावर राहण्यास अयोग्य ठरत असेल.
- ती व्यक्ती कर्तव्याबाहेर जाऊन अनुचीत मार्गाने नियुक्ती करत असेल.
- ती व्यक्ती दिवाळखोर घोषीत झाली असेल.
- या व्यतिरिक्त राष्ट्रपती आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांना पदावरून गैरवर्तनाच्या कारणास्तव दूर करू शकतात. परंतु त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने त्या कारणाला पुष्टी देऊन तसा सल्ला राष्ट्रपतींना देणे आवश्यक आहे. हा सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक.
- आयोगाच्या अध्यक्ष वा सदस्यांची सर्वोच्च न्यायालयात चौकशी सुरु असेल तर त्या काळात राष्ट्रपती व सदस्यांना निलंबीत करू शकतात.

आयोगाचे अधिकार व कार्ये-

- गुणवत्ताधारक व सक्षम उमेदवाराची निवड करणे.
- सेवा व भतीच्या पद्धती निश्चित करणे.
- केंद्रीय नागरी सेवेतील बदल्या, बढत्यांबाबत तसेच नियुक्त्यांबाबत नियम तयार करणे.
- अधिकार पदाच्या शिस्तीविषयक बाबी निश्चित करणे.
- राष्ट्रपतींने सांगितलेल्या बाबी.
- काही वेळेस तात्पुरत्या नेमणुका करते.
- बदलीविषयक केंद्राला सल्ला
- उमेदवारांच्या परीक्षा घेणे, वेळापत्रक ठरवणे, मुलाखती घेणे, नागरी सेवापदी निवड करणे.

परिवर्तन | Competitive Forum | - अभिजीत राठोड

- नागरी सेवकावर शिस्तभंगाची कारवाई झाल्यास त्याबाबत राष्ट्रपतीला आपले मत कळवणे.
- कार्याचा वार्षिक अहवाल राष्ट्रपतींना सुपूर्त करणे.

३. राज्य लोकसेवा आयोग-

- केंद्रीय लोकसेवा आयोगाप्रमाणेच कलम 315 नुसार राज्य लोकसेवा आयोगाची तरतुद.

रचना-

- एक अध्यक्ष आणि इतर सदस्य (सदस्य संख्या निश्चित नाही)
- अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती राज्यपाल करतात.
- आयोगाची सदस्यसंख्या किती असावी हे राज्यपाल ठरवतात
- आयोगातील किमान अर्ध्या सदस्यांनी केंद्र किंवा राज्यसरकारच्या सेवेत कमीत कमी 10 वर्षे काम केलेले असावे.

कार्यकाळ-

- अध्यक्ष आणि सदस्य त्यांच्या नियुक्तीपासून 6 वर्षे किंवा वयाची 62 वर्षे यांपैकी जी अट आधी पूर्ण होईल तोपर्यंत कार्य करतील.
- अध्यक्षांच्या अनुपस्थितीत राज्यपाल एका सदस्याची आयोगाच्या अध्यक्षपदी निवड करतात.
- अध्यक्ष व सदस्य आपला राजीनामा राज्यपालांना सादर करतात.
- नियुक्ती राज्यपाल करतात तर अध्यक्ष व सदस्यांना पदावरून दूर करण्याचा अधिकार फक्त राष्ट्रपतींना आहे.
- केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष वा सदस्यांना ज्या पद्धतीने व ज्या कारणास्तव बडतर्फ केले जाते त्याच पद्धतीने व तशाच कारणांसाठी राज्यलोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांना राष्ट्रपती पदावरून दूर करू शकतो.
- पदावरून दूर करण्याबाबतच्या चौकशीच्या काळात राष्ट्रपती अंतीम निर्णय घेईपर्यंत राज्यपाल राज्यलोकसेवा आयोगाच्या संबंधी व्यक्तीला बडतर्फ करू शकतात.
- राल्यलोकसेवा आयोगातील अध्यक्ष वा सदस्यांची नियुक्ती लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष वा सदस्य म्हणून तर इतर राज्यातील लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्त होऊ शकते परंतु केंद्र वा राज्य शासनाच्या आधीपत्याखालील कोणत्याही सेवेत त्याची नियुक्ती करता येत नाही.
- नियुक्तीनंतर अध्यक्ष व सदस्यांच्या सेवाशर्तीमध्ये त्यांना नुकसानकारक ठरतील असे बदल संसद करू शकत नाही.
- अध्यक्ष किंवा सदस्याची पुनर्नेमणुक करता येत नाही.
- अध्यक्ष, सदस्याचे वेतन, भत्ते, निवृत्तीवेतन हे संबंधीत राज्याच्या संचीत निधीतून देण्यात येत असल्याने विधीमंडळात त्यावर मतदान होत नाही.
- अनुसूचीत जाती/जमातींचे पदाबाबतचे दावे आणि मागासवर्गीयाबाबत आरक्षणाची तरतुद यासंबंधी राज्य शासन लोकसेवा आयोगाशी कोणताही विचारविनिमय करत नाही.

Competitive Forum

आयोगाची कार्ये-

- सनदी सेवेमध्ये उमेदवाराच्या निवडीसाठी कार्यपद्धती निश्चित करणे.
- परिक्षेचे आयोजन, नियंत्रण, संचलन करणे.
- मुलाखती घेणे, पात्र उमेदवारांची शिफारस करणे.
- नियुक्ती, बदली, बढतीबाबत सल्ला देणे.
- सनदीसेवेच्या संपूर्ण भरतीप्रक्रिया पार पाडणे.
- शिस्तपालनाच्या बाबी निश्चित करणे.
- कर्मचारी व्यवस्थापनाबाबत कोणतेही बाबी
- सेवानिवृत्तीसंबंधी बाबी

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

संयुक्त राज्य लोकसेवा आयोग-

- संसद कायदा करून दोन किंवा अधिक राज्यांसाठी त्यांच्या विनंतीवरून संयुक्त लोकसेवा आयोग स्थापन करू शकते.
- अध्यक्ष, सदस्यांची नियुक्ती-राष्ट्रपतींद्वारे
- सदस्य संख्या राष्ट्रपती निश्चित करतात.
- बडतर्फ राष्ट्रपती करू शकतो.
- ही एक वैधानिक संस्था असते.

- यांचा कार्यकाळ इतर राज्य लोकसेवा आयोगाप्रमाणेच
- वार्षिक अहवाल संबंधीत घटक राज्यांतील राज्यपालांना सोपवतात.
- राज्यपाल तो अहवाल संबंधीत राज्यविधीमंडळासमोर ठेवतात.

४. राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग-

- अनुसूचित आणि जमातींचे मागासलेपण दूर करण्यासाठी घटनेत ज्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत त्याचा अभ्यास करून त्यांच्या योग्य अंमलबजावणीबाबत शासनाला शिफारशी करण्याच्या उद्देशाने 1978 साली शासनाने एक बहुसदस्यीय अवैधानिक आयोग स्थापन केला.
- 1987 साली या आयोगाने नाव अनुसूचीत जाती-जमाती आयोग असे केले.
- वरील 'अनुसूचीत जाती-जमाती आयोगा'चे 2003 च्या 89 व्या घटनादुरुस्तीने विभाजन करण्यात येवून कलम 338 अंतर्गत राष्ट्रीय अनुसूचीत जाती आयोग आणि कलम 338 अ अंतर्गत राष्ट्रीय अनु.जमाती आयोग हे दोन स्वतंत्र आयोग स्थापन करण्यात आहे.

अनुसूचीत जाती आयोग-

रचना-

- एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष आणि अन्य 3 सदस्य.
- राष्ट्रपती आपल्या स्वाक्षरीसह लेखी आज्ञापत्राने त्यांची नियुक्ती करतात.
- यांच्या पदाचा कार्यकाळ व सेवाशर्ती राष्ट्रपती ठरवतात.

आयोगासंबंधी कलमे-

- कलम 338- अनु.जातींसाठी राष्ट्रीय आयोग.
- कलम 338 (1)- राष्ट्रीय अनुसूचीत जाती आयोग हे नाव असेल.
- कलम 338 (2)- रचना, कार्यकाळ, पदाच्या सेवाशर्ती
- कलम 338 (3)- आयोगाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांची राष्ट्रपतींद्वारे नियुक्ती
- कलम 338 (4)- स्वतःच्या कार्यपद्धतीचे नियमन करणाऱ्या आयोगाला अधिकार
- कलम 338 (5)- कर्तव्ये
- कलम 338 (6)- केंद्राला आयोगाने केलेल्या शिफारशी राष्ट्रपती संसदेसमोर ठेवतील.
- कलम 338 (7)- राज्याला केलेल्या शिफारशींचे प्रत राज्यपालाला पाठवली जाईल. राज्यपाल राज्यविधीमंडळासमोर ठेवतील.
- कलम 338 (8)- कर्तव्य पार पाडित असताना आयोगाला दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकारी प्राप्त.
- कलम 338 (9)- केंद्र वा राज्यशासनाने एखादे धोरण अनु.जातीवर परिणाम करणारे असेल तर संबंधीत मुद्द्यावर विचार करण्यापूर्वी अनु.जाती आयोगाचे मत विचारात घ्यावे.
- कलम 338 (10)- अन्य बाबी.

परिवर्तन Competitive Forum -अभिजीत राठोड

आयोगाचे अधिकार व कार्ये-

- अनु.जातींच्या प्रकरणांची चौकशी करताना नागरी न्यायालयाचे अधिकार.
- कोणत्याही अस्थापनेतील कागदपत्रे आयोग मागवू शकतो.
- चौकशीसाठी भारतातील कोणत्याही व्यक्तीला बोलवू शकतो.
- आयोग कोणत्याही कार्यालयातील नोंदी किंवा कागदपत्रे मागवू शकतो.
- अनु.जातीच्या हक्काचा भंग प्रकरणातील चौकशी करण्याचा अधिकार.
- अनु.जातींवर परिणाम करणारे धोरण केंद्र किंवा राज्य शासनाने ठरवत असेल तर अशा वेळी आयोगाशी सल्लामसलत करणे आवश्यक.
- आयोग अनु.जातीच्या आर्थिक-सामाजिक विकासाचे मूल्यमापन करून त्या संदर्भात अहवाल तयार करतेवेळी शिफारशी करते.
- वर्षभरातील कामकाजाबाबत वार्षिक अहवाल राष्ट्रपतींना सुपूर्द करते.
- घटनेत असलेल्या अनु.जातींच्या संरक्षण व विकासाशी संबंधीत तरतुदींचे नियमन करते तसेच गरज पडल्यास त्या विकसीत करते.
- अनु.जातींबाबत विकासासाठी केंद्र व राज्य सरकारांनीकेलेल्या अमलबजावणीचे मूल्यमापन करते.
- अनु.जातींच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी करण्यात येणाऱ्या नियोजन प्रक्रियेत आयोग सहभागी होऊन योग्य सल्ला देते.

राष्ट्रीय अनुसूर्चीत जमाती आयोग-

- घटनात्मक तरतुदींचा भारताच्या आर्थिक नियोजीत विकासाचा अनुसूचीत जमातींना लाभ होतो आहे का? तो कसा होत आहे? याबाबत

वेळोवेळी अभ्यास करून त्याचा अहवाल राष्ट्रपतींना सादर करण्यासाठी अनु.जमाती आयोगाची तरतूद करण्यात आली.

- 89 व्या घटनादुरुस्तीने 2003 साली अनु.जमतीसाठी स्वतंत्र आयोग स्थापन करण्यात आला.
- यासाठी घटनेत '338-अ' हे कलम नव्याने निर्माण करण्यात आले.

रचना-

- एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष व इतर 3 सदस्य
- वरील सर्वांची नियुक्ती राष्ट्रपतींमार्फत होते.

अधिकार व कार्ये-

- अनु.जमातींच्या विकासासाठी शासनाद्वारे राबवण्यात येणाऱ्या विकासाच्या नियोजन प्रक्रियेत सहभागी होणे, शासनाला सल्ला देणे.
- अनु.जमातींसाठी केंद्र व राज्यांद्वारे करण्यात येणाऱ्या कामाचे मुल्यमापन करणे.
- अनु.जमातींसाठी त्यांच्या संरक्षणासाठी असलेल्या तरतुदींचे नियमन व विकसन करणे.
- अनु.जमातींच्या सामाजिक-आर्थिक विकासाचे मोजमाप करणे तसेच त्या संदर्भात शासनला आपल्या अहवालात शिफारशी करणे.
- अनु.जमातींच्या हक्कभंगाप्रकरणी चौकशी करणे.
- वार्षिक कामकाजाच्या अहवाल राष्ट्रपतींना सादर करावे.
- अनु.जमातींच्या हक्कभंगाप्रकरणाची चौकशी करताना आयोगाला नागरी न्यायालयाचे अधिकार असतात.
- या चौकशीसाठी आयोग भारतातील कोणत्याही व्यक्तीला बोलावू शकतो तसेच समन्स बजावू शकतो.
- चौकशीसाठी आवश्यक कागदपत्रे, तसेच तपासणीसाठी कोणत्याही कार्यालयातील नोंदी, कागदपत्रे आयोग मागवू शकते.

महत्त्वाचे कलमे-

- कलम 338 (1) - 'राष्ट्रीय अनुसूचीत जमाती आयोग' हे नाव
- कलम 338 (2) - आयोगाची रचना, पदाच्या सेवाशर्ती, कार्यकाळ राष्ट्रपती निर्धारीत करतात.
- कलम 338 (3) - राष्ट्रपतींद्वारे अध्यक्ष, सदस्यांची नियुक्ती
- कलम 338 (4) - स्वतःच्या कार्यपद्धतीचे नियमन करण्याचा अधिकार आयोगास
- कलम 338 (5) - कर्तव्ये (आयोगाची)
- कलम 338 (6) - केंद्रशासनाला केलेल्या शिफारशींचे अहवाल राष्ट्रपती संसदेच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवतात.
- कलम 338 (7) - राज्य शासनाचे अहवाल संबंधीत मुद्द्यांबाबत राज्यपालाकडे सुपूर्द केल जातात व राज्यपाल त्या राज्यविधीमंडळासमोर ठेवतात.
- कलम 338 (8) - आयोगाला दिवाणी न्यायालयाप्रमाणे अधिकार.
- कलम 338 (9) - केंद्रशासन तसेच राज्यशासन अनुसूचीत जमातींसंबंधी धोरणे आखीत असताना आयोगाचा विचार घेणे आवश्यक.

परिवर्तन Competitive Forum - अभिजीत राठोड

राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग-

- 1993 साली राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची स्थापना.
- 1992 च्या इंदिरा सोहनी विरुद्ध केंद्र शासन या खटल्यतील निवाड्यात सर्वोच्च न्यायालयाने इतर मागासवर्गीयांच्या विनंत्या/तक्रारी हाताळण्यासाठी एखादा आयोग स्थापन करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार या आयोगाचो केंद्र सरकारकडून स्थापना.
- कलम 340- देशातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांची परिस्थिती आणि अडचणींचा अभ्यास करून शिफारशी करण्यासाठी एखादा आयोग स्थापन करण्यात यावा.

रचना-

- सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयातील कार्यरत/सेवानिवृत्त न्यायाधिशाची अध्यक्षपदी नियुक्ती.
- अध्यक्षांव्यतिरिक्त आणखी 4 सदस्य (एकूण 5 सदस्य)
- सदस्यांमध्ये -(1) भारत सरकारच्या सचिव पदावर कार्यरत/सेवानिवृत्त व्यक्ती आयोगाचा सदस्य-सचिव, (2) मागासवर्गीयांबाबत असणाऱ्या विषयांचे विशेष ज्ञान असलेले दोन सदस्य, (3) एक समाज शास्त्रज्ञ

कार्यकाळ-

- अध्यक्षांसह, सदस्यांचा कार्यकाळ 3 वर्षे
- राजीनामा- केंद्रसरकारकडे

अधिकार व कार्ये–

- मागासवर्गाच्या तक्रारी ऐकणे आणि त्यासंबंधी योग्य कारवाईसाठी केंद्रसरकारला सल्ला देणे.
- आयोगाचा सल्ला साधारणतः केंद्र सरकारवर बंधनकारक
- एखाद्या वर्गाने मागासवर्गामध्ये समाविष्ट करण्याबाबत केलेल्या विनंतीची तपासणी करून शासनाला योग्य सल्ला देणे.
- ज्यावेळी केंद्र सरकार नवीन वर्गाचा मागासवर्गात समावेश करेल किंवा एकाकाही मागासवर्गात समाविष्ट असलेल्या वर्गाला वगळण्याचा निर्णय घेईल त्यावेळी राष्ट्रीय मागसवर्ग आयोगाशी सल्ला मसलत करावी लागेल.
- आयोग आपला अहवाल राष्ट्रपतींना सादर करते.
- राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग हा निम–न्यायीक संसस्था आहे.

बिगर घटनात्मक आयोग

१. केंद्रीय दक्षता आयोग

- स्थापना – फेब्रुवारी 1965
- केंद्रीय दक्षता आयोग स्थापन करण्याची शिफारस संथानम समिती (1962–64)ने केली. ही समिती भ्रष्टाचार रोखण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी स्थापन करण्यात आली होती.
- देशातील सर्व दक्षता संस्थांची ही सर्वोच्च संस्था आहे.
- 25 ऑगस्ट 1998 पासून आयोगाच्या कार्यास सुरुवात झाली.
- 2003 साली केंद्रीय दक्षता अयोग विधेयक संसदेने संमत केले ज्याला 11 सप्टेंबर 2003 ला राष्ट्रपतींची संमती मिळून आयोगाला वैधानिक दर्जा प्राप्त झाला.



रचना–

- अध्यक्ष– केंद्रिय दक्षता आयुक्त
- सदस्य– इतर दोन दक्षता आयुक्त
- अध्यक्ष आणि सदस्यांची नियुक्ती राष्ट्रपतींद्वारे
- राष्ट्रपती एका समितीद्वारे शिफारस केलेल्या व्यक्तींचीच निवड करेल.
- राष्ट्रपतींना अध्यक्ष व सदस्याची शिफारस एक तीन सदस्यीय समिती करेल जीच्यात पंतप्रधान, लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि केंद्रीय गृहमंत्री असतील. पंतप्रधान यांची निवड समितीचे अध्यक्ष असतील.

परिवर्तन Competitive Forum अभिजीत राठोड

कार्यकाळ–

- नेमणुकीपासून 4 वर्षे किंवा वयाची 65 वर्ष यापैकी जे आधी संपेल तोपर्यंत.
- कार्यकाळ संपल्यानंतर आयोगाचे अध्यक्ष व सदस्य राज्य किंवा केंद्रशासनाच्या कोणत्याही पदावर कार्य करू शकत नाहीत.

पदावरून दूर करण्याची प्रक्रिया व कारणे–

- भारताचे राष्ट्रपती आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांना पुढील कारणाने पदावरून दूर करू शकतात.

1. ते दिवाळखोर घोषीत केले असतील.
2. नैतीक चारित्रहिनतेच्या आधारावर केंद्रसरकारला ते दोषी आढळल्यास.
3. आपल्या कार्यक्षेत्राच्या बाहेरील आणखी एखादे लाभाचे पद ते धारण करत असतील.
4. मानसिक वा शारिरीक कारणाने राष्ट्रपतींच्या मते ते कार्य करण्यास असमर्थ असतील तर
5. केंद्र अथवा राज्यसकारद्वारे लाभ प्राप्त एखाद्या कार्यात ते सामील असतील तर

- अशा वेळी राष्ट्रपती अध्यक्ष वा सदस्य यांना पदावरून दूर करतात.

वेतन, भत्ते व सेवा शर्ती–

- केंद्रीय दक्षता आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांना वेतन, भत्ते व अन्य सेवा ह्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांप्रमाणेच असतात.
- कार्यकाळाच्या दरम्यान यांच्या वेतन, भत्त्यात किंवा सेवा शर्तींमध्ये त्यांना अलाभकारी ठरेल असे बदल करता येत नाहीत.

अधिकार व कार्ये–

- केंद्रीय दक्षता आयोगाच्या 'दक्षता आयोग अधिनियम, 2003' नुसार अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे–

1. केंद्रसरकारच्या नियंत्रणाखालील सर्व दक्षता क्रांतीचे पर्यवेक्षण करणे.
2. नियोजन व त्याची अंमलबजावणी करणाऱ्या केंद्रीय संस्थांना त्यांच्या दक्षता कामात सुधारणा तसेच पुनर्परिक्षण करण्याबाबत सल्ला देणे.
3. भ्रष्टाचार निवारण अधिनियम, 1988 नुसार भ्रष्टाचाराशी संबंधीत दंड प्रक्रिया संहिता अनुसार एखाद्या अपराधाशी दिल्ली विशेष पोलीस एस्टॅब्लिशमेंटद्वारे स्थापन करण्यात आलेल्या चौकशी समितीची प्रगती तपासणे व पुनर्विलोकन करणे.
4. सनदी सेवकांच्या CRPI अंतर्गत गुन्ह्याची चौकशी करणे व जबाबदारी पार पडण्याबाबत दिल्ली स्पेशल पोलीस एस्टॅब्लिशमेंटला निर्देश देणे.
5. भारत सरकारच्या विविध खात्यातील भ्रष्टाचारविरोधी कार्य करणाऱ्या यंत्रणावर नियंत्रण ठेवणे, त्यांचे पर्यवेक्षण करणे.
6. केंद्रीय कार्यकारी होणाऱ्या व्यवहारात भ्रष्टाचार झाल्यास त्याची चौकशी करणे.
7. CBI चे संचालक, पोलीस अधिक्षक यांसारख्या पदावरील अधिकार नेमताना त्या निवड समितीचे अध्यक्षस्थान केंद्रीय दक्षता अयोगाचे अध्यक्ष भुषवितात.
8. केंद्रीय अधिसत्तांना शिस्तपालनाशी संबंधीत सल्ला देणे.
9. कोणत्याही भ्रष्टाचाराशी संबंधीत प्रकरणाची चौकशी करताना आयोगाला सिव्हील न्यायालयाप्रमाणे अधिकार असतात.
10. अखिल भारतीय सेवा किंवा केंद्राच्या नियंत्रणाखालील कोणत्याही सेवेसाठी शिस्तपालनाशी संबंधीत नियम बनवताना आयोगाशी विचारविनिमय करावा लागतो.
11. केंद्रसरकारने भ्रष्टाचाराशी संबंधीत सोपवलेल्या कोणत्याही प्रकरणाची चौकशी करणे.

२. केंद्रीय अन्वेषण मंडळ (CBI- Central Bureau of Investigation)

- भारत सरकारची CBI ही एक प्रमुख चौकशी एजन्सी आहे.
- गुन्हेगारी व राष्ट्रीय सुरक्षेशी संबधीत वेगवेगळ्या प्रकारच्या प्रकरणांची चौकशी करण्याचे काम CBI करते.
- CBI ची रचना फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनशी मिळती-जुळती आहे, परतु CBI चे अधिकार व कार्यक्षेत्र FBI पेक्षा मर्यादीत आहेत.

पार्श्वभूमी–

- CBI ची निर्मिती भारत सरकारद्वारे 1941 साली स्थापन करण्यात आलेल्या विशेष पोलीस प्रतिष्ठानमधुन झाली.
- त्यावेळी विशेष पोलीस प्रतिष्ठानचे कार्य दुसऱ्या महायुद्धाच्यावेळी भारतीय युद्ध व आपुर्ती विभागामधील देवाण-घेवाणमध्ये घुसखोरी व भ्रष्टाचाराशी संबंधीत बाबी हाताळणे, त्यांची चौकशी करण्याचे काम होते.
- युद्ध समाप्तीनंतरसुद्धा केंद्रीय कर्मचाऱ्याद्वारे होणारी घुसखोरी व भ्रष्टाचार या संबंधीत बाबींना नियंत्रीत करण्यासाठी एक चौकशी समितीची गरज भासू लागली म्हणून 1946 मध्ये दिल्ली विशेष पोलीस प्रतिष्ठान अधिनियम लागू करण्यात आला.
- त्याद्वारे विशेष पोलीस प्रतिष्ठानचे हस्तांतरण केंद्रीय गृहविभागाकडे झाले.
- 1 एप्रिल 1963 च्या केंद्रीय गृहमंत्रालयाच्या ठरावाद्वारे विशेष पोलीस प्रतिष्ठानचे 'केंद्रीय अन्वेशन ब्युरो' असे नामकरण झाले व कार्य आणि अधिकाराचा विस्तार करण्यात आला.
- सुरुवातीला केवळ केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांद्वारे होणाऱ्या भ्रष्टाचाराची चौकशी CBI द्वारे करण्यात येवू लागली.
- पुढील काळात सार्वजनिक उपक्रमांची संख्या वाढत गेली व त्यातील कर्मचाऱ्यांनासुद्धा CBI च्या चौकशीच्या कक्षेत आणले.
- 1969 नंतर बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर बँक कर्मचारीसुद्धा CBI च्या कक्षेत आले.
- दिवसेंदिवस CBI च्या कामाचा विस्तार होत आहे.

रचना–

- प्रमुख संचालक असतो. त्यांना दोन वर्षांचा कार्यकाळ असतो.
- प्रमुख संचालकाला विशेष संचालक सहाय्य करतो.
- या व्यतिरिक्त अनेक सहसंचालक, Dy. इन्स्पेक्टर, पोलीस अधिक्षक आणि इतर पदे असतात.


अधिकार व कार्ये–

- भ्रष्टाचाराला प्रतिबंध करून प्रशासनाद्वारे पारदर्शकता निर्माण करण्यास सहाय्य करणे.

Competitive Forum

- केंद्रीय दक्षता अयोगाला सहाय्य करणे.
- राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय स्तरावरील गुन्हेगारी टोळीने केलेल्या गंभीर गुन्ह्यांचा तपास लावणे.
- केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या भ्रष्टाचार वा गैरवर्तनाबाबतच्या खटल्यांचा तपास करणे.
- राज्य सरकारने विनंती केल्यास एखाद्या महत्त्वाच्या खटल्याचा तपास करणे.
- भ्रष्टाचार निर्मुलन यंत्रणा व राज्याची पोलीस दले यांच्यात समन्वय साधून देणे.
- गुन्हेगारीबाबत आकडेवारी गोळा करणे.
- वित्तीय बाबींशी संबंधीत खटल्याचा तपास करणे.

३. राष्ट्रीय महिला अयोग



- भारतात महिलांच्या अधिकाराच प्रतिनिधीत्व करण्यासाठी व महिलांच्या समस्यांबाबत आवाज उठवण्यासाठी या आयोगाची स्थापना करण्यात आली.
- राष्ट्रीय महिला आयोगाची 1992 मध्ये स्थापना करण्यात आली. त्यासाठी 'राष्ट्रीय महिला आयोग कायदा 1990' संमत करण्यात आला.
- घटनेने महिलांसाठी पुरविलेल्या तरतुदींचा अभ्यास करून त्यांच्या अंमलबजावणीवर देखरेख व सरकारला योग्य सल्ला देण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोग स्थापन करण्यात आला.
- आयोगाने आपल्या अभियानामध्ये हुंडा, राजकारण, धर्म तसेच नौकऱ्यांमध्ये महिलांना प्रतिनिधीत्व याचबरोबर महिलांच्या शोषणाशी संबंधीत सर्व बाबींवर गंभीरपणे पाऊल उचलली आहेत.

रचना–

- आयोगामध्ये एक अध्यक्ष आणि इतर पाच सदस्य तसेच एक सचिव असेल.
- वरील सर्वांची नियुक्ती केंद्रशासनाद्वारे.
- पाच सदस्यापैकी एक अनु. जाती व एक अनु.जमातीचा असेल.

अधिकार व कार्ये–

- महिलांवर परिणाम करतील अशा बाबींसंबंधी धोरण ठरवताना/निर्णय घेताना शासनाने राष्ट्रीय महिला आयोगाचा सल्ला घ्यावा लागतो.
- महिलांच्या तक्रारीचे निवारण करणे तसेच कायदेशीर उपाययोजना सुचविणे.
- घटनेत महिलांसाठीच्या तरतुदींचे पुनरावलोकन करणे.
- घटनेतील महिलांच्या तरतुदींचे उल्लंघन करणारे प्रकरणे संबंधीत अधिकाऱ्यांपुढे मांडणे.
- महिलांशी संबंधी भेदभाव, अत्याचार, यांसारख्या समस्येवर सरकारला योग्य शिफारशी करणे.
- केंद्रशासनाला आपला वार्षिक अहवाल सादर करणे.

परिवर्तन Competitive Forum अभिजीत राठोड

- महिला अत्याचार, हिंसा, भेदभाव अशा प्रकरणांची सखोल चौकशी करणे आणि त्यासंबंधी अभ्यास करून आपला अहवाल केंद्रसरकारला सादर करणे.
- कारागृहाचे परिक्षण करून तेथील महिलांच्या स्थितीबाबत व समस्यांबाबत शिफारशी करणे तसेच गरज भासल्यास उपचारात्मक कार्यवाही करण्याची मागणी करणे.
- आयोगाला संबंधीत तसेच अन्य कायद्यान्वये महिलांच्या संरक्षणासंबंधी असलेल्या तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी सिव्हील न्यायालयाचे अधिकार आहेत.
- महिलांच्या सामाजिक, आर्थिक विकासाच्या योजना बनविण्याच्या सरकारच्या प्रक्रियेमध्ये राष्ट्रीय महिला आयोग भाग घेते.
- देशातील महिलांच्या विकासाचे मुल्यमापन करणे.
- महिलांशी संबंधीत सर्व बाबींवर शासनाला आपला अहवाल सादर करणे.
- जयंती पटनायक या राष्ट्रीय महिला आयोगाच्या पहिल्या अध्यक्षा– 03/02/1992 ते 30/01/1995
- 02/08/2011 ते 01/08/2014 या कालावधीत ममता शर्मा या 7 व्या तर व्यवतीशः 6 व्या क्रमांकाच्या अध्यक्षा.
- गिरीजा व्यास या सलग दोन वेळा राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा– 2005 ते 2008 आणि 2008 ते 08/04/2011
- 17/09/2014 पासून ललिता कुमारमंगलम या राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा आहेत.

४. राष्ट्रीय मानवी हक्क आयोग–

- स्थापना –1993 च्या मानवी हक्क संरक्षण कायद्यान्वये राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली.

रचना–



- एक अध्यक्ष – जे सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश असतात.
- इतर चार सदस्य, पैकी उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाचा प्रत्येकी एक माजी किंवा वर्तमान न्यायाधीश असतील.
- इतर दोन सदस्य मानवी हक्क संवर्धन कार्यात विशेष अनुभव असलेले असतील.
- वरील चार सदस्यांव्यतिरिक्त आणखी चार पदसिद्ध सदस्य असतात. जे– 1. राष्ट्रीय महिला आयोग, 2. अनु.जाती आयोग, 3. अनु.जमाती आयोग, 4. राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग यांचे अध्यक्ष असतात.
- राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती राष्ट्रपती करतात.
- या नियुक्त्या एका निवडसमितीच्या शिफारशीने होतात. त्या निवड समितीत–1. पंतप्रधान (अध्यक्ष), 2. राज्यसभा उपाध्यक्ष, 3. लोकसभेचा सभापती, 4. केंद्रीय गृहमंत्री, 5. राज्यसभेचा विरोधीपक्ष नेता, 6. लोकसभेचा विरोधी पक्ष नेता हे असतात.

कार्यकाळ व सेवाशर्ती–

- अध्यक्ष व सदस्य आपल्या पदावर नियुक्तीपासून 5 वर्षे किंवा वयाची 70 वर्षे पूर्ण होईपर्यंत जे आधी घडेल तोपर्यंत पदावर राहतील.
- कार्यकाळ संपल्यानंतर अध्यक्ष व सदस्यांना केंद्र वा राज्य शासनाच्या कोणत्याही पदावर नियुक्त करता येत नाही.
- राष्ट्रीपती पुढील परिस्थितीत आयोगाच्या अध्यक्ष वा सदस्याला पदावरून दूर करू शकतात.

1. ती व्यक्ती न्यायालयाच्या मते मानसिक व शारिरीकदृष्ट्या असक्षम असेल.
2. पदाचा गैरवापर करून आर्थिक वा इतर लाभ प्राप्त करत असेल.
3. ती व्यक्ती दिवाळखोर झाली असेल.
4. तीच्यावर गुन्हा सिद्ध होऊन त्या व्यक्तीला सक्षम न्यायालयाने कारावासाची शिक्षा सुनावली असेल.

- वरील कारणाने राष्ट्रीय मानवाधीकार आयोगाच्या अध्यक्ष वा सदस्याला पदावरून दूर करण्यापूर्वी त्या बाबत चौकशी करण्यासाठी तो विषय सर्वोच्च न्यायालयाकडे पाठवतात.
- [illegible] सल्ल्यानुसार राष्ट्रपती आयोगाच्या अध्यक्ष वा सदस्याला पदावरून दूर करतात.

आयोगाचे अधिकार व कार्य–

- नागरिकांच्या जीवीत, स्वातंत्र्य, प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्याच्या मानवी हक्कांचे योग्यप्रकारे जतन होत आहे की नाही यावर लक्ष ठेवणे.
- एखाद्या सनदी अधिकाऱ्याकडून अथवा कोणत्याही व्यक्ती वा व्यक्ती समुहाकडून एखाद्या व्यक्तीच्या मानवी अधिकारांवर अतिक्रमण झाले असेल व तशी तक्रार आयोगाकडे दाखल झाल्यास आयोग चौकशी करून उच्च व सर्वोच्च न्यायालयामध्ये त्याबाबत पाठपुरावा करते.
- एखाद्या न्यायालयीन खटल्यात की ज्यात मानवाधिकारांचे उल्लंघन झाले आहे, त्यात संबंधीत न्यायालयाच्या परवानगीने हस्तक्षेप करते.
- मानवी हक्कांचे संवर्धन करताना येणाऱ्या अडथळ्यांवर अभ्यास करून उपाययोजना सुचवणे.
- तुरुंग, बालसुधारणगृह, यांसारख्या ठिकाणांची पहाणी करून तेथील परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी शिफारशी करणे.
- सनदी अधिकारी मानवी अधिकाराच्या संरक्षणाबाबत योग्य कर्तव्य बजावत नसेल तर त्या संबंधीत प्रकरणात लक्ष घालून तपासकार्य करणे.
- आंतरराष्ट्रीय मानवी हक्काशी संबंधीत ठराव, कायद्यांचा अभ्यास करून भारतीय व्यवस्थेत तसे कायदे लागू करण्यास व प्रभावी अंमलबजावणी होण्याबाबत लक्ष धालणे.
- मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी घटनेत नमुद तरतुदींचा व त्यांच्या अंमलबजावणीवरील प्रयत्नांचा अभ्यास करून उपाययोजना सुचविणे.
- समाजामध्ये मानवी हक्कांशी संबंधीत जागीव जागृती निर्माण करणे.
- मानवी हक्काशी संबंधीत संकल्पनांचा प्रचार व प्रसार होण्यास कृतीकार्यक्रम तयार करणे.
- मानवी हक्कांच्या संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या शासकीय, बिगरशासकीय तसेच स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन देणे.
- भारतीय लष्कराने मानवी हक्कांचे उल्लंघन केल्यास त्या संबंधी अंतरीम आदेश देण्याचा अधिकार आयोगाला 2008 साली देण्यात आला.
- आयोगाद्वारे स्वीकृत करण्यात येणाऱ्या मानवाधिकाराच्या उल्लंघनाशी संबंधीत याचीकांचे स्वरुप पुढील प्रमाणे असावे–
  1. तक्रार करण्यापूर्वी मानवाधिकाराच्या उल्लंघनाच्या घटनेला किमान एक वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झालेला नसावा.
  2. तक्रार अर्ध–न्यायीक प्रकारची असावी.
  3. तक्रार अज्ञात नावाने नसावी.
  4. आयोगाच्या कार्यक्षेत्राच्या बाहेरील तक्रारी नसाव्या.

Competitive Forum – अभिजीत राठोड
PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग-

- मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 अंतर्गत महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग स्थापन करण्यात आला असून ती एक स्वायत्त वैधानिक यंत्रणा आहे.
- महाराष्ट्रात 6 मार्च 2001 रोजी या आयोगाची स्थापना.

रचना-

- एक अध्यक्ष व इतर दोन सदस्य
- आयोगाच्या अध्यक्षपदी हायकोर्टाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश असतात.
- इतर दोन सदस्यांपैकी एक सदस्य हायकोर्टाचे न्यायमुर्ती अथवा निवृत्त न्यायमुर्ती अथवा जिल्हा न्यायाधिशपदाचा किमान 7 वर्षांचा अनुभव असलेले असतात. तर दुसरे सदस्य हे मानवी हक्क विषयी ज्ञान असलेल्या व प्रत्यक्ष अनुभव असलेल्या व्यक्तींमधून निवडले जातात.

आयोगाचे कार्य-

- सरकारी कर्मचाऱ्यांकडून (पब्लिक सर्व्हंट) होणाऱ्या मानवी हक्कांच्या उल्लंघनावर नजर ठेवून त्याची चौकशी करणे.
- या संदर्भात मानवी हक्क संरक्षण कायदा कलम 12 नुसार आयोगाची कार्यकक्षाठरवण्यात आली आहे-

1. मानवी हक्काचे उल्लंघन अथवा त्याला साथ देणाऱ्यांची दखल घेणे.
2. अशा उल्लंघनाबाबत सरकारी कर्मचाऱ्यांकडून प्रतिबंधात्मक कारवाईकडे दुर्लक्ष झाल्यास त्याची दखल घेणे.
3. एखाद्या व्यक्तीने आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारींची दखल घेऊन तपासाचे आदेश देणे.
4. कोर्टाकडे प्रलंबीत असलेले मानवी हक्क उल्लंघनाचे प्रकरण असल्यास कोर्टाची अनुमती घेऊन हस्तक्षेप करणे.
5. कारागृह अथवा ज्या ठिकाणी व्यक्तींना स्थानबद्ध केले आहे. किंवा उपचार, संरक्षण अथवा सुधारण्यासाठी दाखल केले आहे. तेथे दाखल केलेल्या व्यक्तींच्या राहणीमानाच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी भेट देणे आणि शिफारशी करणे.
6. मानवी हक्काच्या संरक्षणासाठी राज्यघटनेद्वारे अथवा अन्य कायद्याने केलेल्या सुरक्षात्मक उपायांचा व तरतुदींचा आढाव घेऊन प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारस करणे.
7. मानवी हक्काच्या पालनात प्रतिबंध आणणाऱ्या दहशतवाद व त्याला कारणीभूत असलेल्या घटकांचा फेरआढावा घेऊन त्यावर उचित सुधारणात्मक उपाययोजनांची शिफारस करणे.
8. मानवी हक्का संबंधीचे करार व त्यावरील आंतरराष्ट्रीय विचारप्रवाहांचा अभ्यास करून प्रभावीपणे त्याचा वापर होण्यासाठी शिफारस करणे.
9. मानवी हक्काच्या क्षेत्रात संशोधन होते घेणे व्यक्ती व संस्थांना प्रोत्साहन देणे.
10. समाजाच्या विविध घटकांमध्ये मानवी हक्कांविषयी साक्षरता प्रसार करण्यासाठी प्रसारमाध्यमे, सोशल मीडिया माध्यमांचा वापर करणे.
11. मानवी हक्काच्या क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संघटना (NGOs) आणि अन्य संस्थांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे.

परिवर्तन Competitive Forum -अभिजीत राठोड

तक्रार कशी करावी?-

- मराठी, हिंदी अथवा इंग्रजीत तक्रारदाराला महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाकडे तक्रार करता येते.
- अशी तक्रार ज्या व्यक्तीच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाले आहे ती व्यक्ती अथवा तिच्या वतीने अन्य व्यक्तीला तक्रार करण्याची मुभा आहे.
- तक्रार स्वतः येऊन किंवा टपालाने पाठवता येते.
- वकिलाची मदत न घेता तक्रारदार स्वतः आयोगापुढे बाजु मांडू शकतो.
- तक्रारीसाठी कोणतेही शुल्क द्यावे लागत नाही.
- याशिवाय कोर्ट फी स्टॅम्पचीही गरज नसून वकिलाचीही आवश्यकता नाही.

आयोगाचे अधिकार-

- मानवी हक्क आयोगाचे अधिकार हे दिवाणी व्यवहार प्रक्रिया (CPC) या कायद्यातील तरतुदीप्रमाणे आहेत.
- तक्रारींची सुनावणी घेतांना साक्षीदाराला आयोगापुढे हजर करण्याचा आदेश देणे वा आदेश बजावणे. तसेच साक्षीदाराची शपथेवर साक्ष घेणे.
- तक्रार चालविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे आयोगापुढे सादर करणे.
- प्रतिज्ञापत्रावर आधारित पुरावा स्विकारणे.
- कोणत्याही कोर्टाकडून अथवा कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारच्या सार्वजनिक अथवा सरकारी कागदपत्रे, दस्ताऐवजांची मागणी करणे.
- आयोगाला आवश्यक माहिती मागविण्याचा अधिकार आहे.


- आयोगापुढे माहिती उघड करणे बंधनकारक आहे.
- एखादी तक्रार अन्य राज्यातील असल्यास त्या राज्याच्या आयोगाकडे पाठविण्याचा अधिकार.

तपासणी पुर्ण झाल्यावर आयोगापुढील पर्याय–

1. मानवी हक्कांचे उल्लंघन केले असल्याचे तपासणीत आढळून आल्यास दोषी कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाईची, कोर्टात खटला दाखल करण्याची शिफारस करणे.
2. अशा तक्रारींबाबत हायकोर्ट अथवा सुप्रीम कोर्ट यांनी ताकीद किंवा आदेश द्यावा म्हणून आयोगाकडून विनंती केली जाऊ शकते.
3. मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्याची झळ पोहेचलेल्या व्यक्ती व त्यांचे कुटुंबीय यांना तात्काळ हंमामी मदत द्यावी म्हणून सरकार अथवा संबंधित सरकारी यंत्रणेकडे शिफारस करणे.
4. चौकशी अहवालाची व आदेशाची प्रत संबंधीत यंत्रणेला पाठवून त्यावर कारवाई झाली की नाही त्याचे उत्तर मागविणे.

राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग–

पार्श्वभूमी–



- केंद्रीय गृहमंत्रालयाची 12 जानेवारी 1978 रोजी भरलेल्या बैठकीमध्ये राष्ट्रीय स्तरावर एक अल्पसंख्याक आयोग स्थापन करण्याबाबत विचार झाला.
- त्यासाठी संसदेने 1992 साली राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग अधिनियम 1992 संमत केला.
- 17 मे 1993 रोजी राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाची स्थापना करण्यात आली.
- केंद्र सरकारला अल्पसंख्यांक समुदाय अधिसुचीत करण्याचा अधिकार आहे.
- 23 ऑक्टोबर 1993 च्या एक अधिसुचनेद्वारे भारत सरकारने मुर्स्लीम, शीख, बौद्ध, पारशी आणि ख्रिश्चन या पाच धार्मिक समुदायांना अल्पसंख्यांक घोषीत केले.
- 27 जानेवारी 2014 रोजी केंद्र सरकारने राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग अधिनियम 1992 च्या कलम 2 (ग) अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून जैन या समुदायाला अल्पसंख्याक म्हणून घोषीत केले. सध्या सहा धार्मिक समुदाय अल्पसंख्याक म्हणून घोषीत केले आहेत.
- 2001 च्या जनगणनेनुसार धार्मिक अल्पसंख्यांक समुदायांची (जैन समुदाय वगळून) देशाच्या एकूण लोकसंख्येत 18.42% एवढे प्रमाण होते.
- सध्या 6 धार्मिक समुदाय अल्पसख्यांक म्हणुन घोषीत.
- राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग अधिनियम 1992 मध्ये अल्पसंख्याक या शब्दाची कोणतीही व्याख्या नाही.

राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग स्थापन करण्यामागील उद्देश–

- अल्पसंख्यांक समुदायांतील दुयमत्वाची व भेदभावाची भावना नष्ट करणे.
- राष्ट्रात एकात्मता व अखंडता कायम ठेवणे.
- अल्पसंख्यांक समुदायाबाबत घटनेत नमुद तरतुदींची प्रभावी अंमबजावणी करणे.
- धार्मिक व भाषीक अल्पसंख्यांकांचे हितसंवर्धन करणे.

Competitive Forum – अभिजीत राठोड

रचना–

- एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष व इतर पाच सदस्य
- यांची नियुक्ती केंद्रशासनाद्वारे केली जाते.
- अध्यक्षांसहित सर्व सदस्य अल्पसंख्यांक समाजातील असावेत.
- अध्यक्ष तसेच सदस्यांचा कार्यकाळ नियुक्तीपासून 3 वर्षे इतका आहे.
- वेतन, भत्ते– केंद्रसरकारचे अल्पसंख्यांक व्यवहार मंत्रालय आयोगाच्या अध्यक्ष, सदस्यांच्या वेतन, भत्ते व सेवाशर्ती निश्चित करते.
- त्यांच्या कार्यकाळात त्यांना अलाभदायक ठरतील असे बदल वेतन भत्ते व सेवाशर्तीत करता येत नाहीत.
- सध्या सय्यद घयोरुल हसन रिझवी हे अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष आहेत.

कार्ये–

- अल्पसंख्यांकांच्या सामाजिक, आर्थिक तसेच शैक्षणिक बाबींचा अभ्यास करून त्या संबंधी विश्लेषण करणे व उपाययोजना सुचविणे.
- भारतीय राज्यघटना, संसद तसेच राज्य विधीमंडळाचे कायदे याद्वारे करण्यात आलेल्या तरतुदींच्या अंमलबजावणीचे पर्यवेक्षण करणे.
- या तरतुदींची योग्य व प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी केंद्रशासन व संबंधीत राज्य शासनाला शिफारसी करणे.
- केंद्र शासनाने अल्पसंख्यांक समुदायाशी संबंधीत संदर्भीत केलेल्या कोणत्याही बाबीवर कार्य करणे.

- देशात अल्पसंख्यांकांसोबत भेदभावपूर्ण वर्तन झाल्यास निर्माण होणाऱ्या समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचविणे व तशी शिफारस केंद्रशासनाला करणे.
- केंद्र व राज्यातील अल्पसंख्यांक समुदायाच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे.
- अल्पसंख्याकांसंबंधीत समस्यांचा अभ्यास करून त्याबाबत केंद्रशासनाला शिफारशी करणे.
- अलपसंख्यांकांच्या हक्कांचे उल्लंघन करणारे प्रकरणे संबंधीत शासकीय यंत्रणेला वा अधिसत्तेला दाखवून देणे.
- एखाद्या अल्पसंख्यांक समुदायाबाबत शासनाला शिफारशी करणे.

राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग-

पार्श्वभूमी-

- राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग ही एक संस्था असून हीची स्थापना सफाई कर्मचारी कायदा 1993 अंतर्गत करण्यात आली आहे.

रचना-

- एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष व इतर पाच सदस्य
- अध्यक्षांचा कार्यकाळ 3 वर्षांचा असतो.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

कार्य-

- सफाई कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी उपाय योजना करणे.
- सफाई कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे अन्वेषण करून अंमलबजावणीसाठी असलेल्या प्रकरणांची चौकशी करणे.
- सफाई कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही गटासंबंधी कार्यक्रम व योजना तयार करून अंमलबजावणी करणे.
- सफाई कर्मचाऱ्यांचा दर्जा कमी करण्याच्या उद्देशाने योग्य ते निर्णय, मार्गदर्शक तत्त्वे व सूचना जाहीर करणे.
- सफाई कर्मचाऱ्यांसदर्भात केंद्र सरकारने संदर्भित केलेल्या कोणत्याही बाबींवर कार्य करणे.

नीती आयोग-

- NITI-National Institution for Transforming India
- नीती आयोग ही भारत सरकारची विकास धोरण ठरवणारी शिखर संस्था आहे.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून नीती आयोगाची स्थापना करण्यात आली.
- भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी नियोजन आयोगाची स्थापना केली होती.
- 15 ऑगस्ट 2014 रोजी स्वातंत्र्य दिनाच्या आपल्या भाषणात नियोजन आयोगाला पर्याय म्हणुन दुसरी सस्था स्थापन करण्याचे संकेत पंतप्रधान मोदी यांनी दिले होते.

NITI Aayog
(National Institution for Transforming India)
Government of India

पार्श्वभूमी-

- 1991 नंतर भारतीय अर्थव्यवस्थेचा मुक्त अर्थव्यवस्थेकडे प्रवास सुरु झाल्याने नियोजन मंडळाच्या जागी नव्या संस्थेची गरज वाटू लागली.
- केंद्रीय कॅबीनेटने 15 मार्च 1950 चा सरकारचा नियोजन मंडळाबाबतचा अधिनियम रद्द करण्यास मान्यता दिली आणि नवीन संस्थेचे स्वरुप निश्चित करण्याचे पंतप्रधानांनी ठरवावे असे ठरवले.
- 2014 मध्ये मुख्यमंत्र्यांच्या एका सभेत जवळपास सर्व मुख्यमंत्र्यांनी जुन्या नियोजन मंडळाच्या ऐवजी नवीन संस्था स्थापन करण्यास अनुकुलता दाखवली.
- नीती आयोग हा चीन मधील राष्ट्रीय विकास व सुधारणा आयोगाच्या धर्तीवर भारतात स्थापन.
- नीती आयोगाची स्थापना 1 जानेवारी 2015 रोजी एका सरकारी अधिनियमान्वये एक असंवैधानिक व अवैधानिक संस्था म्हणुन झाली.
- नीती आयोग केंद्र तसेच राज्य सरकारला धोरणात्मक बाबींवर सल्ला देते.

रचना-

- एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष, पुर्णकालीन सदस्य, अशंकालीन सदस्य, पदसिद्ध सदस्य, विशेष आमंत्रीत सदस्य तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी इत्यादी.

अ) अध्यक्ष- पंतप्रधान पदसिद्ध अध्यक्ष

ब) उपाध्यक्ष- पंतप्रधानाद्वारे नेमणुक-अरविंद पनगारिया हे सध्या उपाध्यक्ष

क) पुर्णवेळ सदस्य- नेमणुक पंतप्रधान करतील- सध्या रमेशचंद, डॉ.व्ही.सारस्वत, श्री विवेक देबरॉय

ड) अंशकालिक सदस्य- विद्यापीठ किंवा संशोधन संस्थांमधून 2 सदस्यांची अंशकालीक सदस्य म्हणून नेमले जातात.

इ) पदसिद्ध सदस्य केंद्रीय मंत्रीमंडळातील 4 मंत्री पंतप्रधानामार्फत नेमले जातात.

फ) विशेष आमंत्रित- पंतप्रधानांमार्फत काही तज्ञ व्यक्तींची नेमणुक

ग) CEO - केंद्रशासनाच्या सचिव दर्जाचा अधिकारी नीती आयोगाचा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणुन पंतप्रधानाद्वारे नेमणुक-सध्या अमिताभ कांत.

- देशाच्या सर्वांगीन विकासाची दिशा ठरवणे व त्यासाठी धोरणे आखणे हे नीती आयोगाचे प्रमुख कार्य.
- नियोजन अखतांना किंवा धोरणे ठरवतांना राज्यांचा प्रत्यक्ष सहभाग असणे गरजेचे मानले.
- केंद्र व राज्य शासनांना धोरणात्मक व टेक्नीकल सल्ला देणारी संस्था.
- नीती आयोगाच्या रचनेमध्ये पुर्णकालीक संघटनात्मक यंत्रणा, प्रशासक, परिषद, प्रादेशिक परिषदा इत्यादींचा समावेश होतो.

प्रशासक परिषद -

[redacted]

- अध्यक्ष- पंतप्रधान हे प्रशासक परिषदेचे अध्यक्ष असतात.
- नीती आयोगाचे सर्व सदस्य
- दिल्ली आणि पुदुचेरी या केंद्रशासीत प्रदेशांच्या मुख्यमंत्र्यांसह सर्व घटकराज्यांचे मुख्यमंत्री व केंद्रशासीत प्रदेशांचे नायब राज्यपाल.
- नियोजन आयोगामध्ये नियोजन करताना राज्यांचा सहभाग नव्हता.
- नीती आयोगामध्ये प्रशासकीय परिषदेद्वारा राज्यांचा समावेश करण्यात आला आहे.
- प्रशासक परिषदेच्या [redacted] नांच्या अध्यक्षतेखाली गरजेनुसार बैठका घेतल्या जातात.

प्रादेशिक परिषदा-

- आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी तसेच ठराविक राज्यांमध्ये काही मुद्दे सामायीक असतात ते हाताळण्यांसाठी प्रादेशिक परिषदांची स्थापना करण्यात आली.
- या परिषदा डावपेच तयार करून त्याच्या अंमलबजावणीचे पर्यवेक्षक करतील.
- या परिषदांमध्ये संबधीत राज्यांचे मुख्यमंत्री व सचिव तसेच त्या क्षेत्रातील केंद्रीय मंत्री व सचीव यांचा समावेश.
- या परिषदांचे संयुक्त अध्यक्षपद संबधीत राज्यांच्या मुख्यमंत्र्यांमधून क्रमशः एक वर्ष या विषयाच्या अनुशंगाने परिषद स्थापन केली त्या विषयाचा केंद्रीय मंत्री हे संयुक्त अध्यक्षस्थान भुषवितात.
- 12 व्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटाबरोबरच पंचवार्षिक नियोजन संपुष्टात येऊन त्या ऐवजी 15 वर्षांचा दीर्घकालीन विजन डॉक्युमेंट तयार करण्यात आले आहे. यामध्ये 15 वर्षांचे व्हिजन, 7 वर्षांचा डावपेच आणि 3 वर्षांसाठी कृती योजनेचा समावेश आहे.
- या कृती योजनेमध्ये 2017-18 ते 2019-20 या तीन तीन वर्षांमध्ये राबवण्याच्या कृती योजनांचा समावेश.
- नीती आयोगाचे मुख्यालय - नवी दिल्ली

[redacted]

- दारिद्रय निर्मुलनासाठी उपाययोजना/धोरण तयार करणे.
- प्रत्येक स्त्री-पुरुषाला रोजगाराच्या संधी निर्माण करून त्यांच्या क्षमतेचा वापर देशाच्या व त्यांच्या विकासासाठी करणे.
- राज्यांच्या सहभागाने राष्ट्रीय विकासाचे डावपेच आखणे व त्याबाबत सामाईक दृष्टीकोन विकसीत करणे.
- समाजातील आर्थिक वंचीत घटकांकडे विशेष लक्ष पुरवणे.
- ग्रामीण पातळीवर योजना तयार करण्यासाठी यंत्रणा विकसीत करणे व त्यांचे वरच्या स्तरावर संघटन करत जाणे.
- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञाच्या सहयोगाने विकास साधण्यास व्यवस्था निर्माण करणे.
- शाश्वत विकासाच्या पद्धती शोधने, त्यावर संशोधन करून विकासाची दिशा ठरवणे.
- पर्यावरणीय तसेच परिस्थितीकीय संपत्तीचे संरक्षण करणे.
- छोट्या उद्योगांना धोरणात्मक सहाय्य पुरवणे.
- विकासप्रक्रियेत ग्रामीण भागाला विशेष महत्त्व देणे.
- लैंगीक आर्थिक तसेच जातीय भेदभाव/असमानता नष्ट करण्यासंबंधी उपाय योजना तयार करणे.
- भारताच्या जनसांख्यिकीय लाभांशाचा पुरेपुर फायदा करून घेण्यासाठी धोरण आखणे.
- आयोगाने ठरविलेल्या कृती कार्यक्रमांच्या अंमलबजावणीवर विशेष लक्ष ठेवणे, त्याचे मुल्यमापन करणे.

Competitive Forum - अभिजीत राठोड



MPSC / UPSC

परिवर्तन

Competitive Forum

- अभिजीत राठोड

Current Affair

चालु घडामोडी

दर रविवार सकाळी १०.३० वा.

भारत वार्षिकी : 2018	संसद, न्यायालयीन घडामोडी
आर्थिक पाहणी	लोकसंख्या रिपोर्ट
मनोरमा 2018	योजना, कुरुक्षेत्र, लोकराज्य
नवीन सरकारच्या योजना	आंतरराष्ट्रीय संस्था, करार
क्रिडा घडामोडी	इत्यादी...

Event Base...
Conceptual Approach
Admission Open...

अभिजीत राठोड

१०५१, उत्तम-मोती बिल्डिंग, नागनाथपार-शनिपार पार रोड
रमेश डाईंग जवळ, शिवम अभ्यासिकेशेजारी,
सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.

9272100500

आंतर-राज्यीय संबंध

- आंतरराज्यीय नदी जल विवाद (कलम 262)
- आंतरराज्यीय जलविवाद अधिनियम, 1956 नुसार आंतरराज्यीय नद्यांच्या/नदी खाऱ्यातील पाण्याच्या वाटपासंबंधी वाद मिटविण्याचा अधिकार संसदेला.
- संसद कायद्याद्वारे अशी तरतुद करू शकते की, अशा कोणत्याही तंट्याच्या किंवा तक्रारीच्या बाबतीत सवोच्च न्यायालया/इतर कोणतेही न्यायालय आपले अधिकारक्षेत्र वापरणार नाही.

संसदेचे 2 फायदे–

1. **नदी बोर्ड कायदा, 1956–** आंतरराज्यीय नद्या व नदी खोऱ्यांचे नियमन व विकास करण्यासाठी तरतुद.
2. **आंतरराज्यीय नदी जल विवाद कायदा,1956–** जलविवाद आधी चर्चेद्वारे व चर्चा अपयशी ठरल्यास

- अशा लवाद/न्यायाधिकरणामध्ये 1 अध्यक्ष व 2 सदस्य अध्यक्ष तसेच सदस्य – सर्वोच्च /उच्च न्यायालयाचे न्यायाधीश.
- विवादाची पूर्ण तपासणी करून 3 वर्षांचया आत लवादाने आपला निर्णय देणे अपेक्षित, मात्र निर्णय देण्यास उशीर झाल्यास केंद्र सरकार लावादास एका वेळी महत्तम 2 वर्षे वाढवून देऊ शकते.
- लवादाचा निर्णय अंतिम व बंधनकारक, त्यास सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा दर्जा.
- लवादाचा निर्णय केंद्र सरकारने सरकारी गॅझेटमध्ये अधिसूचित केल्यावरच त्याचा अंमल सुरु.

आंतरराज्यीय परिषदा (कलम 263)

- राष्ट्रपतीच्या आदेशाद्वारे 1990 मध्ये स्थापना.

कार्ये–

- राज्याराज्यांतील तंटे–वादाची चौकशी करून त्याबाबत सल्ला देणे.
- राज्याराज्यातील तसेच केंद्र आणि राज्ये/केंद्रशासित प्रदेश यादरम्यानच्या मुद्यांबाबत सल्लागार मंडळ म्हणून कार्य.
- केंद्र व राज्यांमधील सामाइक हिताच्या विषयांचे अन्वेषण व चर्चा करणे.

आंतरराज्यीय परिषद विरुद्ध सर्वोच्च न्यायालय–

- केंद्र व राज्ये न्यायिक तंट्यावर निर्णय देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयास (कलम 131)
- आंतरराज्यीय परिषदेचे आंतरराज्यीय तंट्यांचे (न्यायिक/गैर-न्यायिक तंटे) अन्वेषण व चर्चा करण्याचे कार्य केवळ सल्लागार स्वरुपाचे.
- परिषदेचे कार्य सर्वोच्च न्यायालयाच्या प्रारंभिक अधिकार क्षेत्राला पुरक.

अभिजीत राठोड Competitive Forum PARIVARTAN COMPETITIVE FORUM By-Abhijit Rathod CLASS NOTES

कलम 263 अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या परिषदा–

- केंद्रीय आरोग्य परिषद
- केंद्रीय स्थानिक शासन व शहर विकास परिषद
- विक्रकर व राज्य अबकारी करविषयक प्रादेशिक परिषदा–उत्तर, पूर्व, पश्चिम व दक्षिण विभागांसासठी
- केंद्रीय भारतीय औषध परिषद, केंद्रीय होमिओपॅथी परिषद संसदीय कायद्याद्वारे स्थापन.

आंतरराज्यीय परिषद (कलम 263)–

- सरकारीया आयोगाने स्थापन्याची शिफारस.
- व्ही.पी.सिंगच्या नेतृत्वाखालील जनता हल सरकारने 28 मे 1990 रोजी राष्ट्रपतींच्या अधिसूचनेद्वारे स्थापना.

परिषदेची रचना–

- अध्यक्ष–पंतप्रधान
- सदस्य– सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री/प्रशासक, सहा कॅबिनेट दर्जाचे मंत्री (पंतप्रधानांकडून नामनिर्देशित)
- वर्षातून किमान 3 सभा होणे अपेक्षित
- आतापर्यंत परिषदेच्या केवळ 10 सभा झाल्या. पहिली सभा ऑक्टो.1990, 10 वी सभा 9 डिसेंबर 2006 रोजी.

आंतरराज्यीय व्यापार, वाणिज्य व व्यवहारसंबंध–

- भाग मधील कलम 301 ते 307
- भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र व्यापार, वाणिज्य व व्यवहारसंबंध यांचे स्वातंत्र्य (कलम 301)
- एखाद्या राज्याच्या सीमेवर व्यापार-वाणिज्यावर बंधने घातल्यास कलम 301चे उल्लंघन
- मात्र कलम 301 वर कलम 302 ते 305 अन्वये काही बंधने.
- राज्यांतर्गत व्यापार, वाणिज्य किंवा व्यवहारसंबंधाच्या स्वातंत्र्यावर सार्वजनिक हितार्थ आवश्यक असतील असे निर्बंध घालण्याचा अधिकार संसदेला (कलम 302)
- 7 व्या अनुसुचीत कोणत्याही व्यापार व वाणिज्याशी संबंधित विषयाच्या आधारे, एका राज्याला दुसऱ्या राज्यापेक्षा अग्रक्रम देणारा/राज्याराज्यांमध्ये भेदभाव करणारा/तसे प्राधिकृत करणारा कोणताही कायदा संसद/राज्यविधानमंडळाला अधिकार नाही. (कलम 303)
- मात्र, भारतातील कोणत्याही भागातील माल-टंचाईतून उद्भवणारी परिस्थिती हाताळण्याची आवश्यकता असल्यास असा भेदभावपूर्ण कायदा करण्याचा अधिकार संसदेला.
- राज्याशी होणाऱ्या/त्या राज्यात होणाऱ्या व्यापार, वाणिज्य व व्यवहारसंबंधाच्या स्वातंत्र्यावर सार्वजनिक हितार्थ वाजवी निर्बंध घालता येतील. (कलम 304)
- राज्य मक्तेदारी (कलम 305) म्हणजेच नागरिकांना पूर्णतः/अंशतः वगळून स्वतःचय एखादा व्यापार, धंदा, उद्योग/सेवा चालविण्यासाठी कायदा करण्याचा अधिकार संसद/ राज्य विधानमंडळाला.

विभागीय परिषदा-

- घटनात्मक नसून वैधानिक संस्था
- निर्मिती 'राज्य पुनर्रचना कायदा, 1956' नुसार
- या कायद्याने देशाचे 5 विभागांमध्ये (उत्तर, मध्य, पूर्व, पश्चिम व दक्षिण) विभाजन करून प्रत्येकासाठी विभागीय परिषद स्थापन करण्याची तरतुद.
- 'उत्तर - पूर्व परिषद कायदा 1971' अन्वये उत्तर-पूर्व विभागासाठी परिषद स्थापन.

1. उत्तर विभागीय परिषद, नवी दिल्ली- जम्मू-काश्मिर, हिमाचलप्रदेश, हरियाणा, पंजाब, राजस्थान, दिल्ली व चंदीगड.
2. मध्य विभागीय परिषद, अलाहाबाद- उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड.
3. पूर्वीय विभागीय परिषद, कोलकत्ता- बिहार, झारखंड, ओडिशा, पश्चिमबंगाल.
4. पश्चिमी विभागीय परिषद, मुंबई-गुजरात, महाराष्ट्र, गोवा, दादरा नगरहवेली, दमण व दीव
5. दक्षिणी विभागीय परिषद, चेन्नई- आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, व पुदुच्चेरी
6. उत्तर-पूर्व विभागीय परिषद, गुवाहटी- आसाम, मेघालय, मणिपूर, त्रिपुरा, अरुणाचलप्रदेश, मिझोरम, नागालँड व सिक्कीम

रचना-

अध्यक्ष- केंद्रीय गृहमंत्री
सदस्य-विभागातील सर्व राज्यांचे मुख्यमंत्री
विभागातील प्रत्येक राज्याचे दोन मंत्री
विभागातील प्रत्येक केंद्रशासित प्रदेशाचा प्रशासक

परिवर्तन Competitive Forum - अभिजीत राठोड
PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

सल्लागार व्यक्ती (मताधिकाराविना)-

1. नियोजन आयोगाने नामनिर्देशित केलेली व्यक्ती.
2. विभागातील प्रत्येक राज्यशासनाचा मुख्य सचिव.
3. विभागातील प्रत्येक राज्याचा विकास आयुक्त.

- सर्व विभागीय परिषदांचे अध्यक्ष केंद्रीय गृहमंत्री, उपाध्यक्ष-राज्यांचे मुख्यमंत्री, आळीपाळीने एका वर्षासाठी

उद्दिष्ट व कार्ये-

- राज्ये, केंद्रशासित प्रदेश व केंद्र सरकार यांच्यात समन्वय व सहकार्यास प्रोत्साहन देणे.

कार्ये-

- आर्थिक व सामाजिक नियोजन, भाषिक अल्पसंख्यांक, सीमा विवाद, आंतरराज्यीय वाहतूक इ. मुद्यांवर चर्चा व शिफारसी करणे.
- देशाचे भावनिक एकात्मीकरण घडवणे.
- परस्परांना मोठे विकास प्रकल्प वेगाने पूर्ण करण्यासाठी मदत करणे.
- देशाच्या विविध प्रदेशांमध्ये एक प्रकारचे राजकीय संतुलन साधणे.
- तीव्र राज्य-जाणीव, प्रादेशिकवाद, भाषावाद इ.ची वाढ न होण्यास प्रयत्न करणे.
- केंद्र व राज्यांना परस्परांना सामाजिक व आर्थिक मुद्यांवर सहकार्य करण्यासाठीव कल्पना आणि अनुभवांचे आदानप्रदान करण्यासाठी सक्षम करणे.
- राज्यांच्या विभाजनातून होणारे परिणाम दूर करणे.

जम्मू व काश्मिरची भारतीय संघराज्याशी असलेली सहयोगी घटनात्मक स्थिती-

- जून 1952 मध्ये भारत सरकार व जम्मू-काश्मिर राज्यामध्ये करार-कोणत्या विषयांबाबत संघराज्याचे राज्यावर अधिकारक्षेत्र असेल ते निश्चित
- 1954 - जम्मू व काश्मिरच्या संविधान सभेने राज्याचे भारतात सामिलीकरण व दिल्ली कराराला संमती दिली.
- दुसरा घटना आदेश, 1954 (जम्मू व काश्मिरला लागू) - दिल्ली कराराच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रपतींद्वारे (पहिला घटना आदेश, 1950)
- 1954 च्या आदेशानुसार -

  i) जम्मू व काश्मिर 'भारतीय राज्यक्षेत्रा' चा अविभाज्य भाग, (कलम 1 नुसार)
- पहिल्या अनुसूचीतील 15 व्या क्रमांकाचे राज्य
- मात्र, जम्मू व काश्मिरचे नाव, सिमा व क्षेत्रात बदल करण्याचा अधिकार संघराज्या शासनाला (राज्य विधानमडळाच्या संमतीनंतरच)

  ii) जम्मू व काश्मिरला स्वत:ची घटना, प्रशासन घटनेनुसार त्यामुळे राज्य शासनव्यवस्था लागू नाही
- 'राज्यसंस्था' शब्दाच्या व्याख्येत जम्मू व काश्मिर राज्याचा समावेश नाही.

संसदेचे अधिकारक्षेत्र -

i) राज्य सूचीतील विषय जम्मू व काश्मिर राज्याला लागू नाही

ii) अपवाद वगळता शेषाधिकार राज्य विधानमंडळाकडे (अपवाद-भारताच्या सार्वभौमत्व व अखंडता भंग करणाऱ्या बाबी)

iii) राज्य विधानमंडळाला प्रतिबंधक स्थानबद्धतेचा कायदा करण्याचा अधिकार. (संसदेने केलेला कायदा राज्यास लागू होत नाही)

iv) कलम 249, 1986 च्या आदेशाद्वारे, राष्ट्रहीतासाठी राज्य सूचीतील विषयावर कायदे करण्याचा संसदेचा अधिकार जम्मू व काश्मिर ला लागू

मुलभूत हक्क -

- भाग III मधील मूलभूत हक्क काही अपवाद व अटींसहित लागू (राज्यात अजूनही संपत्तीच्या मूलभूत हक्काची हमी)
- स्थायी निवासी व्यक्तींना विशेष हक्क - सार्वजनिक रोजगार, स्थावर मालमत्तेचे संपादन, स्थानिक होणे, सरकारी स्कॉलरशिप्स, इ.

मार्गदर्शक तत्वे -

- भाग IV (मार्गदर्शक तत्वे), भाग IV अ (मूलभूत कर्तव्ये) जम्मू व काश्मिरला लागू नाही.
- राष्ट्रीय आणीबाणी (अंतर्गत अशांततेमुळे) या राज्याला राज्यशासनाच्या सहमतीने लागु -
- राष्ट्राय आणीबाणी (युद्ध व परकिय आक्रमणांमुळे) या राज्याला आपोआप लागू (राज्यशासनाच्या सहमतीची गरज नाही)
- राज्य घटनेतील घटनात्मक यंत्रणा अपयशी ठरल्यास 'राज्य आणीबाणी' (राष्ट्रपती राजवट) लावता येते.

- राज्यात 2 प्रकारची आणीबाणी लावण्याची तरतूद



Competitive Forum - अभिजीत राठोड

राज्याच्या घटनेतील घटनात्मक यंत्रणा अपयशी ठरल्यास → भारताच्या घटनेअंतर्गत

राज्याच्या घटनेअंतर्गत

- वित्तीय आणीबाणी लागू करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना नाही
- जम्मू व काश्मिर उच्च न्यायालयाला केवळ मूलभूत हक्क बजावण्यासाठीच प्राधिलेख काढण्याचा अधिकार
- जम्मू व काश्मिरला लागू लागू असलेल्या तरतूदी - सर्वोच्च न्यायालयाचे विशेष संमतीचे अधिकारक्षेत्र, निवडणूक आयोग व भारताचे महालेखापरीक्षकाचे अधिकारक्षेत्र

राज्यास लागू नसलेल्या तरतुदी - i) पाचवी अनुसूची (अनुसूचित क्षेत्रे व अनुसूचित जमातींचे प्रशासन व नियंत्रण)


ii) सहावी अनुसूची (आदिवासी क्षेत्राचे प्रशासन)

- राष्ट्रपती जम्मू व काश्मिर राज्याची घटना निलंबित करू शकत नाहीत - राष्ट्रपतींनी दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यास अपयशी ठरल्याच्या कारणावरून
- भारताच्या घटनेत केलेला बदल राष्ट्रपतींच्या आदेशाद्वारेच जम्मू व काश्मिर राज्याला लागू.
- भारताच्या घटनेतील कार्यालयीन भाषेच्या/राजभाषेच्या तरतुदी जम्मू व काश्मिर राज्याला लागू.

जम्मू व काश्मिर राज्य व भारताचे संघराज्यातील विशेष घटनात्मक संबंध-

i) जम्मू व काश्मिर राज्याला इतर राज्याच्या तुलनेत बऱ्याच मोठ्या प्रमाणात स्वायत्तता प्रदान

ii) जम्मू व काश्मिर राज्यावरील केंद्राचे अधिकारक्षेत्र इतर राज्यांच्या तुलनेत अधिक मर्यादित



केंद्रशासित प्रदेश

केंद्रशासीत प्रदेशांच्या निर्मितीची पार्श्वभूमी–

- 1874 साली भारतातील काही क्षेत्रे 'अनुसूचित जिल्हे' म्हणुन निर्माण करण्यात आले होते.
- कालांतराने हे अनुसूचित जिल्हे 'मुख्य आयुक्तांचे प्रांत' बनले.
- स्वातंत्र्यानंतर राज्यांची वर्गवारी ज्या 4 भागात केली होती (A, B, C, D) त्यातील भाग C व D मध्ये वरील प्रदेशांना स्थान देण्यात आले.
- भाग D मध्ये अंदमान-निकोबार या एकाच प्रदेशाचा समावेश होता.
- 1956 मध्ये राज्य पुनर्रचना कायदा (1956) आणि 7 वी घटनादुरुस्ती 1956 नुसार वरील प्रदेशांची केंद्रशासित प्रदेश म्हणून स्थापना झाली.
- पूर्वी मणिपूर, मिझोरम, त्रिपूरा, हिमाचल प्रदेश, अरुणाचल प्रदेश, गोवा हे केंद्रशासित प्रदेश होते; कालांतराने क्रमाक्रमाने त्यांना राज्याचा दर्जा देण्यात आला.

PARIVARTAN COMPETITIVE FORUM Abhijit Rathod CLASS NOTES

1. **राज्य पुनर्रचना आयोग** : 1956 – 7 वी घटनादुरुस्ती कायदा, 1956 द्वारे 14 राज्ये व 6 केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती
2. **संपादित प्रदेशांना केंद्रशासित प्रदेशांचा दर्जा**

पोर्तुगिजांकडून	फेंचाकडून
–गोवा	–पाडिचरी (de facto treaty)
– दमण-दीव	16 ऑगस्ट 1962 ला भारतात विलीन
– दादरा नगरहवेली	

3. **केंद्रशासित प्रदेशांना राज्याचा दर्जा–**
   - हिमाचल प्रदेश – मणिपूर – त्रिपुरा
   - मिझोराम – अरूणाचल प्रदेश – गोवा

परिवर्तन Competitive Forum

भारतीय राजकीय प्रदेश (सद्यस्थिती)

कलम १ (C)

घटकराज्ये (29)

केंद्रशासित प्रदेश (7)

1. अंदमान-निकोबार (1956)
2. दिल्ली (1956)
3. लक्षद्वीप (1956)
4. दादरा आणि नगर-हवेली (1961)
5. दीव आणि दमण (1987)
6. पुदुच्चेरी (1954)
7. चंदीगढ (1966)

भविष्यात संपादित केलेला प्रदेश (0)

- प्रत्येक केंद्रशासित प्रदेशाची निर्मिती ही विशिष्ट अशा कारणामुळे झालेली आहे.

केंद्रशासित प्रदेश	निर्मितीचे कारण
1. दिल्ली आणि चंदीगढ	– प्रशासकीय व राजकीय कारणे
2. पुदुच्चेरी, दादरा आणि नगर-हवेली, दमण आणि दीव	– सांस्कृतीक वेगळेपणा
3. आंदमान-निकोबार बेटे, लक्षद्वीप	– सामरिक महत्त्वाची क्षेत्रे

- **लॅकॅदीव, मिनिकॉय, अमिनदिव** या बेटांना 1973 पासून **'लक्षद्वीप'** या नावाने ओळखले जाते.
- **दिल्ली** या केंद्रशासित प्रदेशाला 1992 पासून **'दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्र'** म्हणून ओळखल्या जाते.

केंद्रशासित प्रदेशांबद्दल-

१) अंदमान-निकोबार बेटे-

- स्थापना – केंद्रशासित प्रदेश म्हणून 1 नोव्हेंबर 1956 रोजी स्थापना
- राजधानी- पोर्टब्लेअर
- जिल्ह्यांची संख्या-3
- नायब राज्यपाल- ॲडमिरल (Retd.) देवेंद्र कुमार जोशी
- लोकसभा सदस्य संख्या -1
- कार्यालयीन भाषा- हिंदी, इंग्रजी

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

२) दिल्ली-

- 1911 पूर्वी भारताची राजधानी कोलकाता हा होता 1911 साली ब्रिटीशांना दिल्लीला भारताची राजधानी बनविले.
- दिल्लीची केंद्रशासित प्रदेश म्हणून स्थापना- 1956
- दिल्लीचे राष्ट्रीय राजधानी प्रदेश म्हणून नामांतरण- 1 फेब्रुवारी 1992
- राजधानी- नवी दिल्ली
- जिल्ह्यांची संख्या- 11
- नायब राज्यपाल- अनिल बैजल (नजीब जंग यांच्या जागी)
- लोकसभा सदस्य संख्या-7
- राज्यसभा सदस्य संख्या-3
- विधानसभा सदस्य संख्या-70
- कार्यालयीन भाषा- हिंदी (अतिरिक्त- पंजाबी, उर्दू)

परिवर्तन
Competitive Forum

३) लक्षद्वीप-

- स्थापना- केंद्रशासित प्रदेश म्हणून 1 नोव्हेंबर 1956 रोजी स्थापना
- राजधानी- कवरती
- प्रशासक- फारूख खान (आयपीएस)(Retd.)
- लोकसभा सदस्य संख्या-1
- कार्यालयीन भाषा- मल्याळम
- साक्षरता-91.85 टक्के

४) दादरा नगर-हवेली-

- 1954 साली दादरा नगर-हवेली हा प्रदेश पोर्तुगिजांपासून मुक्त झाला असला तरीसुद्धा 1961 पर्यंत दादरा नगर-हवेली आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या निर्णयानुसार पोतुर्गिज मालमत्ता म्हणून ओळखल्या जाऊ लागला.
- 1954 ते 1961 पर्यंत दादरा नगर-हवेली हे मुक्त राज्य होते व ते एका वरिष्ठ पंचायतद्वारे चालविले जात होते.
- 1961 साली भारताने गोव्याला मुक्त केले तेव्हा श्री चंगती यांना एका दिवसासाठी गोवा आणि दादरा नगर-हवेलीचे राज्यप्रमुख म्हणून नेमण्यात आले. त्यांनी आणि भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी एक करार केला आणि औपचारिकपणे दादरा नगर-हवेली भारतामध्ये कार्यान्वित केले.
- स्थापना- केंद्रशासित प्रदेश म्हणून 11 ऑगस्ट 1961 रोजी स्थापना
- राजधानी- सिल्वासा
- प्रशासक- प्रफुल खोडा पटेल
- लोकसभा सदस्य संख्या -1
- कार्यालयीन भाषा- गुजराती, मराठी, हिंदी, इंग्रजी

५) दीव आणि दमण-

- स्थापना - केंद्रशासित प्रदेश म्हणून 30 मे 1987 रोजी स्थापना.
- राजधानी- दमण
- प्रशासक- प्रफुल खोडा पटेल
- लोकसभा सदस्य संख्या-1
- कार्यालयीन भाषा- कोकणी, गुजराती, हिंदी, इंग्रजी

६) पुदुच्चेरी-

- फ्रेंचांनी 1673 साली पौंडेच्चेरी येथे वसाहत स्थापन केली होती.
- 1 नोव्हेंबर 1954 रोजी पौंडेच्चेरी या फ्रेंच वसाहतीचे भारत सरकारकडे हस्तांतरण
- स्थापना- केंद्रशासित प्रदेश म्हणून 1 नोव्हेंबर 1954 रोजी स्थापना
- 16 ऑगस्ट 1962 रोजी भारत सरकार आणि फ्रेंच सरकार यांच्यात पौंडेच्चेरी हस्तांतरणाच्या करारावर औपचारिकपणे सह्या करण्यात आल्या व पौंडेच्चेरी भारतीय राज्यक्षेत्राचा अधिकृत भाग बनला.
- 2006 साली पौंडेच्चेरीचे नाव बदलून पुदुच्चेरी असे करण्यात आले.
- राजधानी- पुदुच्चेरी
- नायब राज्यपाल- किरण बेदी
- पुदुच्चेरी या केंद्रशासित प्रदेशात **पुदुच्चेरी, कोराईकल, माहे व यानम** हे 4 जिल्हे आहे.
- मुख्यमंत्री व्ही.नारायणसामी
- विधानसभा सदस्य संख्या- 33 (30- प्रत्यक्ष जनतेतून, 3 नियुक्त)
- कार्यालयीन भाषा- तामिळ, इंग्रजी, फ्रेंच (माहेमध्ये- मल्याळम, यानममध्ये- तेलगु)
- लोकसभा सदस्य संख्या-1
- राज्यसभा सदस्य संख्या-1

७) चंदीगढ-


- स्थापना- केंद्रशासित प्रदेश म्हणून चंदीगढची 1 नोव्हेंबर 1966 रोजी स्थापना
- राजधानी- चंदीगढ

परिवर्तन Competitive Forum

- प्रशासक- व्ही.पी.सिंग बडनोरे
- कार्यालयीन भाषा- इंग्रजी (शैक्षणिक माध्यम हिंदी, पंजाबी)
- लोकसभा सदस्य संख्या-1

केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासन-

- घटनेच्या भाग VIII मधील कलम 239 ते 241 हे केंद्रशासित प्रदेशांशी संबंधीत आहेत.
- केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासन राष्ट्रपतीद्वारा नियुक्त प्रशासकामार्फत चालविले जाते.
- केंद्रशासित प्रदेशाचा प्रशासक घटकराज्याच्या राज्यपालाप्रमाणे राज्यप्रमुख नसतो; तो राष्ट्रपतीचा प्रतिनिधी म्हणून कार्य करतो.
- काही केंद्रशासित प्रदेशांना नायब राज्यपाल तर काही केंद्रशासित प्रदेशांना मुख्य आयुक्त/प्रशासक असतात; हे पदनाम राष्ट्रपती ठरवतात.
- कलम 239 नुसार-



- राष्ट्रपती एखाद्या राज्याच्या राज्यपालाची नेमणुक लगतच्या केंद्रशासित प्रदेशाचा प्रशासक म्हणून करू शकतात. उदा. चंदिगड (पंजाबचा राज्यपाल-प्रशासक)
- राज्यपाल केंद्रशासित प्रदेशाचा प्रशासक म्हणून कार्य करत असताना त्या राज्याच्या मंत्रीमंडळाच्या सल्ल्याविना स्वतंत्रपणे तो काम करतो.
- राष्ट्रपती एका केंद्रशासित प्रदेशाच्या प्रशासकाची नेमणुक दुसऱ्या केंद्रशासित प्रदेशाचा प्रशासक म्हणून करू शकतात. उदा. दादरा नगरहवेली व दमण-दीवचा प्रशासक

काही केंद्रशासित प्रदेशासाठी विधानसभा-

1. पुदुच्चेरी- 14 वी घटनादुरुस्ती कायदा (1962) -कलम 238 A
   - या प्रदेशासाठी विधानसभा किंवा मंत्रिमंडळ किंवा दोन्ही निर्माण करण्याचा संसदेला अधिकार. हा कायदा कलम 368 अंतर्गत येत नाही.
   - यानुसार 'केंद्रशासित प्रदेशांचे शासन कायदा, 1963' संमत
   - पुदुच्चेरीसाठी निर्वाचित विधानसभा व मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाची तरतूद
   - विधानसभेत 30 प्रत्यक्षरित्या निवडून आलेले सदस्य असतात.
2. दिल्ली- दिल्ली या केंद्रशासित प्रदेशाला 1991 च्या 69 व्या घटनादुरुस्तीने विशेष दर्जा देण्यात येवून त्याचे नामकरण दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्र असे करण्यात आले.
   - याच घटनादुरुस्तीने कलम 239 AA , कलम 239 AB समाविष्ट
   - दिल्लीच्या प्रशासकाला नायब राज्यपाल हे पदनाम देण्यात आले.
   - याच घटनादुरुस्तीने (69 वी घटनादुरुस्ती) दिल्लीमध्ये विधानसभा व मंत्रीमंडळाची तरतूद करण्यात आली.
   - दिल्ली विधानसभेची सदस्य संख्या -70 (प्रत्यक्ष निवड)
   - दिल्ली विधानसभेची निवडणूक केंद्रीय निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येते.
   - दिल्ली विधानसभेला राज्यसुचीतील पोलीस, भूमी आणि सार्वजनिक सुव्यवस्था हे 3 विषय वगळता इतर सर्व विषयांवर कायदे करण्याचा अधिकार; तसेच समवर्ती सुचीतील सर्व विषयांवर कायदे करण्याचा अधिकार.
   - परंतु दिल्ली विधानसभेने केलेल्या कायद्यांच्या तुलनेत संसदेने केलेले कायदे वरचढ ठरतात.

दिल्ली मंत्रिमंडळ-

- मंत्रिमंडळ आकार- विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येच्या 10% म्हणजेच मुख्यमंत्री+6 मंत्री
- मुख्यमंत्र्यांची नेमणुक राष्ट्रपतीमार्फत व अन्य मंत्र्यांची नेमणूक मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने राष्ट्रपतीमार्फत.
- मंत्रीमंडळ सामुहिकरित्या विधानसभेला जबाबदार.

परिवर्तन Competitive Forum

- नायब राज्यपाल आपली कार्ये (स्वेच्छाधिकार वगळता) मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने पार पाडतात. नायब राज्यपाल व मंत्री यांत वाद झाल्यास ती बाब राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवणे व त्यानुसार कृती करणे बंधनकारक.
- विधानसभेच्या विरामकाळात राष्ट्रपतीच्या पूर्वसंमतीने नायब राज्यपाल अध्यादेश काढू शकतात.
- घटनात्मक यंत्रणा अपयशी ठरलयास कलम 239 AB नुसार राष्ट्रपती वरील तरतुदी निलंबित करून प्रशासनासाठी प्रासंगिक व आनुषंगिक तरतुदी करू शकतात.

केंद्रशासित प्रदेशाबाबत कायदे करण्याचा अधिकार-

- संसद सर्व केंद्रशासित प्रदेशाबाबत तिन्ही सूचीतील विषयांवर कायदा करू शकते.
- दिल्ली व पुदुच्चेरीसाठी विधानसभा असतानाही संसद राज्य सूचीतील विषयांवरही कायदे करू शकते.
- पुदुच्चेरी विधानसभा स्वतःसाठी राज्य व समवर्ती सूचीतील कोणत्याही विषयावर कायदे करू शकते.
- दिल्ली विधानसभा राज्य सूची (सार्वजनिक सुव्यवस्था, पोलीस व भूमी हे विषय वगळता) व समवर्ती सूचीतील कोणत्याही विषयावर कायदे करू शकते.
- दिल्ली व पुदुच्चेरीच्या नायब राज्यपालांना विधानसभेच्या विराम काळात अध्यादेश (राष्ट्रपतींकडून तशी सूचना प्राप्त झाल्यासच) काढण्याचा अधिकार.

राष्ट्रपतींचा विनियमने करण्याचा अधिकार-

- कलम 240 नुसार राष्ट्रपतींना अंदमान व निकोबार बेटे, लक्ष्यद्विप, दादरा-नगरहवेली व दमण-दीव या केंद्रशासित प्रदेशाच्या शांतता, प्रगती व सुशासनासाठी विनियमने करण्याचा अधिकार.

  (पुदुच्चेरी विधानसभा स्थगित किंवा विसर्जित केली असेल तर राष्ट्रपती ही विनियमने तेथे करू शकतात.)
- या विनियमनांना संसदीय कायद्याप्रमाणे शक्ती व प्रभाव प्राप्त असतो.
- याद्वारे केंद्रशासित प्रदेशांना लागू असणाऱ्या कोणत्याही संसदीय व इतर कायद्यांमध्ये राष्ट्रपती बदल करू शकतात तर काही रद्द करू शकतात.

केंद्रशासित प्रदेशासाठी उच्च न्यायालये- कलम 241

- सध्या दिल्ली हा स्वतंत्र उच्च न्यायालय असणारा एकमेव केंद्रशासित प्रदेश आहे.
- संसद एखाद्या केंद्रशासित प्रदेशाला शेजारील राज्याच्या हायकोर्ट च्या अधिकारक्षेत्रात समाविष्ट करू शकते.

केंद्रशासित प्रदेश	उच्च न्यायालय
1. दादरा नगरहवेली आणि दमण-दीव	मुंबई उच्च न्यायालय
2. चंदिगड	पंजाब, हरियाणा हायकोर्ट
3. पुदुच्चेरी	मद्रास हायकोर्ट
4. लक्षद्विप	केरळ हायकोर्ट
5. अंदमान-निकोबार	कलकत्ता हायकोर्ट

Competitive Forum

परिवर्तन
Competitive Forum

परिवर्तन

Competitive Forum

– अभिजीत राठोड

खालील विषयासाठी विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार स्वतंत्र बॅचेस

- अर्थव्यवस्था (पुर्व व मुख्य)
- राज्यव्यवस्था (संपूर्ण पेपर-2)
- मानव संसाधन विकास व मानवी हक्क
- मराठी
- इतिहास
- भूगोल
- चालू घडामोडी
- सामान्य विज्ञान व तंत्रज्ञान
- अंकगणित व बुद्धीमत्ता

– अभिजीत राठोड

उत्तम मोती बिल्डींग (दुसरा मजला), नागनाथपार–शनिपार रोड,
रमेश डाईंग जवळ, जनसेवा बँकेच्यावर, सदाशिव पेठ, पुणे–३०

9272100500

ग्रामपंचायत

- कायदा–1958 (मुंबई ग्रामपंचायत अधिनियम) कलम 5 मध्ये प्रत्येक गावासाठी एक ग्रामपंचायत स्थापन करण्याची तरतुद करण्यात आली आहे. परंतु एखाद्या गावामध्ये 600 लोकसंख्या असेल त्याठिकाणी गट ग्रामपंचायत स्थापन करण्याची तरतुद करण्यात आली आहे.
- लोकसंख्येनुसार ग्रामपंचायतीची सभासद संख्या–

600 ते 1500–7 सभासद
1501 ते 3000– 9 सभासद
3001 ते 4500– 11 सभासद
4501 ते 6000–13 सभासद
6001 ते 7500– 15 सभासद
7501 व त्यापेक्षा जास्त–17 सभासद

PARIVARTAN COMPETITIVE FORUM By-Abhijit Rathod CLASS NOTES

निवडणूक–प्रत्यक्ष प्रौढ गुप्त मतदान पद्धतीने राज्य निवडणुक आयोग घेते.

कार्यकाल–5 वर्ष

- विसर्जन–कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी राज्यसरकार विसर्जित करू शकते.

आरक्षण–

- महिलांना–50%
- अनुसूचित जाती/जमाती–लोकसंख्येच्या प्रमाणात
- इतर मागासवर्ग–27% (महिला50%)

ग्रामपंचायतीच्या सभासदांची पात्रता–

– तो भारताचा नागरिक असावा.
– त्याला 21 वर्ष पूर्ण झालेली असावीत.
– त्याचे गावच्या मतदार यादीत नाव असावे.

परिवर्तन Competitive Forum – अभिजीत राठोड

- **ग्रामपंचायतीचे विसर्जन**– विसर्जित झाल्यापासून सहा महिन्याच्या आत निवडणूक घेणे बंधनकारक आहे तिच्या राहिलेल्या कालावधीसाठी पुढे काम करणे.
- **सरपंच व उपसरपंच यांची निवड**– निवडून आलेल्या सदस्यांमधून ग्रामपंचायतीच्या पहिल्या सभेच्यावेळी केले जाते.
- सरपंच व उपसरपंचाचा कार्यकाल–5 वर्ष इतका असतो परंतु त्यापूर्वी ते आपला राजीनामा देतात.

राजीनामा–

– सरपंच– पंचायत समितीच्या सभापतीकडे देतो. –उपसरपंच– सरपंचाकडे.

निवडणुकीच्यावेळी वाद निर्माण झाल्यास–

- सरपंच–उपसरपंचाची निवड झाल्यापासून 15 दिवसांच्या आत जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करावी लागते व त्यांनी दिलेल्या निर्णयानंतर त्याविरोधी 15 दिवसांच्या आत विभागीय आयुक्तांकडे तक्रार करावी लागते.

अविश्वासाचा ठराव–

- सरपंच आणि उपसरपंचाची निवड झाल्यापासून 6 महिन्यांपर्यंत अविश्वासाचा ठरावा मांडता येत नाही व तो फेटाळला गेल्यास पुन्हा त्या तारखेपासून 1 वर्षापर्यंत मांडता येत नाही.
- **बैठक**– एका वर्षात 12 बैठका होतात. (म्हणजेच प्रत्येक महिन्याला एक)

- **अध्यक्ष–** सरपंच असतो नसेल तर उपसरपंच
- **तपासणी–** कमीत कमी विस्तारात अधिक दर्जाच्या व्यक्तीकडून तपासणी केली जाते.
- **अंदाजपत्रक–**सरपंच तयार कतो व त्याला मान्यता पंचायत समितीची घ्यावी लागते.
- **आर्थिक तपासणी–**लोकल फंड विभागाकडून केली जाते.

ग्रामसेवक/सचिव–

- **निवड–** जिल्हा निवडमंडळाकडून केली जाते.
- **नेमणूक–** मुख्य कार्यकारी अधिकार.
- **नजीकचे नियंत्रण–**गट विकास अधिकारी.
- **कर्मचारी–**ग्रामविकास खात्याचा वर्ग–3 चा

PARIVARTAN COMPETITIVE FORUM
By-Abhijit Rathod
CLASS NOTES

कामे–

- ग्रामपंचायतीचा सचिव म्हणुन काम करतो.
- ग्रामपंचायतीचे दफ्तर सांभाळणे.
- कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे.
- ग्रामपंचायतीचा अहवाल पंचायत समिती व जिल्हा परिषदेला देणे.
- व्हिलेज फंड सांभाळणे.
- ग्रामसभेचा सचिव म्हणुन काम पाहणे.
- ग्रामपंचायतीच्या बैठकांना हजर राहणे व इतिवृत्तांत लिहणे.
- गावपातळीवर बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणुन काम करणे.
- जन्म–मृत्यूची नोंद करणे.

परिवर्तन Competitive Forum – अभिजीत राठोड

ग्रामपंचायतीची कामे व विषय–

- कृषी
- समाज कल्याण
- जलसिंचन
- ग्रामसंरक्षण
- इमारत व दळणवळण
- सार्वजनिक आरोग्य व दळणवळण सेवा
- सामान्य प्रशासन
- **ग्रामसभा–** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 नुसार निर्मिती करण्यात आली आहे.
- बैठक–आर्थिक वर्षात (26 जानेवारी, 15 ऑगस्ट, 2 ऑक्टोंबर)
- **सभासद–** गावातील सर्व प्रौढ मतदार यांचा समावेश होतो.
- अध्यक्ष–सरपंच नसेल तर उपसरपंच
- ग्रामसेवकाची गणपूर्ती– एकूण मतदारांच्या 15% सभासद किंवा एकूण 100 व्यक्तींपैकी जी संख्या कमी असेल.

ग्रामपंचायतींची कार्ये–

- कृषी– जमीन सुधारणा, धान्य कोठारांची निर्मिती, कंपोष्ट खत निर्मिती, सुधारित बियाणांचा वापर, सुधारित शेती प्रोत्साहन.

- **पशु संवर्धन–** पशुधनाची काळजी, संकरीत गुराच्या पैदाशीसाठी प्रयत्न करणे, दुग्धोत्पादन वाढविणे, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करणे.
- **समाजकल्याण–** दारुबंदीस प्रोत्साहन, जुगार आणि अस्पृश्यता नष्ट करणे, महिला/बालकल्याणाच्या योजना लाभार्थीपर्यंत पोहोचविणे.
- **शिक्षण–** प्राथमिक तसेच माध्यमिक शिक्षणाची सोय करणे, गावाचा शैक्षणिक विकास.
- **आरोग्य–** सार्वजनिक विहीर, गटारे आणि परिसर स्वच्छ राखणे, शासकीय योजना राबविणे, शुद्ध जल पुरवठा.
- **रस्ते बांधणी–** रस्ते, पूल, साकव यांची बांधकामे करणे, सार्वजनिक बाग, क्रीडांगणे, सचिवालय बांधने.
- ग्रामोद्योग आणि सहकार–स्वयं रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे, कार्यकारी संस्था/पतपेढ्या स्थापने.
- **प्रशासन–**महसुलाची कागदपत्रे अद्ययावत करणे, सार्वजनिक मालमत्तेची नोंद ठेवणे, घरांची नोंद ठेवणे, जन्म, मृत्यू आणि विवाहाची नोंद ठेवणे, बक्षिसांची नोंद, अतिक्रमणे हटविणे.
- आपणास आवश्यक असलेली माहिती कोणत्या नोंदवहीत असते याबाबत ही माहिती.
- **गाव नमुना नंबर –1–** या नोंदवहीमध्ये भूमी अभिलेख खात्याकडून आकारबंध केलेला असतो, ज्यामध्ये जमिनीचे गट नंबर, सर्व्हे नंबर दर्शविलेले असतात व जमिनीचा आकार (ऍसेसमेंट) बाबतीत माहिती असते.
- **गाव नमुना नंबर–1 अ –** या नोंदवहीमध्ये वन जमिनीची माहिती मिळते. गावातील वन विभागातील गट कोणते हे समजते. तशी नोंद या वहीत असते.
- **गाव नमुना नंबर –1ब–** या नोंदवहीमध्ये सरकारच्या मालकीच्या जमिनीची माहिती मिळते.
- **गाव नमुना नंबर –1 क–** या नोंदवहीमध्ये कुळ कायदा, पुनर्वसन कायदा, सिलिंग कायद्यानुसार भोगवटादार यांना दिलेल्या जमिनी याबाबतची माहिती असते. सातबाराच्या उताऱ्यामध्ये नवीन शर्त असल्यास जमीन कोणत्या ना कोणत्या तरी पुनर्वसन कायद्याखाली किंवा वतनाखाली मिळालेली जमीन आहे असे ठरविता येते.
- **गाव नमुना नंबर –1 ड–** या नोंदवहीमध्ये कुळवहिवाट कायदा अथवा सिलिंग कायद्यानुसार अतिरिक्त जमिनी, त्याचे सर्व्हे नंबर व गट नंबर याबाबतची माहिती मिळते.
- **गाव नमुना नंबर 1 इ–** या नोंदवहीमध्ये गावातील जमिनीवरील अतिक्रमण व त्याबाबतची कार्यवाही ही माहिती मिळते.
- **गाव नमुना नंबर– 2–** या नोंदवहीमध्ये गावातील पूर्व बिनशेती (अकृषिक) जमिनींची माहिती मिळते.
- **गाव नमुना नंबर –3–** या नोंदवहीत इनाम जमिनींची नोंद मिळते.
- **गाव नमुना नंबर –4–** या नोंदवहीमध्ये गावातील जमिनीचा महसूल वसुली, विलंब शुल्क याबाबतची माहिती मिळते.
- **गाव नमुना नंबर 5–** या नोंदवहीत गावाचे एकूण क्षेत्रफळ, गावचा महसूल, जिल्हा परिषदेचे कर याबाबतची माहिती मिळते.
- **गाव नमुना नंबर 6–** (हक्काचे पत्रक किंवा फेरफार) या नोंदवहीमध्ये जमिनीच्या व्यवहारांची माहिती, तसेच खरेदीची रक्कम तारीख व कोणत्या नोंदणी कार्यालयात दस्त झाला याची माहिती मिळते.
- **गाव नमुना नंबर –6 अ–** या नोंदवहीमध्ये फेरफारास (म्युटेशन) हरकत घेतली असल्यास त्याची तक्रार व चौकशी अधिकाऱ्यांचा निर्णय याबाबतची माहिती मिळते.
- **गाव नमुना नंबा –6 क–** या नोंदवहीमध्ये वारस नोंदीची माहिती मिळते.
- गाव नमुना नंबर 6 ड– या नोंदवहीमध्ये जमिनीचे पोटहिस्से, तसेच वाटणी किंवा भूमी संपादन याबाबतची माहिती मिळते.
- **गाव नमुना नंबर–7–** (7/12 उतारा) या नोंदवहीमध्ये जमीन मालकाचे नाव, क्षेत्र, सर्व्हे नंबर, हिस्सा नंबर, गट नंबर, पोट खराबा, आकार, इतर बाबतीची माहिती मिळते.
- गाव नमुना नंबर–7 अ– या नोंदवहीमध्ये कुळ वहिवाटीबाबतची माहिती मिळते. उदा. कुळाचे नाव, आकारलेला कर व खंड याबाबतची माहिती मिळते.
- गाव नमुना नंबर– 8 अ– या नोंदवहीत जमिनीची नोंद, सर्व्हे नंबर, आपल्या नावावरील क्षेत्र व इतर माहिती मिळते.

Competitive Forum - अभिजीत राठोड

- **गाव नमुना नंबर– 8 ब, क व ड–** या नोंदवह्यांमध्ये गावातील जमिनीच्या महसूल वसुलीची माहिती मिळते.
- **गाव नुना नंबर –9अ–** या नोंदवहीत शासनाला दिलेल्या पावत्यांची माहिती मिळते.
- **गाव नमुना नंबर–10–** या नोंदवहीमध्ये गावातील जमिनीच्या जमा णालेलया महसुलाची माहिती मिळते.
- **गाव नमुना नंबर – 11–** या नोंदवहीमध्ये प्रत्येक गटामध्ये सर्व्हे नंबर, पीकपाणी व झाडांची माहिती मिळते.
- **गाव नमुना नंबर–12 व 15–** या नोंदवहीमध्ये पिकाखालील क्षेत्र, पडीक क्षेत्र, पाण्याची व्यवस्था व इतर बाबतीची माहिती मिळते.
- **गाव नमुना नंबर –13 –** या नोंदवहीमध्ये गावाची लोकसंख्या व गावातील जनावरे याबाबतचीमाहिती मिळते.
- **गाव नमुना नंबर –14–** या नोंदवहीमध्ये गावच्या पाणी पुरवठ्याबाबतची माहिती, तसेच वापरली जाणारी साधने याबाबतची माहिती मिळते.
- **गाव नमुना नंबर –16–** या नोंदवहीमध्ये माहिती पुस्तके, शासकीय आदेश व नवीन नियमावली याबाबतची माहिती मिळते.
- **गाव नमुना नंबर – 17–** या नोंदवहीमध्ये महसूल आकारणी याबाबतची माहिती मिळते.
- गाव नमुना नंबर –18– या नोंदवहीमध्ये सर्कल ऑफिस, मंडल अधिकारी यांच्या पत्रव्यवहाराची माहिती असते.
- **गाव नमुना नंबर–19–** या नोंदवहीमध्ये सरकारी मालमत्तेबाबतची माहिती मिळते.
- **गाव नमुना नंबर –20–** पोस्ट तिकिटांची नोंद याबाबतची माहिती मिळते.
- **गाव नमुना नंबर–21–**या नोंदवहीमध्ये सर्कल यांनी केलेल्या कामांची दैनंदिन नोंद याबाबतची माहिती मिळते.

परिवर्तन
Competitive Forum
– अभिजीत राठोड

उत्तम-मोती बिल्डींग (दुसरा मजला), नागनाथपार-शनिपार रोड,
रमेश डाईंग जवळ, सदाशिव पेठ, पुणे-३०

• अतिरिक्त नोट्समाठी
Telegram Channel-
@abhijitrathod Join करा.

9272100500

	2013		2014		2015		2016		2017		Total
	MPSC	PSI	MPSC	PSI	MPSC	PSI	MPSC	PSI	MPSC	PSI	एकुण.
- राज्य विधानमंडळ →				1 (5)							1/0
- पंचायत राज →	1 (91)	1 (107, 113)									1/2
- शहरी स्थानिक स्वराज्य संस्था →		1 (112)									1/1
- महाराष्ट्रातील पंचायत राज →	1 (90)	1 (116) 119, 120		1 (124)				1 (21)			1/4
- लोकसेवा →											—
- संघ लोकसेवा →	1 (90)						1 (75)				2/1
- राज्य लोकसेवा →		1 (108, 109)		1 (1)							0/2
- न्यायाधिकरणे →											
- निवडणूक आयोग →											—
- राजकीय पक्ष →											
- निवडणूका →	1 (30)			1 (2, 3)							1/1
- भाषा →											
- घटनेची परिशिष्टये / अनुसूची. →											-
- केंद्र-राज्य संबंध →		1 (103)					1 (88)				1/1
- आंतर-राज्यीय संबंध →											-
- केंद्रशासित प्रदेश →											
- जम्मु-कश्मीर →											-
- आणीबाणी. →	1 (58)									(60)	1/1
- लोकपाल, लोकायुक्त →	1 (94)			1 (4)							1/1
- राष्ट्रीय मानवी आयोग →			1 (1)								1/0
- न्यायालयीन पुनर्विलोकन					1 (73)						1/0
- महाभियोग →		1 (111)									0/1
- अल्पसंख्यांक —											0/1

Polity.

	2013		2014		2015		2016		2017		एकुण
	MPSC	PSI	MPSC	PSI	MPSC	PSI	MPSC	PSI	MPSC	PSI	
- घटना निर्मिती →											
- घटनेची ठळक वैशिष्ट्ये →											
- प्रास्ताविका →											
- संघराज्य व राज्यक्षेत्र →											
- नागरिकत्व →											
- मूलभूत हक्क →											
- मार्गदर्शक तत्वे →											
- मूलभूत कर्तव्य →											
- संघराज्य व्यवस्था →											
- घटना दुरुस्ती →											
- संघराज्य शासन कार्यकारी मंडळ →											
- राष्ट्रपती →											
- उपराष्ट्रपती →											
- पंतप्रधान →											
- केंद्रीय मंत्रीमंडळ →											
- भारताचा महान्यायवादी →											
- संसद →											
- भारताचे नियंत्रक, महालेखापाल →											
- न्यायव्यवस्था →											
- सर्वोच्च न्यायालय →											
- उच्च न्यायालय →											
- कनिष्ठ न्यायालय →											
- राज्यशासन कार्यकारी मंडळ →											
- राज्यपाल →											
- मुख्यमंत्री →											
- राज्यमंत्रिमंडळ →											
- राज्याचा महाधिवक्ता →											

Polity.

	2013		2014		2015		2016		2017		Total
	MPSC	PSI	MPSC	PSI	MPSC	PSI	MPSC	PSI	MPSC	PSI	एकुण
- घटना निर्मिती →											
- घटनेची ठळक वैशिष्टे →											
- प्रास्ताविका →											
- संघराज्य व राज्यक्षेत्र →											
- नागरिकत्व →											
- मुलभुत हक्क →											
- मार्गदर्शक तत्वे →											
- मुलभुत कर्तव्य →											
- संघराज्य व्यवस्था →											
- घटना दुरुस्ती →											
- संघराज्य शासन कार्यकारी मंडळ →											
- राष्ट्रपती →											
- उपराष्ट्रपती →											
- पंतप्रधान →											
- केंद्रीय मंत्रीमंडळ →											
- भारताचा महान्यायवादी →											
- संसद →											
- भारताचे नियंत्रक, महालेखापाल →											
- न्यायव्यवस्था →											
- सर्वोच्च न्यायालय →											
- उच्च न्यायालय →											
- कनिष्ट न्यायालय →											
- राज्यशासन कार्यकारी मंडळ →											
- राज्यपाल →											
- मुख्यमंत्री →											
- राज्यमंत्रिमंडळ →											
- राज्याचा महाधिवक्ता →											



MPSC / UPSC

परिवर्तन

Competitive Forum

- अभिजीत राठोड

Current Affair

चालु घडामोडी

दर रविवार सकाळी १०.३० वा.

भारत वार्षिकी : 2018
आर्थिक पाहणी
मनोरमा 2018
नवीन सरकारच्या योजना
क्रिडा घडामोडी
संसद, न्यायालयीन घडामोडी
लोकसंख्या रिपोर्ट
योजना, कुरुक्षेत्र, लोकराज्य
आंतरराष्ट्रीय संस्था, करार
इत्यादी...

Event Base...
Conceptual Approach
Admission Open...

अभिजीत राठोड

१०५१, उत्तम-मोती बिल्डिंग, नागनाथपार-शनिपार पार रोड
रमेश डाईंग जवळ, शिवम अभ्यासिकेशेजारी,
सदशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.

9272100500